म. ग्रं. सं. ठाणें

विषय

|हालय क्रमांक

लेखक गोविंद नारायण

सन

पुस्तकाचें नांव नीति संवाद

१२

सं.क्र.

# नीतिसंवाद.

निबंध

# ELEMENTS OF MORALITY.

# नीतिसंवाद

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे.

गोविंद नारायण

यांणीं

लोककल्याणार्थ रचिला.

त्याची दुसरी आवृत्ति.

सत्यातें जोडावें सुसंगासिपळनसोडावें ॥
पाशांतें तोडावेंधीरेंनकदापिपापजोडावें ॥१॥ मो०,

मुंबईंत

गणपतकृष्णाजी यांचे छापखान्यांत का० ग० यांचे
एक्सिक्युटर रा०सा०वि०ना० मण्डलिक
व गो०गं०फडके यांणीं छापून प्र०के०

सन १८६८.

नामदार बोर्ड आव् एड्युकेशनचे मेंबर, व ग्रांटमेडिकल कालेजांत वैद्यशास्त्र संपादन करून स्वदेशकल्याणार्थ तत्पर, व विद्यावृद्धि करण्यांत सतत झटणारे

# डाक्तर भाउदाजी

यांस

ग्रंथ कर्त्यानें

हा लहानसा ग्रंथ

प्रीतिपुरःसर

नजर केला असे.

# बालसभा.

मराठी ग्रंथ-संग्रहालय नं०

## नीतिसंवाद.

### नीतीविषयीं साधारण विचार.

कोणते पदार्थ खावे आणि कोणते न खावे हें समजून घेणें जसें रोग्यास अवश्य आहे, तसेंच आपली वर्तणूक कशी असावी आणि कशी नसावी हें समजून घेणें मनुष्यमात्रास आवश्यक आहे. मनुष्याचीं सर्व कर्तव्यकर्मे तीन प्रकारचीं आहेत, तीं अशीं.— १ आपला उत्पन्नकर्ता जो ईश्वर तत्प्रीत्यर्थ जीं कर्तव्यकर्मे तीं. २ स्वप्रीत्यर्थ जीं कर्तव्यकर्मे तीं. आणि ३ परप्रीत्यर्थ जीं कर्तव्यकर्मे तीं.

नीति आणि अनीति यांचा बोध मनुष्यास दुसऱ्याचीं कर्मे पाहिल्यावांचून व्हावा ह्मणून भगवंतानें त्यास इतर प्राण्यांसारिखीं कर्मेंद्रियें आणि ज्ञानेंद्रियें देऊन वाचा, बुद्धि आणि विवेकसंपन्न करून त्याच्या अंतःकरणांत नीतिदर्शक शक्ति ठेविली आहे. हा विशेष गुण त्याजमध्यें ठेवण्याचें कारण हेंच कीं, कोणत्याहि कर्मास प्रारंभ करायाच्या पूर्वीं तें कर्तव्य आहे किंवा अकर्तव्य आहे, ग्राह्य किंवा अग्राह्य आहे, याचा त्याला लागलाच बोध व्हावा. नीतिदर्शक शक्ति आणि विवेक हे मनुष्याच्या शरीरांत दोघे निःपक्षपाती न्यायाधीशांसारिखे सतत काम करीत असतात. तो किंचित् आड मार्गानें जाऊं लागला कीं, ते त्यास लागलाच सावध करून शुद्धीवर आणण्याचा प्रयत्न करीत असतात. ह्या अनुपम योजनेच्या योगानें मनुष्य दूषितकर्मांचा निषेध करण्यास समर्थ आहे. त्याणें तिच्या आणि विवेकाच्या बोधाकडेस मात्र लक्ष दिलें पाहिजे.

दुसऱ्याच्या वर्तणुकीकडे लक्ष न देतां आपण नीतीनें

वागावें हेंच मनुष्यास प्रधान आहे. तिरकुपशेठ सधन असून नीतीनें वागत नाहीं. सोकरजीस पांचशें रुपयांचा दरमहा असून तो सदसद्विचारी नाहीं. धोंडोपंत विद्वान् असून सुमार्गानें चालत नाहीं. धनजीशेट मोठा व्यापारी असून देवाचें भय बाळगीत नाहीं. पिपीन साहेब मोठ्या अधिकारावर असून आपल्या कर्तव्यकर्माकडे दुर्लक्ष करितो. शिवराम गीतापाठी असून अनाचारानें वागतो. असे पोकळ विचार करून आपण त्याप्रमाणें आपली वर्तणूक ठेवणें हें अविचारी मनुष्याचें आचरण आहे. ज्याच्या कर्मांचा तो अधिकारी हें ध्यानांत आणून आपापलें आचरण शुद्ध करीत जावें, हें मनुष्यमात्रास उचित होय. आणि जो कोणी आपल्या नीतिदर्शक शक्तीच्या प्रेरणेप्रमाणें वागतो त्यासच मनुष्य ह्मणावें. ज्यास नीति व अनीति समजत नाहीं तो नरपशु. पशूमध्यें आणि मनुष्यामध्यें हाच भेद कीं, मनुष्यास आपल्या इच्छा आणि वासना व इतर इंद्रियें आकलन करण्याची शक्ति आहे. हा गुण पशूमध्यें नाहीं, ते आपल्या इंद्रियांच्या स्वाधीन होऊन त्यांस त्यांचें आकलन करण्याचें सामर्थ्य नसतें. जो कर्तव्यकर्मांप्रमाणें आपली वर्तणूक ठेवीत नाहीं तो इहपरलोकीय सुखास नाडला असें समजावें. ईश्वर सर्वव्यापी, आणि सर्वज्ञ आहे ह्मणून अंतःकरणसाक्षी आहे असा दृढ निश्चय धरून आपल्या कर्तव्यकर्मांचा मनुष्यानें लहानपणापासून निर्बंध ठेविला पाहिजे. प्रारंभापासून वर्तनाचे नेम न ठेवितां जर मनुष्य सुस्तपणानें वागूं लागेल तर त्याच्या अंतःकरणांत जी नीतिदर्शक शक्ति न्यायस्थानीं बसलेली असत्ये, तिचा पराजय होऊन त्याच्या अंगीं जो पशुस्वभाव असतो त्याचें प्राबल्य होतें; ह्मणून

एक साधु अशी विनंति करतो, " अंतरींचा ज्ञानदिवा मालवूं नको, मालवूं नको. " ज्ञानदिवा हीच नीतिदर्शक शक्ति. नंतर तो इंद्रियांच्या व इच्छेचा स्वाधीन होऊन निरंतर त्यांची तृप्ति करण्याचेच उपाय शोधीत असतो. जो रसनेच्या स्वाधीन झालेला असतो, तो कोणताहि प्रकार करून चांगले पदार्थ खाऊन तीस निरंतर संतुष्ट करितो. ज्यास अलंकारभूषणें करून आपलें शरीर सुशोभित करण्याचा नाद लागलेला असतो, तो आपल्या सर्व बुद्धीचा व्यय करून तीं प्राप्त करून घेतो. ज्यास द्रव्य संपादन करण्याचा वेध लागलेला असतो, तो जसजशी संधी सांपडेल तसतसा आपल्या बुद्धीचा कल फिरवून आपलें कार्य साधून घेतो. ज्याच्या अंतःकरणांत सत्ता मिळविण्याचा अनुरोध बलवत्तर आहे तो आपलें वर्तन न्यायी किंवा अन्यायी आहे याजकडे लक्ष न देतां आपलें कार्य मात्र साधून घेतो. ज्याची इच्छा विषयभोगाकडेस लागलेली असती, तो दुसऱ्याच्या सुखदुःखांकडे न पाहतां हरयुक्ति करून आपल्या इच्छेची तृप्ति करीत असतो. अशा मनुष्यांच्या वर्तनांचा निर्बंध नाहीं. ते कोणत्या वेळीं नीतीनें वागतील आणि कोणत्या वेळीं अनीतीनें वागतील, याचा नेम नाहीं. जसजसा त्यांचा स्वार्थपर प्रसंग येईल त्याप्रमाणें ते आपलें वर्तन ठेवितात. अशाप्रकारचे मनुष्य मोठ्याच भयंकर स्थितींत आहेत असें समजावें. जसें एकादें जहाज तांडेलावांचून समुद्रांत लोटून दिलें असतां त्याचा सांभाळ करणारा कोणी नसल्यामुळें तें भरतीच्या लाटांच्या ओघाप्रमाणें, आणि वाऱ्याच्या मानाप्रमाणें इकडून तिकडे गचकळ्या खात खात भलत्याच बंदरास जाऊन लागतें, तसाच प्रकार बंधानें न चालणाऱ्या मनु-

त्याचा आहे. याजवर असें आर्यार्ध आहे. "मन हें ओढाळ गुरूं परधन परकामिनीकडे धांवे" ॥ यांतील रहस्य इतकेंच घ्यावें कीं, अशिक्षित मनुष्याच्या वांछा अज्ञाणी गुरासारिख्या अनिवार असतात, ह्मणून त्यांस ईश्वरभीतीच्या दावांत ठेविलें पाहिजे.

रंगनाथाचें असें पद आहे.

तोंवरि तळमळरे तळमळरे ।। नाहीं भक्तिवळरे ॥ धृ० ॥
विवेकजागा करिना॥जोंवरी शांति जिवीं दृढ धरिना॥१॥तोंवरि०

यांतील तात्पर्य इतकेंच कीं, ईश्वरभीति, विवेक आणि शांति जर मनुष्यास प्राप्त झाली नाहीं, तर जसा एकादा मनुष्य नवज्वराच्या दाहेंकरून तळमळतो, तसें त्याणें तळमळावें.

मनुष्याच्या वर्तनावरून त्याच्या स्वभावाचें अनुमान होतें. आपल्या इच्छा आणि वासना यांचा चांगला उपयोग करून सर्वकाळ मनास चांगल्या कर्मांचा व्यासंग लावण्याचा प्रयत्न करणें हा नीतिमान् मनुष्याचा मुख्य धर्म. निद्रा, आहार, भय, बुद्धि, विवेक, इच्छा, वासना, यांचा यथायोग्य उपभोग घेऊन आपलीं सर्व कर्में ईश्वरापाशीं रुजू होतील असें करण्यास झटलें पाहिजे. हाच त्याचा धर्म. ज्या कर्मांपासून ईश्वराचें गौरव आणि परोपकार होत नाहीं, तीं सर्व वर्ज आहेत असें समजून कुवासनांचा उपमर्द करावा.

नीतीनें वागलें असतां किती कल्याण होतें, आणि अनीतीनें वागलें असतां किती हानि होती, हें सर्व या ग्रंथांत संवाद रूपानें संक्षिप्त निवेदन केलें आहे. ज्या पात्रांच्या द्वारानें हा संवाद चालविला आहे, ते एका कर्मनिष्ठ गृहस्थाचे मुलगे आहेत. त्यांत रामचंद्र हा वडील आणि दीना हा धाकटा भाऊ. हा संवाद वाचून हे दोघे मुलगे उत्त-

रोत्तर नीतीची वृद्धि करितील, आणि लोकांमध्यें तिचा प्रसार करून सुशील व सुखी होतील, अशी पूर्ण आशा धरून हा ग्रंथ लिहिला आहे.

## संभाषण १.

**दीना**—दादा कांहीं दिवसांवर वर्तमानदीपिकेंत उपयुक्त ज्ञानप्रसारकसभेनें नीतीविषयीं निबंध लिहिण्याची जी जाहिरात लाविली होती, ती तूं वाचून पाहिलीस ? नीति या शब्दाचा अर्थ काय होतो, व अनीति कशास ह्मणावें, हें मला अजून चांगलें समजत नाहीं, तर तूं मला नीतीविषयींचे कसे काय नियम आहेत ते सांगशील तर बरें होईल.

**रामचंद्र**— होय, ती जाहिरात त्या दिवशीं मी वाचून पाहिली होती, परंतु तिजकडे मी फारसें लक्ष दिलें नव्हतें. आतां ज्या अर्थी तूं नीतीविषयीं समजून घेण्यास इच्छितोस त्या अर्थीं तुझी समजूत करणें मला भाग आहे. परंतु हें लक्षांत धर कीं, अर्धतासापेक्षां अधिक वेळ तुजबरोबर संभाषण करावयास मला अवकाश नाहीं, तर इतक्या वेळांत माझ्यानें तुझें जेवढें समाधान करवेल तेवढें करीन, यास्तव तूं एकाग्रचित्तानें ध्यान लाविलें पाहिजे. नीतिविषयींचे सर्व नियम जर तुला सांगायास बसेन, तर महिना चार महिने लोटले तरी संपणार नाहीं. हा विषय एवढा विस्तीर्ण असून मोठा अगत्याचा आहे.

**दी०**— बरें तर तुला अवकाश आहे तेवढ्यांत जितकें तुझ्यानें सांगवेल तितकें सांग, मी तें लक्षपूर्वक ध्यानांत ठेवीन.

**रा०**— नीति या शब्दाचा अर्थ तुला अगदीं सोपा करून सांगतों. नीति ह्मणजे चांगलें कर्म करायास लावणारी, अथवा नियमाप्रमाणें चालविणारी. आतां चांगलें कर्म कोणतें

ह्मणशील तर जीं कर्तव्यकर्में मनुष्यास ईश्वरानें लावून दिलीं आहेत, त्यांप्रमाणें वर्तणें; ईश्वरी नियमाबाहेर आपली वर्तणूक ठेविली ह्मणजे तो अनीतिमान झाला असें समजावें.

दा० कर्तव्यकर्में तीं कोणतीं ? मी बाळमित्र इसबनीति हीं पुस्तकें वाचलीं, परंतु त्यांत असला शब्द अजून मला अढळला नाहीं.

रा० कर्तव्यकर्में ह्मणजे मनुष्यमात्रास ईश्वरानें जे नियम लावून दिले आहेत तेच, दुसरें कांहीं नाहीं. जसें प्राणाचें आणि शरीराचें रक्षण होण्यास अन्नवस्त्र पाहिजे, तसेंच आत्म्याचें तारण, प्रपंचसुख व सुकीर्ति प्राप्त होण्यास ईश्वरी नियमाप्रमाणें आपली वर्तणूक ठेवणें अवश्य आहे. सर्व कर्तव्यकर्मांच्या तीन कोटी आहेत त्या अशा.

१ ईश्वर परमपवित्र, अतिन्यायी, परमदयाळू असून सर्वज्ञ, सर्वव्यापी आणि अनंतपराक्रमी आहे असें मानून त्याच्या आज्ञांचें पालन करून सर्वकाळ त्याची आराधना करणें, सत्य बोलणें, त्याला भिऊन वागणें, त्याणें जे नियम लावून दिले आहेत त्यांचें पालन करणें इत्यादि, हीं सर्व कर्तव्यकर्में आपणास आपला उत्पन्नकर्ता जो ईश्वर त्याविषयीं करावीं लागतात.

२ आपल्या वासना अणि आचरण यांचे निर्बंध ठेवणें, शांति, क्षमा, दया, हीं अंगीं असणें, अहंकार न करणें, सर्वांशीं लीनतेनें वागणें, आपल्या सर्व इंद्रियांचें दमन करणें, शरीर पवित्र ठेवणें, अधाशीपणा न करणें, आत्मस्तुति न करणें, आणि ज्या स्थितींत आपणास ईश्वरानें ठेविलें आहे, तींत तृप्त असणें; मिताहारी असणें, आणि शरीरप्रकृति चांगली ठेवणें, शरीरास व्यायाम देणें, हीं सर्व कर्तव्यकर्में स्वप्रीत्यर्थ आहेत.

३ आईबापांची सेवा करणें, सर्व चांगल्या वर्तणुकींत त्यांच्या आज्ञा पालन करणें, भाऊबंदांवर प्रीति करणें, व त्यांशीं प्रमाणिकपणानें वागणें, आपल्या बायकोशीं प्रमाणिकपणा ठेवणें, व तिजवर प्रीति करणें, आपल्या सोयऱ्या संबंध्याशीं स्नेहानें वागणें, शेजाऱ्याशीं, गरीबगुरिबाशीं, व मनुष्यमात्राशीं नीतीनें वागणें, त्यांचें कल्याण इच्छिणें, त्यांजवर उपकारकरणें, दुसऱ्यास न ठकविणें, चोरी न करणें, कोणास अपशब्द न बोलणें, कोणाची निंदा न करणें, दुसऱ्याचें अंतःकरण न दुखविणें, कोणाच्या शरीरास, अब्रूस व बुद्धीस उपद्रव न करणें, कोणी दुराचरणांत पडला असला तर त्यास सुमार्गास लावणें, कोणाचा खून न करणें, हीं सर्व कर्तव्यकर्में आपणास दुसऱ्याविषयीं करावीं लागतात. ह्या कर्तव्यकर्मांचें सार हेंच आहे कीं, जसें दुसऱ्यानें आपणास करावें असें आह्मी इच्छितों तसें दुसऱ्यास करणें.

दी० वर जीं कर्तव्यकर्में तूं सांगितलींस तीं मनुष्यासच लागतात, किंवा दुसऱ्या प्राण्यांसहि लागतात?

रा० पाह.— ईश्वरानें सुज्ञ आणि अज्ञ असे दोन प्रकारचे प्राणी उत्पन्न केले आहेत. आतां मनुष्य हा सुज्ञ आणि पशुपक्षी व इतर सर्व जीवजंतु हे अज्ञ आहेत. यांस कोणतींच कर्तव्यकर्में लागत नाहींत, त्यांस बऱ्या वाइटाचा इनसाफ ईश्वरापाशीं द्यावा लागत नाहीं. कारण त्यांस नीतिदर्शक शक्ति व विचार हीं दिल्हीं नाहींत. हा आपल्या दारापाशीं जो वाघ्या कुतरा नेहमी आळशासारिखा निजलेला असतो, आणि उगीच येणाऱ्याजाणाऱ्यावर भुंकतो, त्यास तूं उद्योग कां केला नाहींस ह्मणून ईश्वर शासन करणार नाहीं. परंतु जर तूं शाळेंत न जातां आळशी होऊन दुष्ट लोकांच्या संगतींत फिरूं लागलास तर देव तुझी

त्याविषयीं झडती घेईल, आणि तुझ्या दुर्गुणांचें फळ तुला प्राप्त होईल. तसेंच ही माजर आपलीं पिलें खात्ये ह्मणून ती बाळहत्येची दोषी होत नाहीं, परंतु जर एखादी अनाचारी स्त्री आपल्या मुलास जिवी मारील, तर ती बालहत्येचो दोषी होऊन घोर नरकांत जाईल. ईश्वर न्यायी आहे ह्मणून ज्यास जसें दिलें आहे तसें त्याजकडून घेतो. मनुष्यास ज्ञान, बुद्धि, वाचा, हीं दिल्हीं आहेत, ह्मणून तो न्यायास पात्र आहे. इतर प्राणी अज्ञ आहेत ह्मणून त्यांस न्यायाचें भय नाहीं.

**दा०** दादा, तूं नुकतेंच सांगितलेंस कीं, जसें दुसऱ्यानें तुला करावें, असें तूं इच्छितोस, तसें तूं दुसऱ्यास कर. तर या वाक्याचा अर्थ मला बराबर समजला नाहीं, यास्तव हें वाक्य स्पष्ट करून सांगशील तर माझी कांहीं खात्री होईल.

**रा०** दुसऱ्यानें जसें तुला करावें असें तूं इच्छितोस तसें तूं त्यास कर. या वाक्याचा अर्थ इतकाच कीं, तूं दुसऱ्याचें वाईट करूनको. तुझी कोणी निंदा करावी, व तुला ठकवावें, असें तूं इच्छित नाहींस, तर तूं दुसऱ्यांची निंदा करूं नको, व त्यांस ठकवूंनको. जसें तूं रोगी झालास तर लोकांनीं तुझा परामर्ष घ्यावा, औषध उपाय करून तुला बरें करावें, असें तूं इच्छितोस, तसें दुसरे लोक दुखणेकरी झाले तर तूं त्यांचा समाचार घ्यावास, आणि त्यांस बरें करण्यास उपाय करावेस. पाह, जर तूं नारायणाच्या घरीं गेलास तर त्यानें तुझा सन्मान करावा असें तूं इच्छितोसना? तर जेव्हां नारायण तुझ्या घरीं येईल तेव्हां तूं त्याचा परामर्ष घ्यावास व त्याजकडे ममतेनें वागावेंस. जर तूं त्यास दारांतून हांकून लाविलेंस, तर तोहि तुला हांकून लावील. अशी वर्तणूक ठेवल्यानें अनाचाराची मात्र वृद्धि होईल, आणि

परस्परांचा स्नेह राहणार नाहीं, ह्मणून ईश्वरानें असा नियम लावून दिला आहे.

दी० बरें तें मी समजलों, परंतु आपले चाकर व गरीब लोक असतील त्यांमध्यें वागायास आपणास फारशी नीति नको.

रा० वाहवा, जें एवढावेळ तुला सांगितलें तें काय सगळें उपड्या घड्यावर पाणी घालावें, त्यासारिखें व्यर्थ गेलें? चाकरांशीं व गरीब लोकांशीं वागायास तर आपणास नीतीचें अधिक अगत्य आहे. मातबर लोकांत आपली बडेजाव होण्यासाठीं व मोठेपणाचा डौल मिरविण्यासाठीं कोणी नीति दाखवीलच; परंतु गरीबगुरिबापाशीं नीतीनें वागायास मोठें पारमार्थिक धैर्य व ईश्वरभीति पाहिजे. आणि त्यांजपाशीं जो नीतीनें वागतो, तोच नीतिमान् ह्मणावा. जर आपल्या चाकरांशीं आपण अनीतीनें वागलों तर ते आपणांवर प्रीति करणार नाहींत, व आह्मांस हरयुक्तीनें ठकवितील. दुसरें, जर आपण त्यांशीं न्यायानें वागलों नाहीं तर ते गरीब लोक विनाकारण ठकले जातील. पाहू, आपला गरीब गंग्या सगळा दिवसभर श्रम करितो, त्यास जर आपण सुखाचा शब्द दिला नाहीं, तर त्यास किती वाईट वाटेल; व त्याच्या शक्तिबाहेर त्याजकडून काम करून घेतलें तर त्यास तें कसें सहन होईल? एखादा दिवस तो आजारी असून जर आपण त्याजकडून काम करून घेतलें, व तें न केलें असतां त्याचा मुशारा कापिला, तर आपण ईश्वरी न्यायापुढें किती अन्यायी होऊं. आपण जेव्हां आजारी असतों, तेव्हां धन्याकडून बरावर मुशारा घेत असतां आपल्या चाकरास याप्रमाणें दुःख दिलें तर तें अतिपवित्र ईश्वरास कसें सहन होईल?

नीति ही सर्वकाळ आणि सर्वप्रसंगीं सारिखी असून मनु-

ष्यास तिजप्रमाणें वागणें भाग आहे. विद्या आणि धन यांपेक्षां नीतीची योग्यता विशेष आहे. आणि ज्या मनुष्यास विद्या, धन आणि नीति हीं तीनहि सारिखीं आहेत, तो पुरुष या जगांत धन्य आहे. पाहा, कित्येक मनुष्यांची कीर्ति केवळ त्यांच्या चांगल्या कृत्यांवरूनच दिगंतरीं गेली आहे. धर्मराजाचें नीतिवैभव याप्रमाणें पुराणांत वर्णिलें आहे:—

पांडवां ऐसे महाराज जगीं थोडे ॥
त्रिभुवनीं पाहातां नाहीं तयासीं जोडे ॥
श्रेष्ठ हा धर्म सत्वाचा सागर ॥
परवनिता माता परद्रव्य पाषाण ॥
परपीडा वारी देऊनि आपला प्राण ॥

एथें धर्मराजाच्या विद्वत्तेविषयीं अथवा संपत्तीविषयीं कांहींच दर्शविलें नाहीं केवळ त्याचे सद्गुण मात्र वर्णिले आहेत. असाच इंग्लंड देशांत जगन्मित्र हवार्ड होऊन गेला, तो तर फारच नीतिमान् असून लक्षावधि लोकांचें त्याणें कल्याण केलें.

**दी०** नीति फार चांगली आहे अशी आतां माझी पूर्ण खात्री झाली.

**रा०** असो, तुझी मजकडून नीतिविषयीं कांहीं तरी समजूत झाली हें पाहून माझें समाधान झालें.

---

## संभाषण २.

**दीना**—चोरीकरणें, दुसऱ्यास ठकविणें, अभद्र शब्द बोलणें, लांच घेणें, असत्य बोलणें, दुसऱ्यास दुःख देणें, येणेंकरूनच आपण परस्परांवर अनाचार केल्याचे दोषी होतों. याशिवाय दुसरी अनीति कांहीं राहिली नसेल.

**रामचंद्र**— अनीतीचे प्रकार पुष्कळ आहेत. दुसऱ्याच्या

अब्रूस दूषण लावणें, एकाद्याचें विनाकारण अंतःकरण दुखविणें, कोणी आपल्या घरीं आला असतां त्याचा सन्मान न करणें, एकाद्यास अपशब्द बोलणें इत्यादि, अनीतीचा दोष लागण्याचे अनेक प्रकार आहेत. ते मी तुला कोठवर सांगत बसूं? वाईट कोणतें व बरें कोणतें याचा आपणास लागलाच बोध व्हावा, ह्मणून ईश्वरानें आपल्या अंतःकरणांत नीतिदर्शक शक्ति ठेविली आहे, तेणेंकरून आह्मांस कर्तव्य कोणतें व अकर्तव्य कोणतें याचा बोध होतो. जेव्हां मनुष्य एकादें वाईट काम करितो तेव्हां त्याचा त्याला पश्चात्ताप होतो; त्यास साधारण लोक "त्याचें मन त्याला खातें" असें ह्मणतात. तीच नीतिदर्शक शक्ति आणखी दुसरें कांहीं नाहीं. यास मन, अंतःकरण अशींहि नांवें आहेत.

दी० त्या दिवशीं जगन्नाथ दादा माडीवर बीजगणिताचा धडा करीत बसला असतां मी जाऊन काकास सांगितलें कीं, तो खेळत बसला आहे. त्यावरून काकानें त्यास तूं आळशी आहेस असें बोलून धमकाविलें, तर त्यास छळावें ह्मणून सहज काकास मी सांगितल्यावरून अनीति केलीशी झाली कीं काय?

रा० यांत काय संशय? जगन्नाथ दादा उद्योग करीत असतां तो आळशी आहे, असें तूं सांगितलेंस त्यावरून तुजवर एक तर लबाडीचा आरोप आला, आणि दुसरा विनाकारण जगन्नाथ दादाच्या अब्रूस दोष लाविलास, यास्तव या गोष्टींत तुजकडेस खोट्या आरोपाचा दोष लागला. नीतिमान् आहेत ते मस्करींतहि अनीतीचें भाषण करीत नाहींत. कारण "नानृतात्पातकंपरं" असें वचन आहे. दुसरें असें वचन सांपडतें कीं, "सत्कर्म योगें वय घालवावें,

सर्वांमुखीं मंगल बोलवावें." यास्तव जें तूं केलेंस, तें ठीक नव्हे.

दी० बरें आळशी होणें यांतहि अनीति आहे काय?

रा० यांत काय भ्रांति! परम दयाळू ईश्वराची मनुष्यास अशी आज्ञा आहे कीं, तूं श्रम करून खा. आणि याप्रमाणें त्यास शरीरसंपत्ति व बुद्धि हीं दिल्हीं आहेत. आणि असें असतांहि जर तो आळशी व निरुद्योगी झाला तर तो अर्थात् अनीतिमान् झाला. नीतीचा पूर्णपणा ईश्वरामध्यें आहे, आणि मनुष्य त्याचा न्यायाचें पात्र आहे. मनुष्य निरुद्योगी असला ह्मणजे त्याच्या अंतःकरणांत अनेक पापकर्मांच्या वासना येऊन तो दुराचरणांत पडतो, ह्मणून ईश्वरानें असा नियम केला आहे कीं, कोणी आळशी होऊं नये.

दी० व्यापार अनीतीवांचून होत नाहीं, असें कित्येक लोक सांगतात, तर व्यापार करणें हें वाईट आहे असें मला वाटतें. कारण, पाहा, बाजारांत भाट्ये, मारवाडी, वाणी, किती तऱ्हेच्या लबाडया करितात, आणि दुसऱ्यापासून पैका ठकवून घेतात, आणि ते तेणेंकरून मोठे मातबर झाले आहेत.

रा० दीना ऐक. कोणताच धंदा मुळचा वाईट नाहीं. व्यापारांत व सर्व प्रकारच्या व्यवहारांत नीतीनेंच वागलें पाहिजे. नीतीवांचून गत्यंतर नाहीं. मोठमोठाल्या पेढ्या व हुंड्या चिट्ठ्या यांचा व्यापार नीतीवांचून कांहींच चालणार नाहीं. पाहा, मुंबईंत व इतरदेशांत कित्येक नामांकित व्यापाऱ्यांच्या पेढ्या व दुकानें नीति आहे ह्मणूनच चाललीं आहेत. नाहीं तर व्यापार अगदींच बुडाला असता. मनुष्य आपल्या कुवासनांनीं कोणत्याहि धंद्यास बट्टा आणितो. अनीतीनें वागणारास लोकांमध्यें मान नसून परलोकीं हि त्याचे हाल होतात. एकादा व्यापारी लबाड असें समजल्यावर

फिरून त्याच्या दुकानावर कोणी जात नाहीं. मग अर्थी-तच त्याचा व्यापार बुडतो. फ्रेंच लोक अमेरिकेंत जाऊन व्यापार करून पुष्कळ द्रव्य कमावीत असत, परंतु एकवेळ एका व्यापाऱ्यानें तेथील कित्येक भोळया व्यापाऱ्यांस असें सांगितलें कीं, बंदुकेच्या दारूचें बीं आपणापाशीं आहे, तें जर तुह्मी खरीद करून घ्याल, तर तुह्मास फार नफा हो-ईल. ह्या त्याच्या सांगण्यावरून त्या निष्कृत्रिम लोकांनीं दारवेच्या पेट्या खरीद केल्या, आणि पावसाळ्यांत जमीन चांगली नांगरून तींत तें दारुरूप बीं पेरिलें, आणि पिका-ची आस्था धरून प्रति दिवशीं रोंप कसें येतें तें पाहायास मोठ्या उत्कंठेनें शेतांत जात असत; परंतु जमिनींत पेरि-तांच ती दारू नासून गेली, आणि त्यांचा सर्व पैका मातींत गेला. तेणेंकरून ते गरीब लोक अगदीं बुडाले. तेव्हां-पासून त्या व्यापाऱ्यांनीं असा निश्चय केला कीं, त्यां बरोबर फिरून कधीं व्यापार करूं नये. तेणेंकरून त्या फ्रेंच व्यापाऱ्यांची फार नासाडी झाली. अनीतीनें संपा-दन केलेलें द्रव्य कसें लयास जातें याविषयीं.

## श्लोक.

अन्यायोपार्जितंद्रव्यं दशवर्षाणितिष्ठति
प्राप्तेएकादशेवर्षेसमूलंचविनश्यति १

आतां व्यापारांत नीतीनें वागलें असतां किती लाभ हो-तात ते पाहा. काशींत एक तूप विकणारा वाणी आहे ह्मणून सांगतात, तो एवढा प्रमाणिक आहे कीं, लोक तूपा-चीं भांडीं व पैसे चाकरापाशीं देऊन त्याच्या दुकानावर पाठवून देतात, मग तो जसा दर असेल, त्याप्रमाणें बराबर वजन करून त्यांस उत्तम प्रतीचें तूप पाठवून देतो. असें सांगतात कीं, याच्या दुकानावर नेहमी शेंपन्नास तुपाची

भांडीं पडलेलींच असतात. जर याचें दुकान बंद झालें तर त्याचें गिराईक, तपावांचून राहातें, परंतु दुसऱ्याच्या दुकानावर जात नाहीं. याप्रमाणें गिराईक आपणापाशीं आणण्यास व्यापाऱ्यास नीतीची आवश्यकता आहे.

इंग्लंड देशांत एक नीतिमान् व्यापारी असे तो सदूसद्विवेकी असून लक्षावधि रुपये धर्मकृत्यास लावी. कधीं कधीं तो असें अलौकिक कृत्य करीत असे कीं, जर त्याणें एखाद्या व्यापाऱ्याकडून स्वस्त दरानें माल घेतलेला असला आणि त्याचा भाव फारच वाढून आपणास पुष्कळ नफा झाला, तर त्यांतून कांहीं द्रव्य ज्या धन्याकडून माल घेतलेला असेल त्यास देत असे. पाहा, हा केवढा उदारपणा आणि प्रमाणिकपणा! असें करीत असे ह्मणून त्यास पैका कमी मिळाला होता असें नाहीं. उलटा त्याचा व्यापार वाढून त्यास अतोनात पैका मिळाला. त्याणें लक्षावधि रुपये धर्मकृत्यास लावले व अद्यापहि याचा धर्मादाय चालला आहे. यास्तव सर्व व्यवहारांत मनुष्यास नीतीसच अवलंबून असलें पाहिजे.

**दी०** जे अनीतीनें चालतात त्यांस मेल्यानंतर देव शासन करितो, मला वाटतें कीं, जिवंत असतां त्यास कांहीं शासन होत नाहीं.

**रा०** जे लोक अनीतीनें चालणारे अहेत त्यांस देव जिवंतपणींच बहुधा थोडें बहुत शासन करितो; आणि मेल्यानंतर त्यांस जसें असावें तसें पूर्ण शासन होतें. चोर, खुनी, जुगारी, लुच्चे हे सांपडले असतां त्यांस सरकारांतून कांहीं तरी शासन होतें. जे दुर्गुणी, व्यसनी, अधाशी, मद्यपी, व कैफी असतात, त्यांस अनेक तऱ्हेचे रोग होऊन ते दुःख भोगून अल्पायुषि होऊन मर-

नात. हेंच त्यांला या लोकीं शासन. एकद्या मुलानें तारुण्य आळसांत घालविलें, आणि उधळेपणानें वागला, तर अर्थातच पुढें त्याचे खाण्यापिण्याचे सर्वप्रकारें हाल होतात. त्या दिवशीं एक मनुष्य आमचे घरीं येऊन बांकेवर बसला होता, आणि काकाजवळ एक दिडकी मागत होता त्याची तुला आठवण आहे ? तो मनुष्य एका सधन गृहस्थाचा मोठा लाडका मुलगा होता, ह्मणून बापानें त्याचें लहानपणींच लग्न केलें होतें. परंतु ज्या वेळीं बाप त्याला शाळेंत पाठवी त्या वेळीं त्याणें खेळायास जावें. ख्यालीखुशाली व अनेक तऱ्हेचे कैफ करावे. शेवटीं तो चोऱ्या देखील करूं लागला. जेव्हां बापास त्यापासून फारच उपद्रव होऊं लागला तेव्हां त्यास घरांतून हांकून लाविला. आतां त्यास दारांत देखील कोणी उभा करीत नाहींत. त्याच्या अंगावर फाटकी चिंधी देखील सांपडायाची मुष्कील पडली आहे. याप्रमाणें दुराचरणी लोकांचें एथें हाल होतात. या पलीकडे दुसरें शासन कोणतें राहिलें आहे ! कित्येक व्यसनी लोकांचे पाय धरतात, नाकें जातात, घाटीस छिद्रें पडतात, अशी त्यांस शिक्षा होत्ये. कित्येकांस शरीरदुःख न झालें तरी अंतःकरणाचें दुःख होत असतें.

**दी०** मला असें वाटतें कीं, बहुतकरून अनीति रागापासून होती. यास्तव आपण रागास मारून टाकून नाहींसा करावा ह्मणजे आपलें अंतःकरण निर्मळ होईल.

**रा०** वाहवा ! बरें सांगतोस. मनुष्यानें शत्रूपासून आणि पापापासून आपलें रक्षण करावें ह्मणून ईश्वरानें त्यास राग आणि भय हीं दोन मुख्य आयुधें दिलीं आहेत. तींच जर त्याजकडून नष्ट झालीं तर मग आपलें रक्षण करायास त्याजकडे काय हत्यार राहिलें. जसें सत्य बोलणें अवश्य

आहे, तसेंच जर कोणी दुराचरण केलें तर त्याजवर रागें भरणें, त्यास धमकाविणें, व त्याच्या दुराचरणाचा तिरस्कार करून त्यास सन्मार्गांत आणणें, आवश्यक आहे. पापाची भीति बाळगून त्यापासून दूर राहणें, अनाचारी लोकांस ईश्वर शासन करितो, हें लक्षांत आणून त्याच्या दंडाची दहशत बाळगून आपलीं कर्मँ निर्मळ ठेवणें, हें मनुष्यमात्राचें कर्तव्यकर्म आहे, तें या दोन तत्वेंकरून साध्य होतें. तूंच पाहा, राग आणि भय हीं मनुष्यास किती उपयोगी आहेत. अपल्या कुटुंबांतील मनुष्यें अनीतीनें वागत असली आणि जर आपण त्यांजकडे लक्ष न देतां त्यांच्या दुराचरणाकडे पाहून थंडेथंड बसलों आणि पापाची भीति त्यांस न दाखविली तर कुटुंबांत किती अनाचार होईल ? मुलें चोरी, चहाडी, कैफ, असे अनाचार करूं लागतील आणि घरांत सर्वप्रकारें अव्यवस्था होऊन पृथ्वीवर अनाचार माजेल. सारांश, राग आणि भय हीं मनुष्याचीं हत्यारें आहेत. त्यांचा त्याणें सांभाळ करून कारणपरत्वें उपयोग केला पाहिजे. जसी तरवार शिकिल करून म्यान्यांत घालून ठेवितात त्याप्रमाणें ह्या दोन्ही तत्वांचें रक्षण केलें पाहिजे. केवळ रागाच्याच स्वाधीन होऊंनये. त्यास तरवारीप्रमाणें आपल्या स्वाधीन ठेवून गरज लागेल तेंव्हां त्याजकडून काम करून घ्यावें. अल्प स्वल्पकारणांवरून ज्यावर त्यावर विनाकारण रागें भरणें हें महा दोषी आहे. तसेंच ज्यास अनचार पाहून तिरस्कार येत नाहीं तोहि दोषी आहे, अशा पुरुषाची प्रतिमा केवळ दगडासारिखी असें समजावें.

## संभाषण ३.

**दीना**— दादा, अनीतीचे भयंकर परिणाम आणि नीती-

चीं कल्याणकारक फळें पाहून मला तर असें वाटतें कीं, सर्वकाळ नीतीनेंच वागावें, जेणेंकरून मला लोकांमध्यें मान मिळून मजवर देवाची कृपा होईल. बरें; हल्लीं आपल्या लोकांत नीतीची वृद्धि होऊन अनीतीचा नाश व्हावा म्हणून कोणी प्रयत्न चालविले आहेत काय ?

**रामचंद्र**- अनीतीचा नाश व्हावा म्हणून अलीकडे बहुतेक सुज्ञ व परोपकारी विद्वान लोकांनीं प्रयत्न चालविले आहेत. सरकार देखील या कामाचा कळवळा बाळगितें.

**दी०** अनीतीचा नाश होऊन नीतीचा प्रसर होण्यास त्यांणीं कोणकोणते प्रयत्न चालविले आहेत ते मला सांग.

**रा०** सांगतों ऐक. सरकारानें व दुसऱ्या लोकांनीं शाळा घातल्या आहेत. आणखी मुलींसहि विद्या शिकविण्याचा क्रम चालविला आहे. आमच्या कित्येक विद्वान लोकांनीं पुस्तकालयें स्थापिलीं आहेत. कित्येक सभा स्थापिल्या आहेत. त्यांचीं नावें उपयुक्तज्ञानप्रसारकसभा, ज्ञानवर्धकसभा, सद्गुणवर्धक सभा, परोपकारप्रसारकसभा, इत्यादि. ह्या ठिकाणीं आठवड्यांत एक दोन वेळ व पंधरवड्यांत एक वेळ जसजसे त्यांचे नियम असतील त्यांप्रमाणें विद्वान् लोक जमून एकेक चांगल्या विषयावर संभाषण करितो, व निबंध लिहून ते तेथें वाचितात. याप्रमाणें लोकांचीं मनें सुमार्गाकडे लावायास अनेक उपाय करितात. सरकार व परोपकारी श्रीमंत लोक आपापल्या पदरचा पैका खर्चून नूतन नीतिपर निबंध करवून छापवून प्रसिद्ध करितात.

**दी०** वा: हें त्यांचें काम मोठें स्तुतीस योग्य आहे, परंतु शाळा ह्या केवळ विद्या शिकविण्याकरितां घातलेल्या आहेत, त्यांत नीतीचा संबंध काय आहे ?

रा० विद्या शिकविण्याचा मुख्य उद्देश हाच कीं, लोकांस ज्ञान प्राप्त होउन ते सद्गुणी व सुशील व्हावे. विद्या शिकून जर मनुष्य सद्गुणी झाला नाहीं, तर विद्या कांहीं कामाची नाहीं. मोठा विद्वान् असून तो मद्यपी, दुराचरणी, दुर्व्यसनी, असला तर त्याच्या विद्येस काय आग लावावी ? तुला ठाऊकच आहे कीं, विद्या शिकवायास प्रारंभ करते वेळीं प्रथम पंतोजीचे सद्गुण पाहून त्याचे स्वाधीन मुलगा करितात. मग जीं चांगलीं पुस्तकें असतील तींच मुलांस वाचायास देतात. मुलांस शिकवायाचीं पुस्तकें तपासायासाठीं सरकारानें वेगळेच पंच नेमले आहेत. ते जीं पुस्तकें पसंत करितील तींच पुस्तकें सरकारी शाळांत शिकवितात. मोठमोठाल्या हुद्याच्या जागा केवळ विद्याच पाहून देत नाहींत. बहुधा विद्येपेक्षां त्यांच्या सदाचरणाकडे अधिक पाहतात. मनुष्याच्या अंगीं विद्येपेक्षां किमानपक्ष दुपटीनें सद्गुण असले पाहिजेत, तरच त्यास विद्येचें भूषण होतें.

दी० मुलींस विद्या शिकवून काय उपयोग ? पुरुषांनीं शिकली ह्मणजे झालें. बायकांस विद्या शिकून काय कारभार करावयाचा आहे ?

रा० बायकांस सरकारी कारभार करायाचा नाहीं, ही गोष्ट खरी आहे. परंतु त्यांस याहूनहि मोठा कारभार चालवावा पडतो. मनुष्याचें कुटुंब हें एक लाहानसें शहर आहे. त्याचा कारभार स्त्रियांस करावा पडतो. कुटुंबामध्यें बायको ही राणी आहे. आणि तिची जसी वर्तणूक असेल त्याप्रमाणें घरांतील इतर मनुष्यें वागतात. स्त्री ही नवऱ्याचा परम सखा असें मानलें आहे. तीच जर अनाडी असली तर मग घरांत स्वस्थपणा कोठून राहील ?

घरांत निरंतर कज्जे, तंटे होऊन संसाराची नासाडी होईल. मुलांस सुशिक्षा न लागल्यामुळें तीं दुर्गुणी होतील. यास्तव मुलींस शिकवायाचा प्रयत्न मांडिला आहे. अतां त्या लहान मुली आहेत खऱ्या, परंतु पुढें कांहीं वर्षांनीं त्या मोठ्या होऊन त्यांच्या हातांत कुटुंबाचा कारभार येईल, त्या वेळीं विद्या शिकल्यानें काय लाभ झाले आहेत हें ध्यानांत येईल. वाचायास व लिहायास आल्यावांचून चांगली नीति समजणें कठीण.

दी० नीतीची वृद्धि होण्यास याशिवाय कोणते उपाय त्यांणीं योजिले अहेत?

रा० नीतीवर अनेक तऱ्हेचे ग्रंथ करवून छापिले आहेत. दारू व इतर मादक पदार्थ ज्यांपासून अनीतीची वृद्धि होती, ते विकायास प्रतिबंध असावा ह्मणून सरकारांत कित्येक सुज्ञ लोकांनीं अर्ज्या केल्या आहेत. कोणी लांच घेतला, जुगार खेळला व कुकर्म केलें तर सरकार त्यास योग्य शिक्षा करितें. याचें कारण नीतीची वृद्धि होऊन अनीतीचा क्षय व्हावा. होळीच्या सणांत अभद्र भाषण होतें, तेणेंकरून लोकांचीं मनें बिघडतात ह्मणून रस्त्यांत अपशब्द काढण्याची मनाई केली आहे. तसेंच बीभत्स चित्रें विकूंनयेत व अवाच्य पुस्तकें छापून प्रसिद्ध करूं नयेत, असा सरकारानें अलीकडे कायदा केला आहे.

दी० आमच्या लोकांचीं मनें अलीकडे तर बरींच चांगल्या कृत्याकडेस लागलीं आहेत; परंतु हीं त्यांचीं सर्व कामें सिद्धीस जातील?

रा० होय, जातील यांत संशय नाहीं, परंतु अशीं कामें ह्मटलीं ह्मणजे एका दोघांचीं किंवा पांच दहा मनुष्यांचीं नाहींत. यांस पुष्कळांनीं मदत केली पाहिजे, व त्यांजकडे

सर्वांनीं झटलें पाहिजे. जर अविचारी लोक भलत्याच कल्पना काढून सुधारणुकीच्या व नीतीच्या कामांत अडचणीआणून बिघड पाडूं लागले तर मग आपल्या देशाचें कल्याण होणें कठीण. यास्तव सुज्ञ लोकांनीं पारमार्थिक धैर्याच्या बळानें अल्पज्ञानी व वितंडवादी लोकांचें भय न बाळगतां ज्या कामास आपण एकदां मन घातलें आहे, तें सहनशीलतेनें सिद्धीस न्यावें, ह्मणजे कोणत्या गोष्टीस अडचण पडणार नाहीं. असें काम धीटपणानें एकदां सुरू केलें ह्मणजे कांहीं दिवसांनीं तेंच लोकांस मान्य होऊन मग कुतर्क काढणाऱ्या लोकांचीं तोंडें सहज बंद होतात.

---

## संभाषण ४.

**दीना**--हल्लीं सुज्ञ लोकांनीं नीतीचा प्रसर होण्यास जे जे उपाय चालविले आहेत, ते चांगले आहेत, परंतु याशिवाय दुसरे कांहीं उपाय तुला सुचतात कीं काय ?

**रामचंद्र**-नीतीची वृद्धी होण्याचे दुसरे कांहीं उपाय माझ्या ध्यानांत येतात, ते मी तुला सांगतों. प्रथम आमच्या लोकांनीं आपणामध्यें एकी स्थापन करावी, ह्मणजे मत्सर, द्वेष, हेवा, निंदा, कपट हीं जीं आमच्या लोकांच्या अंतःकरणाचें स्वामित्व घेऊन बसलीं आहे, त्यांचा मोड होईल. आणि परोपकारबुद्धि, देशाभिमान, भूतदया, शांति, क्षमा, औदार्य, सहनशीलता यांची वृद्धि होईल. आमच्या लोकांच्या जातींत ज्या क्षुल्लक कारणांवरून दुफळ्या, तंटेबखेडे होतात, त्यामुळें नीतीचे कोंब आंतच्या आंत चेंगरटून मरतात ह्मणून नीतीचा विस्तार होत नाहीं. यास्तव असे बखेडे होऊं देऊंनये. अशा खटल्यांत पडलेला मनुष्य कितीहि नीतिमान् असला तरी त्यास आपल्या

पक्षास भिऊन राहावें पडतें. यांत त्याच्या निःपक्षपातीपणास बट्टा येतो. यास्तव मनुष्याच्या अंतःकरणाच्या सद्भावाचे यथासांग व्यापार होण्यास सर्व मनुष्यमात्रासारिख्या न्यायास योग्य आहे, असें मानिलें पाहिजे. नीतीचें काम आलें ह्मणजे मग तो श्रीमंत असो किंवा गरीब असो, शत्रू असो किंवा मित्र असो, सर्वांस समदृष्टीनें पाहिलें पाहिजे. दुफळ्या पडलेल्या असल्या ह्मणजे मनुष्याच्या करण्यांत धरबंध न राहिल्यामुळें तो अनीतीचा दोषी होतो.

दी० दादा, तूं वर सांगितलेंस कीं, आपल्या आचरणांत धरबंध असावा, तर या वाक्याचा अर्थ मी कांहीं समजलों नाहीं.

रा० धरबंध ह्मणजे बोलण्याचे व कांहीं काम करण्याचे नियम बांधणें. जर आपण ह्मटलें कीं ही गोष्ट करीन तर ती अवश्यमेव करावी, आणि जो पुरुष ह्मणतो एक, आणि करतो एक, त्याच्या शब्दास धरबंध नाहीं असें ह्मणतात. अशा मनुष्याचें लोकांत वजन नसतें, आणि तो ह्मणतो तें कांहींच सिद्धीस जात नाहीं. अशीं उदाहरणें अलीकडे आपल्या दृष्टीस किती पडतात. कित्येक लोक अनेक तऱ्हेच्या सुधारणुकेविषयीं बोलतात, परंतु त्याप्रमाणें करणारे कोणी अढळत नाहींत, त्यामुळें लोकांत त्यांचें वजन न पडतां त्यांच्या अंगीं अनीतीचा दोष लागतो. कारण जसें बोलावें तसें करावें हा धर्म आहे, यावर ही चमत्कारिक गोष्ट कसी आहे पाहा! बोरी लोकांत असी चाल आहे कीं, ज्ञातीमध्यें जो सुशिक्षित आणि विद्वान् असेल त्याचस आपला मुल्ला करून भजावें. एखादा मोठा विद्वान् असला आणि त्याचें आचरण निर्मळ नसलें तर त्यास मुल्लाची पदवी कधीं देत नाहींत. एके समयीं त्या लोकांचा मुल्ला मरण पावला असतां त्याच्या जागेवर कोण स्थापावा

याचानिर्णय करायास सभा भरली, त्यावेळीं पांच सात तरुण विद्वानांनीं ती पदवी आपणास 'मळावी ह्मणून आपापले मनोदय दर्शविले. त्यांत एक मोठा विद्वान् असून त्याणें नीति व लोकांची सुधारणूक कशी व्हावी, याजवर लहानसा ग्रंथ लिहिला होता; तो पाहून बहुतेक लोकांचीं मनें त्याकडे लागलीं. परंतु कित्येक ह्मणाले कीं, त्याचें आचरण पाहिल्यावांचून त्यास आमच्या गुरुस्थानीं बसविणें योग्य नाहीं. हें त्यांचें बोलणें सर्वांनीं मान्य करून त्याची वर्तणूक कसी आहे ती पाहायास लागले. कांहीं दिवसांनीं त्यांणीं असें पाहिलें कीं त्याची वर्तणूक केवळ जें त्याणें लिहिलें होतें त्याविरुद्ध आहे. नंतर त्यास सभेंत बोलावून आणून सांगितलें कीं जें तूं लिहिलें आहेस तें फार चांगलें आहे. परंतु तुझें आचरण त्याविरुद्ध आहे, यास्तव तूं कांहीं उपयोगी मनुष्य नाहींस तूं जें पुस्तक केलें आहेस तेंहि कांहीं कामाचें नाहीं; कारण, जर तें कदाचित् लोक वाचतील तर त्यांस असें वाटेल कीं चांगल्या गोष्टी ह्या सर्व लिहायास मात्र केल्या आहेत. परंतु करायास नव्हत. यास्तव हें जें पुस्तक तूं केलें आहे, तें जाळायाच्या मात्र उपयोगी; असें ह्मणून तें त्याचें पुस्तक जाळून टाकिलें. आणखी त्यास बजावून सांगितलें कीं तूं असें पुस्तक कधीं लिहूंनको. लिहिलें असतां तुला जातीकडून दंड होईल.

पाहा, कोणी सांगतात कीं पुनर्विवाह करावा; कोणी ह्मणतो कीं लहान मुलांचें लग्न करूं नये; कोणी ह्मणतो कीं लग्नांत व इतर शुभकार्यांत कलावंतिणीचा नाच करूं नये; कोणी ह्मणतो कीं उधळेपणानें लग्नांत वावगा खर्च करूं नये; परंतु आपल्यावर गोष्ट बितरली ह्मणजे आपण बोललेलें तें एकाच ठिकाणीं ठेवून भलतेंच करितो.

असें केल्यानें लोकांचीं मनं विशकलित होऊन लोकांस कोणावरच विश्वास ठेवायास आधार नाहींसा होतो. आणि त्याचें अचरण निर्मळ राहत नाहीं. मनुष्यानें आपलें वचन पाळावें याविषयीं तुकाराम असें ह्मणतो कीं,

बोले तैसा चाले,
त्याचीं वंदावीं पाउलें.

या वाक्याचा भावार्थ इतकाच कीं, बोलतो त्याप्रमाणें करितो तो नीतिमान् असें समजावें. दुसरा एक कवी असें ह्मणतो कीं; बोलण्याप्रमाणें चालणें हें सद्गुणी मनुष्याचें काम. आणि ज्याच्या बोलण्यास व करण्यास ताळ नाहीं तो ढोंगी व अनीतिमान् असें समजावें.

दी० आपल्या कमाईपेक्षां अधिक खर्च करणें हेंहि नीतिच्या मार्गास विरुद्ध आहे काय?

रा० नीतिमार्ग मोठे सूक्ष्म आहेत, ते तुला सांगायास मला अवकाश नाहीं; परंतु तुला एवढेंच सांगतों कीं जो मनुष्य कोणतेंहि काम आपल्या शक्तीच्या बाहेर करितो तो अनीतीस पात्र होतो. आपल्या कमाईपेक्षां अधिक खर्च ठेवणें, आपल्या योग्यतेपेक्षां अधिक सन्मान इच्छिणें, व आपल्यास समजतें त्यापेक्षां कोणत्याहि गोष्टींत वितंडवाद घालणें, इत्यादि गोष्टी अयोग्य आहेत. दुसऱ्याचें कर्ज काढून धर्म करणें हेंही दोषास कारण होय. याविषयीं तुकाराम असें ह्मणतो.

कर्ज काढुनी ब्राह्मणाचें,
श्राद्ध वाढिलें पित्याचें,
यांत सार्थक बा तूं काय केलें.

आपल्या लोकांत नीतीचा प्रसर होण्याचे जे उपाय ते तुला सांगावयाचा माझा. हाच हेतु कीं, लोकांनीं आपा-

पली स्थिति ओळखून चालायास शिकावें ह्मणजे वावगें कर्ज होणार नाहीं; असत्य बोलावें पडणार नाहीं; लोकांस ठकवायाची सवय लागणार नाहीं; ईश्वराच्या आज्ञेचे उल्लंघन करणें पडणार नाहीं; दुसऱ्याचा हेवा, मत्सर, व द्वेष, होणार नाहीं; आणि मनाची शांति होईल.

**दी॰** दादा, नीतीचे बहुतेक मार्ग व तिची वृद्धिकरण्याचे जे उपाय तूं सांगितलेस ते माझ्या मनांत ठसले. आतां माझी खात्री झाली कीं नीतीचे मार्ग सुगम असून कल्याणकारक आहेत. अज्ञानी लोक असे सरळ मार्ग सोडून आडमार्गानें जाऊन आपला नाश करून घेतात, हें मला फार वाईट वाटतें. बरें, मी मोठा झाल्यावर माझ्यानें जितकें होईल तितकें करून नीतिचा प्रसर करीन, ही माझी इच्छा सिद्धीस नेणार देव आहे असें लक्षांत आणून मी त्याची अशी प्रार्थना करितों कीं, हे जगदोद्धारका माझे सर्व चांगले मनोरथ तूं सिद्धीस ने.

**रा॰** या विषयावर अणखी मी तुला पुष्कळ सांगितलें असतें, परंतु काय करूं आतां अवकाश राहिला नाहीं, सबब तुला इतकेंच सांगतों कीं, आपलीं सर्व कर्में ईश्वर पाहतो हें लक्षांत आणून वर्तणूक ठेव, त्यास शरण जा, आणि खालीं जो मी श्लोक लिहिला आहे त्याचा भावार्थ ध्यानांत आणून वाग, ह्मणजे तुझें जन्म सफळ होईल.

नीतिमंतो महामान्या भवंतिसधनाअपि
तद्विरुद्धंतदन्यानांतस्मान्नीति र्महत्तमा १

यांतील सारांश, जे नीतीनें वागतात त्यांस प्रतिष्ठा आणि संपत्ति प्राप्त होतात, परंतु जे तिच्या विरुद्ध चालतात, त्यांस अप्रतिष्ठा आणि दुःख हीं प्राप्त होतात.

**समाप्त.**

# पश्चिम हिंदुस्थानांतील हुन्नर.

रावसाहेब बाळकृष्ण आत्माराम गुप्ते

यांणीं

या विषयावर दिलेलें व्याख्यान

मुंबईंत

गणपत कृष्णाजी यांचे छापखान्यांत छापिलें.

आगस्ट १८९१

किंमत १ आणा.

[ विविधज्ञानविस्तार पुस्तकालयांत विकत मिळेल. ]

सन १८६७ च्या २५ आक्टाप्रमाणें रजीस्टर करून सर्व

प्रकारचे हक्क राखिले आहेत.

# सूचना.

ह्या अफाट हिंदुस्थान देशाचें व्यापारसंबंधानें मुख्य शहर मुंबई आहे. या मुंबई बंदरांतून कोट्यावधि रुपयांचा माल हिंदुस्थानांतून बाहेर जात आहे, व तसाच परदेशांतील माल या बंदरीं आयात होऊन एथून सर्व देशभर पसरत आहे. तेव्हां या शहरांतील विद्वान् गृहस्थ व व्यापारी शेट सावकार लोक यांच्यापुढें आपल्या पश्चिम हिंदुस्थानांतील हुन्नरसंबंधी कांहीं माहिती ठेवावी व तिजपासून आमच्या कारागीर लोकांस कांहीं फायदा होईल तर पाहावा, ह्मणून या व्याख्यानाची योजना केली आहे.

# पश्चिम हिंदुस्थानांतील हुन्नर.

हुन्नर ह्मणजे हस्तकौशल्यानें तयार होणारें काम. यांत विलायती धरतीवर यंत्रद्वारें गिरण्यादिकांत तयार होत असलेल्या सामानाचा समावेश होत नाहीं. पुढील माहिती पश्चिम हिंदुस्थानांतील कारागिरांच्या हातून परंपरा होत असलेल्या कामाबद्दल आहे. या पश्चिम हिंदुस्थानांतील कारागिरीचे आपण चार भाग करूं: ( १ ) लांकडाचें काम; ( २ ) सोनें, रुपें इत्यादि धातूंचें काम; ( ३ ) वस्त्रप्रावरण; ( ४ ) किरकोळ.

## ( १. ) लांकूडकाम.

पश्चिम हिंदुस्थानांत लांकडाचें काम फार सुरेख होतें. या कामाचे चार प्रकार आहेतः—

१ शिल्पकलेसंबंधीं नकसकाम.

२ टेबलें खुर्च्या वगैरे वस्तु.

३ लांकडाचे खोदींव कामाचे लहान लहान नमुने. [ वर्कबॉक्सिस् ]

४ कातान्याचें व इतर लाखारी काम.

१. **शिल्पकलेसंबंधीं नकसकाम.**—घर बांधण्याच्या संबंधानें लागणारें नकशीचें काम आपल्या देशांत पूर्वीं पुष्कळ होत असे. अमदाबादेस शेट भोलानाथ साराभाई ज्या गल्लींत राहतात त्या गल्लीच्या दोन्ही बाजूनें पाहत गेलें ह्मणजे मोठमोठालीं तीन तीन मजली

घरें खोदून काढिलीं आहेत असें दृष्टीस पडतें; नाशकास हिंगण्यांचा वाडा, राजेबहाद्दरांचा वाडा, बगाजी ठाकूर व इतर कांहीं ठाकूर लोकांचे वाडे, यांजकडे पाहिलें ह्मणजे नजर थक्क होऊन जाते; व यवल्यास, सुरतेस आणि वडोद्यास कांहीं जुने वाडे आहेत ते पाहिले ह्मणजे आमच्या कारागिरांच्या कौशल्याची तारीफ केल्याशिवाय राहवत नाहीं. ही विद्या अलीकडे उतरत्या कळेस लागली आहे. जैन लोकांचीं मंदिरें खेरीज करून इतर घरांवर नकशीचें काम करण्याची चाल बंद होत चालली आहे. प्राचीन काळीं सुताराची गणना गांवपंचांत होऊन त्यांना बराच मान मिळे; त्यांला 'सूत्रधार' ह्मणत आणि तो युद्धप्रसंगाकरितां रथ तयार करीत असे; इतकेंच नाहीं; तर रणामध्यें सारथ्याचेंही काम त्याच्याचकडे असे. ऋग्वेदांत सुद्धां सुताराबद्दल उल्लेख आहे. बृहत्संहितेंत व शिल्पशास्त्रांत झाड केव्हां तोडावें, कसें तोडावें व लांकूड सुकवून तयार कसें करावें, याबद्दल माहिती दिली आहे. अलीकडे मात्र सुतार ही हलकी जात आहे, व घरावर नकशीचें काम काढणें हें सुताराचें काम नाहीं, असा समज पडत चालला आहे. ज्या नाशिक शहराकडे पाहिलें ह्मणजे त्या गांवीं पूर्वी लांकडावरील कोरींव काम तयार करणारे सुतार शेंकडो असावे अशी खात्री होते, त्या गांवीं सन १८८३ सालीं तपासाअंतीं अशा प्रकारचा कायतो एकच कारागीर आढळला.

नाशिक शहरीं कोणत्याही जुन्या घराकडे पाहिलें तरी त्याचीं बहालें, दरवाजे, खिडक्या, व छतपट्या, यांवरील नक्षी नेहमीं कमळाच्या आकाराची आहे असें दि-

सून येतें. नाशिकाचें प्राचीन नांव 'पद्मावती' आहे, व हें नांव ठेवण्याचें कारण असें सांगतात कीं, हें शहर वसलें आहे त्या ठिकाणीं गोदावरीस सहा नद्या मिळून त्याज-मुळें त्या जागेस कमळाचा आकार आला आहे. कम-ळाचीच नक्षी जुन्या घरांवर जिकडे तिकडे खोदण्याचें कारण 'पद्मावती' हें नांव असावें असें दिसतें. पद्मावती शहरीं वाडे बांधावयाचे, तेव्हां त्याजवर पद्मांची ह्मणजे कम-ळांची नक्षी काढावी अशी बुद्धि होणें साहजिक आहे. टॉमस मॉरिस या साहेबानें सन १८०१ सालीं प्रसिद्ध के-लेल्या आपल्या "इंडियन आन्टिक्विटी" नांवाच्या पुस्त-कांत हिंदुस्थानांतील कमळांपासून ग्रीस देशांतील 'कॉरि-न्थियन' या नांवाच्या खांबाची उत्पत्ति आहे असें कबूल केलें आहे. कॉरिन्थियन खांब मुंबईच्या 'टाऊन हालास' आहेत, त्यांजकडे पाहिलें ह्मणजे खांब हा कमळाचा देंट व त्याच्यावर असलेला गलथा हा कमळाच्या पाकळ्या तोडून टाकिल्यावर आंत राहिलेला मधला भाग आहे, असें लक्षांत येईल. या मधल्या भागास चारी बाजूंला चार कमळाच्या पाकळ्या शिल्लक ठेवून बाकीच्या तोडून टा-किल्या, व त्या चार पाकळ्या सारख्या लावून त्यांचीं टोंकें जरा मुरडलीं ह्मणजे जो आकार होईल तोच कारिन्थि-यन खांबाचा मूळ "श्रीग" आहे. मग त्याजवर कमळाच्या पाकळ्यांच्या बदला आकॅथस नांवाच्या पानाची योज-ना करून ग्रीक लोकांनीं त्या आकारांत फेरफार केला आहे. ज्या कमळाच्या नक्षीची इतकी योग्यता, कीं ती हिंदु-स्थानदेशांत उत्पन्न होऊन, ग्रीस देशीं प्रयाण करून, तेथें आपलें रूप बदलून आमच्या टौनहालांत येऊन बसली

आहे, तिचें मूळ स्वरूप आमच्या देशांतून नाहींसें होत आहे ही गोष्ट मोठी दुःखाची समजली पाहिजे. हिंदुस्थानांतील शिल्पकला लयास जाण्यास याच देशांतील श्रीमंत लोक कारण आहेत. ज्या लोकांचें साहेब लोकांशीं दळणवळण आहे ते जुन्या तऱ्हेच्या घरांत राहण्यास कंटाळून नवीं घरें बांधण्याकरितां हजारों रुपये खर्च करितात, आणि तें काम इंजिनियर कॉलेजमध्यें शिकलेल्या लोकांकडेस सोंपवितात; इतकेंच नाहीं तर एखादें सरकारी हपीस किंवा आसपासची एखादी लष्करांतील "बराख" त्यांस दाखवून एकसहा हुकूम बजावितात, कीं आह्मांस बांधविणें आहे तो 'राजमहाल' असाच उठला पाहिजे. ही आमची स्थिति! आतां परस्थांकडे पहा. मेजर म्यांट ह्मणून एक मुंबईंत मोठे कामदार होते, त्यांनीं बडोदें येथील नवीन सरकारवाडा व हायस्कूल वगैरे इमारतींचे 'प्लयान' काढिले. हे साहेब हिंदुस्थानांतील जुन्या नकशीकडे फारच लक्ष देत; आपल्या हाताखालील मेस्त्री लोकांस देशी नक्षीच काढतां येण्याकरितां त्यांनीं पुष्कळ ठिकाणीं फिरून जुन्या इमारतींवरील नक्षीचे नमुने काढून ठेविले आहेत, त्यांतील कांहीं मुंबईंतील चित्रशाळेंत पाहण्यांत येतात. मुंबईंतील मेजर म्यांटप्रमाणें मद्रासेस मेहरबान चिझोल्म साहेब आमच्या शिल्पकळेचे पूर्ण भोक्ते आहेत. हल्लीं बडोदें येथील दरबारीकामावर त्यांची देखरेख आहे. भावनगरास मेहरबान प्रॉक्टर सिम्स या नांवाचे इंजिनियर आहेत. तेही आमच्या शिल्पकलेस मान देतात. मुंबईंतील चित्रशाळेवरील मुख्याधिकारी मेहरबान ग्रिफिथ्स साहेब यांच्या हातून 'प्लयान' तयार करून घेऊन मे. सिम्ससाहेबांनीं भावन-

गरच्या ठाकूर साहेबांकरितां 'छत्री' या नावांची इमारत बांधिली आहे. या इमारतीकरितां तयार करविलेलें संगमरवरी दगडांवरील कांहीं खोदींव काम कलकत्ता येथील प्रदर्शनांत सन १८८३ सालीं पाठविलें होतें. या कामाबद्दल सदरील प्रदर्शनकमेटीकडून चांदीचा बिल्ला देण्यांत आला होता. कांहीं वर्षांपूर्वी अमेरिका खंडांतून मेहेरबान लॉकउड फॉरेस्ट या नांवाचे एक व्यापारी हिंदुस्थानांत आले होते, ते अमदाबाद येथील घरांची नकशी पाहून इतके लुब्ध झाले कीं, त्यांनीं तेथील एक मोडकळीस आलेलें घर चार हजार रुपयांस विकत घेऊन आपल्या देशास नेण्याकरितां त्याचीं लांकडें काढून तयार केलीं. इतक्यांत मेहरबान पर्डन क्लार्क नांवाचे एक साहेब लंडन शहरांतून आपल्या देशांत आले होते त्यांनीं तीं लांकडें पाहिलीं तेव्हां त्यांचें मन त्यांवर बसून तीं त्यांनीं मे. फॉरेस्ट साहेबांपासून खरेदी केलीं, व विलायतेस पाठवून दिलीं. पुढें फॉरेस्ट साहेबांनीं अमदाबाद शहरांतील प्रसिद्ध शेट मगनभाई हट्टीसिंग यांजवळ एक लाख रुपयांची रक्कम देऊन ठेविली आहे. शेट मगनभाई यांनीं सुमारें ऐंशीं सुतार नोकरीस ठेवून घराच्या तुळ्या, पट्या, खिडक्या, दरवाजे इत्यादि जिनसा तयार करण्याचा कारखाना काढिला आहे. कारखान्यांत माल तयार झाला ह्मणजे अमेरिकेस जातो, व तेथून त्याची किंमत पुनः परत येते, व ती पुनः भांडवलांत पडते. अशा रीतीनें एकलक्ष रुपयांची रक्कम अमदाबादेंत खेळती राहून, अमेरिका खंडांत नकशीचीं घरें तयार होत आहेत, व आमच्या देशांतील नकशीचीं घरें नाहींशीं होत चाललीं आहेत ! व त्यांच्या जागीं आमचे श्रीमंतलोक मोठमोठ्या

'बराखी' किंवा घोडशाळा बांधीत आहेत. ह्या गोष्टीकडे लक्ष देऊन, मुंबईतील शेटसावकार लोक देशी कारागिरीचा अभिमान बाळगून या विद्येचें पुनर्जीवन करतील अशी उमेद आहे.

नकशीचीं घरें बांधवितांना शुद्ध देशी काम न होतां धेडगुजरी काम होण्याची भीति आहे, ही गोष्ट मात्र ध्यानांत ठेविली पाहिजे. नाहीं तर आपण करावयास जाऊं एक आणि होईल भलतेंच. याबद्दल एक दाखला सांगतों.

चार वर्षांपूर्वीं आह्मीं अमदाबाद शहरीं गेलों होतों; त्या वेळेला तेथील एका नवीन घराचा कारखाना पाहाण्याकरितां गेलों. त्या घरास लागणाऱ्या तुळयांवर कांहीं सुतार नकशीचें खोदांव काम करीत होते. ही नकशी एका ब्रान्डीच्या बाटलीवरचा छाप पुढें ठेवून त्या प्रमाणें हुबेहूब काढलेली होती. ती पाहून माझ्या पोटांत खवळून आलें, व तेथील मेस्त्रयांस सहज प्रश्न केला कीं, आपली जुन्या तऱ्हेची नकशी टाकून असली तुह्मीं कां बरें घेतां ? तेव्हां तो मोठ्या डौलानें ह्मणाला "मग आमची अक्कल ती काय? आह्मीं ही नवीन नकशी काढिली आहे." हें ऐकल्यावर मीं ह्मटलें, " शेटजी ही नक्षी कांहीं नवी नाहीं. ही ब्रान्डीच्या बाटलीवरून येथें आली आहे." हें ऐकतांच मेस्त्रीबावांचें तोंड खरकन उतरलें, व पुढें ते बोलेनातसे झाले. असल्या प्रकारचा नवीनपणा दाखवून आमच्या घरांचा खराबा न करितां आमचे मेस्त्रीलोक पूर्वींच्याच नमुन्यांकडे विशेष लक्ष देतील तर फार बरें होईल. हल्लीं मुंबईत मेहरबान ग्रिफिथ्स साहेब व मेहरबान स्टीवन्स साहेब या दोन गृहस्थांस आपल्या देशांतील न-

कशीची मोठी आवड आहे, तेव्हां त्यांस विचारून त्यांच्या सल्ल्यानें नवीन घरें बांधलीं तर तीं मुंबई शहरास भूषणप्रद होतील ह्यांत संशय नाहीं.

२. **टेबलें. खुर्च्या, वगैरे वस्तु.**—आमच्या देशांत प्राचीनकाळीं टेबलें खुर्च्या इत्यादि वस्तु मुळींच नव्हत्या असें ह्मटलें तरी चालेल. सिंहाच्या आकाराचे पावकें असलेलीं सिंहासनें, सिंहाचीं किंवा मगरीचीं तोंडें हातास बसविलेलीं व्यासपीठें, पलंगाचे खूर व देव्हारे, यांशिवाय कांहीं सामान प्राचीन काळीं होत असेल असें आह्मांस वाटत नाहीं. टेबलें खुर्च्या हें सामान पाश्चिमात्य लोकांकरितां पहिल्यानें मुंबईंत होऊं लागलें; पूर्वीं तें शिसव्याच्या लांकडाचें करीत. परंतु अलीकडे ती तऱ्हा नापसंत होत चालली आहे. सागाचें सामान अलीकडे गिऱ्हाइकास फार आवडतें. त्यांतही सागाचें काम करून त्यांस कोंदणें काढून त्या कोंदणांत शिसू, हस्तिदंत, व सांबराचें शिंग, या पदार्थांची नकशी करून तींत बसविली ह्मणजे साहेब लोकांस फार पसंत पडतें. गोवाळिया तलावाजवळ मेहरबान विंब्रिज साहेबानें काढलेल्या कारखान्यांत असलें काम फार उत्तम प्रकारचें तयार होत असतें. रत्नागिरीस उद्योगशाळा आहे, तींतही असलें काम फार चांगलें होतें. त्याच्या खालोखाल शेट जमशेटजी नौरोजी यांचें कामही सुरेखांत गणलें तरी चालेल; या सामानाबद्दल आमची अशी सूचना आहे कीं, खुर्च्या व कोंचा यांच्यावर आच्छादन घालण्यासाठीं विलायती किंवा चिनई रेशमी कापड वापरितात, त्याच्याबद्दल सुरतेस तयार होत असलेल्या हिमरूतांवाच्या रेशमी कापडाचा उपयोग करण्यांत यावा. सन १८८३सालीं

कलकत्ता प्रदर्शनांत आह्मी काम करीत असतांना लेडी रिपन या बाईसाहेबांची गांठ पडली होती, तेव्हां सुरती हिंमरू पाहून त्या फार खुष झाल्या, व त्यांपैकीं दोन नमुने निवडून त्यांनीं तसलें कापड स्वतःकरितां सुरतेहून मुद्दाम आणविलें होतें. लेडी रिपनसारख्या विद्वान् व समंजस मडम साहेबांला जो माल पसंत पडला, तो माल इतर पुष्कळ मडमांस पसंत पडेल असें मला वाटतें. दुसरी आमची अशी सूचना आहे कीं, विलायती कापड स्स्तें असल्यामुळें वापरणेंच असेल तर त्याजवर नकशी छापणें ती मेहरबान ग्रिफिथ्स साहेबांनीं अजंटा येथील लेण्यांतून नक्कल करून आणलेल्या नकशीवरून घेतलेली असावी. सन १८८६ सालीं मेहरबान वाडल नांवाच्या एका साहेबानें असली नकशी एका मखमालीवर छापून लंडन प्रदर्शनांत ठेविली होती, ती मोठमोठ्या 'लाट' साहेबांस फार पसंत पडली. यावरून मला वाटतें कीं, तसल्या मखमालीचा कोंचा व खुर्च्या मढविण्यास उपयोग केला तर साहेब लोकांस फार पसंत होईल.

## ३. लांकडाचे खोदींव कामाचे लहान लहान नमुने.

### ( वर्कबॉक्सिस्. )

पश्चिम हिंदुस्थानांत कच्छ ( भूज, ) अमदाबाद, सुरत, मिरज, गोकाक, सावंतवाडी, बिलिमोरा, मुंबई, कारवार, व कुमठा या ठिकाणीं चंदनाच्या पेट्या, आरशांकरितां शिसवी चौकटी, घड्याळें ठेवण्याच्या ' दिवालगिऱ्या ' ( brackets. ) व इतर लहान लहान सुशोभित जिनसा पुष्कळ तयार होतात. अमदाबादेस खोदींव काम करणाऱ्या

सुतारांचीं आठशें घरें आहेत. तरी त्या कामाचा तेथें ऱ्हास होत चालला होता, व फुलदाण्या आणि आरशांच्या चौकटी यांशिवाय विशेष कांहीं काम होत नसे; परंतु आह्मीं मागें सांगितलेले मेहेरबान फॉरेस्ट साहेब यांनीं कारखाना काढल्यापासून पुष्कळ काम तयार होऊन अमेरिकेस जात आहे.

बडोदें संस्थानांत बिलिमोरा ह्मणून एक गांव आहे, तेथें खोदींव कामाच्या चंदनाच्या पेट्या करणारीं पंधरा वीस पारशी कुटुंबें आहेत; त्यांत मिस्टर सोराबजी जामास्पजी हे मोठे कुशळ आहेत.

सुरतेस चंदनाच्या पेट्या, जनावरांचीं व पांखरांचीं चित्रें, व इतर खेळणीं तयार होतात. या गांवीं असलेल्या कारागिरांत मूळचंद काशीराम हा मुख्य आहे. हा कारागीर कानडा जिल्ह्यांतील लोकांचें अनुकरण करून देवादिकांच्या मूर्तींची सुरेख नकशी कोरूं लागला आहे. सुमारें पाऊणशें वर्षांपूर्वीं सुरतेस चंदनाच्या पेट्या करणारीं ऐशीं कुटुंबें होतीं, परंतु त्यांतील कांहीं मुंबईंत येऊन काळबादेवीच्या रस्त्यावर राहिलीं आहेत.

कच्छभूज एथील हुन्नरशाळेंत चंदनाच्या पेट्या वगैरे सामान अलीकडे होऊं लागलें आहे.

कानड्यांत कुमठा व कारवार येथें चंदनाच्या पेट्या फार चांगल्या होतात. या चंदनाच्या कामाबद्दल साहेब लोकांचें असें ह्मणणें आहे कीं, " लांकडावर खोदींव काम करण्यास जितकी मेहनत व जितका वेळ लागतो, तितकी मेहनत व तितका वेळ खर्च करून न कंटाळतां शांतपणें

सतत काम करण्याची शक्ति हिंदुस्थानांतील लोकांच्या आंगीं मोठी विलक्षण आहे. "

लांकडावर खोदींव काम करून ह्मणजे त्यास कोंदणांसारखीं घरें पाडून त्यांत हस्तिदंत, सांबरशिंग, पितळ, चांदी, कथील, किंवा मोत्यांचे शिंपले, बसविण्याचीही पश्चिम हिंदुस्थानांत चाल आहे. काठेवाडांत भावनगरास लांकडाच्या पेट्या करून त्यांजवर कोंदणांत पितळेची नकशी बसवितात, व नवानगर येथें तशीच मोत्यांच्या शिंप्यांची नकशी बसवितात. मुंबई, सुरत, बिलिमोरा, आणि कच्छभूज या ठिकाणीं चंदनाच्या पेट्या करून त्यांत कोंदणांत हस्तिदंत व सांबरशिंग बसवितात. ही विद्या इराण देशांतून ह्मणजे शिराज येथून सिंध प्रांतांत येऊन, तेथून सुरतेस, व सुरतेहून मुंबईस, आली आहे. पांढरा किंवा रंगविलेला हस्तिदंत, शिसवी लांकूड, रक्तचंदन व कथलाच्या पट्ट्या, ह्या एका ठिकाणीं बांधून तिकोनी, चौकोनी, पांचकोनी, षट्कोनी किंवा वर्तुलाकार दांड्या करितात. ह्या दांड्या बांधण्यापूर्वीं पट्ट्यांच्या आंत एकजीव होण्याचा मसाला घालून त्या एकमेकांस चिकटवितात. नंतर बारीक करवतीनें त्यांच्या पातळ चवली सारख्या आडव्या चकत्या पाडतात. ह्या चकत्यांत रंगा रंगाच्या टिकल्या दिसूं लागतात. लांकडावर शिरस लावून त्यानें ह्या टिकल्या नंतर एकमेकांस लावून सारख्या चिकटवितात. असल्या कामास इंग्रजींत 'बॉंबे वर्कबाक्सिस्' असें नांव पडलें आहे. या कामाच्या संबंधानें आमची अशी सूचना आहे कीं, कोंदणांत बसविलेल्या टिकल्या विलायतेसारख्या थंड प्रदेशांत माल नेला ह्मणजे हवेंतील दमसरपणामुळें गळून पडतात, तसें

न व्हावें ह्मणून अलीकडील सायन्सपदवीवाल्यांपैकीं कोणी तरी विद्वानानें एखादी युक्ति शोधून काढावी. नाहीं तर माल विकेनासा होऊन धंदा बुडणार आहे. हा माल खराब होतो याबद्दल पुष्कळ हाकाहाक आमच्या कानीं आली आहे. याचप्रमाणें कारवार, सुरत, मुंबई या ठिकाणीं चंदनाच्या खोदींव पेट्या होतात त्यांचें सांधकाम फार वाईट असतें. कुमठ्याहून पंनासापासून अडीचशें रुपये किंमतीची एखादी पेटी मुंबईस आणून पाहतां, तिचे सर्व सांधे सुटलेले, तिजवरील सुरेख नकशींत भलत्याच ठिकाणीं एक भला भक्कम खिळा मारलेला, अथवा तिची एखाद्या बाजूची नकशीदार व मौल्यवान फळी तडकलेली असावी, हें पाहून आमच्या मनास नेहमीं दुःख होई. ज्या प्रदर्शनाकरितां पेटी आणवावी त्यांत ती न पाठवावी तर अमुक प्रकारचें काम नाहीं ह्मणून ओरड व्हावयाची, पाठवावी तर आह्मी नमुने खरेदी करणारे लोक असला माल विकत घेतल्याबद्दल मूर्ख ठरावयाचे! या धास्तीनें पांच पंचवीस रुपये खर्च करून ती मुंबईतल्या कारागिरांकडून दुरुस्त करून घ्यावी लागत असे, असा आमचा अनुभव आहे. तेव्हां चंदनाच्या पेट्यांचा व्यापार करणाऱ्या शेटसावकारांस आमची अशी सूचना आहे कीं, दोन पैसे जास्ती खर्च करून चांगल्या कुशल कारागिरांकडून सांधकाम करून घ्यावें, नाहींतर लवकरच त्यांचा माल युरोपखंडांत खपेनासा होईल.

४. **कातान्याचें व इतर लाखारी काम.** लांकडावर लाखेचें काम दोन प्रकारचें होतें. एक 'कातार काम' व दुसरें 'चितार काम.' कातार कामांत पदार्थास दोन लोखंडी

आंसांच्यामध्यें धरून कमानीच्या योगानें गरगर फिरवितात, व ते फिरत असतांना त्यांच्याशीं लाखेची दांडी टेंकून धरतात; त्यामुळें घर्षणजनित उष्णतेच्या योगानें ती वितळून लांकडास चिकटते. नंतर बांबूच्या चिपाटीनें किंवा केतकीच्या पानानें तिजवर झील देतात, व अखेरीस फडक्यानें तेल लावतात. लांकडावर नागमोडी सारखी पुष्कळ रंगांची नकशी उठविणें असेल तर रंगारंगाची लाख घेऊन ती ठिकठिकाणीं थोडथोडी लावतात, आणि मग बांबूच्या चिपाटीनें सारखी पसरतात. सिंधप्रांतीं एकावर एक दोन तीन रंगांची लाख चढवून नंतर तिच्यांतील वरचे वरचे कांहीं थर छिणीनें खोदून काढून वेलबुट्टी सोडवितात. हें काम करतांना वरचे जितके थर कापून काढावयाचे असतील, तितकेच नेमके काढून घेण्यांत मोठें कौशल्य असतें. उदाहरणार्थ, एका डब्यावर पहिल्यानें तांबडी लाख चढवून नंतर तिजवर हिरवीचा व हिरवीवर काळीचा असे दोन थर दिले आहेत, अशी आपण कल्पना करू. आतां जर तांबडा रंग दाखविणें आहे तर काळा व हिरवा हे दोनच थर छिणीनें नेमके खोदून काढावयाचे असतात. पांढरा दाखविणें आहे तर काळा, हिरवा, व तांबडा हे तीनही थर काढून पांढरें लांकूड दाखवावें लागतें. असलें काम पंजाब व सिंधप्रांतीं पूर्वीं पासून होत आलें आहे.

सिंध येथील कातारी लोक जातीचे मुसलमान आहेत, व आपले पूर्वज झांजिबाराहून हिंदुस्थानांत आले असें त्यांचें ह्मणणें आहे. ते मोठे आळशी, अव्यवस्थित, व दरिद्री आहेत, त्यामुळें लांकूड व लाख घेण्यास सुद्धां त्यांचे जवळ पैसे नसतात. ते त्यांस व्याजीं काढावे लाग-

तात. आगष्ट महिन्यापासून जून महिन्यापर्यंत सिंधी लाखटलेल्या कामास कांहीं गिऱ्हाईक असतें. तथापि अलीकडे हा धंदा बसत चालला आहे. सगळ्या वर्षांत कायतो हजार पंधराशांचा माल तयार होतो. काठेवाडांत, गोंडळ व भावनगर येथें लाखेचें काम फार सुरेख होतें. गायकवाडी राज्यांत संखेडा गांवीं लाखटलेलें काम होतें. तेथें लांकडावर लाख चढविण्यापूर्वीं आंत कारागीरलोक वर्खाचा पातळ थर देत असावे अशी आमची अटकळ आहे. कल्याण व पेण या दोन गांवची, पाळणे आणि 'आषाढ व श्रावण पांट्याचा खेळ,' तयार करण्याच्या कामीं कोंकणपट्टींत पूर्वीं मोठी ख्याति असे, परंतु अलीकडे आषाढ व श्रावण पांट्या मोडत चालल्या, आणि विलायती मच्छरदाणीचे पाळणे प्रचारांत येऊं लागले, त्यामुळें धंदा बसत चालला आहे.

सांवतवाडीस काताऱ्याचें काम होतेंच, परंतु त्याशिवाय चिताऱ्याचेंही काम होत असतें, तसें इतर ठिकाणीं होत नाहीं. येथें चिताऱ्याचें काम ह्मणजे काय हें सांगितलें पाहिजे. पाट, चौरंग, गंजिफांच्या पेट्या, ( ज्यांस कमानीनें आंसावर फिरवितां येत नाहीं ) असल्या पदार्थांवर हातानें रंगी बेरंगी चित्रें काढून त्यांवर लाखेचा थर द्यावयाचा असतो, हा थर देण्यापुर्वीं लांकूड तापवावें लागतें, व त्याजवर पारदर्शक लाख ठेवून ती वितळूं लागली ह्मणजे सारखी पसरावी लागते. असलें काम पूर्वीं पाटांवर, पोथीच्या फळ्यांवर, व गंजिफांच्या पेट्यांवर मात्र होत असे, परंतु पोलि० सुप० मेहेरबान कर्नल वेस्ट्राप

साहेबांनीं आपल्या कारकीर्दींत पुष्कळ मेहनत घेऊन या कामांत सुधारणा केली त्यामुळें कपाटें, टेबलें, खुर्च्या, दिवालगिऱ्या, नारळाच्या बेल्यांचे डबे इत्यादि पुष्कळ पदार्थ तयार होऊं लागले आहेत; आणि त्यांचा खप साहेबलोकांत विशेष असल्यामुळें धंद्यालाही तेज येत चाललें आहे. साहेब बहादूर यांणीं स्वतः सतत मेहनत घेऊन या धंद्याचा ऊर्जित काळ केल्यामुळें त्यांचे आमच्यावर मोठे उपकार झाले आहेत.

याशिवाय लांकडाचीं चित्रें किंवा फळफळावळ करून ती गोकाक येथें रंगवितात. गोकाक येथील कामाची पूर्वीं मोठी कीर्ति असे, परंतु अलीकडे येथील कारागीर स्वस्त माल तयार करण्यास गुंतून गांवाची अब्रु दवडीत आहेत. पेण, कल्याण, नाशिक, पुणें, इत्यादि ठिकाणीं कातान्याचें साधारण प्रकारचें सामान तयार होतें. परंतु त्यांत सुधारणा करण्यांत अजून पुष्कळ मार्ग आहेत. आमच्या कातारी लोकांचीं हत्यारें फारच ओबडधोबड असतात. त्यांऐवजीं त्यांस नवीन हत्यारें देऊन त्यांजकडून चांगलें काम कोणी तयार करून घेईल तर त्यांस विशेष फायदा होईल. प्रोफेसर नायगांववाले यांनीं असलें एक यंत्र ७५रुपयांस खेरदीकरून आणिलें होतें तें आम्हीं पाहिलें.असल्या जिनसा आपल्या कारागीर लोकांच्या हातीं पडल्या तर पुष्कळ फायदा होईल.

**सोनें, रुपें, वगैरे धातुकाम.** प्राचीनकाळीं आमच्या देशांत आमचे पूर्वज धातूंचीं भांडीं पुष्कळ वापरीत होते इतकेंच नाहीं, तर ते जवाहिराचे दागिने सुद्धां वापरीत असत. पृथ्वींत अत्यंत जुना ग्रंथ ऋग्वेद आहे. या

ग्रंथांत इंद्राचें वर्णन करितांना तो 'सोन्याचे चकचकीत दागिने वापरतो' असा लेख आहे, आणि त्याच ग्रंथांत असुरांचें वर्णन देतांना, तेही सोन्याचे व जवाहिराचे दागिने वापरीत असत असा लेख सांपडतो. याच ग्रंथांत कक्षिवान् ऋषीनें वर मागितला आहे, त्यांत तो ह्मणतो "सोन्याचीं कुंडलें व जवाहिराची कंठी यांनीं सुशोभित असा पुत्र मला होवो."

सन १८७८ सालीं पारीस शहरांत एक मोठें जंगी प्रदर्शन झालें होतें. तेव्हां तेथें म्यास्कुलिन् नांवाचा एक साहेब काम करीत होता. त्यानें आपल्या ग्रंथांत लिहिलें आहे कीं, "स्पर्शेंद्रियाच्या मदतीनें होणारें अति नाजूक काम केवळ बोटांच्या अग्रांनीं उत्तम प्रकारें करण्यांत हिंदु लोकांची बरोबरी करील असा कारागीर दुनियेंत मिळणार नाहीं. सुतेऱ्याच्या जाळ्याच्या बारीक तंतूइतकी फारच बारीक तार करून तिचे हिंदुस्थानांतील कारागीर दागीने बनवितात, तसले दागिने यंत्रसामर्थ्यानें सुद्धां करितां येणार नाहींत; व तसल्या सुंदर कामांत युरोपखंडांतील कुशल कारागीर देखील कांहीं सुधारणा करूं शकतील असें नाहीं. असलें नाजुक काम प्राचीन काळीं ग्रीस देशांत होत असे."

"हिंदुस्थानांत जातीभेद आहे, व जातींजातींचे कांहीं विवक्षित धंदे ठरून गेले आहेत. यास्तव तेथें एका जातीचा कारागीर पिढ्यानपिढ्या तेंच तेंच काम करीत असतो, त्यामुळें त्यास लहानपणापासून चांगलें शिक्षण मिळतें व तो स्वतःच्या धंद्यांत वाकबगार होतो. ज्याप्रमाणें प्राचीन काळीं संस्कृत भाषा वापरणारांचे वंशज

प्रस्तुतकाळीं त्याच भाषेपासून उत्पन्न झालेल्या प्राकृत भाषा बोलतात, त्याप्रमाणेंच हिंदुस्थानांतील कारागीर पिढ्यानपिढ्या एकच धंदा करीत आहेत. अलीकडे मात्र या रिवाजांत फरक पडत चालला आहे. हिंदुस्थानांतील लोक आपल्या पूर्वजांचा धंदा सोडून देऊं लागले आहेत; त्यामुळें त्या देशांतील कौशल्यास उतरती कळा लागली आहे."

अलीकडे या देशांत तयार झालेले दागीने मडम लोकांच्या वापरण्यांत येत असतात, त्यामुळें आमच्या सोनार लोकांस बरेंच काम मिळतें. दागिन्यांपेक्षां चांदीच्या भांड्यांस साहेब लोकांत गिऱ्हाइकी विशेष आहे. चांदीचीं नकशीचीं भांडीं कच्छप्रांतीं पुष्कळ तयार होत असतात. अलीकडे अहमदनगर व मुंबई या शहरांतही तसला माल होऊं लागला आहे. अहमदनगरांतील प्रसिद्ध व्यापारी शेट खरशेठजी व त्यांचे मुलगे चांदीचीं नकशीचीं भांडीं तयार करवून कच्छच्या भांड्यांपेक्षां स्वस्तदरानें विकीत असतात. 'मुंबईतील सरजमशेटजी जिजीभाई आर्ट स्कुलांत' नकशीचीं तांब्याचीं भांडीं तयार होत असतात. पुणें शहरांत विश्वनाथ विनायक डोंगरे नांवाचे एक व्यापारी तांब्यापितळेचीं नकशीचीं भांडीं तयार करवीत असतात. मुंबईत कांहीं कच्छी लोकांनीं तांब्यापितळेचीं नकशीचीं भांडीं तयार करण्याचीं दुकानें पायधुणीवर काढलीं आहेत. या भांड्यांचा व्यापार दिवसेंदिवस वाढत जाईल असें वाटतें.

धातूंच्या भांड्यांवर मिन्याचें काम होत असतें, तें वर्णन करण्यासारखें आहे. पश्चिम हिंदुस्थानांत सिंध व

कच्छ प्रांतीं मात्र मिन्याचें काम होत असतें. त्यांत सुधारणा करून कोणी व्यापारी लोक मडम लोकांकरितां, दिल्ली शहरांत तयार होतात तसे दागिने तयार करवील, तर तेथील धंद्याचा मुंबईत सहज प्रघात पडणार आहे.

कच्छ ( भुज ) प्रांतीं तऱ्हेतऱ्हेचीं हत्यारें तयार करून त्यांजवर व त्यांच्या म्यानांवर तांब्याची नकशी करून तिजवर मुलामा देतात, किंवा हत्यारांवरच नकशी खोदून तींत 'कुफ्तगारी' कामाप्रमाणें सोन्यारुप्याच्या तारा बसवून सुंदर वेलबुट्टी वठवितात. हीं हत्यारें फक्त शोभेकरितां साहेब लोक आपल्या दिवाणखान्यांत टांगून ठेवितात.

**कपडे.** विलायतेच्या कापडामुळें व मुंबईतील गिरण्यांत तयार होत असलेल्या कापडामुळें मुंबई इलाख्यांतील कोष्ट्यांचा धंदा दिवसेंदिवस बसत चालला आहे यांत कांहीं शंका नाहीं. पुर्वीं आमचे राजेलोक व सरदारलोक अमदाबाद येथील किनखाप व गजनी पुष्कळ वापरीत असत. ही गिऱ्हाइकी प्रस्तुत काळीं अगदीं बुडत चालली आहे. अमदाबाद, खेडा, भडोच, व सुरत, या जिल्हांत छापत असलेल्या गुजराथी बायकांच्या साड्यांचा त्याग करून आमच्या गुजराथी लोकांच्या बायका विलायतेंत छापलेलीं पातळें वापरीत असतात. या गुजराथी बायकांच्या संगतीनें मुंबईच्या आसपास दक्षणी बायाही छापी पातळें व चुनड्या वापरूं लागल्या आहेत. अमदाबाद, यवलें, नाशिक, पुणें, व ठाणें या शहरीं पीतांबर व पैठण्या पुष्कळ तयार होत असत, आणि हल्लींही कांहीं कांहीं तयार होतात. या पीतांबरांच्या व पैठण्यांच्या बद्दल मुंबईतील 'सासून' आणि 'अलायन्स' कंपनींच्या

गिरण्यांतील माल व चीन देशांतील माल वापरण्यांत येऊं लागला आहे. ठाणें व भडोच या शहरीं 'ससी' या नांवाचें चौकडोचें जाड कापड पुष्कळ तयार होत असे. त्याच्याबद्दला "वेंगुर्ली" या नांवाचें कापड विलायतेहून येऊं लागलें आहे. विलायती गिरण्यांत तयार होत असलेलें कापड स्वस्तें व खुमासदार असल्यामुळें तें तयार करणाऱ्या "तीन राक्षसांपैकीं" एका राक्षसा पुढें सुद्धां आमच्या दुबळ्या साळीं लोकांचा टिकाव लागण्याची आशा नाहीं. तथापि आह्मीं कापड वापरणाऱ्या लोकांनीं कांहीं विचार केला तर आमच्या साळी लोकांचा धंदा जेमतेम थोडाबहुत चालेल, नाहींतर आशा नाहीं.

पारशी व गुजराथी बायका चीन देशांतून येत असलेलें रेशमी कापड सोडून, ठाणें येथें तयार होत असलेलें रेशमी कापड वापरीत नाहींत; याचें कारण आह्मांस असें वाटतें कीं, त्यांस ठाणें येथें तयार होत असलेल्या कापडाची माहिती नाहीं, व तें वेळेवर बाजारांत तयार मिळत नाहीं. कोणी व्यापारी लोक असला माल आणवून दुकानांत ठेवितील तर आमच्या ठाणें येथील गरीब खत्री लोकांवर त्यांचे मोठे उपकार होतील यांत संशय नाहीं. ठाणें येथील 'सुसी'चे व चौकडीदार नकशीचें कापड वापरण्यालायख आहे.

ऑक्सफर्ड व केंब्रिज शहरीं मोठमोठालीं विद्यालयें आहेत त्यांतील सर्व विद्यार्थी एकसारखा पोषाख करितात; ह्मणजे, एका शाळेंतील सर्व मुलें एका तऱ्हेचा, परंतु एकरंगी असा पोषाख करीत असतात. असले कपडे घातल्यामुळें ते पाहतांच हा मुलगा अमूक शाळेंतील

किंवा कालेजांतील आहे, हें सहज सांगतां येतें. ही रीत मुंबईंतील विद्यालयांत सुरू झाली, व तिजमुळें ठाणाक्लॉथ या नांवानें प्रसिद्ध असलेलें ठाणें येथील कापड घरोघरीं वापरण्यांत येऊं लागलें, तर देशी कारागिरांस उत्तेजन मिळेल व मुलांचा पोषाखही व्यवस्थित राहील.

किनखाब, हिमरू, पटोळें, गजनी, वगैरे कापडांची विणकर कशी असते याचें वर्णन करण्याचो येथें जरूर नाहीं; तथापि तें काम मोठ्या कौशल्याचें आहे व उत्तम नग काढण्यास पुष्कळ अक्कल खर्च करावी लागते, ही गोष्ट विसरतां कामा नये. या कामीं आमची अशी शिफारस आहे कीं, फावल्यावेळीं प्रत्येक गृहस्थानें साळी लोकांचे माग जाऊन पाहावे. ते निरखुन पाहिल्यानें मोठा आनंद होतो. सन १८८३ सालीं आह्मीं अमदाबाद येथील एका वृद्ध साळ्यास किनखाप विणतांना पाहावें ह्मणून त्याच्या घरीं गेलों होतों. त्यावेळीं त्याच्या जवळ नमुन्यादाखल ठवलेला चित्रविचित्र रंगांचा भिंतीस चिकट- विण्याचा एक छापील कागद आमच्या पाहण्यांत आला. त्या कागदावर फार कठीण अशी पांच सहा रंगांची नकशी होती. ही बिकट नकशी पांच सहा रंगांचें रेशीम, व दोन रंगांची-ह्मणजे सोनेरी व रुपेरी-कलाबतू घेऊन तो ह्मातारा साळी विणीत बसला होता. दुःखाची गोष्ट इत- कीच कीं, ते सर्व रंग कच्चे होते. असल्या कच्या रंगानें विणण्याकरितां हातीं घेतलेल्या कापडावर तीन वर्षें सतत मेहनत करून काय ते सोळाच वार कापड तयार केलें होतें. या कामीं ह्मातार्‍यानें खर्च केलेली अक्कल, त्याचें अप्रतिम कौशल्य, आणि त्यानें रात्रंदिवस केलेली सतत

मेहनत पाहून आह्मी व आह्मांबरोबर असलेले ग्रीफिथ्स् साहेब हे अगदीं थक्क होऊन गेलों. आह्मीं त्यास त्या कापडाची किंमत विचारिली, तेव्हां ह्मातारा ह्मणाला "हें विकावयाचें नाहीं, हें कापड मीं आमच्या महाराजांसाठीं तयार केलें आहे. याचे मला कोणीं हजारों रुपये दिले तरी मी ते घेणार नाहीं. माझें वय ८० वर्षांचें आहे, व इतक्या मुदतींत मीं जो कांहीं पैसा सांठविला आहे तो सर्व या किनखाबास लागणाऱ्या मालमसाल्याकरतां खर्च करून, तो तयार झाला ह्मणजे महाराजांस अर्पण करणार आहें. असें केलें ह्मणजे स्वर्गास गेल्यावर मला असला कपडा वापरण्यास मिळेल !" बिचाऱ्या ह्माताऱ्याची धर्मावरील श्रद्धा पाहून आह्मांस आश्चर्य वाटलें. पण त्यानें खर्च केलेली सर्व अक्कल, हुशारी, पैसा पैसा करून सांठवून ठेविलेली सर्व पुंजी, व इतकी बिकट नकशी कपड्यावर वठविण्यास खर्च केलेलें सर्व कौशल्य, कच्चे रंग वापरल्यामुळें थोड्याच दिवसांत व्यर्थ जाणार हें मनांत येऊन फारच वाईट वाटलें; व त्या बिचाऱ्या वृद्ध कपीनें स्वदेशांतील सुंदर नकशी सोडून देऊन विलायती कागदावर छापलेली भिकार नकशी हुबेहुब विणून काढण्यांत केलेली डोकेफोड अगदीं फुकट आहे हें ध्यानांत येऊन हळहळ वाटूं लागली. असले कुशळ कारागीर हल्लीं पश्चिम हिंदुस्थानांत फारसे शिल्लक राहिले नाहींत. त्यांचें काम पहाण्याची संधी पुढें मिळणार नाहीं.

**रंगाऱ्याचें काम.** प्राचीन काळापासून पश्चिम हिंदुस्थानांत कापडावरील पक्के रंग फार सरेख होत आले आहेत. येशू ख्रीस्त जन्मास येण्यापूर्वीं पांचशें वर्षें

गौतम बुद्धाचा जन्म झाला. तो पक्क्या रंगाचे कपडे वापरीत असे, असा लेख पाली भाषेंतील ग्रंथांत सांपडतो. खिस्ती शकाच्या पूर्वी ५४३ व्या वर्षी फोको नांवाचा एक चिनी व्यापारी हिंदुस्थानांत आला होता, त्यानें त्यावेळीं लिहिलेल्या ग्रंथांत सुद्धां बौद्धधर्मी लोकांच्या पक्क्या रंगानें रंगविलेल्या कापडांचें वर्णन सांपडतें.

अजिंठा व बाग नांवाच्या प्राचीन लेण्यांत भिंतींवर काढलेल्या चित्रांच्या आंगावर तांबड्या व काळ्या रंगानें छापलेल्या छिटांचे कपडे काढिलेले आहेत. कच्छप्रांतीं तुरटीच्या ( फटकीच्या ) खाणी आहेत, आणि तुरटी रंगांत वापरितात. यूरोप खंडांत कच्ची तुरटी 'इंडियन आलम' या नांवानें विकते, त्यावरून यूरोप खंडांतील मोठमोठ्या विद्वान लोकांनीं असें सिद्ध केलें आहे कीं, कपडे रंगविण्याची विद्या प्रथम हिंदुस्थानांत उत्पन्न होऊन तेथून मिसर देशांत गेली, व त्या देशांतून पुढें यूरोप खंडांत फैलावली. पुर्वी असीरियन, इजिप्शियन, बाबेलोनियन, व परशियन, हे लोक भरभराटींत होते त्यावेळीं ते आमच्या देशांतील छिटें पुष्कळ वापरीत असत.

सन १७८७ सालीं सर उइलियम जोन्स नांवाच्या एका साहेबांनीं हिंदुस्थान देशसंबंधीं एक ग्रंथ रचिला आहे. त्यांत ते ह्मणतात—"हिंदुस्थानच्या लोकांची कापडें रंगविण्याची विद्या आमच्या इंग्रज लोकांस कोणी दाखवून देईल तर आह्मांस त्यानें सोन्याची खाणच दाखविली असें होणार आहे." या गोष्टीस १०० वर्षें होऊन गेलीं, परंतु तितक्या अवकाशांत सर्व चक्र फिरून गेलें आहे. हल्लीं आमच्या देशी छिटांची कोणीच परवा करीत नाहीं.

हिंदुस्थानांतीस सर्व लोक विलायती छिटें वापरण्यांत आनंद मानितात! अर्थात् सर उईलियम जोन्स यांची इच्छा तृप्त झाली; विलायती व्यापाऱ्यांनीं सोन्याची खाण मिळविली, व त्या खाणींत सोन्याचा पुरवठा आह्मी करीत आहों.

परंतु इतकें बरें आहे कीं, साहेब लोक अझून सुद्धां आमचेच रंग पसंत करितात व हे आमच्यावर त्यांचे मोठे उपकार आहेत असें समजलें पाहिजे; नाहींतर आमच्या देशांतील रंगारी व छिटें छापणारे लोक कधींच नाहींसे झाले असते, व त्यांचा पत्ताही लागताना. देशी कापडावर कोनाड्यांसारखी नकशी छापून त्यांचा साहेब लोक भिंती शुशोभित करण्याकडे उपयोग करितात. आमच्या गुजराथी लोकांच्या छिट्यांचा ते पडद्यांप्रमाणें उपयोग करितात, जाजमांचीं छतें करितात, आणि ओढण्यांचें 'टेबल क्लॉथ' करितात. देशी रंगाची, व देशी नकशीची योग्यता ते जाणतात, व त्या दोहोंची वाखाणणी करीत असतात. आपल्यांत एक ह्मण आहे कीं "कोणतीही जिन्नस पिकते तेथें विकत नाहीं.". वसईस केळीं पुष्कळ उत्पन्न होतात परंतु तीं मुंबईंत येऊन विकतात. अशा सारखाच हा प्रकार आहे. हिंदुस्थानांत छापलेले कपडे या देशांत न विकले तरी हरकत नाहीं; आमचे व्यापारी परदेशीं असला माल पाठवून देशांतील व्यापार वाढवितील अशी आशा आहे. आमच्या स्त्रिया विलायतेंत छापलेलीं पातळें, छिट्या व झग्याचें कापड वापरतात खऱ्या, तथापि आमच्या देशांत छापलेल्या छिट्या सयाम व ब्रह्मदेशांत पुष्कळ जात असतात. बांधणीच्या नमुन्यावर

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे.

विलायतेंत छापलेले कपडे कच्छी रंगाऱ्यांच्या देखील बायका वापरूं लागल्या आहेत. असें आहे तरी, आमचें बांधणीचें रेशमी कापड सगळ्या विलायतेभर वापरीत असतात. ह्या गोष्टी लक्षांत ठेवून फायदा करून घेणें हें व्यापारी लोकांचें काम आहे.

**भरतकाम.**–कच्छ, सिंध, सुरत, व मुंबई या चार ठिकाणांची भरतकामाविषयीं प्रसिद्धि आहे. कच्छप्रांतीं व्यापाराकरितां रेशमी कशीदा काढण्याचें काम मोची लोक करितात, व घरखर्चाकरितां स्वतःचे घागरे, चोळ्या, व ओढण्या यांवर रेशमी कशीदा काढून त्यांत मधून मधून पारा चढविलेले कांचेचे तुकडे बसविण्याचें काम रबारी लोकांच्या बायका करितात. सिंध हैदराबादेस जरीचें भरतकाम होतें; शिकारपुरास कच्छ व तुर्कस्थान येथें होत असलेल्या नमुन्यावर रेशमी कशीदा काढण्यांत येतो. सुरत शहरीं व मुंबई बंदरीं रेशमी काम होत असून 'कारचोबी' भरतकामही होत असतें. याशिवाय येथें अग्यारीच्या रस्त्यांवर कांहीं किरिस्तांव लोक एका प्रकारचें भरतकाम करीत असतात. कलाबतूचें व टिकल्या बसविलेलें 'कारचोबी' काम मुसलमानी दरबारांत पुष्कळ वापरण्यांत येत असे. प्रस्तुत काळीं मुलांबाळांच्या कपड्यांशिवाय दुसरा कोठें याचा उपयोग फारसा होत नाहीं. रेशमी कशिद्याचें 'टेबल क्लॉथ,' तक्के, गिरद्या, 'टी-कोझी,' सपाता, व टोप्या यांचा व्यापार कांहीं वर्षांपूर्वी बराच वाढला होता. परंतु दोन तीन वर्षांपासून विलायती सांच्यावर तयार केलेला असला माल येऊं लागला आहे, तेव्हां यापुढें या धंद्यांतही अर्थ उरला नाहीं.

**सतरंज्या.**-सिंधप्रांतात 'व्यूबाक' शहर, दक्षिणेंत अहमदनगर, गुजराथेंत खंबायत, व धारवाड जिल्ह्यांत नवलगुंद या ठिकाणांची सत्रंज्यांबद्दल प्रसिद्धि होती, परंतु हें काम सरकारी तुरुंगांत चांगलें होऊं लागल्यामुळें व आमचे लोक विलायती कच्चे रंग वापरूं लागल्यामुळें अलीकडे हा धंदा अगदीं बसला आहे. अमदाबादच्या तुरंगांत एका प्रकारची सुरेख सतरंजी निघते, तिचें नांव "अहमदनगर प्याटर्न्" ! धन्य त्या अहमदनगराची! तेथील कारागीर उपाशीं मरत आहेत, तरी शहराचें नांव सरकारदरबारीं पुष्कळ वर्षें चालेल अशी आशा आहे.

**गालीचे.** कराचीस मात्र अझूनही चांगले गालीचे तयार होतात. बाकी हैदराबाद, कराची, येरवडें, ठाणें व अमदाबाद या सर्व ठिकाणीं तुरुंगांत आमचे गालीचे जाऊन पडले आहेत! कोणास गालीचा पाहिजे असेल तर यांपैकीं कोणत्या तरी एका तुरुंगांत गेलें पाहिजे ! एका प्रसंगीं "विजापूर कार्पेट ह्मणजे विजापूर 'प्याटर्नचा' ( तऱ्हेचा ) गालीचा आपल्यास पाहिजे असल्यास पुण्याजवळ येरवडें येथील तुरुंगांत जा, असा एका गृहस्थास जबाब देणें आह्मास भाग पडलें. अमदाबाद शहरीं शेट मगनभाई हत्तीसींग यांच्या कारखान्यांत गालीचे विणीत असतांना आह्मी पाहिले आहेत. तसाच कारखाना आमच्या मुंबई शहरांत कोणी काढील तर त्यास फायदा झाल्याशिवाय राहाणार नाहीं.

**५. किरकोळ शोभिवंत व उपयोगी पदार्थ.** चित्रें, कागदावर कातरलेली नकशी, दगडावर कोरलेली नकशी, वाद्यें, टिकल्या, कटारी, व चांदले, हस्तिदंती सामान, मातीवर रोगण चढविलेल्या बरण्या वगैरे सामान, कांच,

ढाली वाळा, बांबू, वेत, नरोट्या, मातीचीं चित्रें, अकीका-चें सामान इत्यादि जिनसांचा समावेश 'किरकोळ उपयोगी व शोभिवंत पदार्थांत' केला आहे.

**चित्रें.** कागदावर देवादिकांचीं चित्रें काढणारे जिनगर जातीचे लोक पुणें, नाशिक, मुंबई, वगैरे ठिकाणीं आढळतात. त्यांचें काम मोठें तारिफ करण्यासारखें असतें असें नाहीं, तरी व्यापारी लोक त्यांचे नमुने विलायतेस पाठवून ? भिंतावर चिकटविण्याकरितां तेथून तसले कागद छापवून, आणितात. आमच्या " चित्रशाळा " वगैरे छापखान्यांत असलें काम होऊं लागेल तर बरें.

**कागदावर कातरलेली नकशी.** कागदावर कातरलेली नकशी, डोले ( ताबूत ) तयार करण्यास व मखरें तयार करण्यास उपयोगी पडते.

ही नकशी कातरण्यास जितकी मेहनत लागते तितक्या मानानें तीस किंमत येण्याची आशा नाहीं. केवळ धर्मावर श्रद्धा राखून जे लोक हें काम करितात, त्यांस तें तयार झालें म्हणजे एका प्रकारचा आनंद होत असेल एवढेंच.

**दगडावर कोरलेली नकशी.** दगडावर कोरलेली नकशी कानडा जिल्ह्यांत शिरशी गांवीं कांहीं थोडी होते; बाकी, इंग्रजी शिकलेल्या इंजिनियर लोकांच्या देखरेखीखालीं व्हिक्टोरिया टर्मिनस ( बोरीबंदर स्टेशन ) सारख्या नवीन इमारतींत व देवळांत आणि मुख्यत्वें जैनमंदिरांत जें काम होतें त्या शिवाय पश्चिम हिंदुस्थानांत असलें काम कोठें होत नाहीं.

**वाद्यें**. अमदाबाद, मिरज व मुंबई या शहरीं सतार, तंबुरा, विणा, मृदंग, सारंगी, वगैरे वाद्यांवर हस्तिदंताची अथवा रंगाची नकशी काढणारे कांहीं कुशळ कारागीर आहेत. या वाद्यांचे नमुने विलायतेस नेण्याकरितां साहेब लोक नेहमीं खरेदी करितात.

**टिकल्या, कटोऱ्या, चांदले वगैरे**. मुंबई व सुरत शहरीं कांचेच्या, अभ्रकाच्या व बेगडीच्या टिकल्या, कटोऱ्या व चांदले, गुजराथी मोची लोक बनवितात. त्यांचा उपयोग मखरें तयार करण्यास व कपाळीं लावण्यास होतो. विलायतेहून शिळा छापावर छापलेलीं कांहीं चित्रें आपल्या देशांत विकावयास येतात त्यांजवर कटोऱ्या व ठिकल्या चिकटविलेल्या असतात. त्याप्रमाणें आमच्या चित्रशाळेंतील तसबिरींवर देवांचे मुगूट किंवा राजेरजवाडयांचे शिरपेंच टिकल्या लावून तयार केले तर त्यांस किंमत ज्यास्त येईल, व आमच्या टिकलेवाल्यांचेंही पोट भरेल.

**हस्तिदंताचें व सांबरशिंगाचें काम**. सुरतेस हस्तिदंत व सांबरशिंग ह्यांचीं लहान लहान चित्रें करून तीं रंगवून विकतात. तरी बंगाल प्रांतीं मुर्शिदाबाद शहरीं फार सुरेख काम तयार होतें. त्या कामाची बरोबरी आमच्या सुरती लोकांच्यानें करवत नाहीं. पुण्यांत व मुंबईंत हस्तिदंती फण्या तयार होतात. पुणें, जुनागड, कच्छ (भूज), व सावंतवाडी या गांवीं हस्तिदंत कोरणारे कांहीं कुशळ कारागीर आहेत, परंतु त्यांस उत्तेजन देऊन त्यांजपासून चांगलें काम तयार करून घेईल असा व्यापारी कोणी आढळत नाहीं. असा कोणी सांपडेल तर आमच्या कारागिरांचें नशीब उघडलें असें समजलें पाहिजे.

**गव्याच्या शिंगाचें सामान.** रत्नागिरी जिल्ह्यांत विजयदुर्ग ह्मणून एक बंदर आहे तेथें व सावंतवाडीस गव्याच्या शिंगांचीं कमळें वगैरे तयार होतात. विजयदुर्ग येथील कारागीर फार गरीब स्थितींत आहेत. नुसतीं शिंगें घेण्यास सुद्धां त्यांजजवळ पैसे नाहींत, व त्यांजकडून काम तयार करून घेणें असल्यास तें वर्षानुवर्षें मिळत नाहीं. ही मोठी दिलगिरीची गोष्ट आहे. विजयदुर्गच्या एक दोन कारागिरांस मुंबईंत येऊन राहण्यास विषयीं शिफारस केली होती, पण ते घर सोडण्यास खुशी नाहींत असें आढळून आलें. यावरून असें वाटतें कीं, त्यांचें गांवच्याच कोणी व्यापारी त्यांस शिंगें देऊन त्यांजकडून माल वेळोवेळीं तयार करून घेईल तर मात्र तो मिळण्याची आशा आहे. शिंगांचीं कमळें, फुलदानें, वशा, संपुटें, हरणें, सांबरें, नंदी, वगैरे चित्रांस गिऱ्हाइकी फार आहे.

**मातीवर रोगण चढविलेलें बरण्या वगैरे सामान.** प्राचीन काळीं पश्चिम हिंदुस्थानांत रोगण चढविलेल्या बरण्या वगैरे मातीचीं भांडीं आमचे पूर्वज वापरीत असत किंवा नाहीं, हें अजून सिद्ध करून दाखवितां येत नाहीं. तत्रापि मुसलमानी राज्यांत सिंध हैदराबादेस, रोगण चढविलेल्या नकशीदार विटांनीं सुशोभित केलेल्या पुष्कळ जुन्या मशिदी आढळतात, त्यांवरून इतकें ठरतें कीं, पांचशें किंवा सहाशें वर्षांपूर्वीं तरी हें काम आमच्या देशांत होऊं लागलें असावें. सिंधप्रांतीं हल्लीं तयार होत असलेल्या बरण्या साहेब लोकांस फार पसंत पडतात. त्या कोणत्याही प्रदर्शनांत पाठलिया तरी ताबडतोब विकल्या जातात. मुंबई शहरीं मैदानांत असलेल्या बरण्या करण्याचा

एक कारखाना मेहेरबान टेरी साहेबांनीं काढिला आहे. त्यांत सिंधी कुंभार नोकरीस ठेवून त्यांच्या हातानें रोगण चढविण्यांत येतें. मातीचीं मडकीं खारवी जातीचे कुंभार तयार करितात, त्यांजवर चित्रशाळेंतील मुलें चित्रें काढितात, व मडक्यांच्या आकारांत किंवा त्यांजवरील नकशींत विलायती आकाराची व नकशीची भेळ होऊं नये ह्मणून देखरेखीचें काम साहेब महशूर स्वतः करीत असतात. मुंबई जवळ नायगांवास शेट फिरोजशहा नांवाच्या एका पारशी गृहस्थानें असला एक कारखाना काढला आहे. तेथेंही रोगण चढविलेल्या बरण्या तयार होतात. या दोन्ही कारखान्यांची भरभराट होऊन उभय मालकांस फायदा होईल तर त्यांत आह्मांस आनंद आहे.

**कांच.** देशी कांच पश्चिम हिंदुस्थानांत कपडवंज गांवीं मात्र होते. या गांवाच्या आसपासच्या जमिनींत एका प्रकारची माती सांपडते, तीस 'ऊस' ह्मणतात. ही माती भाजली ह्मणजे तिची कांच होते, कारण तिच्यांत 'पापडखार' व 'रेती' ह्या दोहोंची मिसळ आहे, ज्या आकाराचीं व रंगाचीं भांडीं कपडवंज येथें होतात त्याच आकाराचीं व रंगाचीं भांडीं रोम शहरांतील एका संग्रहालयांत ठेवलेलीं पाहण्यांत आलीं. त्यांच्या टिकिटांवर हीं 'व्हेनिस् शहरांतून आणिलेलीं,' असें लिहिलें आहे. यावरून आमचे कपडवंज येथील कांच तयार करणारे लोक व्हेनीस येथून आले; किंवा व्हेनीस येथील लोकांचे पूर्वज आमच्या देशांतून तिकडे गेले असावे असा एक मोठा ऐतिहासिक प्रश्न उत्पन्न होतो. या प्रश्नाचा काय निकाल होईल तो खरा, परंतु सांगण्यास आनंद वाटतो कीं हल्लींसुद्धां कपडवंज

येथून विलायतेस तीन लाख रुपयांची पक्की कांच दरसाल जात असते, असें त्या शहरच्या एक दोन व्यापाऱ्यांकडून माहिती मिळाली आहे.

**ढाली.** गेंड्याच्या व नीळगाईच्या कातड्यांच्या सुंदर ढाली कच्छ व अमदाबाद येथें होतात. त्यांचा साहेब लोकांत बंगले सुशोभित करण्याच्या कामीं उपयोग होतो. गेल्या आक्टोबर महिन्यांत पुणें येथें झालेल्या प्रदर्शनांत अमदाबाद येथील ढालगर पुरुषोत्तम खुशाल यांजकडून एक ढाल आली होती, ती राज्ञीपुत्र ड्यूक ऑफ् क्यानॉट यांनीं ३३६ रुपयांस विकत घेऊन खुद्द महराणी साहेबांस नजर केली.

**वाळ्याचें काम.** वाळ्याचे पंखे, डबे, व पेट्या सावंतवाडी, पुणें, व मुंबई, या ठिकाणीं तयार होतात. त्यांस मोराचीं पिसें, माशांचे पंख, टिकल्या, कलाबतू, इत्यादिकांच्या योगानें शोभा आणलेली असते. याही कामास मोठी गिऱ्हाइकी साहेब लोकांचीच.

**बांबू.** सावंतवाडीस डबे, टोपल्या, करंड्या सुपल्या, रोवळ्या वगैरे जिनसा बनवून त्या कापडानें मढवून त्याजवर चित्रें काढून वर लाख चढवितात. वाडीशिवाय इतर ठिकाणीं हें काम होत नाहीं.

**वेत.** वेताच्या करंड्या, फुलांच्या परड्या, खुर्च्या, वगैरे सामान मुंबईस, कच्छभूज येथें, व सरकारी तुरुंगांत तयार होतें. त्यांत ठाणें येथील तुरुंगांत होणारें काम विशेष सुंदर आहे.

**नरोटीवर पारा चढवून केलेलें काम.** नारळाच्या

बेल्यांचे डबे करून, त्यांजवर नकशी खोदून त्यांत पारा भरण्याचें काम सावंतवाडी येथील कारागीर करितात.

**मातीचीं चित्रें.** पूर्वी मातीचीं चित्रें जिनगर, व कुंभारलोक मात्र करीत असत. अलीकडे पुण्यांत सोनार, ब्राह्मण, व गुरव लोक चांगलीं सुरेख चित्रें करूं लागले आहेत. ते वेगवेगळ्या जातींच्या लोकांचीं व वेगवेगळ्या पेहरावाचीं चित्रें करून साहेब लोकांस विकतात.

**अकीकाचें काम.** अकीक हा दगड खंबायतेस सांपडतो. नदीतीरीं कच्चा माल गोळा करून व्यापारी लोक त्याचे दोन भाग करितात. एक भट्टींत घालून भाजावयाचा असा, व दुसरा भट्टींत घालण्याची जरूर नाहीं असा. या दुसऱ्या प्रकारच्या दगडाच्या तीन जाती आहेत.

१ "गोरा" अथवा "भावागोरी,"

२ "चष्मदार" अथवा "डोळा,

३ " रोरी" अथवा "लसणिया."

भट्टींत भाजावे लागतात अशा दगडांच्या पुष्कळ जाती आहेत, व त्या प्रत्येकीस वेगळें नांव आहे. अकीकाचा व्यापार करणारे खंबायतेस सुमारें शंभर व्यापारी आहेत, व कारागिरांची संख्या सुमारें अडीच हजारांपासून तीन हजारपर्यंत होईल. अकीकाच्या लोलक, आंगठ्या, कांकणें, मडमांच्या गळ्यांतील 'ब्रोच,' वगैरे पुष्कळ जिनसा होतात. त्या विलायत, चीन, व जपान या देशीं विकावयास पाठवितात.

# गणपतकृष्णाजी यांच्या छापखान्यांतील विक्रीचे ग्रंथ.

| | रु. | आ. | पै. |
|---|---|---|---|
| एकनाथीभागवत... | ६ | ८ | ० |
| सिद्धांतबोध...... | ६ | ० | ० |
| भक्तलीलामृत ... | ५ | ० | ० |
| काशीखंड... ... | ४ | ८ | ० |
| ज्ञानेश्वरी......... | ४ | ८ | ० |
| रामविजय ... ... | ४ | ० | ० |
| पांडवप्रताप ...... | ४ | ० | ० |
| तुकारामबुवाची गाथा | ४ | ० | ० |
| भक्तविजय. ...... | ३ | ८ | ० |
| जैमिनिअश्वमेध ... | ३ | ८ | ० |
| गीतार्थबोधिनी ... | ३ | ० | ० |
| हरिविजय ग्लेझका. | २ | ८ | ० |
| हरिविजय रफकागद | २ | ० | ० |
| दासबोध... ...... | २ | ० | ० |
| तुकारामचरित्र .. | १ | ८ | ० |
| शिवलीलामृत ... | १ | ४ | ० |
| दशमाच्या आर्या. | १ | ० | ० |
| रुक्मिणीस्वयंवर.. . | १ | ० | ० |
| काशीप्रकाश...... | १ | ० | ० |
| पंचरत्नगीता प्राकृत गु० लालरेघा. | ० | १२ | ० |
| पंचरत्न प्राकृत गु० काळयारेघा. | ० | ८ | ० |
| लेखनपद्धति...... | ० | ८ | ० |
| विदुरनीति व नारदनी० | ० | ८ | ० |
| भावचंद्रिका ...... | ० | ८ | ० |
| बाळक्रीडा अभंग.... | ० | ८ | ० |
| पदसंग्रह... ...... | ० | ८ | ० |
| मनश्चंद्रबोध ...... | ० | ८ | ० |

| | रु. | आ. | पै. |
|---|---|---|---|
| संगीत ललित. ... | ० | ८ | ० |
| तुलसीमाहात्म्य.... | ० | ६ | ० |
| सिंहासनबत्तिशी... | ० | ६ | ० |
| वेताळपंचविशी ... | ० | ६ | ० |
| सप्तशतीप्राकृत ... | ० | ६ | ० |
| पंढरीमाहात्म्य ... | ० | ६ | ० |
| लवकुशाख्यान ... | ० | ४ | ० |
| हरिश्चंद्रआख्यान... | ० | ३ | ० |
| शनिमाहात्म्य (ला.) | ० | ३ | ० |
| " काळ्यारेघा.... | ० | २ | ० |
| रामदासी मनाचे श्लोक | ० | २ | ६ |
| बभ्रुवाहन आख्यान. | ० | २ | ० |
| कनकेश्वरमाहात्म्य. | ० | २ | ० |
| व्यंकटेशस्तोत्र ... | ० | २ | ० |
| कृष्णजयंती...... | ० | २ | ० |
| नळाख्याननोडीवखर | ० | २ | ० |
| पांडुरंगस्तोत्र...... | ० | २ | ० |
| सुदामचरित्र.... | ० | २ | ९ |
| श्रीगुरुस्तोत्र..... | ० | २ | ० |
| पंचपदी ...... | ० | २ | ० |
| छबिना... . | ० | २ | ० |
| शिवरात्रीमाहात्म्य | ० | १ | ६ |
| एकादशीमाहात्म्य | ० | १ | ६ |
| सोळासोमवारकथा | ० | १ | ६ |
| करुणामृतस्तोत्र . | ० | १ | ० |
| अश्विनी आख्यान | ० | १ | ० |
| पाळणे .... | ० | १ | ० |
| हरिपाठ अभंग . | ० | १ | ० |
| नौकाक्रीडनश्लोक. | ० | १ | ० |

# विविधज्ञानविस्तार पुस्तकालयांतील विक्रीचीं पुस्तकें.

| | रु. | आ. | पै. |
|---|---|---|---|
| पश्चिम हिंदुस्थानांतील हुन्नर. | ० | १ | ० |
| दुष्काळनिवारण. | ० | ४ | ० |
| पुरून ठेविलेलें द्रव्य. | ० | ३ | ० |
| सटवाजीराव ढमाले. | ० | ४ | ० |
| ब्रिटिश राज्यव्यवस्था. | ० | ८ | ० |
| बेकनचे निबंध. | ० | ८ | ० |
| सिसरोकृत नीतिविषयक चार निबंध. | ० | ४ | ० |
| कर्तव्यविचार अथवा व्यवहारनीति भाग २ रा. | ० | २ | ६ |
| चातुर्य आणि मनोरंजन | ० | ५ | ० |
| महाराष्ट्र भाषेची लेखनशुद्धि. | ० | २ | ० |
| लाघवी लिपि अथवा अतित्वरेनें लिहिण्याची युक्ति. | ० | ५ | ० |
| सुबोध व्याकरण. | ० | ४ | ० |
| सौभाग्य रत्नमाला. भाग १ ला. | ० | ६ | ० |
| भाग २. | ० | ६ | ० |
| बालविवाह. | ० | १ | ० |
| व्हिक्टोरिआ महाराणीचें चरित्र. | ० | ३ | ० |
| कुटुंबवत्सल. | ० | २ | ० |
| हानत. | ० | १ | ६ |
| तीन गोष्टी. | ० | ४ | ० |
| बालशिक्षण. | ० | ३ | ० |
| सुंदरेची संक्रांत. | ० | १ | ६ |
| नानकचरित्र. | ० | ३ | ० |
| लार्ड बेकनचें चरित्र. | ० | १० | ० |

| | रु. | आ. | पै. |
|---|---|---|---|
| काव्यमाधुर्य. | ० | ७ | ० |
| श्री. माधवराव पेशवे यांच्या मृत्यूवर काव्य. | ० | ६ | ० |
| गणपतिनिधनविलाप. | ० | २ | ० |
| मुलांस थोडासा बोध. | ० | १ | ० |
| स्वतःचा प्रयत्न. | ० | ३ | [illegible] |
| कुसुमांजली. | ० | ४ | ० |
| ठगाची जबानी. | २ | ८ | ० |
| श्रीमहाबळेश्वर वर्णन. | ० | ८ | ० |
| वनस्पतिशास्त्राचीं मूलतत्त्वें. | १ | ४ | ० |
| अबलासंजीवन. | १ | ० | ० |
| सायुज्यसदन नाटक. | १ | ० | ० |
| शककाल विचार. | ० | ६ | ० |
| गृहिणीकंठभूषण. | ० | १२ | ० |
| सौभाग्य रत्नमाला (दोन भाग एकत्र.) | ० | ११ | ० |
| अकबर काव्य. | ० | ८ | ० |
| मोहना नाटक | ० | ८ | ० |
| प्रियाळ नाटक. | ० | ८ | ० |
| भ्रांतिकृत चमत्कार. | ० | ६ | ० |
| सद्गुणी स्त्री. | ० | ४ | ० |
| दोन गोष्टी. | ० | ४ | ० |
| मारिसचा प्रश्नोत्तररूप इतिहास. | ० | ५ | ० |
| अभिनव कादंबरी. | ० | ५ | ० |
| रिपनवियोग (मराठी इंग्रजी.) | ० | २ | ० |
| रिपनवियोग (मराठी) | ० | १ | ० |
| आर्यमातृविलाप. | ० | ० | ६ |
| हेनरी फासेट. | ० | ० | ६ |

हे ग्रंथ व पुस्तकें रोख पैसा अगर व्हा० पे० नें मागविल्यास तावडतोब पाठविण्यांत येतील. **म्यानेजर विविधज्ञानविस्तार.**

Maijikar Brothers
Commission Agent
39 Lower Chenbe
Khana

# विद्येचे इष्ट परिणाम

ह्मणजे

विद्येपासून आपणांवर कोणते परिणाम
घडले पाहिजेत.

हा निबंध

**रामचंद्र विनायक परळकर**

यांनीं

क्षात्रैक्यसमाजाच्या जाहिरातीवरून लिहून त्या
मंडळीपुढें वाचला.

तो

त्या समाजानें छापवून प्रसिद्ध केला.

१८८९.

**सूचना:**—रा० रा० बाबुराव बाळकृष्ण यांच्या सूचनेवरून क्षात्रैक्यसमाजानें क्षत्रियज्ञातीच्या लोकांकडून ह्या विषयावर निबंध मागविले. त्याप्रमाणें आलेल्या सात निबंधांत हा निबंध पसंत झाल्याकारणानें निबंधकारास बक्षीस देण्याचें ठरविण्यांत आलें. हा निबंध ज्ञातिबांधवांचे अवलोकनांत यावा ह्मणून कांहीं सद्गृहस्थांनीं तो छापविण्याच्या कामीं मदत करण्याचें कबूल केलें. त्यांच्या मदतीचा समाजानें आभारपूर्वक स्वीकार करून, ज्ञातींतील लोकांस वांटण्याकरितां हा निबंध छापविला.

# विद्येचे इष्ट परिणाम.

... ग्रंथ संग्रहालय
नं० १९८
१९०

## ह्मणजे
## विद्येपासून आपणांवर कोणते परिणाम घडले पाहिजेत.

### आर्या.

ज्यांच्या हत्कासारीं होय गुणस्नेह-विंदुही फार ।
सारज्ञ असूयोज्झित त्यांला माझा असो नमस्कार ॥

**मोरोपंत.**

मनुष्य बरा वाईट निपजणें हें त्याच्या शिक्षणावर अवलंबून असतें. प्रख्यात निबंधकार आडिसन ह्मणतात:—

"What sculpture is to a block of marbie, education is to a human soul."

ह्मणजे मूर्तिकाराच्या कारागिरीचा जो परिणाम दगडावर होतो, तोच परिणाम मनुष्याच्या मनावर शिक्षणाचा होतो.

आफ्रिकेच्या मध्यप्रदेशांत, अतिशयित रानटी लोकांची वस्ती आहे. ते केव्हां केव्हां लहान लहान टोळ्या करून, व केव्हां केव्हां एकएकटे, डोंगरांच्या गुहांत अथवा रानांत वास करितात; पारधींत मारलेल्या जनावरांवर, व केव्हां केव्हां स्वजातीय प्राण्यांवर, त्यांचा निर्वाह चालतो; पुढला मागला त्यांना कांहीं विचार नसतो; आपण कोण, आलों कोठून, जाणार कोठें, येथें आपल्याला काय कर्तव्य आहे, इत्यादि गोष्टी त्यांच्या स्वप्नांही येत नसतात; आपणांला गरज आहे अशी वस्तु दुसऱ्या कोणाजवळ असली, तर त्याच्या जवळून ती जुलमानें घ्यावी, आपल्या सुखासाठीं दुसऱ्याला पाहिजे तितका

त्रास द्यावा, असें त्यांचें आचरण असतें. स्वसुख, ही त्यांची आराध्य देवता असते, व 'बळी तो कान पिळी' हा त्यांचा न्याय असतो. ही स्थिति अगदीं अडाणी लोकांची आहे. ज्यांवर विद्येचा संस्कार झाला नाहीं, व ज्यांवर अज्ञानतिमिर पसरलेलें आहे, त्यांचा वर्तनक्रम अशा प्रकारचा असतो.

आतां, ज्यांवर विद्येचा संस्कार झाला आहे, अशा मनुष्यांच्या मनावर कोणता परिणाम होतो, तें पाहूं. ज्याप्रमाणें लोखंडाला परिसाचा स्पर्श झाला ह्मणजे लोखंडाचें सोनें होतें, त्याप्रमाणें, मनुष्याच्या मनावर विद्येचा संस्कार झाला ह्मणजे, पशु, पक्षी, इत्यादिकांहून श्रेष्ठ पद त्याला प्राप्त होतें. ह्या श्रेष्ठत्वाचे, अनेक मनुष्यांवर, अनेक परिणाम घडतात. कित्येक लोक, इतर प्राण्यांकडून आपल्याला पाहिजे तसें काम करून घेतात; कित्येक आपणांला मौज वाटावी ह्मणून त्यांना प्रतिबंधांत ठेवितात; व कित्येक, हिंस्र पशूंपासून निर्बल पशूंचें रक्षण करवितात. ही गोष्ट मनुष्य आणि पशु ह्यांच्यांतील झाली. आतां फक्त मनुष्यांची गोष्ट घेऊं. सर्व मनुष्यांना सारखी ज्ञानप्राप्ति होईल, हें अशक्य आहे. ह्मणून, कित्येक मनुष्यें, इतरांपेक्षां अधिक विद्वान् व्हावीं, हें साहजिकच आहे. व ह्या विद्वानांचें, इतर जनांबरोबरील वर्तन, वेगवेगळ्या तऱ्हेचें असलें पाहिजे, हें उघड आहे. हें वर्तन चांगल्या तऱ्हेचेंच असतें असें नाहीं. केव्हां अन्यायाचें, जुलमाचें, व कपटाचें, आणि केव्हां न्यायाचें, सरळ, व सालसपणाचें असें असतें. ह्यांतून चांगलें कोणतें, व वाईट कोणतें, इष्ट कोणतें व अनिष्ट कोणतें, हें पाहणें जरूर आहे. कारण, असें केल्यानें, इतरांबरोबर चांगलें व इष्ट वर्तन होण्यास, विद्येच्या योगानें मनावर कोणते संस्कार झाले पाहिजेत, हें पाहण्यास बरें पडेल.

एका कवीनें विद्येचें वर्णन असें केलें आहे:—

मातेव रक्षति पितेव हिते नियुङ्क्ते
कान्तेव चापि रमयत्यपनीय खेदम् ।
लक्ष्मीं तनोति वितनोति च दिक्षु कीर्ति
किं किं न साधयति कल्पलतेव विद्या ॥

अशा प्रकारच्या विद्येचें परिस्फोटन येथें केलें असतां, अप्रासंगिक होईल असें नाहीं; कारण, जरी आजचा विषय विद्येपासून आपणांवर काय परिणाम घडले पाहिजेत असा आहे, तरी विद्या ह्या शब्दाचा खरा अर्थ समजल्याखेरीज, तिजपासून होणाऱ्या परिणामांकडे वळणें, हें ठीक होणार नाहीं. ह्मणून आतां, विद्येची व्याख्या करण्याचा प्रयत्न करूं.

जर्मनीची राजधानी कोणती ?—नाईल नदी कोणत्या देशांतून वहाते ?—नेपोलियन केव्हां जन्मला ?—अथवा पानिपतची लढाई केव्हां झाली ?—हें सांगतां आलें, अथवा 'एका त्रिकोनाच्या सगळ्या कोनांची बेरीज, दोन काटकोनांबरोबर होते,' हें सिद्ध करितां आलें, अथवा इंग्रजी, संस्कृत किंवा दुसऱ्या एखाद्या भाषेंत, अस्खलित बोलतां आलें ह्मणजे विद्येची परिपूर्णता झाली, विद्येपासून मनावर इष्ट संस्कार घडले, असें ह्मणतां येणार नाहीं. त्याच प्रमाणें, विश्वविद्यालयाच्या कित्येक परीक्षा दिल्यानें, शिक्षणाचें काम संपलें, असेंही होत नाहीं. भट्ट मोक्षमुल्लर हे आपल्या 'India, what can it teach us?' ह्या ग्रंथांत ह्मणतात:—

'The universities were meant to teach us something, that may not have a marketable value before a board of examiners, but which has a permanent value for the whole of our life, and that is a real interest in our work, and more than that, a love of our work, and more than that, a true joy and happiness in our work.'

ह्याचें तात्पर्य—विश्वविद्यालयांतील शिक्षण असें असलें पाहिजे कीं, तें परीक्षेंत उतरण्यास उपयोगी पडावें एवढेंच केवळ नव्हे; तर तें आपणांस जन्मभर सर्व कामांत उपयोगी पडावें, तेंच खरें शिक्षण; त्यानें आपलें कर्तव्य आपणांस आवडेसें झालें पाहिजे; आणखी त्याहीपेक्षां विशेष हें कीं आपल्या कर्तव्यांत आपणांस खरा आनंद आणि खरें सुख वाटलें पाहिजे.

मनुष्यास मानसिक व शारीरिक अशा दोन शक्ति असतात. कसरत, तालीम, इत्यादि व्यवसायानें, शारीरिक शक्ति दृढ व वृद्धिंगत होते. कसरतीच्या योगानें शरीराच्या ठेवणींत फेरफार होतो, तसाच विद्येच्या योगानें मनाच्या घटनेंत फेरफार होतो. हा फेरफार कोणत्या तऱ्हेचा झाला पाहिजे, हें पाहूं.

ह्या फेरफाराचीं आपण दोन अंगें कल्पूं; एक विद्याप्राप्तीनें साक्षात् होणारा परिणाम, व दुसरा परंपरया होणारा परिणाम. साक्षात् होणाऱ्या परिणामांत, विद्याप्राप्तीनें स्वतःविषयीं काय वाटलें पाहिजे?— ह्याविषयीं, ह्मणजे विद्याप्राप्तीनें गर्व, अभिमान, इत्यादि मनोवृत्तींवर होणाऱ्या परिणामाविषयीं विचार करूं. ह्या परिणामांत आपणांस किती कमी ज्ञान आहे हें समजणें हा विद्येपासून मनावर होणारा पहिला परिणाम आहे; हा परिणाम पहिला असून अत्यंत महत्त्वाचा आहे; व विद्यावृद्धीबरोबर हा वाढत गेला पाहिजे. अशिक्षित मनुष्याला विश्वाचा विस्तार किती अवाढव्य आहे, मनुष्य प्राणी किती क्षुद्र आहे, त्याची शक्ति किती मर्यादित आहे, ह्या जगांत त्याचें वास्तव्य किती अल्प आहे, इत्यादि गोष्टी कळण्याचीं साधनें नसतात; पण ज्याला खगोलादि विद्या अवगत आहेत, आजपर्यंत झालेल्या बुद्धिवान् व शोधक लोकांची थोडी बहुत माहिती आहे, ज्याला पंचमहाभूतांचा प्रभाव ठाऊक आहे, त्याला स्वतःचें अज्ञान व दौर्बल्य दिसून येऊन, त्यानें नम्र व्हावें, हें साहजिक आहे.

गर्व, आढ्यता व मगरुरी हीं अज्ञानदर्शक चिन्हें आहेत; व विनय आणि नम्रता हीं विद्वत्तासूचक आहेत. भर्तृहरि ह्मणतोः—

यदा किंचिज्ज्ञोऽहं द्विप इव मदान्धः समभवं
तदा सर्वज्ञोऽस्मीत्यभवदवलिप्तं मम मनः ।
यदा किंचित्किंचिद्बुधजनसकाशादवगतं
तदा मूर्खोऽस्मीति ज्वर इव मदो मे व्यपगतः ॥

ह्मणजे जेव्हां मी अल्पज्ञ होतों, तेव्हां मत्तमतंगजाप्रमाणें मदान्ध झालों, व मी अतिशय विद्वान् आहे असा गर्व मला झाला. परंतु जसजसें माझें मन विद्वज्जनांच्या सहवासानें विकास पावत गेलें, तसतसा माझ्या अज्ञानाचा मला उमज पडून, ज्वराप्रमाणें माझा मद नाहींसा झाला.

ज्याप्रमाणें दानावांचून धन हें व्यर्थ आहे, सदुपयोगावांचून अधिकार हा बाधक आहे, त्याप्रमाणें विद्या ही विनयावांचून अश्लाघ्य आहे. 'विद्या ह्यापि सावद्या विना विनयसंपदम्' विद्या कितीही मान्य असो, विनयावांचून ती निंद्य आहे. रामदास ह्मणतातः—

अहंतागुणें सर्वही दुःख होतें । मुखें बोलिलें ज्ञान तें व्यर्थ जातें ॥

न्यूटन, ग्यालिलिओ इत्यादि विद्वानांच्या अंगांत विनय अतिशयित होता. त्यांच्यासारखे बुद्धिवान् गृहस्थ जर इतके नम्र होते, तर इतर जनांना आपापल्या ज्ञानाविषयीं गर्व बाळगण्यास किती जागा उरते, ह्याचा विचार ज्याचा त्यानेंच करावा.

व्यासपुत्र शुक ह्याला आपल्या ज्ञानाचा व वैराग्याचा अतिशयित गर्व झाला होता. तो एकदां जनक राजाच्या येथें गेला, व शुकमुनि बाहेर आले आहेत ह्मणून राजाला जाऊन सांग, असें द्वारपालास त्यानें सांगितलें. शुकाला वाटलें कीं आपलें नांव ऐकल्याबरोबर राजा आपणांस भेटावयास बाहेर येईल; परंतु राजानें आंतून निरोप पाठविला कीं 'संगं त्यक्त्वा सुखी

भव' तुझ्या बरोबर असलेल्याचा त्याग कर आणि सुखी हो. पहा, गर्वामुळें शुकासारख्याही महामुनीचा उपमर्द झाला. एकनाथांनीं ह्मटलें आहे:—

मी ज्ञाता तो अज्ञान, ऐसें जेथं स्फुरे स्फुरण ।
तेथूनि पळे ब्रह्मज्ञान, ज्ञानाभिमान उरे देहीं ॥

ज्याप्रमाणें, जगीं सर्वसुखी असा कोणी नाहीं, त्याचप्रमाणें जगांत सर्वज्ञ असा कोणी नाहीं. सर्वांस इतरांपासून शिकण्याजोगें असें थोडें तरी असतें. स्माइल्स ह्मणतात:—

"He who thinks himself already too wise to learn of others, will never succeed in doing anything, either good or great. We have to keep our minds and hearts open, and never be ashamed to learn, with the assistance of those, who are wiser and more experienced than ourselves."

'आपणांस दुसऱ्यापासून शिकण्यासारखें कांहीं नाहीं, असें ज्यास वाटत असतें, त्याच्या हातून चांगलें किंवा मोठें काम कधींही व्हावयाचें नाहीं. आपण सदा नवी गोष्ट शिकण्यास, आणि बोध घ्यावयास तयार असावें, आणि आपणापेक्षां जे शहाणे व अनुभवशीर असतील त्यांपासून ज्ञान संपादण्यास आपणांस लाज वाटूं नये.'

विनय असणें आणि आर्जव करणें ह्या दोन गोष्टी अगदीं निराळ्या आहेत, हें सांगायाला नकोच. विनय असण्याची आपणांस जितकी आवश्यकता आहे, तितकीच आर्जव करण्याचा तिरस्कार असणें ह्याची आवश्यकता आहे. विद्वान् मनुष्याला स्वतःविषयीं व स्वतःच्या विद्येविषयीं अभिमान वाटावा, हें साहजिक आहे. गर्व व अभिमान हे दोन गुण भिन्न आहेत. गर्विष्ठ मनुष्याला इतरांच्यापेक्षां आपल्या अंगांत एखादा गुण, अथवा आपणाजवळ एखादी वस्तु विशेष आहे, ह्मणून आनंद

वाटतो, व इतरांना तो तिरस्कारानें वागवितो; परंतु स्वाभिमानी मनुष्याची गोष्ट ह्याच्याहून अगदीं निराळी आहे. त्याला स्वतन्त्र रीतीनें वागण्याची हौस असते. सदा दुसऱ्याच्या तोंडाकडे पहात राहावें, आपलें जिणें दुसऱ्यावर अवलंबून असावें, अथवा दुसऱ्याच्या महत्त्वावर आपण थोरवी मिरवावी, हें स्वाभिमानी मनुष्याला मरणास्पद होतें. "पराधीनं वृथा जन्म" हें तत्व त्यास ठाऊक असतें. तो उपाशी मरेल, परंतु भिक्षा मागणार नाहीं. विद्येच्या योगानें मनुष्याच्या आंगांत स्वाभिमान जागृत होणें हें अवश्य आहे. कारण, स्वाभिमानी पुरुषाचे विषयीं इतर जनांच्या मनांत पूज्यबुद्धि उत्पन्न होते, व पूज्यबुद्धि उत्पन्न झाली ह्मणजे ते त्याचें अनुकरण करूं लागतात.

येथपर्यंत विद्येच्या योगानें मनाची स्थिति कोणत्या तऱ्हेची व्हावी, ह्मणजे मनावर कोणते साक्षात् परिणाम व्हावेत, ह्याचा विचार झाला. आतां विद्येचा उपयोग कसा करावा, ह्मणजे विद्येनें मनाला कोणतें वळण द्यावें, हें पाहूं, ह्मणजे आतां दुसऱ्या अंगाचा विचार करूं. च्यानिंग् साहेब ह्मणतात:—

"Its (Education's) office is to call forth power of every kind,—power of thought, affection, will, and outer action; power to observe, to reason, to judge, to contrive; power to adopt good ends firmly, and to pursue them efficiently; power to govern ourselves and to influence others; power to gain and to spread happiness."

ह्मणजे 'विद्येच्या योगानें मनुष्याच्या प्रत्येक शक्तीची उन्नति व्हावी; विचार करण्याची शक्ति, ममता, मनोरथ, व कर्तबगारी, ह्यांचा त्याचे ठायीं उदय व्हावा; त्यास वस्तुस्थितीचें अवलोकन करितां यावें; तिच्याविषयीं साधक बाधक प्रमाणांचा विचार करितां येऊन, तिचें खरें स्वरूप लक्षांत यावें, व त्याचा आपणांस उपयोग करून घेतां यावा; चांगल्या साधनांची योजना करितां यावी, व

कार्यसिद्धि होईल, अशा रीतीनें ती अमलांत आणतां यावी. आपले मनोविकार स्वाधीन ठेवतां येऊन, दुसऱ्यांना वळण घालून देतां यावें; आणि स्वतः सुखी होऊन, दुसऱ्यांना सुखी करतां यावें.' ह्यांतील कित्येक गोष्टींचें आतां विवेचन करूं.

मनुष्याच्या ठायीं, आपल्या आप्तांविषयीं आणि इतर मानवांविषयीं प्रीति उत्पन्न झाली पाहिजे व आपली स्थिति सुधारण्याविषयीं, त्याच्या मनांत इच्छा उत्पन्न झाली पाहिजे. आपल्या पुराणांत सांगितलें आहे कीं, मनुष्यानें माया ममता सोडून द्यावी, इहलोकींच्या सुखांचा तिरस्कार करावा, नेहमीं निरिच्छ असावें, तरच त्याला सुख होईल; नाहीं तर जो संसारपाशांत सांपडला आहे, ज्याच्यावर मायेचा पूर्ण प्रभाव आहे, व ज्याच्या इच्छा पौर्णिमेच्या समुद्राप्रमाणें वृद्धिंगत होत आहेत, त्या मनुष्याला अत्यंत दुःखें भोगावीं लागतील. ह्या मासल्याच्या विचारांनीं आपलीं पुराणें परिपूर्ण आहेत. पुराणांत ममतेचा उच्छेद करावयास सांगितला आहे, ह्याचें कारण हें कीं, मनुष्य एकदां भवपाशांत गुंतला ह्मणजे श्रीमच्छंकराचार्यांच्या

वालस्तावत्क्रीडासक्तस्तरुणस्तावत्तरुणीरक्तः ।
वृद्धस्तावच्चिंतामग्नः परमे ब्रह्मणि कोऽपि न लग्नः ॥

ह्या ह्मणण्याप्रमाणें, त्यास ईश्वराविषयीं विसर पडतो, आणि धर्माविषयीं तो उदास होतो, ह्मणून त्यानें संसारांतील बंधनें तोडून टाकावीं. आपला कोणत्याही सुहृदावर अथवा वस्तूवर लोभ नसला, ह्मणजे त्या सुहृदाच्या मृत्यूपासून व त्या वस्तूच्या नाशापासून आपणाला फारसें दुःख वाटत नाहीं, अथवा स्वतःच्या मरणसमयीं, आपणाला अमक्या अमक्या मनुष्याचा वियोग घडेल, अथवा अमकी अमकी वस्तु सोडून जावें लागेल, असें वाटून विषाद होत नाहीं. आतां ह्याचा विचार क-

रितांना हें लक्षांत ठेविलें पाहिजे कीं, आपले पुराणकर्ते सर्व विरक्त होते; संसाराचा कंटाळा अनेक कारणांनीं त्यांना आला होता, ह्मणून त्यांनीं सर्वसंगपरित्याग करून एकांतवास स्वीकारला, आणि तेथें त्यांनीं आपले ग्रंथ रचिले. अशा लोकांनीं संसाराविषयीं तिरस्कार दाखवावा, हें स्वाभाविकच आहे. माझ्या मनांत संन्यासाश्रमाची निंदा करावयाची नाहीं, अथवा गृहस्थाश्रमाची स्तुति करावयाची नाहीं; परंतु ही गोष्ट सर्वजण कबूल करतील कीं, संसारांत दुःखें कितीही येवोत, संन्यासाश्रम स्वीकारणाऱ्या लोकांची संख्या नेहमीं अतिशय थोडीच असणार; व थोडा विचार केला ह्मणजे असें आढळून येईल कीं, मानवी प्राण्यानें गृहस्थाश्रमांत काळ कंठावा, असाच ईश्वरी संकेत आहे. जर सर्वांनींच भगवीं वस्त्रें धारण करण्याचा निश्चय केला, तर मनुष्यजातीला आज जी उन्नतावस्था प्राप्त झाली आहे, ती कधींच प्राप्त होतीना; इतकेंच नाहीं तर ह्या जगांतून मनुष्यजाति केव्हांच नाहींशी झाली असती. आईबापांनीं मुलांवर प्रीति करावी, हा ईश्वरी संकेत आहे; व ह्या ममतेचा नाश होणें, हें मनुष्याला हानिकारक आहे, इतकेंच नाहीं, तर तें त्याच्या स्वाधीनही नाहीं. आतां विद्येच्या योगानें सर्व मनुष्यजातीविषयीं प्रीति उत्पन्न झाली पाहिजे, व त्याच्या ठायीं जात्यभिमान व देशाभिमान उत्पन्न झाला पाहिजे. त्यानें जातीबरोबर सलोख्यानें, देशबांधवांबरोबर मित्रत्वानें, आणि इतर मनुष्यांबरोबर प्रेमानें वागलें पाहिजे. अडाणी मनुष्य, आपण व आपले आप्त, ह्यांच्या विषयींच काळजी घेत असतो; परंतु विद्येच्या योगानें ज्याचें मन प्रशस्त झालें आहे, ज्याला 'वसुधैव कुटुंबकं' असें वाटूं लागलें आहे, व 'स्वार्थो यस्य परार्थ एव' हें वाक्य ज्याला लागतें, तो स्वसु-

त्याची विशेष परवा न करितां, इतरांच्या सोईकडे पहात असतो, व त्यांना जेणेंकरून सुख होईल असें आपलें आचरण ठेवण्याविषयीं खबरदारी राखीत असतो. जॉर्ज वॉशिंग्टन्, जॉन् ब्राइट्, शिवाजी, यांचीं चरित्रें वाचून पाहिलीं असतां, इतर जनांच्या सुखाकरितां चांगला मनुष्य किती तोटा सोसण्यास तयार असतो, हें ध्यानांत येईल. कवि ह्मणतातः—

पिबन्ति नद्यः स्वयमेव नाम्भः स्वयं न खादन्ति फलानि वृक्षाः ।
नादन्ति सस्यं खलु वारिवाहाः परोपकाराय सतां विभूतयः ॥

ह्मणजे, नद्या स्वतःच कांहीं उदकाचें प्राशन करीत नाहींत; झाडें फलांचें भक्षण करीत नाहींत; मेघ धान्य खात नाहींत; सारांश, सज्जन इतरांसाठीं आपला देह अर्पण करितात. कविवर्य कालिदासानें ह्मटलें आहे:—

अनुभवति हि मूर्ध्ना पादपस्तीव्रमुष्णं
शमयति परितापं छायया संश्रितानाम् ।

ह्मणजे, झाडें आपल्या शिरोभागावर सूर्याचा प्रखर ताप सहन करितात, आणि आपल्या छायेचा आश्रय करणाऱ्या पांथस्थांचा श्रमपरिहार करितात. ह्या झाडांप्रमाणें दुसऱ्याचें दुःख हरण करणें, व त्याला सुख देणें हें प्रत्येक विद्वानाचें काम आहे.

आतां मनुष्याचे ठायीं निरनिराळ्या इच्छा उत्पन्न होणें ह्यापासून किती फायदे होतात हें पाहूं. परंतु ह्याचा विचार करण्यापूर्वी, इतकें सांगून ठेवितों कीं, 'न संतोषात् परमं सुखं' समाधान हेंच सुख आहे, हा न्याय मला मान्य आहे, व ह्याविषयीं माझे विचार मी विस्तारपूर्वक पुढें सांगणार आहें. मनुष्याचे मनोरथ वाढत जावे, असें जें माझें ह्मणणें आहे, त्यावरून असें समजूं नये कीं, मनुष्यानें समाधानवृत्तीनें राहूं नये. मनुष्याचे मनांत इच्छा उत्पन्न झाली ह्मणजे, इच्छित पदार्थ मिळविण्याकरितां उद्योग करण्यास त्याला ईर्षा उत्पन्न होते, व

त्या ईर्षेनें तो श्रम करितो. येथपर्यंत मनोरथापासून कांहीं दुःख होत नाहीं; कारण, आपण होऊनच मेहनत करणें, ही गोष्ट दुःखापासून वेगळी आहे. परंतु श्रम करून इच्छित वस्तु प्राप्त झाली नाहीं ह्मणजे वाईट वाटणें, व निराश होणें, हें मानवधर्माला अनुसरूनच आहे; परंतु इतक्यासाठीं मनुष्यानें कोणत्याही वस्तूची इच्छाच धरूं नये, अथवा निरिच्छ असावें, हें ह्मणणें निवळ वेडेपणाचें आहे असें मला वाटतें; कारण आजपर्यंत मनुष्यांच्या मनांत निरनिराळे मनोरथ आले नसते, 'सर्वाः संपत्तयस्तस्य संतुष्टं यस्य मानसं' ह्या वाक्यानें त्यांनीं आपलें समाधान करून घेतलें असतें, व आपलें सुख वाढविण्याविषयीं त्यांनीं इच्छाच केली नसती, तर मग मनुष्यप्राण्याचीं सुखोपभोगाचीं साधनें जीं आजपर्यंत वाढलीं आहेत, त्यांची जी उन्नति झाली आहे, व त्यांना जें पंचमहाभूतांवर स्वामित्व प्राप्त झालें आहे, तें कधींच प्राप्त होतें ना. ज्या वेळीं, आपली आहे तीच स्थिति उत्तम आहे, आपल्याला अधिकाची गरज नाहीं, असे विचार लोकांच्या मनांत येऊं लागतील, त्या वेळीं सुधारणेची वाढ खुंटेल, मनुष्यजातीची उन्नति होणार नाहीं, इतकेंच नाहीं तर तिला नीचावस्था प्राप्त होत जाईल. जगामध्यें नेहमीं स्थित्यंतर होत असतें. आपली स्थिति चांगली होईल अथवा वाईट होईल, परंतु आहे तशी राहणार नाहीं. पाहिजे तर पुढें जाण्यासाठीं श्रम करावे, नाहीं तर काललहरींच्या ओघाबरोबर मागें जाण्यास तयार असावें; ह्यास्तव सुधारणेच्या पंथांत आपण जागच्याजागींच राहण्याचा निश्चय केला, व आह्मापाशीं जितकें आहे, तितक्यांतच आह्मी संतुष्ट आहों, असें ह्मटलें तर मग आपणांस दिवसेंदिवस उतरती कळा लागेल. ह्याकरितां, आपली स्थिति सुधारण्याविषयीं आस्था बाळगणें, हें इष्ट आहे.

वर सांगितलेंच आहे कीं, शिक्षणाच्या योगानें मानसिक

शक्तीला तालीम मिळते; परंतु ह्यावरून असें समजूं नये कीं, ज्या मानानें मानसिक शक्तीचा उदय होतो, त्यामानानें शारीरिक शक्ति क्षीण होत जावी, अथवा सुशिक्षितांना शारीरिक श्रमाचा त्रास यावा. शिक्षणाच्या योगानें स्वाभिमान उत्पन्न होतो, आणि स्वाभिमानी मनुष्याला, दुसऱ्याच्या तोंडाकडे पाहत राहण्याची लज्जा वाटते, असें मागें ह्मटलेंच आहे. आपण स्वतन्त्र असावें, इतरांचे उपकार आपणांवर नसावे, ह्मणजे आपण कोणाचेही ओशाळे नसावें, असें त्यास वाटतें. बहुतेक लोकांचा श्रम केल्यावांचून चरितार्थ चालत नाहीं; यास्तव प्रत्येकाला श्रम केले पाहिजेत; परंतु नुसते मानसिक श्रम करून चालायाचे नाहींत, तर शारीरिक श्रमाची प्रत्येक मनुष्याला थोडीबहुत जरुरी आहे. एका तत्ववेत्त्याचें असें ह्मणणें आहे कीं ज्या वेळीं राष्ट्रामध्यें प्रत्येक मनुष्याला मानसिक व शारीरिक श्रम एकाच प्रमाणानें करावे लागतील, त्या वेळेस त्या राष्ट्रामध्यें सामाजिक स्थिति पूर्णावस्थेस आली आहे, असें समजावें; व सामाजिक इतिहासाचा विचार केला असतां, हें ह्मणणें खरें आहे, असें दिसून येईल. अत एव विद्येच्या योगानें आंगमेहनत करण्याचा कंटाळा येऊं नये, हौस यावी.

ह्याच प्रमाणें वस्तुस्थितीचें अवलोकन करण्याची शक्ति त्याच्या आंगीं यावी. च्यानिंग् साहेब ह्मणतात:—

"They should be taught to observe and study the world in which we live, to trace the connection of events, to rise from particular facts to general principles, and then to appy these, in explaining new phenomena."

ह्मणजे, 'ज्या जगांत आपण राहतों, त्याचें अवलोकन करून अध्ययन करण्यास त्यांस शिकवावें. कार्यांचा परस्पर संबंध त्यांस लावतां यावा. विशेष गोष्टीवरून साधारण तत्वें काढितां यावीं, व ह्यांच्या योगानें नवीन चमत्कारांची फोड करितां यावी.'

झाडावरून फळ पडतांना आपण सर्वांनीं पाहिलेंच असेल, परंतु आपणांस त्याविषयीं विशेष कांहीं वाटलें नसेल, व त्यावर कोणी विचारही केला नसेल; परंतु हीच गोष्ट पाहून न्यूटननें गुरुत्वाकर्षणाचा नियम शोधून काढिला. न्यूटनच्याप्रमाणें विशालबुद्धि धारण करणारे क्वचितच असतात, ही गोष्ट खरी; परंतु त्याच्याप्रमाणें विचार करण्याची संवय प्रत्येकानें लावून घेतली पाहिजे. विचार जडपदार्थांच्या स्थितीविषयींच केला पाहिजे असें नाहीं, तर प्राण्यांमध्येंही विचार करण्यासारख्या पुष्कळ गोष्टी आहेत. मनुष्यस्वभाव कसा असतो, त्यांत फेरफार कसा होत जातो, सद्गुणांचा उदय कोणत्या उपायांनीं होतो, दुर्गुणांचा ऱ्हास कोणत्या प्रकारानें होतो, अमक्याचा स्वभाव कसा आहे, आपलें इतरांबरोबर वर्तन कसें असावें, कोणत्या रीतीनें वागलें असतां मनुष्य उदयास चढतो, अविचारानें तो कसा खाड्यांत पडतो, ह्याचा प्रत्येक मनुष्यानें विचार केला पाहिजे; व विद्येच्या योगानें असा विचार करण्याची संवय लावली पाहिजे, आणि साधक बाधक प्रमाणांचा विचार करून, खरी स्थिति कोणती, ह्याचें अनुमान करितां आलें पाहिजे; व त्या अनुमानानें आपलें हित साधतां आलें पाहिजे.

लढाईत हेर पाठवून, शत्रूच्या सैन्याविषयीं खडान्खडा बातमी काढून आणवितात, व ज्याप्रमाणें सेनापति चाणाक्ष असतो, त्याप्रमाणें तो ह्या बातमीपासून आपला फायदा करून घेतो. साधारण मनुष्याची स्थिति देखील, कांहीं अंशीं ह्या सेनापतीसारखीच असते. आपल्या भोंवती काय चाललें आहे, हें तो आधीं पाहतो, त्याविषयीं चांगला विचार करितो, आणि मग त्यापासून आपल्या अक्कलहुशारीनें कार्यसिद्धि करून घेतो. एखाद्या शहाण्या मनुष्याचीं कृत्यें पाहिलीं असतां, दूरस्थाला

असें वाटेल कीं, प्रत्येक कार्याचा परिणाम ह्याच्या कृत्याला साधक असाच होतो; परंतु वास्तविक रीतीनें पाहिलें असतां, हा मनुष्य आपल्या बुद्धिचातुर्यानें, होतां होईल तितकें करून प्रत्येक कार्यापासून आपणास फायदा करून घेतो. ज्यानें नेपोलियन बोनापार्टचा इतिहास वाचला असेल, त्याला असें वाटेल कीं, युरोपची साधारण स्थिति, इटली इत्यादि देशांतील युद्ध करण्याची थंड रीति, फ्रेंच लोकांचा उतावळा स्वभाव, इत्यादि अनेक कारणांचा उपयोग नेपोलियनच्या सुदैवानें त्याला झाला; परंतु ह्यांत वस्तुतः नेपोलियनच्या दैवाचा संबंध मुळींच नव्हता, असें ह्मटलें तरी चालेल. कोणत्या वेळीं कसें वागावें, व वस्तुस्थितीचा उपयोग कसा करून घ्यावा, हें तो पूर्णपणें जाणत होता, ह्मणूनच त्याला एवढें श्रेष्ठत्व प्राप्त झालें. ज्याच्या आंगांत ही कला नसते, त्याला असें वाटत असतें कीं, आपण जें काम हातीं घेतों, त्यांतच अनेक अडचणी येतात. आपलें नशीबच दुर्बल आहे; परंतु कोणत्या वेळीं काय करावें, वेळेनुसार अडचणीपासूनही फायदा कसा करून घ्यावा, हें टाऊक नसल्यामुळें आपली अशी स्थिति होतें, हें त्याच्या स्वप्नींही येत नाहीं. संसारांत कोणत्या रीतीनें वागावें, ही महत्त्वाची गोष्ट आपणांस विद्येपासून शिकायाची आहे. हर्बर्ट स्पेन्सर ह्मणतातः—

"How to live?— that is the essential question for us. Not how to live in the material sense only, but in the widest sense. The general problem which comprehends every special problem is—the right ruling of conduct in all directions under all circumstances. In what way to treat the body; in what way to treat the mind; in what way to manage our affairs; in what way to bring up a family; in what way to behave as a citizen; in what way to utilize those sources of happiness which nature

supplies—how to use all our faculties to the greatest advantage of ourselves and others—how to live completely? And this being the great thing needful for us to learn, is, by consequence, the great thing which education has to teach."

ह्याचा अर्थ असा कीं 'आपण कोणत्या रीतीनें राहावें, ह्याचा मुख्यत्वेंकरून आपणांस विचार करावयाचा आहे. कोणत्या रीतीनें राहावें, ह्याचा साधारण व्यावहारिक अर्थ घ्यावयाचा नाहीं, तर अतिव्यापक अर्थ घ्यावयाचा. प्रत्येक गोष्टींत व प्रत्येक स्थितींत, आचरण सन्मार्गवर्ती असावें, हा साधारण विचार आहे, आणि प्रत्येक विशिष्ट विचाराचा ह्यांत समावेश होतो; शरीराचें संगोपन कोणत्या तऱ्हेनें करावें, मनाचें संगोपन कोणत्या रीतीनें करावें, धंदा कसा चालवावा, कुटुंबाचें पालन कसें करावें, जानपद ह्या नात्यानें कसें वागावें, वस्तुस्थितीनें प्राप्त झालेल्या सुखाच्या साधनांचा उपयोग कसा करून घ्यावा, जेणेंकरून आपणास व इतरांस फायदा होईल, अशा रीतीनें आपल्या शक्तींचा उपयोग कसा करावा, अथवा चांगल्या रीतीनें कसें आचरण करावें, हा विचार आहे; आणि ही गोष्ट शिकणें, हें आवश्यक व महत्त्वाचें असल्याकारणानें, विद्येपासून शिकण्यासारख्या गोष्टींत, ही एक मोठी गोष्ट आहे.'

आतां दुसऱ्या एका मुद्द्याकडे वळूं:—विद्येच्या योगानें आत्मसंयमन करितां यावें, ह्मणजे मनोविकारांवर विचारशक्तीचा दाब ठेवतां यावा. 'सद्वर्तनांत' असें सांगितलें आहे कीं, 'आत्मसंयमन ह्मणजे मनाचा निग्रह. हा धैर्याचा अपर पर्याय आहे, असें ह्मणण्यास चिंता नाहीं. आत्मसंयमन हें सद्वर्तनाचें जीवित होय. जनावरें व मनुष्य यांमध्यें यापासूनच भेद उत्पन्न होतो. जनावरांस कार्याकार्य, भक्ष्याभक्ष्य, पेयापेय, गम्यागम्य हा भेद नाहीं. मनुष्यास मनोनिग्रहाच्या योगानें तो बाळगिला पाहिजे. मनो-

निग्रह हें सर्व सद्गुणांचें बीज आहे.' रानटी लोकांच्या मनोवृत्ती अतिशयित प्रबल असतात, व त्यामुळें त्यांच्या हातून कधीं क्रूर, कधीं निंद्य, कधीं अनर्थकारक, व कधीं हास्यास्पद कृत्यें घडतात. मुसलमान लोकांच्या इतिहासावरून ह्याची सत्यता तेव्हांच लक्षांत येईल. मनोविकारांना आपले पूर्वज षड्रिपु असें ह्मणत, व ह्यांना जो जिंकील, ह्मणजे सदसद्विचाराच्या कह्यांत ठेवील, तो खरा शूर असें समजत; तें अगदीं यथार्थ आहे.

आत्मसंयमन हा गुण स्वतःच्या वर्तणुकीविषयीं आहे; परंतु विद्वानाचें कर्तव्य येथेंच आटोपतें असें नाहीं; तर त्यांना इतर जनांस सुमार्ग दाखविला पाहिजे. 'उपकारः परो धर्मः' हें वाक्य शब्दशः खरें आहे. एका विचक्षण गृहस्थानें व्यासकृत अठरा पुराणांचें मंथन करून त्यांतून सार काढलें आहे कीं, 'परोपकारः पुण्याय पापाय परपीडनम् ॥' परोपकार हेंच पुण्य आहे, आणि परपीडन हें पाप आहे. व्यास, बुद्ध, रामदास, तुकाराम, विष्णुबावा ब्रह्मचारी, लूथर, लॉर्डबेकन् इत्यादि विद्वज्जनांनीं, लोकांस कुमार्गांतून काढण्याचा प्रयत्न केल्यानें मानवजातीवर त्यांचे किती उपकार झाले आहेत, ह्याचा विचार केल्यानें, मी ह्मणतों ह्याचें महत्त्व कळून येईल. विद्येचा शोध अनेक लोकांनीं केलेला आहे, ह्मणून जो कोणी त्या अनेकांच्या यत्नांपासून स्वतःला फायदा करून घेईल, त्यानें आपल्या विद्यार्जनानें इतरांचेंही कल्याण करावें, हें त्याचें कर्तव्य आहे. ज्याप्रमाणें कृपणाच्या येथें असलेल्या अगणित द्रव्याचा इतरांस कांहीं उपयोग नाहीं, त्याप्रमाणें जो विद्वान् मनुष्य आपल्या विद्येच्या योगानें दुसऱ्याचा फायदा करणार नाहीं, त्यांना सन्मार्ग दाखविणार नाहीं, परहित साधण्यासाठीं आपला देह झिजविणार नाहीं, त्याची विद्या देखील निरुपयोगी आहे.

च्यानिंग् साहेब ह्मणतात:—

"It is a higher action of the intellect and heart to study and understand thoroughly the character of an individual who is near us, to enter into his mind, to trace his defects and sufferings to their true springs, to bear quietly and gently with his frowardness and relapses, and to apply to him patiently and encouragingly the means of intellectual and moral elevation."

ह्मणजे, 'आपणांसंनिध असलेल्या मनुष्याच्या स्वभावाचें परिशीलन करून त्याची पूर्णपणें ओळख करून घेणें, त्याच्या मनांत प्रवेश करून त्याच्यामध्यें असलेल्या उणीवींचीं व दुःखाचीं कारणें शोधून काढणें, तो तिरसट झाला अथवा पुनः पहिल्याप्रमाणें आचरण करूं लागला, तर धिमाईनें व गोडीगुलाबीनें वागून शांतरीतीनें आणि उत्साहपूर्वक त्याच्या बुद्धीची व सद्गुणांची उन्नति करण्यास झटणें, हें विद्वत्तेचें व सदंतःकरणाचें मुख्य काम आहे.'

विद्येच्या योगानें मनाला शांति, सुख, आणि समाधान वाटावें. अज्ञाणी मनुष्याचें सुख आणि दुःख हीं क्षणभर अनिवार असतात. त्याला सुख झालें ह्मणजे मी इंद्रभुवनांतच आहें कीं काय, असें त्यास वाटत असतें, व आनंदसागरांत तो गटांगळ्या खात असतो; तसेंच त्याला दुःख झालें ह्मणजे तो अगदीं वेडावून जातो. ह्या जगांत आतां माझें कांहीं उरलें नाहीं, माझ्या कपाळीं सर्वदा दुःख भोगावयाचें आहे, ह्या त्रासांतून जेव्हां मी सुटेन तो सुदिन समजावयाचा, असें त्यास वाटतें. परंतु विद्येच्या योगानें ज्याच्या शक्ति प्रगल्भित झाल्या आहेत, ज्याच्या अंतःकरणांत सदा चिरस्थायी सुख, समाधान, आणि शांति जागृत असते, त्याला सुख झालें असतां तो ब्रह्मानंदांत निमग्न होऊन जात नाहीं, तसेंच त्याला दुःख झालें असतां त्याच्या योगानें त्याचें अंतःकरण

पोळून जात नाहीं. त्यास कोणत्याही कृत्यांत यश मिळालें ह्मणजे परमेश्वरानें मला साह्य दिलें, असें ह्मणून तो ईश्वराचे आभार मानतो, व मेहनत करूनही यश आलें नाहीं, तर 'यत्ने कृते यदि न सिध्यति कोऽत्र दोषः' असें समजून आपलें समाधान करून घेतो. ज्या ज्या मनुष्याचा संबंध असल्या माणसाबरोबर येईल, त्याच्या अंतःकरणांत, तो, शांति व समाधान जागृत करितो. ह्याच्या योगानें त्याच्या समाधानवृत्तीनें त्यालाच सुख होतें असें नाहीं, तर इतर लोकांनाही त्यापासून लाभ होतो. समाधानवृत्तीनें राहणें, हें आपलें ईश्वराबरोबरील एक कर्तव्यकर्म आहे. परमेश्वरानें आपणांवर केलेल्या उपकारांबद्दल आपण त्याचे आभार मानणें, हा आपला धर्म आहे; व समाधानवृत्तीनें राहिल्यापासून ईश्वरानें दिलेल्या सुखांची किंमत आपण जाणतों, असें विदित होतें.

आतां दुसऱ्या एका ग्रंथकाराच्या ह्मणण्याचा विचार करूं. सिड्निस्मिथ् हे आपल्या स्त्रीशिक्षणावरील निबंधांत ह्मणतातः—

"The object is to give to children resources that will endure as long as life endures—habits that time will ameliorate, not destroy—occupations that will render sickness tolerable, solitude pleasant, age venerable, life more dignified and useful, and therefore death less terrible."

"मुलांना आमरणान्त उपयोगी पडण्यासारखीं सुखोत्पत्तीचीं साधनें द्यावीं; नाश न होतां, दिवसेंदिवस बलवत्तर होणाऱ्या संवयी त्यांना लावाव्या; व त्यांना असें वळण लावून द्यावें कीं, आजारामध्यें त्यांची वृत्ति शांत राहील, एकांतवासांत त्यांचें मनोरंजन होईल, वृद्धापकालीं त्यांस पूज्यत्व येईल, व त्यांच्या जीविताला प्रौढत्व येऊन त्याचें सार्थक्य होईल, व येणेंकरून मृत्यु इतरांइतका भयावह वाटणार नाहीं." हे शिक्षणाविषयीं

साधारण परंतु अत्यंत महत्त्वाचे व प्रौढ विचार आहेत. ह्यांतल्या थोड्याशा भागाविषयीं आतां विचार करूं.

विद्येच्या योगानें चांगल्या संवयी लागाव्या; येथें चांगल्या संवयी ह्मणजे काय हें सांगणें अवश्य आहे. सत्य भाषण करणें, असत्याचा तिरस्कार करणें, गंभीर रीतीनें वर्तन ठेवणें, इत्यादि सद्गुणांचा समावेश मी चांगल्या संवयींत करितों. हे सद्गुण प्रत्येक विद्वान् मनुष्याच्या आंगीं असले पाहिजेत. पोप कवि ह्मणतात:—

"Know thou this truth, (enough for man to know)
"That virtue alone is happiness below."

ह्याचें तात्पर्य असें कीं, इहलोकीं सद्गुणाशिवाय दुसरें सुख नाहीं इतकेंच तत्व जरी समजलें तरी पुरे आहे.

विद्येच्या योगानें मनावर असा संस्कार व्हावा कीं, शरीरास मोठा व्याधि जडला असतां, व सर्वांगास कळा लागल्या असतांही, मनानें स्वास्थ्य सोडूं नये, आणि निर्जन अशा रानांत देखील त्याचें रञ्जन व्हावें. अशी स्थिति होणें, हें कित्येकांना अशक्य वाटेल, परंतु हें शक्य आहे. मिल्टन् कवीनें ह्मटलें आहे,

"The mind is its own place, and in itself
"Can make a Heaven of Hell, a Hell of Heaven."

ह्मणजे 'मनाचें निवासस्थान मन हेंच आहे. इन्द्रभुवनांत असलेल्या मनुष्याला, आपण नरकवास भोगीत आहों असें वाटूं शकेल; व नरकवासांत असलेल्या मनुष्याला आपण इन्द्रभुवनांत आहों, असें वाटूं शकेल.' मनाची अशी स्थिति होणें हें कांहीं अंशीं स्वभावावर अवलंबून आहे हें खरें, तथापि शिक्षणानें स्वभाव सुधारतो हें निःसंशय आहे, व स्वभावाला अशा रीतीनें वळण लाविलें ह्मणजे अनेक प्रकारचे फायदे होतात.

जॉन् लॉक् ह्मणतातः—

"The great work of a governor is to fashion the carriage, and form the mind; to settle in his pupil good habits, and the principles of virtue and wisdom; to give him by little and little a view of mankind, and work him into a love and imitation of what is excellent and praiseworthy; and in the prosecution of it, to give him vigour, activity, and industry."

ह्मणजे, 'शिक्षकाचें मुख्य काम हें आहे कीं, त्यानें शिष्याला रीतभात लावून द्यावी, व त्याचें मन संस्कृत करावें; त्याला चांगल्या संवयी लावाव्या, व सद्गुणांचीं व शहाणपणाचीं तत्वें त्याच्या मनांत ठसवून द्यावीं; हळूहळू मनुष्यस्वभावाचें त्याला शिक्षण द्यावें; चांगल्या व स्तुत्य कृत्यांविषयीं, त्याचे ठायीं प्रीति उत्पन्न करून, त्यांचें अनुकरण करण्याविषयीं त्याच्या मनांत इच्छा उत्पन्न करावी आणि हीं कृत्यें त्याला नेटानें, चलाखीनें, आणि अनलसतेनें करतां यावीं.' ह्या वाक्यांतील बहुतेक मुद्दे, च्यानिंग् व सिड्निस्मिथ् ह्यांच्या ग्रंथांतून घेतलेल्या उताऱ्यांत येऊन गेले आहेत, ह्मणून त्यांविषयीं पुनः सविस्तर रीतीनें लिहिण्याचें प्रयोजन नाहीं.

आतां दुसऱ्या कांहीं मुद्द्यांविषयीं साधारण विचार करूं:— विद्येनें, गतकालीं घडलेल्या विविध गोष्टींपासून, आपणांस शहाणें होतां यावें. आपली पूर्वीं स्थिति कशी होती, तींत काय काय फेरफार होत गेले, आपल्या पूर्वजांच्या हातून कोणकोणत्या चुका होत गेल्या, त्यांपासून कायकाय परिणाम झाले, इत्यादि गोष्टी समजून घेऊन, त्यांचें मनन करावें, आणि त्यांपासून आपणांस शिकण्यासारखें काय आहे तें पहावें. प्रोफेसर म्याक्समुलर ह्मणतातः—

"Why do we want to know History? simply because, all of us and every one of us, ought to know how we

have come to be what we are, so that each generation need not start again from the same point and toil over the same ground, but profiting by the experience of those who came before, may advance towards higher points and nobler aims."

ह्मणजे, "आपण इतिहास कां शिकतों? कारण, आपणां सर्वांस आणि आपणांपैकीं प्रत्येकास, आपली सध्यांची स्थिति कोणत्या तऱ्हेनें प्राप्त झाली, हें समजलें पाहिजे; कारण, असें केल्यानें प्रत्येक पिढीस, उन्नतीच्या मार्गांत पुनः पहिल्या ठिकाणाहून प्रवास करायास पडूं नये; व पूर्वजांनीं केलेल्या कामाची द्विरुक्ति करण्याची गरज पडूं नये. गतकालीं झालेल्या लोकांच्या अनुभवापासून फायदा व्हावा, सुधारणेच्या मार्गांत त्यांनीं दूरवर प्रवास करावा, व थोर कृत्यें करण्यास प्रवृत्त व्हावें."

विद्येच्या योगानें स्वकर्तृत्वावर भरंवसा उत्पन्न व्हावा, ह्मणजे मनुष्याची शक्ति किती आहे, त्याला काय करितां येईल, हें ध्यानांत यावें. कोणतेंही सत्कर्म करण्यास, माझ्यानें हें होणार नाहीं असें ह्मणून माघार घेऊं नये. आपण जें करतों तें सत्कृत्य आहे, व आपण जे उपाय योजणार आहों, ते आपल्या समजुतीप्रमाणें बरोबर आहेत, अशी खात्री असली, ह्मणजे आपल्या कर्तृत्वावर विश्वास ठेवून, व परमेश्वर आपणांस साह्य करील असा भरंवसा धरून उद्योग करावा.

मेहनतीनें सर्व साध्य होतें असें समजून, योग्य वेळीं श्रम करण्यास तयार असणें व कार्यसिद्धीविषयीं शंका न धरितां, निश्चयानें व नेटानें आपल्या ताब्यांत असलेल्या साधनांची योजना करणें, हीं कोणतेंही काम करण्यास अवश्य आहेत. कार्यारंभीं 'आपल्या हातून हें काम सिद्धीस जाईल काय,' किंवा 'कांहीं आकस्मिक संकटें येऊन आपणाला मध्येंच हें सोडून द्यावें लागेल काय,' अथवा 'आपल्या अंगांत हें कर-

त्यापुरती शक्ति आहे काय, ' असे जो आपणास प्रश्न विचारीत असतो, जो भीतभीत कोणतेंही कार्य हातीं घेत असतो, तो थोड्याशा अडचणी आल्या ह्मणजे, घाबरून तें सोडून देतो, व अशा रीतीनें कोणतेंही काम त्याच्या हातून होणें बहुधा अशक्य होतें. निश्चय आणि धैर्य, ह्यानें कितीही कठिण काम असलें तरी तें सिद्धीस जातें. ह्मणून विद्येच्या योगानें मन निश्चयी, धीट व कष्टाळू करावें.

विद्येनें विचार, वचन, व आचार ह्मणजे ज्यांस अनुक्रमें Thought, word and deed असें ह्मणतात त्यांमध्यें ऐक्य व्हावें, ह्मणजे आपणांस खरें वाटेल तें बोलावें, व बोलण्याप्रमाणें आचरण ठेवावें. ' क्रियेवीण वाचाळता व्यर्थ आहे ' हें वाक्य प्रत्येकानें लक्षांत ठेवावें, आणि होतां होईल तोंपर्यंत बोलण्याप्रमाणें आचरण ठेवण्याचा प्रयत्न करावा.* असें आचरण ठेवणें हें हितावह आहे, ह्मणूनच तुकाराम ह्मणतात, " बोले तैसा चाले त्याचीं वंदावीं पाउलें. " व त्याचप्रमाणें एक संस्कृत कवि ह्मणतो,

यथा चित्तं तथा वाचो यथा वाचस्तथा क्रियाः ।
चित्ते वाचि क्रियायां च साधूनामेकरूपता ॥

तसेंच एक कवि ह्मणतो:—

" From righteous acts let nought thy mind dissuade,
" Of vulgar censures be thou ne'er afraid ;
" Pursue the task which justice doth decree;—
" E'en tho' the crowd think different from thee."

ह्याचा अर्थ असा कीं, 'सत्कृत्यांपासून आपलें चित्त चळूं देऊं नका, व निंदकांच्या निंदेची मनांत भीति बाळगूं नका;

* ह्या साधारण सिद्धांताच्या अपवादाकरितां ना० काशिनाथपंत तेलंग ह्यांचें 'सामाजिक विषयासंबंधीं तोडजोड' ह्या विषयावरील व्याख्यान पाहावें.

जरी अज्ञजनसमूहाचा व तुमचा मतभेद झाला तरी जो मार्ग तुह्मांस न्याय्य दिसेल तो स्वीकारा.'

एक ग्रंथकार ह्मणतो, "लोकांच्या अज्ञानमूलक चालींस न भितां, आपल्या सामर्थ्याप्रमाणें वागण्याचें धैर्य नसल्यामुळें, मनुष्यास थोडा त्रास होतो काय? लग्नकार्यांत अव्यवस्थित खर्चाच्या अनेक चाली पडल्या आहेत. त्यांपैकीं कित्येक तर अशा आहेत कीं, खर्च करून त्यांपासून कांहीं एक उपयोग न होतां, उलटा त्रास मात्र होतो." हा त्रास मानसिक धैर्याच्या अभावामुळें होतो. स्माइल्सनें एके ठिकाणीं ह्मटलें आहे:—

"A man must have the courage to be himself and not the shadow or echo of another. He must exercise his own powers, think his own thoughts, and speak his own sentiments."

ह्मणजे, "दुसऱ्याच्या ओंजळीनें पाणी न पितां, अथवा आपलीं मतें त्याच्या ह्मणण्यावर अवलंबून न ठेवतां, आपलें स्वत्व स्थापण्या पुरतें धैर्य मनुष्याला असावें. त्यानें आपल्या शक्तींचा उपयोग केला पाहिजे, स्वतंत्र विचार केला पाहिजे, आणि स्वतःचेच विचार प्रगट केले पाहिजेत." असो.

विद्वानानें वडिल मनुष्यांस मान द्यावा, व ईश्वराबरोबर आपलें कर्तव्य काय आहे तें समजून घेऊन त्याप्रमाणें आपलें आचरण ठेवावें. 'बापसे बेटा सवाई' झाला तरी त्यानें आपल्या बापाची हेळणा करूं नये, ही गोष्ट सर्व कबूल करितात, परंतु त्याप्रमाणें आचरण ठेवणारे थोडेच असतात. वृद्ध आईबाप ह्यांची विचारपूस देखील न करणारे असे मुलगेही बरेच आढळतील. आईबापांस मान देणें, व त्यांची आज्ञा पाळणें, हें प्रत्येक मनुष्याचें कर्तव्य आहे. मुलगा लहान असतांना 'आई थोर तुझे उपकार' ह्यासारख्या कवितांनीं तो आपल्या

आईबापांचे उपकार गाऊं लागतो. परंतु जसजसा तो मोठा व विद्वान् होत जातो, तसतसा त्याला आईबापांच्या उपकारांचा विसर पडत जातो, ही मोठी शोचनीय गोष्ट आहे. 'साठी बुद्धि नाठी' ह्या म्हणीप्रमाणें कदाचित् त्याच्या वृद्ध मातापितरांची बुद्धि पूर्वीप्रमाणें नसेल; परंतु ह्या दैविक बुद्धिभ्रमाकरितां, त्यांचा अपमान अथवा तिरस्कार करणें, हें अगदीं अयोग्य आहे. ज्यांच्या मनांवर विद्येचा पूर्ण अंमल बसला आहे, त्यांस हें उत्तम प्रकारें कळून आलें पाहिजे, इतकेंच नाहीं, तर त्यांजकडून तदनुरोधानें वर्तनही झालें पाहिजे.

आतां ईश्वराबरोबरील कर्तव्याकडे वळूं. हा विषय फार व्यापक आणि महत्त्वाचा आहे. अनेकांनीं अनेकदां ह्याचें विवेचन केलें आहे; परंतु ह्याविषयीं जितकें लिहिलें तितकें थोडेंच होणार आहे. असें आहे तरी पुनः चर्वितचर्वण होऊं नये म्हणून माझें मत थोडक्यांतच सांगतों.

विद्याविभूषित मनुष्याला असें वाटलें पाहिजे कीं, ह्या जगांत ईश्वराचे आज्ञेशिवाय कांहीं एक होत नाहीं, व प्रत्येक कार्याची योजना ईश्वर मनुष्याच्या फायद्यासाठींच करितो. आपणांवर संकटें येतात, आपणांस दुःख सोसावें लागतें, आपली मानहानी होते, दारिद्र्य येतें, व्याधि जडतो,—परंतु ह्या सर्व गोष्टी आपल्या सुखासाठींच असतात; आणि जरी आपल्या अल्प बुद्धीमुळें, आपणांस सुख होण्यासाठीं देवानें योजलेल्या उपायांचा हेतु आपणांस समजत नसतो, तरी प्रत्येक गोष्ट आपल्या बऱ्यासाठीं घडून येते, असें समजून देवाचें आभारी व्हावें. दुःख झाल्याशिवाय सुखाची किंमत समजत नाहीं. 'यदेवोपनतं दुःखात्सुखं तद्रसवत्तरम्' दुःखानंतर होणारें सुख अतिशय आनंददायक असतें. जो नेहमीं सुखांत

वागलेला असतो, दुःख ह्मणजे काय हें त्यास ठाऊक नसतें, त्यास स्वतःच्या स्थितीविषयीं धन्यता वाटत नाहीं, किंबहुना ज्याप्रमाणें 'र्‍यासेलस्'ला happy valleyचा कंटाळा आला, त्याप्रमाणें कंटाळा येतो. सारांश काय कीं, सुखी होण्यास दुःख भोगण्यावांचून परिणाम नाहीं; ह्यास्तव परमेश्वरानें सुख आणि दुःख, ह्यांची अशा रीतीनें भेसळ केली आहे कीं, शहाण्या मनुष्यानें दुःखापासून आपल्या सुखास भर पाडावी, संकटांपासून उपदेश घ्यावा, मानहानीपासून नम्र व्हावें, व्याधींपासून आयुष्याच्या क्षणभंगुरत्वाविषयीं उमज पाडून घ्यावा, आणि परमेश्वराचे त्यानें केलेल्या उपकारांबद्दल आभार मानावे. रामदास ह्मणतातः—

देवें जन्मासी घातलें । नाना सुख दाखविलें ॥
कुळ समूळ सांभाळिलें । नाना प्रकारें पाळिले ॥
त्यासी कैसें विसरावें । पुढें कैसेनी तरावें ॥
दास म्हणे देवाविण । दुजा संभाळितो कोण ॥

सारांश, सज्ञान होऊन आपल्या अज्ञानाची ओळख करून घेतां यावी. अहंता व गर्व ह्यांचा नाश होऊन, अंगांत स्वाभिमान उत्पन्न व्हावा; स्वकर्तृत्वावर भरंवसा राहून, आचरणांत विनयाच्या प्राबल्याचा आविर्भाव व्हावा; आणि आपली स्थिति सुधारण्याविषयीं औत्सुक्य उत्पन्न होऊन, मनोरथसिद्धि न झाल्यास समाधान मानून घेतां यावें. परमेश्वराविषयीं पूज्य बुद्धि व आईबापांविषयीं सन्मान बुद्धि उत्पन्न व्हावी. विद्वानास कुटुंबकलहाचा तिरस्कार यावा, त्यानें जातिबांधवांबरोबर मिळून वागावें, देशबांधवांवर प्रीति करावी, मनुष्यमात्राच्या हितास जपावें, आणि प्राणिमात्रांवर दया करावी. उदयकाळीं नम्र असावें, व विपत्काळीं धैर्य धरावें.

विचारांती आपणास जें खरें वाटेल, तें कोणाची भीड न धरितां बोलून दाखवावें, व लोकांच्या उपहासास न डगमगतां, बोलल्याप्रमाणें आचरण ठेवावें. मनोविकार स्वाधीन ठेवून, स्वतः सदाचरणानें वर्तन ठेवावें; व इतरांस सन्मार्ग दाखवून, दुराचरणापासून पराङ्मुख करावें. त्यानें आपल्या हिताविषयीं उदास न होतां, परहिताविषयीं तत्पर असावें, दुःखिताचें सांत्वन करावें, निराश झालेल्यास उत्साह द्यावा, आणि अनाथास सहाय्य करावें,—साधारणतः आचरण असें ठेवावें कीं, आपलें भाग्य उदयास आलें असतां, इतरांच्या मनांत आपणांविषयीं मत्सर उत्पन्न होऊं नये; आपणांस गरीबी आली असतां, त्यांचे ठायीं सन्मानबुद्धि उत्पन्न व्हावी, व आपली हेळणा करण्यास कोणाचीही छाती होऊं नये. तारुण्यांत त्यांच्यावर आपलें वजन असावें आणि वार्धक्यांत आपणाविषयीं पूज्यबुद्धि उत्पन्न व्हावी.

विद्येनें अनुद्योगाचा कंटाळा यावा, आणि अंगमेहनत करण्याची लाज वाटूं नये; चांगली रीतभात लागावी, व मन प्रशस्त आणि प्रगल्भ व्हावें; स्वतंत्र विचार करण्याची संवय लागावी; कार्यावरून कारण शोधितां यावें, विशिष्ट कारणांवरून साधारण नियम काढतां यावेत, आणि वस्तुस्थितीप्रमाणें त्यांचा उपयोग करून घेतां यावा; यत्किंचित् गोष्टीपासूनही फायदा करून घेतां यावा; पूर्वजांच्या हातून झालेल्या चुका आपल्या हातून न होण्याविषयीं खबरदारी ठेवतां यावी; आणि ईश्वरानें दिलेल्या प्रत्येक शक्तीचा योग्य उपयोग करतां यावा. तात्पर्य काय तर सन्मार्गानें आणि शहाणपणानें वागून इहलोकीं सुख भोगतां यावें, व परलोकप्राप्ति करून घेतां यावी. हाच अर्थ थोड्या शब्दांत सांगावयाचा ह्मणजे विद्येच्या योगानें

'सज्जन' होतां यावें; सज्जन ह्मणजे काय, अथवा सज्जनाचें व्रत कोणतें, हें वामनपंडिताच्या मुखानें सांगून हा निबंध पुरा करूं:-

सुनीतिपथ सेवणें मलिन कर्म मानेच ना ॥
घडो मरण नावडे खलजनांप्रति प्रार्थना ॥
विपत्तिसमयीं हि जो प्रगटवीच ना दीनता ॥
भल्याविण असें असिव्रत करूं शके कोणता ॥ १ ॥

**वामन.**

**समाप्त.**

" नळी फुंकिली सोनारें इकडून तिकडे गेलें वारें,"
असें हेमंतव्याख्यानांचें होऊं नये ह्मणून,

# मूकव्याख्यान.

ह्या समाजांत तीन प्रकारचे लोक दिसतात. वृद्ध—ह्मणजे, बहुतेक संसारविचार आटपून, उतारवयांत आलेले; प्रौढ—ह्मणजे, विद्याभ्यासाचा व्यवसाय पूर्ण होऊन, संसार करायास लागलेले; आणि तरुण—ह्मणजे, वयानें लहान असून ज्ञानसंपादन करीत आहेत असे. ह्या तीन प्रकारच्या माणसांस ह्या व्याख्यानांच्या संबंधानें एकाच प्रकारें वागायास सांगणें, ह्मणजे, दोन महिन्यांच्या मुलापासून तों शाण्णव वर्षांच्या ह्मातान्यांपर्यंत सर्वांस एकाचप्रकारचें अन्न खायास सांगणें—ह्यासारखें आहे. ह्मणून, ह्या तीन प्रकारच्या माणसांनीं कसकसें आचरण केलें असतां एकंदर सगळ्या राष्ट्रास ह्या व्याख्यानविषयांचा चांगला उपयोग होईल, हें वेगळें वेगळें सांगितलें पाहिजे.

**वृद्धहो.**—आपणांस ह्या जगांतल्या व्यवहारांचा अनुभव पुष्कळ आला आहे, आणि आपल्या पुत्रपौत्रांचें निरंतर कल्याण व्हावें, अशी फार इच्छा आहे. त्यापक्षीं, आपण कसें वागावें हें सांगण्याचें प्रयोजन तादृश नाहीं; तरी, विस्मरण ही एक मोठी अडचण आहे. ती सर्व व्यवहारांत नडत असते; ह्मणून, माणसांस कितीएक गोष्टींचें स्मरण द्यावें लागतें. पहा, आपण तरुण होतां तेव्हां पाश्चिमात्य विद्येचा प्रसार जितका इकडे होता, तित-

त्याच्या निदान दहापट किंवा कदाचित् वीसपट देखील प्रसार सध्याच्या पिढींत झाला आहे; आणि, त्या ज्ञानाच्या योगानें आपल्या अंतःकरणांत जे विचार तेव्हां उभे राहत असत, त्यांच्या दसपट किंवा वीसपट विचार सध्याच्या पिढ्यांच्या मंडळीच्या मनांत आतां येत असतात. आणि त्या मानानें, त्यांच्या व आपल्या वर्तनांतही अंतर पडावें, हें अगदीं सहाजिक आहे. तर, त्या अंतरावरून आपण भलत्याच कल्पना मनांत आणूं नये. आपला अनुभवाधिकार मोठा आहे; त्यावरून, योग्यायोग्य गोष्टी आपणांस विशेष कळतात, हें खचीत आहे. तरी, चांगली गोष्ट कोणती आणि वाईट कोणती ह्याविषयीं कधींही मतभेद व्हावयाचा नाहीं. कां कीं, गोष्ट चांगली ती चांगली, आणि वाईट ती वाईट, हें ठरलें आहे. आतां, ती चांगली गोष्ट केव्हां कोठपर्यंत करावी, ह्याविषयीं मात्र मतभेद पडेल; परंतु, गोष्ट जर चांगली आहे, तर तींत पाऊल पुढें टाकण्यास नवी मंडळी पुढें सरसावली असतां, कृपा करून आपण त्यांच्या आड येऊं नये. हें उदाहरणाशिवाय स्पष्ट व्हावयाचें नाहीं. विधवाविवाह, स्त्रीशिक्षण, परदेशगमन ह्यांचा प्रचात असणें अत्यंत इष्ट आहे, अशी जितकी खातरी आपली झाली आहे, तितकीहून सध्याच्या मंडळीची खातरी पुष्कळ अधिक झाली आहे; आणि ह्मणून, ते प्रघात चालू करण्याविषयींचा आवेश त्या मंडळीस अधिक येणें साहजिक आहे, आणि इष्ट आहे. तर, त्या कृत्यांत आपण आड येऊं नका. तितकें धैर्य नसेल, तर, साह्य नका करूं; पण त्यास आडकाठी आणूं नका. महाराज, इतर असोत, पण

विधवाविवाह हें कृत्य अगदीं जुन्या माणसांस देखील आतां इतकें चांगलें वाटूं लागलें आहे कीं, त्याविषयींची एक गोष्ट आपणांस सांगितली तर खरी देखील वाटावयाची नाहीं. तरी ती शब्दशः खरी आहे, असें आह्मी आपणांस अगदीं खातरीनें सांगून ती येथें सादर करितों. ती गोष्ट अशी कीं,—आमच्या एका तरुण मित्रानें विधवेशीं विवाह केला आहे. तो, पंधरा सोळा वर्षांनीं, थोड्या दिवसांमागें, कोंकणांत, एका खेड्यामध्यें, आपल्या घरीं गेला होता. त्यास त्याची कोणी आप्त विधवा बाई, नव्वद वर्षांच्या वयाची, भेटली. ती त्याला शिवली नाहीं; तरी, त्यास ह्मणाली, "बाळा, तूं एका गाईला चिखलांतून काढलेंस, हें फार चांगलें केलेंस वरें!" सारांश, विधवाविवाहासारख्या गोष्टी अत्यंत इष्ट आहेत; आणि त्यांचें इष्टत्व ह्या व्याख्यानांच्या योगानें प्रौढांच्या मनांवर विशेष ठसण्याचा संभव आहे; आणि तेणेंकरून त्यांस त्याविषयीं विशेष आवेश यावा हें साहजिक आहे. तर, त्यास, सगळ्या अडचणी सोसून, आपण साह्य करावें, हें आधीं अत्यंत इष्ट आहे; पण, कांहीं कारणांवरून जर आपणांस तसें करवत नसेल, तर, आपण त्यांच्या आड तरी येऊं नये.

किंवा एकपक्षीं पाहिलें तर, अशा प्रकारच्या कृत्यांत आपण साह्य केलें असतां, ज्या अडचणी आपणांवर येतील, त्या अडचणी आपणांस आतां फार वर्षें भोगाव्या लागणार नाहींत; कां कीं, आपलें अवतारकृत्य आटोपत आलें आहे; आणि सत्कृत्यांत आपल्या लेंकरांस साह्य केल्याचा अप्रतिम संतोष आपणांस लाभेल; तर आतां,

हे दोन्ही मार्ग मोकळे आहेत. त्यांतला हा दुसरा फार चांगला आहे. त्याचें अवलंबन आपणांस करवत नसलें, तर, पहिल्याचें अवलंबन आपण करावें, अशी आपणांस प्रार्थना आहे.

प्रौढहो.—पहा, आपल्या ह्या राष्ट्राच्या व्यवहारोन्नतीचीं सगळीं सूत्रें परमेश्वरानें पर्यायेंकरून आपल्या हातीं दिलीं आहेत. आपण नाविक आहां, आणि राष्ट्रांतलीं बाकीचीं माणसें उतारू आहेत. ह्यांना आपण जिकडे न्याल, तिकडे हीं जातील. हें उपलक्षण आहे. पाश्चिमात्य विद्येच्या संस्कारानें आपणांस ज्या गोष्टी चांगल्याशा वाटल्या आहेत, त्यांचें स्मरण ह्या व्याख्यानांवरून आपणांस झालें आहे. त्या गोष्टी कोणत्या हें सांगण्याच्या भरीस आह्मी पडत नाहीं. कां कीं, त्या आपल्या लक्षांत सध्या घोळत आहेत. त्या गोष्टी करण्यास पुष्कळ धैर्य पाहिजे. त्या आपण करूं लागलां ह्मणजे आपणांवर बहिष्कारादि संकटें येतील; कांहीं वृद्ध लोक आपला द्वेष करितील; कितीएक अडाणी आणि तरुण लोक आपणांस हंसतील; आपणांस मोठमोठ्या अडचणी सोसाव्या लागतील; अपमान सहन करावा लागेल; कदाचित् अल्पस्वल्प छळासही पात्र होणें भाग पडेल. परंतु, आपण असें पाहा कीं, कोणतेंही मोठें काम जें आहे, तें कोणी तरी फार श्रम केल्याशिवाय आणि महत्संकटें भोगल्याशिवाय आजपर्यंत झालें नाहीं. कोलंबसानें अमेरिकेचा शोध लाविला, त्यास किती संकटें भोगावीं लागलीं बरें? डाक्टर जेनर ह्यानें गोस्तनदेवी प्रचारांत आणिल्या, त्यास किती छळ सोसावा ला-

गला हें आपणांस विदित नाहीं काय? शिवाजीमहाराजांस राज्य स्थापण्यास थोडे श्रम पडले काय? धर्मरीति सुधारण्यास लूथराला किती क्लेश पडले, ते आपणांस ठाऊक नाहींत काय? ज्या ज्या मानानें काम मोठें, त्या त्या मानानें त्याला कष्ट अधिक; आणि ज्या ज्या मानानें कष्ट अधिक, त्या त्या मानानें त्या कार्यसिद्धीचें भूषण अधिक; असें आहे. ह्मणून, आपणांस ह्या कामीं जरी कष्ट फार पडले, तरी त्या मानानें आपले उपकार आमच्या राष्ट्रावर अधिक होणार आहेत; आणि ज्या मानानें हे उपकार होणार आहेत, त्या मानानें आपणांस पुण्य अधिक लागणार आहे. आणखी, आपणांस विशेष सांगावयाचें तें हेंच कीं, आपणांस जी गोष्ट चांगली अशी वाटत आहे, ती करण्यास आपण एकदम आरंभ करा. तो जुटीनें करा. आपली मंडळी कांहीं थोडी नाहीं. पुष्कळ आहे; आणि, आपल्या विद्येवर, सौजन्यावर आणि चांगल्या हेतूंवर इतर जनांचा विश्वास आहे. ह्यास्तव, ज्या गोष्टी चांगल्या ह्मणून आपणांस वाटूं लागल्या आहेत, त्या, कोणाचीही परवा न करितां एकदम करायास लागा. त्या गोष्टी कराव्या असें आह्मीं ह्मणूं, आणि त्या गोष्टी करण्याचें काम पुढच्या पिढीवर ठेवूं, असें ह्मणूं नका. कां? तर, श्रीकृष्णाच्या पराक्रमावरून, वसुदेवाची पूजा कधीं कोणी करीत नाहींत. किंवा दाशरथी रामाच्या नांवाच्या महिम्यावरून, दशरथनामाचा जप कोणी कधीं करीत नाहींत. यश जें आहे तें ज्याचें त्याला. तें बापाचें लेंकाला किंवा लेंकाचें बापाला मिळत नाहीं. आ-

णखी, चांगल्या गोष्टी कोणत्या हें आपणांस कळलें असून जर आपण त्या केल्या नाहींत, तर, आपणांस त्या कळल्या आणि न कळल्या सारख्याच होत. कोलंबस, जेनर, शिवाजीमहाराज, लूथर इत्यादि मंडळीस जें योग्यसें वाटलें, तें त्यांनीं संकटांस न जुमानितां जर मनोनिग्रहानें केलें नसतें, तर, तीं महत्कार्यें त्यांचे हातून घडलीं असतीं काय? आणि तीं घडलीं नसतीं, तर त्यांच्या योगानें लोककल्याण झालें असतें काय? आमच्या वडिलांस ह्या गोष्टी कळत होत्या, पण त्या करण्यास त्यांस धैर्य नव्हतें, असें पुढच्या पिढीनें आपल्या पश्चात् आपणांस ह्मणावें, हें आपणांस पतकरतें काय? आणखी, त्यांत दुसरें विचारणें असें कीं, ज्या गोष्टी, त्रास टाळण्याकरितां, आपण जाणूनबुजून मागें टाकितां, त्या गोष्टी, त्याच सबबीवरून आपल्या पुढच्या पिढीनें कां मागें टाकूं नयेत? आणि अशी जर परंपरा चालली, तर, उन्नति होणार कशी? आणि देशाचें दैन्य जाणार कसें? आणखी, ह्या चांगल्या गोष्टी पुढच्या पिढीनें करून आपलें कल्याण साधिलें, तर त्यांत आपलें मोठेपण तें कोणतें?

आपल्या राष्ट्राची उन्नति ही एक मोठी इमारत बांधावयाची आहे; आणि कोणत्याही इमारतीला ह्मटला ह्मणजे पाया आधीं पाहिजे. तो रचण्याचें जर दिवसगतीवर टाकिलें, तर इमारत तयार होण्यास उशीर लागेल; किंवा त्या पायाच्या कामाची जर लोटालोट केली तर, तो कधींही व्हावयाचा नाहीं. बरें तो झाला नाहीं, ह्मणजे वरच्या इमारतीचें नांव कशास पाहिजे? आणि हा

पाया बांधणें ह्मणजे कांहीं अल्पकाळाचें काम नाहीं. त्यास तपांची तपें लागावयाचीं. इंग्लंडाच्या उन्नतीची इमारत जी एवढी भव्य आपणांस दिसत आहे, ती तयार होण्यास कमींत कमी सात आठशें वर्षें लागलीं आहेत. पण, ती एकदाची तयार झाली आहे; कां कीं, तिजवरचे कामदार आपापलीं कामें कायावाचामनेंकरून करणारे होते. ते इतके कीं, त्यांतल्या कितीएकांनीं तर, तत्प्रीत्यर्थ आपले जीवही अर्पण केले आहेत. तोच प्रकार फ्रान्स, जर्मनी, अमेरिकेंतलीं स्वतंत्र संस्थानें इत्यादिकांत झाला आहे. ह्या गोष्टी इतिहासावरून सर्वांस ठाऊक आहेत. तसा प्रकार आपल्या ह्या देशांत झाल्यावांचून आपल्या देशाचें कल्याण व्हावयाचें नाहीं. गाब्रिएल बौतन ह्यानें दिल्लीच्या बादशाहाच्या कन्येस बरें केलें, त्याबद्दल बक्षीस स्वतःकरितां पांच चार लाख रुपये किंवा एकादी जाहागीर त्यानें मागितली नाहीं; तर, आपल्या लोकांस व्यापार करायास मोकळीक असावी, हें मागणें मागितलें. अशी मंडळी निपजली पाहिजे. हें आपणास चांगलें कळलें आहे. तर, त्याप्रमाणें आपल्या सुखाकडे लक्ष न पुरवितां, आपण स्वतः अडचणी आणि संकटें सोसून आपल्या लोकांच्या कल्याणार्थ उद्योग कां न करावा? हीं संकटें आपणांस फार तर पांच वर्षें, दहा वर्षें, वीस वर्षें किंवा पंचवीस वर्षेंपर्यंत सोसावीं लागतील. पण, तेवढ्यांनीं एकदा चांगले प्रघात चालू झाले ह्मणजे, आपल्या पुत्रपौत्रांचें हित चिरकाळ होईल, हा मोबदला लहान आहे काय? अमेरिकेंतल्या स्वतंत्र संस्थानांचा इतिहास आपल्या लक्षांत असेलच. तें राजकीय प्रकरण आहे. पण उदाहरणार्थ तें घेण्यास कांहीं

प्रत्यवाय नाहीं. आपला देश इंग्लंडाच्या ताब्यांतून काढून स्वतंत्र करणें हें चांगलें आहे, असें जार्ज वाशिंगटन, बेंजामिन फ्रांक्लिन् इत्यादि मंडळीच्या मनांत आलें; तें इतकें कीं, तें त्यांच्या अंतःकरणांत ओतप्रोत होऊन, त्यानें राष्ट्रांतल्या सहस्त्रावधि लोकांचीं अंतःकरणें व्यापिलीं; आणि त्यांनीं सर्वांनीं, नानाप्रकारचे कष्ट सोसून, आपला हेतु सिद्धीस नेला. हें कशाचें फळ? तर, जी गोष्ट चांगली अशी मनांत वाटली, ती कोणत्या तरी प्रकारें करावयाची, ह्या दृढनिश्चयाचें! लढाई चालली असतां, इंग्लंडांतला कोणी एक शिपाई अमेरिकनांच्या लष्करांत जाऊन त्यांची स्थिति पाहून आला. त्यानें आपल्या सरदारास सांगितलें कीं, "अमेरिकेंतला सेनापति, त्याच्या हाताखालचे अमलदार, आणि त्यांच्या ताब्यांतले शिपायी, हे सगळे पगार न घेतां, अर्धपोटीं तर अर्धपोटीं, उघडे तर उघडे, असे आपल्या स्वातंत्र्यार्थ झगडत आहेत. असे पुरुष ज्या राष्ट्राचें रक्षण करीत आहेत, तें राष्ट्र जिंकण्याची आशा आह्मी वृथा कशाकरितां करावी?" तात्पर्य एवढेंच आहे कीं, मोठ्या कष्टावांचून मोठें फळ नाहीं, आणि आपल्या राष्ट्रांतल्या वाईट गोष्टी काढून टाकून त्यांच्या ठिकाणीं चांगल्या चालू करणें हें कार्य फार मोठें आहे. त्याकरितां श्रमही तसेच मोठे केले पाहिजेत. ते करण्यास आपण आरंभ करावा. उद्यां उद्यां, परवां परवां असें करून लांबणीवर टाकूं नये. जर टाकाल, तर व्याख्यानें देण्याचे आणि ऐकण्याचे सर्व श्रम व्यर्थ होत.

**तरुणहो.**—तुह्मी आमच्या उन्नतीच्या इमारतीचे

पाये आहांत. आमच्या सगळ्या पुढच्या इमारतीचा भार तुह्मांवर पडणार आहे; ह्मणून, तुह्मी ह्या व्याख्यानांत जें काय ऐकतां, तें चांगलें लक्षांत ठेवा, आणि त्यांतल्या चांगल्या गोष्टी खचीत करावयाच्या, असा निश्चय आतांपासून मनांत धरा. नेहमींच्या चर्चेवरून आणि शाळांतल्या अभ्यासावरून तुह्मांला कळलेंच आहे कीं, आपल्या ह्या राष्ट्राची स्थिति अगदीं वाईट झाली आहे. ती चांगली करण्याचें जें काम आहे, तें आपलें आपणच केलें पाहिजे. दुसऱ्याच्या तोंडाकडे पाहून तें कधीं व्हावयाचें नाहीं, हें खचीत लक्षांत ठेवा. केवळ परोपकारबुद्धीनें, स्वहिताकडे न पहातां, एका राष्ट्राचें कल्याण दुसऱ्या राष्ट्रानें केलें आहे, असें एक देखील उदाहरण जगाच्या इतिहासांत सांपडत नाहीं. परोपकारी मनुष्यें कधीं कधीं निपजतात; परंतु परोपकारी राष्ट्र कधीं निपजावयाचें नाहीं. ह्यास्तव, आपल्या राष्ट्राचें बरें व्हावें अशी जर इच्छा लोकांस आहे, तर, त्याविषयीं त्यांनीं स्वतः प्रयत्न केला पाहिजे. त्यांत, दृढनिश्चय हा अगदीं पहिला गुण पाहिजे; आणि आपल्या राष्ट्राचें हित तेंच आपलें हित, असें मानणारी मंडळी तयार झाली पाहिजे. अशा मंडळीचा कित्ता तुह्मांस, इतर राष्ट्रांच्या इतिहासापेक्षां अमेरिकेंतल्या स्वतंत्र संस्थानाच्या इतिहासांत पुष्कळ सांपडेल. आणि तो तुह्मांस जितका उपयोगी पडेल तितका दुसरा कोणताही कित्ता उपयोगीं पडावयाचा नाहीं. मारिअन् ह्मणून एक अमेरिकन सरदार होता, तो एका इंग्लिश सरदारास ह्मणाला, " माझी ही दशा पाहून तुह्मांस माझी दया यायाला नको. मी तुमच्यापेक्षां सुखी आहें; कां

कीं, मी आपला देश स्वतंत्र करण्यासाठीं लढतों आहें, आणि तुह्मी आपल्या देशबंधूंस गुलाम करण्यास झटत आहां. माझें काम चांगलें आहे, तुमचें वाईट आहे. मी जे कष्ट सोशीत आहें, त्याचें कदाचित् स्मरण देखील पुढें कोणास राहाणार नाहीं. तें न राहीना कां. त्याची परवा मी करीत नाहीं, परंतु, मी आपल्या देशाचें काम करितों आहें, इतकें माझ्या मनांत येऊन मला जो संतोष होत आहे, त्याची बरोबरी दुसऱ्या कोणत्याही संतोषाच्यानें करवणार नाहीं." पहा तर मग, ही केवढी देशप्रीति आहे ती ! अशी देशप्रीति उत्पन्न होण्यास मूळपासून वळण पाहिजे; तें वळण, अमेरिकेचा इतिहास वाचल्याच्या योगानें लागणार आहे. ह्मणून त्याजकडे विशेष लक्ष द्या. एक एक माणूस मिळून कुटुंब होतें; आणि कुटुंब कुटुंब मिळून राष्ट्र होतें. माणसें चांगलीं झालीं ह्मणजे कुटुंबें चांगलीं होतील, आणि कुटुंबें चांगलीं झालीं ह्मणजे राष्ट्र चांगलें होईल. आणि पुढच्या पिढीचीं सगळीं माणसें तुह्मी आहां. तुह्मीं चांगले होण्याचा प्रयत्न करा, ह्मणजे राष्ट्र चांगलें करण्यास वेगळे प्रयत्न करायास नकोत. आतां तुह्मी चांगले होणें ह्मणजे इतकेंच कीं, लक्षपूर्वक अभ्यास करणें, चांगल्या गोष्टी मनांत धरणें, त्याप्रमाणें वागण्याचा निश्चय करणें, चांगलें काम करण्यास न भिणें, वाईट काम करण्यास लाजणें, आईबापें आणि परमेश्वर ह्यांशीं भक्तिपुरस्सर वागणें, आणि आपल्या देशाचें हित तें आपलें हित असें निरंतर मनांत धरून त्याप्रमाणें निरंतर सगळ्या व्यवसायांचा ओघ ठेवणें, आणि ह्या सध्यां चाललेल्या व्याख्यानांत तेंच तुमच्या

कानीं पडतें. तें लक्षांत ठेवून त्याप्रमाणें वागा, हेंच सगळ्या व्यवसायांचें सार्थक्य होय.

**सर्व सभाजनहो.**–विद्याभ्यास करून आणि अशीं व्याख्यानें ऐकून करावयाचें तें काय? तें करावयाचें हेंच कीं, मनुष्यें व्हावयाचें. ह्याचा अर्थ काय? आपण सध्या मनुष्यें नाहीं आहों काय? आह्मी ह्मणतों नाहीं; आपण मनुष्यें नाहीं. कां! पहा, मांजर मांजराच्या डोक्यावर बसून कधीं चाललें आहे काय? नाहीं. आणि जर तसा प्रकार अकस्मात् दृष्टीस पडला, तर खालीं जें दिसतें तें खरोखर मांजर नव्हे, तर, मांजरापेक्षां कमी प्रतीचें जनावर असलें पाहिजे, ह्मणून त्याच्या डोक्यावर खरें मांजर स्वार होऊन चाललें आहे, असा त्याचा खरा अर्थ होणार आहे. ह्याहून अधिक स्पष्ट करण्याच्या भरीस पडूं नये हें बरें. तर, सांगावयाचें मिळून एवढेंच कीं, **वृद्धहो**, आपण सध्याच्या काळीं अशा रीतीनें वागा कीं, तेणेंकरून प्रौढांस आपलीं चांगलीं कामें करण्यास साह्य व्हावें; **प्रौढहो**, तुह्मी अशीं कामें करा कीं, तेणेंकरून, केवळ स्वतः आपणांस नव्हे, तर सर्व राष्ट्रास सुख होऊन, उत्तरोत्तर त्याचा आभ्युदय अधिकाधिक होत जाईल; आणि **तरुणहो**, तुह्मी असे तयार व्हा कीं, तुह्मांस राष्ट्राच्या हिताचीं कामें, तुमच्या वडिलांपेक्षां अधिक चांगल्या रीतीनें करतां येतील. हेंच मनुष्यें होणें आहे. आणखी, राष्ट्रसंबंधीं स्वत्व ह्मणून जें काय आहे, तें मनुष्यपणाचें मुख्य लक्षण आहे. त्या स्वत्वाची व्याप्ति ज्या वस्तूवर जितकी होते, त्या वस्तूच्या उत्कर्षाविषयीं तितकी विशेष आसक्ति उत्पन्न होते. ह्मणून, हें आमचें

राष्ट्र, असें ह्मणणारी मंडळी ह्या राष्ट्रांत नसल्यामुळें ह्याची जी आबाळ चालली आहे, ती नाहींशी होण्यास आणि ह्याची उन्नति होण्यास, **हें राष्ट्र आमचें आणि आह्मी ह्या राष्ट्राचे.** असा उत्तम भाव मनांत दृढ धरून, धर्मसंबंधीं, जनव्यवहारसंबंधीं, आणि राज्यव्यवहारसंबंधीं, ज्या ज्या वेळीं जितकें जितकें आपणांस करवेल, त्या त्या वेळीं तितकें तितकें आपण करूं या. हेंच आपल्या सगळ्या विद्याभ्यासाचें, सगळ्या व्याख्यानदानाचें, सगळ्या व्याख्यानश्रवणाचें, आणि सगळ्या इतर व्यवसायाचें उत्तम सार्थक्य होय.

आणखी, अशा प्रकारच्या कृत्यांस उशीर लावणें हें अत्यंत घातक आहे, असें मोठमोठ्यांनीं ह्मटलें आहे; त्यांत आपल्या वामनपंडितांचा जो एक श्लोक आहे, तो, प्रकृत विषयाच्या धोरणानें थोडासा फिरवून, येथें सादर करून, हा विषय संपवितों:—

**श्लोक.**

**जों हे स्वस्थ तनू जरा वसतसे जों दूर जों इंद्रियें**
**शक्तें कीं सरलें न आयु पुरतें तों शाहण्यांनीं स्वयें**
**देशाच्या हितसाधनार्थ धरणें हव्यास तो फारसा**
**होतां मंदिर दीप्त कूप खननीं उद्योग तो कायसा.**

ह्या बोधानुरूप वागण्याचा प्रयत्न आपण करूं या. हें सत्कार्य अत्यंत पवित्र आहे; आणि हें परमेश्वरास अत्यंत प्रिय आहे; ह्मणून ह्यांत तो आपणांस खचीत यश देईल, अशी आशा आहे. ती तो सफल करो.

# दुसरें मूकव्याख्यान.

माझे देशबांधवहो,

**ज्ञान संपादून आपणांस करावयाचें काय?**

हा प्रश्न फार मोठा आहे; ह्याचें उत्तर द्यावयाचें कठिण आहे; आणि तें उत्तर द्यावयास पुष्कळच बोलायास पाहिजे; असें प्रथम दर्शनीं वाटतें; आणि तें एका पक्षीं खरेंही आहे. परंतु, तत्त्वरूपानें पाहिलें ह्मणजे त्याचें उत्तर अगदीं सोपें आणि थोडक्यांत आहे, असें दिसतें. तें उत्तर ह्मणजे हेंच कीं, ज्ञान संपादून आपणांस जें काय करावयाचें आहे तें हेंच कीं, आपणांस मनुष्यें व्हावयाचें.

ह्या उत्तराचा अर्थ काय? आह्मी सध्या मनुष्यें नाहीं आहों कीं काय? असें कोणी विचारितील, आणि कदाचित् किंचित् रागावतील देखील. पण, आह्मी त्यांस एवढेंच उत्तर देतों कीं, होय; आह्मी सध्या माणसें नाहीं आहों; माणसांहून पुष्कळ कमी आहों; असें ह्मणतों ह्याबद्दल, उतावळीनें, राग येऊं देऊं नका; शांतपणानें थोडा चांगला विचार करा.

आधीं प्रथम असें पाहा कीं, प्रौढ माणसें आणि मुलें ह्यांच्या मध्यें अंतर आहे कीं नाहीं. तर आहे. तें कोणतें; तर, मुलें जीं आहेत, तीं, आपापल्या हिताचीं आवश्यक कार्यें करण्याविषयीं अगदीं असमर्थ असतात; आणि त्यांचें खाणें, पिणें, निजणें, बसणें, उठणें, खेळणें, बोलणें, चालणें, ह्यांविषयींची सगळी तजवीज प्रौढ माणसांस पाहावी लागते. आणखी, मोठीं प्रौढ माणसें जीं

असतात, तीं, आपापल्या सुखाचीं आवश्यक कार्यें आपण स्वतः यथास्थितपणें करितात; आणि त्यांत त्यांस दुसऱ्याच्या तोंडाकडे पाहात बसावें लागत नाहीं. हें अंतर कांहीं लहान नव्हे; फार मोठें आहे. आणि हें अंतर नाहींसें करणें, हाच ज्ञान संपादण्याचा मुख्य हेतु आहे, असें सर्व समंजस माणसें समजतात. हें अंतर ज्या मानानें मनुष्यास कमी कमी करितां येतें, त्या मानानें तो अधिकाधिक मनुष्यत्व पावतो. ह्या दृष्टीनें पाहिलें ह्मणजे, मनुष्यें ज्या ज्या मानानें अज्ञान असतात, त्या त्या मानानें, तीं लहान लहान मुलेंच समजलीं पाहिजेत.

हा विचार थोडा आपल्या स्वतःच्या स्थितीकडे लावून पाहा; ह्मणजे ह्या देशांतले आपण सर्व लोक खरोखर मुलें आहों, किंवा प्रौढ माणसें आहों, हें सहज लक्षांत येईल.

एक दृष्टांत दिला तर हें विशेष स्पष्ट होईल, असें वाटतें. असें समजा कीं, एका गांवामध्यें एक घर आहे. त्यांतलीं सगळीं माणसें लहान आहेत किंवा मोठीं आहेत, अजाण आहेत किंवा सुजाण आहेत, हें बरोबर ठाऊक नाहीं; परंतु, त्या घरचा सगळा कारभार शेजारीपाजारी दूरदूरचे देखील लोक येऊन पाहात आहेत, आणि खुशाल आपलीं घरें भरीत आहेत. तर, त्या घरचीं माणसें, वयानें लहान असोत किंवा मोठीं असोत, तीं प्रौढ माणसें नव्हत, लहान मुलें किंवा जनावरासारखीं अजाण माणसें आहेत, असें मानण्यास कांहीं प्रत्यवाय आहे काय? नाहीं.

त्याप्रमाणें आतां असें पाहा कीं, आपल्या ह्या राष्ट्राचीं जीं आवश्यक कामें आहेत, तीं वास्तविक ह्मटलें असतां,

आह्मींच केलीं पाहिजेत; तीं कामें, आमची इच्छा नसतां, आह्मांस न विचारतां, आज शेंकडों वर्षेंपर्यंत, परके लोक करीत आहेत, ही गोष्ट खरी नव्हे काय? आमच्या राष्ट्राचें राज्य ह्मटलें ह्मणजे आह्मीं हांकावें, तें परकीय लोक हांकीत नाहींत काय? आमच्या राष्ट्राचें रक्षण आह्मीं करावें, तें परकीय लोक करीत नाहींत काय? आमच्या राष्ट्रास जें वस्त्रपात्र किंवा सामानसुमान निर्वाहास पाहिजे तें आमचें आह्मीं तयार करून पुरवावें, हा आमचा धर्म, तें सगळें साहित्य परकीय लोक पुरवीत आहेत, नाहींत काय? आमच्या राष्ट्रांतल्या मुलांस विद्या शिकविण्याचें काम—ह्मणजे तें पोटाला अन्न तयार करून घालण्याच्या कामाइतकें आगत्याचें—तें, आमचें आह्मांस करितां येत नसल्यामुळें, परकीय लोक करीत आहेत, नाहींत काय? फार काय सांगावें, आमच्या अगदीं घरांतली गोष्ट—ह्मणजे आमच्या स्त्रियांस कोणत्या प्रकारची विद्या शिकवावयाची, ह्याचा निर्णय देखील परकीय लोक करीत आहेत, आणि त्याप्रमाणें आह्मी चालत आहों, हें खरें नव्हे काय? शिक्षणाचेंच कशाला? आमच्यांतल्या नवगायकांचे वाद तोडण्यास देखील परकीय लोक लागतात, तें काम सुद्धां आमच्यानें होत नाहीं, हें खरें नव्हे काय? आणखी त्याप्रमाणेंच, वेद ह्मणजे आमचें धर्मशास्त्र; आमच्या ऋषींनीं लिहिलेलें; तें, वास्तविक ह्मटलें असतां, इतर कोणत्याही लोकांपेक्षां आह्मांला अधिक कळलेंच पाहिजे; असें असतां, त्याचा जो अर्थ सातां समुद्रांपलीकडचे लोक आह्मांस सांगतात, तो खरा मानून आह्मी चूप राहातों, हें खरें

नव्हे काय? हें सगळें जर खरें आहे, तर, आपण ह्मणजे ह्या देशांतलीं सगळीं माणसें—पुरुष, बायका, मुलें हीं सगळीं—अजाण आणि दुर्बल, किंबहुना लहान मुलें आहोंत, आमच्यामध्यें मनुष्यपणा कसा तो मुळींच नाहीं, असें ह्मणण्यास कांहीं प्रत्यवाय आहे काय? आणि हा प्रकार जर खरा आहे, आणि लहान मुलांस अथवा अज्ञानांस खरें मनुष्यपण जर ज्ञानाच्या योगानें येतें आहे, तर, ज्ञान संपादून आह्मांस मनुष्यें व्हावयाचें आहे, हें ह्मणणें शब्दशः खरें झालें कीं नाहीं?

बरें, आपणांस मनुष्यें व्हावयाचें आहे हें ठरून, शिवाय तें कोणत्या गोष्टीच्या संपादनानें व्हावयाचें, हेंही स्पष्ट झालें. पण, आतां, ती गोष्ट संपादावी कशी, हा एक मोठा विचार राहिला. त्याचा उलगडा कांहीं फार कठिण नाहीं. तो उलगडा ह्मणजे एवढाच कीं, इतर राष्ट्रें आपापलीं कामें जशीं उत्तम प्रकारें बजावीत आहेत, तशीं आमच्या राष्ट्राचीं सगळीं कामें, जीं सध्या दुसरे लोक करीत आहेत, तीं, आमचीं आह्मांस करितां आलीं पाहिजेत; अशा प्रकारचें, बळ आमच्या अंगीं आलें पाहिजे. तें बळ एक प्रकारचें उपयोगीं नाहीं; ज्ञानबल, आणि निश्चयबल, असें दोन प्रकारचें बल पाहिजे. त्यांत पहिलें ज्ञानबल. आपण आहों कोण, आपणांस करावयाचें आहे काय, आणि तें कोणत्या उपायांनीं करावयाचें, हें समजणें, हीं ज्ञानबलाचीं मुख्य अंगें होत. सांप्रत काळीं असा कांहीं चमत्कार झाला आहे कीं, आपण आहों कोण, हें आपण अगदीं विसरलों आहों. आपणांस दास्य गोड लागूं लागलें आहे. कसें तरी पोट भरणें, हेंच

कायतें जन्मसार्थक्य, असें आपणांस वाटूं लागलें आहे. आणि, कालदेशवर्तमानाच्या प्रवाहास आह्मांला कधीं हात लावतां यावयाचा नाहीं, ह्मणून होईल तें होऊं द्यावें, आणि आपण स्वस्थ राहावें, अशा प्रकारची कांहीं चमत्कारिक वृत्ति आह्मांतल्या कितीएकांत उत्पन्न झाली आहे. ही बरी नाहीं. ही वृत्ति आमच्या नाशास कारण होत आहे. ही वृत्ति आमच्या राष्ट्राला रसातळास नेत आहे. ही वृत्ति सोडिली पाहिजे, आणि इतर राष्ट्रांतले सुज्ञ पुरुष काय करितात तें पाहून, त्यांप्रमाणें वागण्याचा प्रयत्न केला पाहिजे. इंग्लंडांतल्या माणसांप्रमाणें आह्मी माणसें असून, त्यांच्या इच्छेप्रमाणें आमच्या राष्ट्राचा कारभार चालावा, आणि त्यांत आह्मांस मुळींच कोणीं विचारूं नये, हा मोठा अन्याय आहे—मोठें पाप आहे—मोठा जुलूम आहे—आह्मांला केवळ नरकवास आहे—असें जेव्हां अमेरिकन लोकांच्या मनांत उभें राहिलें—अशी जेव्हां त्यांची त्यांनाच ओळख पटली, तेव्हां ते आपल्या राष्ट्रोद्धाराच्या उद्योगास लागले. हा त्यांच्या ज्ञानबलाचा परिणाम झाला. तसें ज्ञानबल आपणांत उत्पन्न झालें पाहिजे.

असें ज्ञानबल झाल्यावर, तें जों जों मनांत अधिकाधिक ठसतें, तों तों त्याजवरची निष्ठा अधिकाधिक होऊन, त्याचें सार्थक्य करण्याचा निश्चय मनांत वृद्धिंगत होतो. वाल्या कोळी ह्यास जेव्हां स्वतःच्या भयंकर स्थितीचें ज्ञान झालें, आणि उद्धाराचा मार्ग दिसला, तेव्हां तो पश्चात्ताप पावून त्याच्या ठायीं, पापनिवृत्तीचा निश्चय उत्पन्न झाला. तसा निश्चय आपले ठायीं उत्पन्न झाल्यावांचून आपले हातून उद्योग व्हावयाचा नाहीं; आणि तो

निश्चय उत्पन्न होण्यास आत्मस्थितीचें पूर्ण ज्ञान, आणि तिचा वीट—तिची खंती—मेलों तर चालेल, पण तिजमध्यें राहावयाचें नाहीं असा तिचा मनस्वी तिटकारा—उत्पन्न झाला पाहिजे. इतर राष्ट्रांतल्या पुरुषांनीं आपल्या पौरुषबळानें आपापल्या राष्ट्राचे मोठमोठे कारभार आपापल्या हातीं घ्यावे, आणि आह्मी त्यांसारखे पुरुष असतां, आणि आह्मांस त्यांच्यापेक्षां कांहीं एक कमी नसतां, आमच्या राष्ट्राचे कारभार आह्मांस करितां येऊं नयेत, आणि आह्मी—अशक्त विधवा स्त्रियांप्रमाणें कसेंतरी पोट भरून काळाचे दिवस काढावे—आणि आपलें पौरुष जें आहे तें, कुत्र्यांमांजरांप्रमाणें, केवळ प्रजोत्पत्तींत मात्र प्रदर्शित करावें, हें केवढें लाजिरवाणें आहे! अशा जिण्यापेक्षां मरणें बरें नव्हे काय? एकाद्या ठिकाणीं पृथ्वीवरचीं सगळीं राष्ट्रें, मानवरूपें धारण करून जर जमा झालीं, तर, त्यांत, बाकी सगळे पराक्रमी पुरुष, आणि आमचें हिंदुस्थान ही एवढी मात्र काय ती निर्बल स्त्री—गरीब बिचारी—केवळ अन्नवस्त्र देऊन घरांत एकीकडे ठेविलेली ह्मातारी—विधवा—असें दिसणार नाहीं काय? ही स्थिति अत्यंत लज्जास्पद आणि शोचनीय नव्हे काय? अशा स्थितींत आह्मांला कितीही सुख झालें, तरी तें काय कामाचें? पुरुषाला विधवा स्त्रीचें स्वरूप द्यावें, आणि त्याला नेसायाला मोठमोठ्या कांठांचीं उंची उंची लुगडीं द्यावीं, आणि खायाला चांगलें सुग्रास अन्न द्यावें, आणि त्या मनुष्यानें आपणांस सुखी मानावें, हें मनुष्यपणास शोभतें काय? जें मनुष्यपणास शोभत नाहीं, तें माणसांनीं करूं नये. तर

अशा स्थितीचा तिटकारा यावा–ओकारी यावी–तींतून बाहेर पडण्याचा भगीरथ प्रयत्न करतांना,—त्यांत जीव गेला तरी जाऊं द्यावा–हाच खरा पुरुषार्थ होय. बापू गोखले आष्ट्यांच्या लढाईंत मरण पावले, ह्यानें त्यांचा जो पुरुषार्थ दिसून आला आहे, तो पुरुषार्थ, ते आणखी शंभर वर्षें वांचून शंभर जय मिळवितें, तर दिसून आला नसता!

निश्चयाचें बळ कांहीं विलक्षण असतें. भीष्माचार्यांची गोष्ट आपणां सर्वांस ठाऊक आहे. मी हातीं शस्त्र धरणार नाहीं, अशी प्रतिज्ञा कृष्णांनीं केली असून, तुमच्या हातून मी शस्त्र धरवीन तरच खरा भगवद्भक्त, अशी जी प्रतिज्ञा त्यांजपाशीं भीष्माचार्यांनीं केली, ती कांहीं अजाणपणानें केली नाहीं. तर, कोणती युक्ति केली ह्मणजे, सगळया आणा शपथा आणि प्रतिज्ञा विसरून, कृष्ण शस्त्र धरतील हें त्यांला पूर्णपणें ठाऊक होतें, ह्मणजे ते कृष्णाला पूर्णपणें ओळखीत होते–ह्मणूनच ती प्रतिज्ञा त्यांनीं केली; एरव्हीं कधींही केली नसती. त्याप्रमाणेंच, आपले राज्यकर्ते आपणांस कशानें वश होतील, काय केलें ह्मणजे ते निरुपाय होतील–त्यांच्याच अभिवचनांनीं त्यांस कसें अडविलें ह्मणजे ते आपोआप वळतील, हें सगळें मनांत आणून, त्याप्रमाणें आपण उद्योग केला पाहिजे, आणि त्यांत कितीही वेळां माघार आली, आणि कितीही निराशा झाली, तरी पुनःपुनः, पुनःपुनः, पुनःपुनः तोच उपाय योजून–तो उद्योग सिद्धीस नेण्याचा निश्चय दृढ धरिला पाहिजे. त्यांत बाहेर एक आणि आंत एक असा पडदा न ठेविला पाहिजे; आपण त्याला अगदीं वाहलों आहों,

असें त्यांच्या प्रत्ययास आणिलें पाहिजे; आणखी तो उद्योग सिद्धीस नेण्याच्या कामीं एकनिष्ठेनें आपण त्यांचें साह्य मागितलें पाहिजे. आणि आपण जें करीत आहों, तें खरोखर सत्कार्य आहे—त्यांत हिंदुस्थान आणि इंग्लंड ह्या उभयतांचेंही हित आहे—अशी त्यांची खातरी केली पाहिजे. ह्मणजे भीष्माचार्यांस जशी आपल्या प्रतिज्ञेची धन्यता वाटली, तशी आपल्या उद्योगाची धन्यता आपणांस वाटून, परम आल्हाद होईल.

सत्कार्याविषयीं दृढनिश्चय हा सर्वत्र वंदनीय आहे. आणि पराक्रमी थोर पुरुषांचें किंवा राष्ट्रांचें ब्रीद काय तें तेंच आहे. आणखी अशा उद्योगास सांप्रतचा काळ आपणांस केवळ कपिलाषष्ठीच्या योगासारखा, नवस करूनही न प्राप्त व्हावा, असा आहे. तो कसा तो पाहा. पूर्वीं कधीं परकीय राज्यकर्ते कोणत्याही राष्ट्रास मिळाले नव्हते, असे उत्तम राज्यकर्ते आपणांस मिळाले आहेत. ते मोठे शाहाणे आहेत; चतुर आहेत; दूर दृष्टि आहेत; विचारी आहेत; कालदेशवर्तमान पाहून वागणारे आहेत; आणखी, सर्वांहून विशेष हें कीं, ते चांगले धार्मिक असून, त्यांस परोपकारी, न्यायी, आणि अत्यंत प्रामाणिक ह्मणवून घेण्याची इच्छा अतिशयित आहे. त्यामुळें, कोणताही कुढाभाव मनांत न आणितां, आमचे हातीं स्थानिक स्वराज्याचा अधिकार देऊन, राज्य कसें हांकावें हें आह्मांस शिकवीत आहेत; आमच्या लोकांस कवाईत शिकवून, प्रसंगीं राष्ट्राचें रक्षण कसें करावें, हें शिकवीत आहेत; आमच्या देशांत नानाप्रकारचीं यंत्रें आणून आह्मांस नानाप्रकारच्या आवश्यक वस्तु करा-

यास हळू हळू हस्तें परहस्तें शिकवीत आहेत; स-ध्याच्या काळास उपयोगीं पडण्यासारखी विद्या आमच्या मुलांस आमच्यानें शिकववत नाहीं, ती ते शिकवीत आहेत; आणि, सांप्रत आमची अवस्था आहे काय, व आपली उन्नति करून घेण्यास आह्मीं केलें पाहिजे काय, हें जें आह्मांस थोडथोडें कळूं लागलें आहे, तें केवळ त्यांच्याच साहचर्याचें आणि उपदेशाचें फल आहे. आणखी हा उपक्रम जर असाच वाढत गेला, तर, कालेंकरून आपल्या राष्ट्राचा पूर्ण उद्धार, ऐहिक व्यापारसंबंधानें आणि पारमार्थिक विचारसंबंधानें—अशा दोन्ही प्रकारीं—होईल, आणि तो दिवस—लार्ड मेकाले ह्मणतात त्याप्रमाणें—इंग्लंड आणि हिंदुस्थान ह्या दोन्ही देशांच्या इतिहासांत सोन्याच्या ठळक अक्षरांनीं लिहून ठेवण्यासारखा होईल. एवढा हा उद्धार ज्या पर्वणीच्या योगानें प्राप्त होण्यासारखा आहे, ती पर्वणी आह्मी फुकट जाऊं देऊं नये, असें आमचें आग्रहपूर्वक केवळ सांगणेंच आहे असें नाहीं, तर हात जोडून मागणें आहे.

परंतु, ह्यांत एक गोष्ट निरंतर लक्षांत ठेविली पाहिजे. ती ही कीं, ह्या पर्वांतलें कर्म सफल होण्यास दंडण सोशिलें पाहिजे. ह्मणजे ही एक प्रकारची तपश्चर्या आहे. ही यथासांग व्हावयास देह आणि मन हीं कष्टविलीं पाहिजेत. आपली तपस्या सफळ होण्याकरितां प्राचीन ऋषि लोहपिष्ट भक्षून राहात, असें आपल्या प्राचीन ग्रंथांत आहे, तसें कांहीं दंडन ह्या तपश्चर्येच्या संबंधानें आपण भोगलें पाहिजे. तें आपणांसच काय, पण, विद्याचारसंपन्न राष्ट्रांतल्या मोठ्या नामांकित राजर्षींसही

सध्या भोगावें लागत आहे. ऐर्लंडाच्या संबंधानें नामदार ग्ल्याडस्टन ह्यांनीं जो दृढ निश्चय धरिला आहे, त्याच्या योगानें त्यांस महाराणीसरकाराची मुख्य प्रधानगिरी सोडावी लागली आहे, आणि जनांच्या तोंडचे नानाप्रकारचे अपरिमित शब्दबाण सहन करावे लागत आहेत. तरी ते आपला निश्चय तिळभरही सोडीत नाहींत. ही त्यांची कृति—देवकृतीसारखी आहे, असें सर्व थोर माणसें—आपलीं महाराणीसरकार देखील मानीत आहेत. त्याप्रमाणें, आपल्यांतले जे कोणी लोक, अपमान सोसून, द्रव्याची हानि सोसून, आणि इतर सर्व आघात सोसून, आपल्या राष्ट्राच्या हितार्थ झटतील, ते केवळ आमच्या लोकांसच वंदनपात्र होतील असें नाहीं, तर महाराणीसाहेबांसारख्या थोर माणसांच्याही स्तुतीस पात्र होतील. हें जर साधलें, तर, आह्मी ह्मणतों कीं, सर्व कांहीं साधलें.

ह्मणून आतां ह्मणणें एवढेंच आहे कीं, आपण आपल्या सांप्रतच्या स्थितीचा चांगला विचार करावा; आपणांस पुरतें ओळखावें; आणि ह्या सोन्यासारख्या कपिलाषष्ठीच्या पर्वणींत, न्यायी, आणि सत्याचे पक्षपाती आपले राज्यकर्ते ह्यांच्या साह्यानें आपण आपल्या उद्धाराचा प्रयत्न करावा. तो एकदम फार होणार नाहीं. थोडा थोडा होईल. चिंता नाहीं. मोठी इमारत एका दिवसांत उभारत नाहीं. आपण पाया खणून ठेवूं; आपले मुलगे त्यांत चिरे लावतील; त्यांचे मुलगे त्यावर पहिला मजला उठवितील; त्यांचे मुलगे त्यावर दुसरा उठवितील; त्यांचे मुलगे त्यावर तिसरा उठवितील; आणि असें होतां होतां,

बाहेरच्या कोणाचेंही साह्य न लागे, आणि बाहेरच्या कोणाकडे पाहून लज्जा न वाटे, आणखी इतर लोक टकमकां पाहात राहात, अशा प्रकारें आपली संतति त्या इमारतींत सुखाचा उपभोग करीत राहील. आणि त्याच्या पुण्याचा वांटा केवळ आपणांसच मिळेल असें नव्हे; तर, आपले हितकर्ते, आपलें खरें हित आपणांस सांगणारे जे आपले राज्यकर्ते, त्यांचाही त्यांत बराच वांटा राहील. शिवाय, ही आपली परम पवित्र आणि परम हितकारक कृति पाहून, आपणां सर्वांचा परम मंगळधाम, परम दयाळू पिता जो परमेश्वर, त्यास अत्यंत संतोष होईल. ह्मणून, पुनः हरिदासाप्रमाणें पूर्वपदावर येऊन ह्मणतों कीं, आपण जीं लहान बालकें आहों, किंवा अजाण माणसें आहों—आणि त्यामुळें अत्यंत दीन आणि अत्यंत पराधीन झालों आहों—सगळी दुनयां आपणांस हंसत आहे--ही स्थिति टाकून देण्यास, आणि उच्च स्थिति प्राप्त करून घेण्यास, सत्य ज्ञान संपादूं या, आणि दृढ निश्चय करूं या. ह्मणजे आह्मी असें ह्मणतों कीं आपण मनुष्यें होण्याचा प्रयत्न करूं या. फलदाता परमेश्वर आहे.

---

## आळ्यताष्टक.

### श्लोक.

गेलें स्वराज्य तुमचें अवघें बुडालें
दारिद्य पूर्ण तुमच्या सदनांत आलें
कोणी पुसे न तुमच्या विगता यशाला
ही आळ्यता मग उगाच हवी कशाला ? १.

जो जो अहर्निश परां उदरां भराया
टाकोनि लाज करितां श्रमवोनि काया
लत्ताप्रहार गणितां सुरपुष्पमाला
हो आळ्यता मग उगाच हवी कशाला ? २.
शस्त्रें तुम्हां जवळचीं हि समस्त गेलीं
स्त्रीता असोनि पुरुषत्व तुम्हांस आली
पाहा तुम्हां परनराधिप देव झाला
ही आळ्यता मग उगाच हवी कशाला ? ३.
ज्यांचे वडील रणधीर विशाल होते
भिक्षान्न भक्षित पहा वसले अहो ते
ऐसा तुम्हांस विपरीतचि काळ आला
ही आळ्यता मग उगाच हवी कशाला ? ४.
जे आपणां म्हणविती प्रभु तेहि सारे
होवोनि गाय वसले थकले विचारे
स्वेच्छेनुरूप परका वळवी तयांला
ही आळ्यता मग उगाच हवी कशाला ? ५.
विद्या श्रमेकरुनि मेळविली जयांनीं
ते जाहले प्रवल नास्तिक मद्यपानी
पीतां सुधा विष तसा परिणाम झाला
हो आळ्यता मग उगाच हवी कशाला. ६.
ही आळ्यता प्रखर घातक फार मोठी
खाल्ले तिनें जन अभाग्य सभाग्य कोटी
देऊं नका स्थल तिला लवमात्र पोटीं
आधीं करा प्रथम ही बहु गोष्ट मोठी. ७.
त्यानंतरें करुनियां वश लोकपाला
जाणोनियां स्वपरधर्महि देशकाला
व्हा नित्य उद्यमपरायण सावकाश
देईल तो यश तुम्हांस जगन्निवास. ८.

बालबोध.

# आधुनिक विद्वानांचे कर्तव्य आणि शिक्षण.

हा निबंध

कृष्णाजी गोविंद उकीडवे

नूतन मराठी विद्यालय पुणें आणि

प्रायव्हेट इन्स्टीटयूशन वडोदें यांचे माजी

सुपरिन्टेन्डेन्ट यांणीं रचिला.

तो

पुणें येथें,

"सौजन्यमित्र" छापखान्यांत छापिला.

सन १८८७.

किंमत २॥ आणे.

# आधुनिक विद्वानांचें कर्तव्य आणि शिक्षण.

कोणत्याही लोकसमाजधुरीणाच्या मनांमध्यें आपले आचार, विचार, धर्मव्यवहार इत्यादिकांमध्यें कांहीं फेरफार करून त्या ठिकाणीं चांगलासा बदल करावा असें आल्यास त्याला सुगम असा मार्ग ह्मटला ह्मणजे आपली भावी प्रजा त्या मार्गाची करण्याविषयीं झटणें हें होय. एखाद्या जख्ख्ड वयोवृद्धाजवळ जाऊन एखाद्या गोष्टीचें प्रतिपादन डोकेंफोड करून केलें तरी त्याच्या घट्टेपडलेल्या हृदयावर त्या गोष्टीचें प्रतिबिंब कधीं ही उमटणार नाहीं. आणि असें असणें हें साहजिकच आहे. कारण आपल्या नेहमींच्या संवयीविरुद्ध वागणें हें प्रत्येकाला फार दुर्घट आहे. त्यांत ज्याचे बुद्धीला कधींही विचाराची बाजू ठाऊक नाहीं, त्यांचे कडून चांगली गोष्ट चांगली आहे असें ह्मणविणें हें देखील कठीण; मग त्याप्रमाणें आचरण व्हावें कसें? इत्यादि गोष्टींचा सूक्ष्मरीतीनें विचार केला ह्मणजे जी काय घडामोड करावयाची असेल ती होतकरू मंडळी कडूनच करवावी हें बरें दिसतें. जसा नवीन रंग देणें झाल्यास तो जुन्या वस्त्रापेक्षां नव्यावर अधिक जिल्हईदार व तरतरीत वठतो, तसें ज्यांचीं मनें अनेक मतांनीं कलुषित झालीं आहेत अशा जुन्या लोकांपेक्षां नवीन

पैदास्त स्वच्छ व सरळ अमलयामुळें त्या ठिकाणीं महोवृक्ष मोठ्या जोरानें वाढून तो पर्ण, पुष्प, व फळें, यांनीं परिपूर्ण असा आपल्या दृष्टीस पडेल. यासाठीं आपणाला पुढें जें काय पाहिजे त्याचे प्रयोग आपल्या कोंवळ्या बाळांवरच करणें हें इष्ट आहे. आणि हे प्रयोग करण्याचें ठिकाण ह्मणजे लोकांनीं स्थापिलेल्या खासगी शाळा हें होय.

खासगी शाळा असे ह्मणण्याचें कारण—सरकारी शाळांमध्यें नियत शिक्षणाहून निराळें शिक्षण देणें हें लोकसमाजाचे हातीं नसतें. त्यामुळें त्यांत बदल करणें असल्यास सरकारचा तिऱ्हाइतपणा घ्यावा लागतो. आणि सरकारपक्ष व लोकपक्ष यांचा मेळ कधींही होत नसल्यामुळें तिऱ्हाईत सरकारचा ठराव लोकमता विरुद्ध असणें हें साहजिक आहे. यासाठीं सरकारी शाळा समाजाला व्हाव्या तशा हितकारक नसतात.

खासगी शाळा स्थापन करण्याचे संबंधानें प्रस्तुतचें प्रतिपादन पुरें आहे असें वाटतें. कारण या विषयाचा बराच मोठा ऊहापोह होऊन त्यांची योग्यता व अवश्यकता या विषयींचा संशय कोणाला उरला आहे असें वाटत नाहीं. ह्मणून त्याच गोष्टीची चर्चा न करितां खासगी-शाळांचा विस्तार कोणत्या रीतीनें वाढवितां येईल याबद्दल विचार करणें जरूर आहे. ह्मणून प्रथमतः या संबंधानें कोणकोणत्या अडी उत्पन्न होतात व त्यांचें निवारण कोणत्या रीतीनें करितां येईल याबद्दल विचार करूं."

मराठी ग्रंथ संग्रहालय

जोंपर्यंत बालकांना विद्यामृतप्राशनाची गोडी लागली नाहीं ; तोंपर्यंत जसा रोग्याला दाबून औषध द्यावें लागतें तसें बळेंच दाबून विद्यौषध मुलांकडून प्राशन करवावें. असें एवढ्याच कीं शिक्षणाची गोडी लोकांमध्यें उत्पन्न होण्यासाठीं प्रथमतः तें मोफत मिळण्याची अवश्यकता आहे. व त्या संबंधानें कोणाला थोडांसुद्धां जुलूम वाटतां कामा नये. परंतु एकदां सुशिक्षितेचा प्रभाव पूर्ण रीतीनें अवगत झाला ह्मणजे जसा व्यसनी मनुष्य आपल्या व्यसनासाठीं तन, मन आणि धन, यांची पर्वा करीत नाहीं, तद्वत् विद्याव्यसन्याला सर्वांपेक्षां विद्या ही प्यारी होते.

आतां अशा प्रकारें पदरचे पैसे खर्चून सार्वत्रिक विद्याप्रसार करण्याची शक्ति कोणाचे अंगीं आजकाल आहे असें वाटत नाहीं. कदाचित् कुठें असल्यास तिचा उपयोग करण्याची बुद्धि त्यांना होत नाहीं. एकंदरींत सरकारचे आश्रयाशिवाय येथें आमच्या विद्याप्रसारकांचें घोडें लंगडें पडतें. यासाठीं त्याला एकच तोड दिसते ती ही कीं सरकारांतून विद्याप्रत्यर्थ बसविलेल्या लोकलफंडांतून किंवा शाळा खात्याकरतां ह्मणून जी रक्कम ठरलेली असेल तींतून मोठी रक्कम कांहीं नियमांनीं सरकारानें अशा मंडळीचे ताब्यांत द्यावी. आणि हळूहळू विद्याप्रसार वाढत जाईल तसा तो फंड अगर ती रक्कम सगळीची सगळी ह्मा मंडळीचे ताब्यांत देऊन सरकारानें आपलें आंग हळूच काढून घ्यावें. या नियमानें व्यवस्था झाली असतां लोकांना अनुकूल

शिक्षण मिळण्याचे मार्ग खुले राहतील. हाच क्रम आमच्या शाहण्या इंग्रज बहादुरांनीं उचलला आहे. पण शेवटीं हातीं आलेला पैसा देण्याची वेळ आली ह्मणजे तिथेच कायती मोठी गोम दृष्टीस पडते. शिक्षणाचे उद्देशानें कररूपानें लादलेला पैसा पोतडींत पडला ह्मणजे पुढें मारवाडी कावा सुरू होतो. उद्देशाप्रमाणें जर हात सैल सुटले तर विद्योपार्जनाचे कामीं आह्मांला हवे तितके दरवाजे खुले राहतील. परंतु हिंदुस्थानचे खर्चांत काटकसर करण्यासाठीं नेमलेल्या कमिशनानें पहिल्यानें शाळाखात्याचे छाटाछाटीस आरंभ केला! येथें उद्देशाची मातबरी काय राहिली? असो; पण आज अशा प्रकारचें शिक्षण देण्यासाठीं आमचे संस्थानिक जर खटपट करतील तर थोड्या दिवसांत ब्रिटिश राज्यांतील शाळाखात्याला ते बरेच मागें टाकतील; कारण आमच्या संस्थानिकांचा व आमचा निकट संबंध असल्यामुळें आह्मांला पाहिजेत त्या गोष्टी त्यांचा हात धरून करून घेतां येतील, तसें ब्रिटिश राज्यांत करून घेतां येत नाहीं. परंतु या सर्वांत मोठ्या गोष्टीकडे त्यांचें दुर्लक्ष्य झाल्याचें दिसून येतें ही मोठी दुःखाची गोष्ट आहे! हल्लीं जी कांहीं नेटिव संस्थानें आहेत त्यांमध्यें असलेले बहुतेक मोठे कामदार, पंडित, विद्वान, हे ब्रिटिश विद्यादानाचा प्रतिग्रह केलेले आहेत असें ह्मणणें मोठ्या धाडसाचें होणार नाहीं. हिंदुस्थानची स्वतंत्रता गेली, कलाकौशल्य नाहींसें झालें, लोक अनाथ झाले, तरी देखील हा सर्व प्रकार केवळ अशिक्षितपणाचा आहे हें न समजून किंवा समजलें असल्यास

त्याकडे डोळेझांक करून आंगड्यानें पांघरूण ओढून घेणें धोक्याचें झाल्या शिवाय खचित रहाणार नाहीं. माझी अशी समजूत आहे कीं, जगामध्यें जवळ्या ह्मणून कांहीं महत्वाच्या गोष्टी आहेत त्यांमध्यें पहिली गोष्ट ह्मणजे लोकांचा सुशिक्षितपणा वाढणें ही आहे. आगगाड्या चालु झाल्या, तारायंत्रानें बातमी पाठवितां येऊं लागली, छापखाने सुरू होऊन हजारों पुस्तकें निघूं लागलीं, इत्यादि गोष्टी कशानें झाल्या? याचें एकच उत्तर मिळेल तें हें कीं "लिबरलएज्युकेशन." परंतु यापैकीं किंवा अशा सारखी एकादी गोष्ट तरी शोधून काढण्याबद्दल आमच्या नामश्रेष्ट हिंदुलोकांच्या देशांत एकाचें तरी नांव ऐकूं येतें काय? मारुती एका उडी सरसा द्रोणागिरी घेऊन आला; भारती युद्धामध्यें अर्जुनानें कौरव सैन्याची दाणादाण केली; भास्कराचार्यांनीं ज्योतिषावर मोठा गूढ विचार केला; वाग्भट्ट व सुश्रुतकार मोठे शारीरशास्त्रकोविद झाले; कालिदास भवभूतीचे घरीं काव्यालंकार पाणी भरीत होते; इत्यादि पांच सहा नावांचें तर्पण करीत बसून आंग्लभाषा विभूषित दीक्षितां पुढें निभाव लागणें कठीण आहे. शिक्षण वाढणें याचा अर्थ परवशतेची चिडी वागविणाऱ्या कैद्यांची संख्या वाढणें असा नव्हे. ज्या देशामध्यें नित्य नवे. नवे शोध चालू आहेत; कालची कल्पना आज जुनी होत आहे; व्यापारा शिवाय बोटभरही जागा रिती नाहीं; लोकांना प्रत्येक वस्तुचा उपयोग करितां येत आहे; अशा सारख्या हजारों गोष्टी ज्या ठिकाणीं दृष्टीस पडतील, तो देश सुशिक्षित समजावयाचा.

शाळेंत जाणें ह्मणजे निवळ नोकरी मिळविण्या करितां, हा समज जेव्हां आमचे लोकांतून निघून जाईल तो दिवस कोणच्या तरी एका युगाचा पहिला समजून तेव्हांपासून निराळी वर्षगणती करण्याला कांहीं हरकत नाहीं. एखाद्या पांच वर्षांच्या मुलाला " बाळा, तूं कशा करितां शाळेंत जातोस?" असें विचारिलें असतां तो असें उत्तर देईल कीं, " बाबा सारखी मोठी चाकरी मिळविण्या करितां." तर हा त्याचा समज जाऊन पृथ्वीचा आकार वाटोळा आहे, या वाक्याची सत्यता जशी सिद्धते शिवाय त्याचया मनावर ठसलेली असते. त्या प्रमाणें आपल्या आयुःपर्यंत लागणाऱ्या निबिड कांतारामधून सुरक्षित पार पडण्याकरितां शिक्षणरूपी वाटाड्याचा स्नेह करणें अवश्य आहे; अशी त्याची समजूत झाली पाहिजे. कोळी, साळी, लोहार, सुतार, वाणी, उद्मी, पाथरवट वगैरे प्रत्येक व्यापारी मनुष्याला आपलें काम शिक्षणाशिवाय अधिक सुरस रीतीनें खचित करितां येणार नाहीं. एवढा हा व्यापक विषय असून त्याचा उपयोग केवळ नोकरी करण्या कडेसच व्हावा; इतकेंच नव्हे तर शिक्षितपणाचा शिक्का ठोकल्यानंतर सोनाराला दागिने करण्याची, हजामाला हजामती करण्याची, कुंभाराला मडकीं घडवण्याची लाज वाटून त्यांनीं आपल्या स्वकीयांची निर्भर्त्सना करावी ही मोठी दुःखाची व अशुभसूचक गोष्ट आहे. आह्माला जो कांहीं थोडा बहुत बरासा काळ गेला त्यांत आमच्या शिक्षणामध्यें राजांचा संबंध बिलकुल नसे; राजांनीं लढाया करून प्रजांचें संगोपन करावें आणि

राजा व प्रजा यांना ब्राह्मणपंडितांनीं आपल्या विद्येने तरबेज करण्यासाठीं निरनिराळ्या प्रकारच्या शाळा स्थापून शिक्षण देत जावें; यामुळें प्रत्येक धंद्याचे लोक त्या त्या धंद्यांत भरपूर राहून प्रत्येकास आपापले का मांत चढाओढीनें वर्चस्व मिळविण्याची उत्कटेच्छा साहजिक उत्पन्न होत असे. त्या वाळीं आपला धंदा सोडून दुसरा धंदा करणें नीच मानीत असत. परंतु आतां सगळ्यानांच पंडित होण्याची इच्छा उत्पन्न झाल्यामुळें केवळ मंदरांची स्थिती येऊन ठेपली आहे. न जाणों असा एखादा दिवस येईल कीं त्या दिवशीं एका मंदराचा पाय घसरताच त्याचे मागून सगळ्यांचे पाय मोडके होऊन जिवावरही येऊन बेतेल. तर येवढ्या मोठ्या भावी संकटाच्या निवारणार्थ आह्मांस आजपासून झटणें अवश्य आहे. जर आम्हीं आमचें शिक्षण आपल्या हातांत घेण्याची खटपट न केली तर आमची हरवलेली स्वतंत्रता पुनः हातीं येण्याची आशा मुतराम नको.

या वर लिहिलेल्या गोष्टींचा विचार केला ह्मणजे त्या तडीस नेणें हें दोन प्रकारच्या लोकांवर अवलंबून राहतें. संस्थानिक व श्रीमान् या लोकांनीं द्रव्यद्वारा मदत केली पाहिजे आणि सुशिक्षित व देशाभिमानी सद्गृहस्थांनीं आपल्या मंडळ्या जमवून योग्य शिक्षण देण्याचा भार आपले डोक्यावर घेतला पाहिजे. पहिल्यानें या गोष्टींचा प्रयोग संस्थानांतून करणें जितकें सोपें जाईल, तितकें ब्रिटिशसत्तेखालीं जाणार नाहीं हें उघड आहे. कारण आपला देश, आपले लोक,

आपलें हित जाणून नेटिव राजांच्या मनांत स्वप्रजेवि-षयीं जितकी कळकळ उत्पन्न होईल तितकी केवळ तरवारीच्या जोरावर राज्य हांकूं, असें ह्मणणाऱ्या पर-कीयांचे मस्तकाखालीं उत्पन्न होणार नाहीं. आतां नेटिव संस्थानिकांची तरी शिक्षणोद्यानाचा रमणीय देखावा पाहण्याची इच्छा सर्वांचनी जगदननुभवरूपी कांटेऱ्या निवडुंगांचा गराडा असल्यामुळें त्या भयंकर देखाव्याक-डे पाहून आपोआपच नाहींशी होते. परंतु ज्ञानवल्ली ज्यावर झोकांडे खात आहे, व अनुभवरूपी छत जिथें उभारून दिलें आहे, धीरस्तंभ ज्याला रोविले आहेत अशा मुत्सद्दीद्वारांतून आंत प्रवेश केला असतां त्यांची घटकाभर तहानभूक निवाल्याशिवाय खचित र-हाणार नाहीं. तात्पर्य एवढेंच कीं शाहण्या शाहण्या मुत्सद्दी माणसांनीं आपला अनुभव दाखवून त्याप्रमाणें राजांचें वर्तन राहण्याविषयींची खबरदारी घेतली पाहिजे. जन्मतःच कोणी वाईट किंवा चांगला नसतो. जशीं जशीं चांगल्या किंवा वाईट अनुभवाचीं पुटें स्वभावावर चढत जातील तसतसा त्याचा रंग पालटतो. दुर्व्यसनांच्या पायीं धुळीला मिळालेलीं जीं शेकडों उदाहरणें आपल्या दृष्टीस पडतात त्यांचें तरी कारण कुसंगती हेंच होय. असा नियम आहे कीं मनाची प्रवृत्ति नेहमीं दुराचाराक-कडे वळलेली असते व तिचा परिणाम सांबंधिकांवर प-डतो. मग ज्या एका व्यक्तीवर सारें राष्ट्र अवलंबून राहिलें असतें त्या व्यक्तीच्या गुणदोषांचें पर्यवसान सा-ऱ्या राष्ट्रावर होईल यांत आश्चर्य कोणतें ? राष्ट्र आणि राजा यांचा मन आणि शरीर यांच्या सारखा निकट

संबंध आहे. मन दुराचारी होतांच शरीराकडून दुराचार घडले जातात; यासाठीं मी ह्मणतों कीं राजाचा बेरवाईटपणा राज्यांतील मुत्सद्दी माणसांच्या मुत्सद्दीपणाचें सूचक आहे.

ज्या कामदारांचें राजाजवळ वजन नाहीं ते कामदारच नव्हत. आतां ज्या अर्थी प्रत्येक राज्यामध्यें कांहीं कामदारमुत्सद्दी आहेत असें आपण गृहीत धरतों, त्याअर्थी आह्मी ह्मणतों या गोष्टी आमच्या नेटिव्ह राजेसाहेबांकडून सहज होऊं शकतील. आपणाला असा अनुभव आहेच कीं राज्यनौकेचे मुकर्णधार झालेल्या नूतन आर्यश्रेष्ठ राजांनीं आपली नौकामोठमोठीं शिडें लावून मोठ्या झपाट्यानें चालविण्याचा प्रयत्न केला आहे. परंतु हल्लीं त्या नौकेचे आंतील यंत्रामध्यें अव्यवस्था झाल्यामुळें सुस्थळास जाऊन पोंचण्याचें काम फारच हळूहळू होऊन त्यास अत्यंत अवधीहीलागणार आहे. शाळा स्थापन करणें, सुताचीं यंत्रें चालविणें, मजुरांस उद्योग देणें इत्यादिक ज्या लहान मोठ्या गोष्टी दृष्टीस पडतात त्या भावी सुधारणेच्या द्योतक आहेत. याच गोष्टी बहुतांशीं आमच्या श्रीमंत लोकांसही लागू आहेत. त्यांच्या लहानशा जहागिरी, लहानशीं इनामें, येवढ्यांमध्येंच जरी त्यांनीं व्यवस्था केली तरी आपलें बहुतेक कार्य होणार आहे. कारण लहान लहान इनामें लहान लहान जाहागिरी यांनींच राज्य होतें. आह्मी ह्मणतों ही गोष्ट कांहीं मोठ्या विलक्षण जोखमीची नाहीं. डोंगरांतलें पाणी ज्या प्रमाणें नद्यांचे रूपानें समुद्राला मिळतें व मेघांचे रूपानें पुन्हां डोंग

रांवर कोमळतें; तद्वत् प्रजेने शिक्षाकरितां प्रजेच्या पैसा एका निराळ्या रूपानें प्रजेकरितांच खर्च करावयाचा आहे. अज्ञान आणि अप्रबुद्ध अशा ज्या मनुष्यांचा पोषकसागर, तो दृष्टीस जर आपली कामगिरी बजावतो, तर मग चेतनाज्ञानसंपन्न अशा मानवीप्राण्यांच राजाची ही कर्तव्यता नाहीं असें कोण म्हणणार आहे?

ही एक प्रकारची बाजू झाली. दुसरा प्रकार म्हटला म्हणजे तो आमच्या आधुनिक विद्वान् मंडळीवर येऊन आपटतो. याचे बद्दल विचार करूं लागलें म्हणजे आपलाच आपलेवर विश्वास नाहींसा होतो. आज नांवाच्या डिग्रीवाल्यांची संख्या थोडी आहे असें नाहीं. पण युनिव्हर्सिटी यंत्रांतून बाहेर पडल्यावर पुस्तकांची आणि त्यांची शिवाशिव होईल तर शपथ! परीक्षा होऊन पसार होणें हीच त्यांना मोठी धन्यता वाटते. शेवटीं खावंदकी करतां करतां ३० रुपयांची जागा मिळाली म्हणजे झालें जन्माचें सार्थक्य. युनिव्हर्सिटी हॉलमध्यें गाऊन घालून डिग्री घेतेवेळीं बाबानों असे व्हा; तसे व्हा; स्वतांसाठीं उद्योग शोधा; स्वकीयांचे पुरस्कर्ते बना. देशाचें कल्याण करा. इत्यादि चान्सेलर साहेबांचें उपदेशपर भाषणश्रवण करून बाहेर पडले नाहीं तोंच गाडी वळविली कलेक्टर साहेबांचे बंगल्यावर! अशा विद्वानांला विद्वान् म्हणण्याची देखील लाज वाटते. पण हे कायदेशीर विद्वान् झाले त्यापुढें इलाज नाहीं.

एक ग्राजूएट होण्याकारितां १०वर्षांत सुमारं ३००० रुपये खर्च करावे लागतात, असा अजमास आहे. याचा एकोत्र्याचे व्याजानें हिशेब केला असतां दरमहा ३० रुपये कोणाही महामूर्ख मनुष्याला मिळणें स्वाहजिक आहे. शिवाय एखादा सामान्य मनुष्य जर १० वर्षे त्या रकमेवर व्यापार करील तर रुपया मागें अर्धा आणा नफ्यानें सदर मुदतींत तूटनाट वजा जाऊन कमींत कमी तो तीस हजारांचा मालक झालाच पाहिजे. हें माझें ह्मणणें प्रथम दर्शनीं जरा कसेसेंच वाटेल, परंतु थोडासा वेळ पाटी पेन्सिल घेऊन हिशेब केला तर त्यांहून मला थोरला आंकडा दृष्टीस पडेल. या वरून असें सिद्ध होतें कीं हें शिक्षण नव्हे तर एक प्रकारची देशाची हानि आहे. अभ्यास करकरून छातीला ओंडा, उंच वरगड्या, डोळ्यांस उपनेत्र, हातांत काठी, कंबरेवर हात आलेले पाहणें हा एक तऱ्हेचा मजेदार देखावाच होतो. विद्वत्ता आणि कर्तृत्वशक्ति यांचे मध्यें सवतीमत्सर असल्याचें आमच्या देशांत दिसून येतें. आजि आमचे आधुनिक विद्वानांची नुसती तोंडची बडबड झाली आहे, याचें बीज तरी हेंच. देशाला ऊर्जित दशा येण्याला नुसत्या बडबडीपेक्षां कर्तृत्वशक्तीची फार जरूरी आहे. परंतु प्रस्तुत बडबडाध्याय वाचणाऱ्या विद्वानांचा वाक्प्रवाह मोठ्या झपाट्यानें सुरू आहे; त्याला बंधारा घालून प्रवाहाची दिशा उद्योगाकडे फिरवणें हें दूरदृष्टि व देशहितचिंतक सुधारकांचें कर्तव्य आहे. काय

चमत्कार पहा एखादा आचारी किंवा पाणक्या दरमहा १० रुपये घेतल्याशिवाय सोईवार मिळण्याची मारामार पडते, पण तीन रुपयांच्या शिक्षकाचे जागेकरितां शेंकडों उमेदवार हातांत अर्ज घेऊन एका पायांवर तयार असतात. वस्तुतः पहातां शिक्षकाचें काम कमी महत्वाचें आहे असें नाहीं. उदाहरणार्थ नुकतीच फर्ग्युसन कॉलेजची कोणशिला गव्हरनरसाहेबांनीं आपल्या हातानें बसविली. तशी प्रत्येकाचे आयुष्य इमारतीच्या पायाची कोणशिला शिक्षक बसवितो. गव्हरनर साहेबांनीं फार तर दहा पांच शिला बसविल्या असतील. परंतु त्या एका शिक्षकाच्या हातून सालीना शेंपन्नास बसविल्या जातात. यावरून शिक्षकाची खरी योग्यता ध्यानांत येईल. असें असून शंभरनंबरी सोन्याची किंमत तीन रुपये होण्याला विद्वत्तेचा पैशापासरीपणाच कारण झाला आहे असें ह्मणावें लागतें. हीच स्थिती ज्याचे त्याचे योग्यते प्रमाणें प्रत्येक विद्वान् मनुष्याला लागू आहे. यावरून असा प्रश्न उत्पन्न होतो कीं आजपर्यंत झालेल्या विद्वान् उपपदधारी मंडळीची व्यवस्था कोणत्या तऱ्हेनें लावावी ? तर याला तोड एवढीच दिसते ती ही कीं, पांचपांच दहादहा मिळून एक अशा ग्राजुएट किंवा त्यांचे तोडीच्या लोकांच्या मंडळ्या तयार कराव्या. आणि त्या प्रत्येक कंपनीचा निरनिराळा उद्देश असावा. कोणाचा शाळा स्थापन करण्याचा, कोणाचा शिसपेन्सिली तयार करण्याचा, कोणाचा स्लेटपाट्या करण्याचा कोणाचा टांचण्या, सुया करण्याचा, कोणाचा लोखंडी

हत्यारें करण्याचा, कागदांचा, रेशमाचा, चामड्याचे कारखान्याचा इत्यादि-शेकडों प्रकारचा. पण की मांजराचे गळ्यांत घांट बांधण्या सारखी आली. पहिल्यानें खाविंद सरकारची सेवा सोडून मंडळीचा एक जम बसावा कसा, याबद्दल मोठा विचार आहे. आह्मीं ह्मणतों, रडतराव घोड्यावर बसवावयाचे आहे। खरे, मग पहिल्यानेंच त्यांचे सवेंत तरी अंतर कां पडूं द्या ? लहान मुलांच्या लुटूपुटीच्या खेळांत नवरा, बायको, सासू, सून, जांवई इत्यादिक लटक्याच नात्यानें जसा तीं एक संसार जमवितात, पण वस्तुतः प्रत्येकाचा संबंध निराळा असतो; तसा एक असामी पुढें सरून त्यानें पुढील संसार मांडण्यासाठीं पहिल्यानें लटकेच संबंध खरे ह्मणून कबूल करून घ्यावेत, ह्मणजे लोकांना एक तऱ्हेचा बाऊ वाटूं लागेल. मग ज्याचा तो निरनिराळ्या धंद्यांत असेनाका बापडा; पण एवढेंच कीं, खेळामध्यें मुलें जशीं आपापलीं नातीं तेवढ्या वेळा पुरतीं कबूल करतात, तशीं वेळ पडेल तेव्हां प्रत्येकानें आपापलीं नातीं कबूल केलीं पाहिजेत. आतां याच्याहून बारीक शंका घेऊन त्यांचें निवारण करीत बसण्यापेक्षां मंडळ्या जमवाव्या, एवढें ह्मणूनच पुढें चलावें हें बरें वाटतें. कारण हा लेख ह्मणजे निवळ शोपट मार्ग आहे. अस्तु. या विद्वान्, थोर नांवाजलेल्या मंडळीबद्दल कोणाला अविश्वास आहे, असें नाहीं. तरी पण एखादे रावसाहेब, रावबहादूर, किंवा खानबहादूर गांठून त्यांचे अभिप्रायासह आपले उद्देश जगाला जाहिर करावे, ह्मणजे सहजच वजन जास्त

पडतें. कारण असें करणें हें लोकांचा विश्वास पट
ण्यास अधिक साधनीभूत होईल. या गोष्टी झाल्या
ह्मणजे आपली बहुतेक तयारी झालीच. मग एवढ्या
लठ्यासम्यामह्वर्तमान एकादा संस्थानिक, व जहा-
गिरदार, श्रीमंत पाहून तेथें जाऊन द्यावा तळ; नि
काय! पाहुण्याचे योग्यते प्रमाणें आणि देणाराचे ऐप-
ती प्रमाणें होतोच आहे पाहुणचार. शिंदे, होळकर
गायकवाड, निजाम, ह्मैसूरचे राजे अशा वडच्या वडच्या धेंडां-
कडे पांचदहा. पांचदहा पाहुण्यांचें आदरातिथ्य यथास्थित
होण्याला कांहीं हरकत नाहीं. आम्हीं पूर्वी ह्मटलेंच
आहे कीं, हल्लींचे राजे व त्यांचे कामदार यांचें बहुतेक
सुधारणेंकडे लक्ष लागलें आहे. त्यांत अशी मंडळी
जर त्यांना हातभार लावण्यास तयार झाली तर दुधांत
साखर घातल्या प्रमाणें होणार आहे. बहुधा विमुख हो-
ऊन मागें परतण्याची पाळी नाहीं पण पाहुण्यांचा तळ
नेहमीचाच त्यांचे जवळ पाहिजे, व त्यांचे राज्यांतच या
उलाढाली झाल्या पाहिजेत, ही गोष्ठ मात्र त्यांनीं विसर-
तां कामा नये. नेटिव्ह राजांस ह्मणजे थोडच्या गोष्टींची
जरूर आहे असें नाहीं. इंजनियरिंग, मिलटरीमध्यें लो-
खंडी सामान किती पाहिजे असतें? पावडी, कुदळी, खो-
रीं, बंदुका, या आपले राज्यांत साहजिक होऊं शकतील,
व त्यांमध्यें पाहिजे त्या सुधारणाही करितां येतील.
समरांगणा मध्यें नेटिव्ह बंदुकांचा इंग्रजी बंदुकांशीं
कांहीं तरी टिकाव लागेल काय? इंग्रजी बंदुकांची १२००
फूट पर्यंत कारागिरी चालते. परंतु आमचे बंदूकींतुन २००
फूट देखील झेंपण्याची मारामार पडते. प्रसंगीं काठीपेक्षां

यांचा कांहीं जास्त उपयोग नाहीं. एल्. सी. ई. ची अक्कल येथें कां चालत नाहीं? तसेंच चामड्याचे कारखान्याविषयीं ही त्यांना मोठी अवश्यकता असते. फौजेंत स्वारांसाठीं घोड्यांची जीनें, पायांतले बूट, पट्टे, यांवरच लाखों रुपये चट्ट होतात. ते जर घरच्या घरीं राहिले तर कोणाला नको आहेत? हे व ह्या सारखे शेंकडों कारखाने घरच्या घरीं होऊं शकतील; त्यांत आश्रय देणाराचा कोणत्याही रीतीनें तोटा आहे असें नाहीं. त्यांना केव्हां तरी या कामीं पैसा खर्च करावयाचा असतो; मग तो आधीं केला काय आणि मग केला काय, सारखेंच. पण एवढ्या पासून देशाचा कि ी फायदा झाला? किती लोकांना आपले अकलेची चीज करून दाखवितां येईल? व देशाची संपत्ती किती वाढेल? हें मनांत आणलें ह्मणजे आधीं आणि मागाहून यांचे मध्यें काशी रामेश्वराचें अंतर आहे, असें सिद्ध होतें. कोल्हापुरास स्लेटीचे दगडाचा शोध लागतांच त्या ठिकाणीं स्लेटीचा टोलेजंग कारखाना उभारण्यास काय हरकत होती? श्रीमंत आबासाहेब कागलकरां सारखा मोहरा आमचे मंडळीची पाठ थोपटून एका पायावर मदत करण्यास तयार झाला असता. पण आतां ती वेळ गेली, ती फिरून यावयाची नाहीं !!! कंपन्या काढून कारखाने घालावयाचें काम साधारण मनुष्याचें नाहीं. त्याला राजाश्रय मिळणें फार अवश्य आहे. अशा कामाला कांहीं जड बुद्धीचीं माणसें लागतात. आज आमचे देशांतून भांडवल नाहींसें झालें आहे तें फिरून उभारण्याला कैक तपें लोटावीं लागती

ल; आणि हीं तर्पे आगत निर्गत मालाचे वजावाकींतून निर्गत मालाची संख्या जास्त होईल, तव्हां पासूनच मोजलीं पाहिजेत. एकंदरींत मागण्याचा मुद्दा इतकाच कीं, नेटिव्ह राजे, सरमजामी, जाहागिरदार, व त्यांचे कामदार यांचे विचारानेंच सवडी सवडीनें जर आपला कार्यभाग करून घेतला, तर पाहिजे तितके ग्राजुएट, अंडर ग्राजुएट यांचा समावेश होऊन त्यांनीं देशसेवेचे कामास हातभार लाविल्या सारखें होणार आहे. शिवाय जे सरकारी नौकरीस चिकटून राहतील त्यांनाही लवकरच पोटभर अन्न मिळण्याचे दिवस येतील. थोड्या काळा मागें नुसतें यस् नो ह्मणणारी मंडळी देखिल आज मोठमोठ्या पगारावर असल्याचें आपण पाहतों, याचें कारण तरी त्याकाळीं विद्वानांची दुर्मिळता होती हेंच आहे. हल्लींचे विद्वत्तेनें लोक श्रीमंत झाल्य,ाचीं उदाहरणें फार थोडीं दृष्टीस पडतील; नाहीं ह्मटलें असतां ही चालेल. एखादे रावसाहेबांस पांच पन्नास रुपये देखील दरमहा शिलक टाकण्याची पंचाइत पडते. गाडी, घोडा, बंगले, नौकर, बाग बगीचे, यांचे खालींच बहुतेक पैशाचा फन्ना उडतो. कदाचित् कोणाचें याचे विरुद्ध आचरण दिसल्यास लागलीच त्याला कळपाचे बाहेर पडण्याची पाळी येते. रावसाहेब होतांच आपली पूर्वीची स्थिति विसरून जाऊन आपले हल्लींचे दिवस कायमच रहातील असें वाटूं लागतें, यांत कांहीं सामान्यरीत्या आश्चर्य मानण्याजोगें नाहीं, परंतु विद्वान् या दृष्टीनें पहातां, ही गोष्ट न शोभण्या सारखी होईल. उद्योग हा ज्याचा त्याच्याच सा ठीं आहे, असें

तत्ववाद्यांचें ह्मणणें नाहीं. यावरून पहातां आपण मिळविलेल्या संपत्तीचा उपयोग आपल्या एकट्यालाच करून घेणें चुकीचें होईल. परंतु ही गोष्ट नवीन विद्वानांचे कृतीवरून स्पष्टपणें दृष्टोत्पत्तीस येत नाहीं. तर ही गोष्ट विशेष रीतिनें लक्षांत वागविण्याजोगी आहे.

आतां वर लिहिलेल्या गोष्टी आजपर्यंत कोणाचे च मनांत आलेल्या नाहींत असें नाहीं. याला कै० विष्णु शास्त्री चिपळूणकरां सारखे कित्येक अपवाद आहेत. त्यांनां थोडीशी सवड सांपडतांच खाड्दिशीं नोकरीची सांखळी तोडून आपले उद्देश जगाचे पुढें मांडण्यास त्यांनीं कमी केलें नाहीं. ते आपल्या निबंधमाला मासिक पुस्तकांत लिहितात, कीं शिक्षण, मुद्रण, वक्तृत्व इत्यादिक, हींच देश सुधारणेचीं मूलतत्वें आहेत. यामध्येंच नीटनेटकीशी व्यवस्था केली ह्मणजे आपोआप सर्व कांहीं गोष्टी सहजीं होऊं लागतील. नौकरी करण्यामध्यें विद्वानांचा अपमान होऊं लागला, ज्याचे त्याचे विद्वत्तेनुरूप संभावना होईनाशी झाली, ह्मणून नोकरी पतकरण्या सारखी शरमेची गोष्ट दुसरी नाहीं, असें ह्मणावें लागतें. वस्तुतः नोकरीपेक्षां खरी स्वतंत्रता ही अतिशय परतंत्रता आहे. जर स्वतंत्रतेमध्यें दुसऱ्याचा संबंध नसेल तर तिचा कांहीं उपयोग नाहीं. मग स्वतंत्र मनुष्याला स्वछंदी, स्वेच्छाचारी अशींच क्लिष्ट विशेषणें द्यावीं लागतील. जशी नोकरीमध्यें एकाचा उपरी दुसरा आणि दुसऱ्याच्या तिसरा अशी परंपरा असते तशीच स्वतंत्रतेमध्यें देखील असावी लागते; फरक एवढाच कीं, एकावर ती लादली जाते आणि

दुसरा तिला मुद्दाम होऊन ओढून घेतो. सर्वांनींच स्वतंत्रतेनें वागून चालावयाचें नाहीं. आपल्या सोईसाठीं एकाला दुसऱ्याचा बंदा झालेंच पाहिजे. मात्र एवढेंच कीं, त्यांत आपल्या योग्यतेची हानी होऊंदेतां कामा नये. यावरून नोकरी करणें यामध्यें कांहीं वाईट आहे, असें होत नाहीं; परंतु पुष्कळांनीं एकच मार्गाचें अवलंबन केल्यामुळें नोकरींत तथ्यांश नाहींसा झाला आहे. अस्तु इथवर आमच्या पुढारी विद्वान् मंडळीचे कर्तव्याविषयीं विचार झाला, आतां प्रस्तुत कोणत्या तऱ्हेचें शिक्षण पाहिजे आहे याबद्दल विचार करूं.

हिंदुस्थानचीं राज्यसूत्रें इंग्रेजबहादुरांच्या हातीं आल्यापासून जिकडे तिकडे शाळाखात्याची वृद्धि मोठ्या जारीनें सुरू आहे. आपल्या प्रजेला शिक्षण मिळण्यासाठीं इंग्रजीराज्यामध्यें जितक्या सोई झाल्या आहेत तितक्या आजपर्यंत कोणच्याही नेटीवराजाच्या कारकीर्दींत झालेल्या नाहींत, इतकें असूनही शिक्षणा पासून व्हावातसा फायदा आह्मांला होत नाहीं; याचें मुख्य कारण ह्मटलें ह्मणजे आंग्लभाषाध्ययन करण्यामध्यंच आमचा बहुतेक काळ निघून जातो, हें आहे. ज्ञानसंपन्नता हीएक किंवा अनेक भाषा शिकल्यानें प्राप्त होणारी नाहीं; अनुभव आणि वाचन यांचा परीश्रम जरी एकाच भाषेंत केला तरी ती पाहिजे तितकी मिळवितां येईल. युनिव्हर्सिटीच्या परीक्षा इंग्रजी शिकल्या शिवाय देतां येत नाहींत; यामुळें इंग्रजी शिकल्या शिवाय उपायच नाहीं, असें झालें आहे. आतां ही गोष्ट खरी आहे कीं—आमच्या

भाषेपेक्षां इंग्रजी भाषेमध्यें निरनिराळ्या विषयांवर निरनिराळे चांगले चांगले ग्रंथ उपलब्ध आहेत, तसे आमच्या भाषांतून नाहींत. पण ही उणीव आमच्या उपपदधारी मंडळीचे मनांत आली असतां तर्‍हांच नाहींशी होण्यासारखी आहे. परंतु आजपर्यंतच्या अनुभवावरून असें दिसून येतें कीं, सामान्य माणसांकडून आपल्या भाषेमध्यें ग्रंथांची भरती जितकी पडली आहे, तिच्या पासंगास पुरण्यापुरती देखील ती ग्राजुएट मंडळी कडून झालेली नाहीं. हा अन्याय सर्वस्वी त्यांचाच आहे असें नाहीं. कारण बहुतेक विद्यार्थी इंग्रेजी भाषेचाच अभ्यास करीत असल्यामुळें त्यांना आपले कोड इंग्रेजी ग्रंथ वाचून तृप्त करून घेतां येतात. मग नवीन ग्रंथाचा खप व्हावा कसा ? व ग्रंथकारांना नवीन ग्रंथ करण्याची उमेद यावी कशी ? यासाठीं पहिल्यानें इंग्रेजी शिकण्याचीच जरूर नाहीं, असा नियम केला पाहिजे. हल्लीं राज्यकर्ते इंग्रज असल्यामुळें त्यांच्याशीं संबंध ठेवण्याकरितां इंग्रेजी शिकण्याची अवश्यकता आहे खरी; पण अशा हजारों गोष्टी आहेत कीं—त्यामध्यें इंग्रजी भाषेचा संबंध ठेवण्याचें मुळींच कारण नाहीं. न्यायाचीं कोर्टें, वकीली, जमीनबाब इत्यादि कामें इंग्रजींत चालत असल्या मुळें रयतेला जास्त पैसा व्यर्थ खर्चावा लागतो. एकदां आपले भाषेंत ग्रंथ पाहिजेत असें झालें ह्मणजे ते भराभर होऊं लागतील; व ते वाचण्याची लोकांनां गोडी ही लागेल.

हल्लीं विद्या खात्याची चळवळ मोठमोठ्या शहरांतून मात्र दृष्टीस पडते, परंतु त्या मानानें आसपासचे

नेटिंगांवांतून व्हावी तशी व्यवस्था झालेली नाहीं. एखाद्या कुळवट बनगरा पासून तो गांवच्या पाटील कुळकर्ण्यापर्यंत सर्वांना विद्येची गोडी लागली पाहिजे, व या करितां कनिष्ट प्रतीच्या शाळांची संख्या जितकी वाढवितां येईल तितकी वाढविली पाहिजे. अजून पर्यंत देखील नेटिव्ह संस्थानांतून शाळाखात्याचा कांहींच बंदोबस्त झालेला नाहीं, अशा सारखी स्थिति आहे. अशा वेळीं जर शाळा स्थापन करण्याचा, व आहेत त्या सुधारण्याचा कोणीं मक्ता घेईल, तर सहजीं शिक्षणांत फेरफार करण्याचीं पुष्कळ साधनें आपल्या हातांत येण्यासारखीं आहेत. मी स्वतांच्या अनुभवावरून सांगतों कीं, पुष्कळ संस्थानांमध्यें विद्यार्थ्यांची सोई व त्यांना लागणारा खर्च यांकडे न पाहतां शाळाधिकाऱ्यांनीं शाळांची संख्या अव्यवस्थित रीतीनें वाढवून दाखविली आहे. एका मोठ्या प्रतीच्या शाळेला दोन किंवा तीन लहान शाळा ( ब्रँचस्कूल ) जोडून दिल्या तर खर्चाचे संबंधानें जास्त बोजा लादला जाणार नाहीं. शाळा जास्त वाढविण्याचा उद्देश फक्त विद्यार्थ्यांचे सोईसाठीं आहे. आह्मी ह्मणतों या रीतीनें व्यवस्था केली असतां विद्यार्थ्याला लहानपणीं जवळचे जवळ शाळेंत जाण्याची सोई होऊन ते जरा मोठे होतांच आपल्या मोठे शाळेंत जाण्याला त्यांना कांहीं हरकत नसते. जसजसें शिक्षण वाढत जाईल तसतशी शिकणारांची संख्या कमी होत जाते. यामुळें साहजिकच मोठ्याप्रतीच्या शाळा झाल्या असतां वरचे वरचे वर्गांतून विद्यार्थ्यांची संख्या फारच थोडी

राहून त्याचेबद्दल शिक्षक वगैरे ठेवण्याकरितां बराच मोठा खर्च करावा लागतो; परंतु दोन तीन लहान शाळांसाठीं एक मोठी शाळा असली ह्मणजे प्रत्येक शिक्षकाला भरपूर विद्यार्थी मिळून चढाओढीनें शिक्षण चांगलें होतें, व खर्च कमी पुरतो.

थोड्या वर्षांमागचे विद्यार्थी आणि हल्लींचे विद्यार्थी यांचे मध्यें जमीन अस्मानाचें अंतर दिसून येतें. पूर्वी शाळांमधून व्यवहारोपयोगी शिक्षण फार मिळत असे. अक्षर सुवाच्य लिहिणें, हिशेब चोख करणें, उत्तम वाचतां येणें, इत्यादि गोष्टींवर फार लक्ष दिलें जात असे; व या गोष्टी प्रथमारंभींच चांगल्या झाल्या असल्यामुळें कोणचाही सामान्य मनुष्य व्यवहारामध्यें निपुण होई. तिथि, वार, नक्षत्र, योग, करण, संवत्सर इत्यादि पंचांग विषय हल्लींचे एका विद्यार्थ्याला तरी माहीत असतील कीं नाहीं, कोण जाणें! बहुतेक सर्व निर्वाह तारखांवरच होतो. मुंबई इलाख्यांतली भूशिरें, बंदरें हीं मात्र गाइत्रि तुल्य तोंडपाठ असतात. हातांत लेखणी धरितां येण्याची ही पंचाइत. जोंपर्यंत शाळाखात्याची नवी नवी व्यवस्था होती, तोंपर्यंत शिक्षक नेमण्याचे कामीं आतांचे सारखी हयगय होत नसे. हल्लीं ज्या मनुष्याला उद्योग मिळत नाहीं, जो दुसरा कोणचाही धंदा करण्याला लायक नाहीं, अशा माणसानें उदरनिर्वाहार्थ शिक्षकाचें काम करावें; अशी पाळी येऊन ठेपली आहे. मुलांना शाळेंत घालणें ह्मणजे गुरें गुराख्याचे ताब्यांत देतात, त्यांतलाच एक प्रकार आहे; अशी निदान खेडे गांवचे लो-

कांची तरी समजून आहे. शिक्षकानें भूगोल, इतिहास, कवितांचा धडा घरून तोंडपाठ करून येण्याकरितां द्यावा, आणि विद्यार्थ्यांनीं तो घरून पाठ करून आणला ह्मणजे तो शाळेंत शिक्षकानें ह्मणून घ्यावा. ह्या पलीकडे बहुधा कधींच काम नसतें. व्याकरणांतील उभयान्वयी, शब्दयोगी, द्वंद्व, बहुव्रीहि इत्यादि पारिभाषिक शब्दांचा अर्थ जिथें शिक्षकालाच कळण्याची मारामार असते, तिथें ता विद्यार्थ्यांना समजावा कसा! या सर्व गोष्टीं मध्यें ह्मणजे शिक्षकाचीच चुक आहे, असें नाहीं. तीन किंवा चार रुपयांवर महिनाभर माथेकूट करीत ज्याला स्वतांच्या पराक्रमावर दोन पैसे मिळविण्याचा पराक्रम आहे, असा मनुष्य कधीं बसणार नाहीं. शिक्षकाची किती योग्यता आहे हें आह्मी मागें सांगितलेंच आहे. तर अशा नाजुक कामाला कोणा एकाची नेमणूक करण्याचें कामीं लोकांनीं व सरकारानें फार काळजी घेतली पाहिजे. साधारण असा नेम आहे कीं, तीन चार इयत्ता झाल्या नंतर व्यापार धंदेवाले लोकांचीं मुलें शाळेंतून निघून जातात; व एवढ्या मुदतींत तीं आपला उदीम धंदा करण्याला योग्य होतात. तर शाळेमध्यें सर्वांना सामान्य असे विषय प्रथमतः शिकवून—नंतर इतिहास, भुगोल, कवितांचीं जरी पारायणें करविलीं तरी कांहीं हरकत नाहीं. या विषयांचा धंदेवाले लोकांना म्हणण्यासारखा कांहीं उपयोग नसतो. नुसतें पाठ करीत बसण्यामध्यें सगळें आयुष्य घालविण्यांत कांहीं अर्थ नाहीं. ही शिक्षण देण्याचे कामीं मोठी सुधारणा झाली पाहिजे.

चांगले शिक्षक तयार होण्याकरितां शिक्षकांचीं वेतनें बरींच मोठीं करावीं लागतील. पुष्कळ ठिकाणीं असें आढळून येतें कीं शाळेच्या शिपायापेक्षांही शिक्षकाचा रोजमुरा कमी आहे. ही शोचनीय स्थिति नाहींशी झाल्याशिवाय शाळा खात्याची सुधारणा कधींही होणें नाहीं.

शिक्षकाचें काम करितां येण्यासाठीं म्हणून पुणें, धारवाड, अमदाबाद वगैरे शहरांमध्यें दोन चार पाठ शाला ( ट्रेनिंग कॉलेजें ) स्थापन झाल्या आहेत. त्यांचा शिक्षक या दृष्टीनें पाहिला असतां कांहींच उपयोग होत नाहीं. ट्रेनिंग कॉलेजमध्यें गेल्याशिवाय बढती मिळत नाहीं, म्हणून मोठ्या जुलमानें दोन किंवा तीन वर्षेपर्यंत कारागृहवास भोगण्याला प्रत्येक शिक्षक तयार होतो. धर्म, व्यवहार, देशाची, स्थिति इत्यादिकांबद्दलचे विचार त्यांचे स्वप्नींही नसतात. या शाळांतून जाणारे विद्यार्थी हे देशी भाषांचे प्रोफेसर म्हणून होतात. पण यांना पांचचार पुस्तकांचे बाहेर जाण्याची कधीं जरूर पडत नाहीं. आजपर्यंत या मंडळींपैकीं पांच दहा ओळी सुरेखशा लिहिणाराचें नांव आम्हीं तरी ऐकिलें नाहीं; मग एखादा नवीन ग्रंथ तयार करण्याची गोष्ट कशाला पाहिजे. ज्यांच्यावर पुढें शाळा खात्याची इमारत बांधली जाते, अशा शिक्षकांचीच जर ही दशा तर पुढें त्यांचे विद्यार्थ्यांबद्दल लिहिण्याची जरूरच नाहीं. असें कां होतें, याबद्दलचा प्रश्न पाठशाळांच्या प्रिन्सीपालांना, किंवा अधिकाऱ्यांनां कोणीं तरी केला आहे काय ? शाळा खात्यांत चालू

असलेल्या पुस्तकांपैकीं एखादं दुसरं देखील प्रसन्न या शिक्षकांकडून न होणें ही फार मोठी शो  स्थिति आहे. शाळा खात्याचा डामडौल बाहेरून  भपकेदार दिसतो. पण आंतून मुळापासून शेवटपर्यंत एक सारखी कीड लागलेली आहे. याचें मूळ कारण शिक्षकांच्या जागा लहान पगाराच्या असतात, हेंच आहे. जे नुसते मेषपात्र असतात अशा लोकांच्या उदर निर्वाहार्थ हें खातें उत्पन्न झालें आहे. कर्तृत्व शक्ति आणि सृष्टयवलोकन, जिथें वास करीत आहे, अशांपैकीं एक देखील इकडे ढुंकून पाहणार नाहीं. अशा प्रकारें हें शाळाखातें अजागळ माणसांच्या हातांत येऊन पडलें आहे. तें कधीं सुटेल तें सुटो ! ! जर चांगलासा एखादा लेखक मिळाला असता तर त्यानें आपल्या कलमानें या शिक्षकांची मोठी चित्तवेधक तसबीर उठवून दिली असती.

जे लोक मानसिक व्यायाम करितात त्यांना शारीर श्रम झालेच पाहिजेत. नुस्ते मनाचे व्यापार वाढल्यानें शरीर प्रकृति क्षीण होते. हल्लीं जे कांहीं पैलवान दृष्टीस पडतात, त्यांचे तालीमखाने मुख्यत्वें करून शाळा गृहेंच आहेत. थोड्या वर्षां पूर्वीं मुलांच्या प्रकृती निरोगी आणि सशक्त असत. पण आतां तशा राहिल्या नाहींत. प्रत्येकाच्या आयुष्यांतलीं पहिलीं दहाबारा वर्षें निष्काळजी आणि उनाड पणामध्यें जात असत. या मुळें पुढें त्यांचे आंगांत चांगली तरतरी राहत असे. पण हल्लींचा प्रकार कांहीं निराळाच आहे. बाळांच्या तोंडांतून बोबडे शब्द येऊं लागले नाहींत, तोंच

त्यांच्या मागें शिक्षणाचा लगा लागतो एवढ्या लहान वयांत शिक्षण मिळूं लागल्या पासून मुलांची स्थिति फार भयंकर झाली आहे. त्यांना लहान पणापासून काळजीमध्यें दिवस काढावे लागतात, यामुळें त्याच्या प्रकृति अतिशय अशक्त होऊन जातात. शेंकडा पांच मुलें देखील सशक्त व निरोगी दृष्टीस पडत नाहींत. हीं आपलीं मुलें ह्मणजे भावी सृष्टी आहे; यांचें संगोपन आपल्याला उत्तम प्रकारें केलें पाहिजे. लहान पणापासून जर त्यांना कामाला जुंपिलीं तर पुढें त्यांच्यानें जगाचा एवढा मोठा गाडा ओढला जाणार नाहीं. प्रत्येकाला आपलीं मुलें लवकर विद्वान् होण्याची इच्छा असते, ह्मणून ती तडीस नेण्याकरितां इतके लवकर मुलांच्या मागें उपाधि लावणें ठीक नाहीं. झाड लवकर लागाला आलें असतां तें लवकर मरतें, हा अनुभव सर्वांना आहेच. निदान दहा वर्षां नंतर विद्यार्थी शाळेंत जाऊन अभ्यास करण्याला योग्य होतो. पुढें अभ्यास करणें तो तरी शारीर श्रम आणि मानसिक श्रम यांचें पारडें समतोल राखून केला पाहिजे. दिवसें दिवस मानसिक श्रम करण्याची प्रवृत्ति फार होत असल्यामुळें शारीर श्रमाला अजीबात रजा मिळाली आहे. हुतूतु, आट्यापाट्या, चेंडूफळी, लगोऱ्या इत्यादि खेळ हल्लींचे पिलावळींत क्वचितच दृष्टीस पडतात. मुलांनीं खेळ खेळणें, हें आपलें आयुष्य फुकट घालविण्यासारखें आहे. अशी कित्येक लोकांची समजूत आहे; पण असें ह्मणणें निवळ चुकीचें होईल. उलट खेळ हे आयुष्य

वृद्धीला अंशतः कारणीभूत आहेत. शिवाय असा नेम आहे कीं, धिम्या शांत मुलांविषयीं ब्रात्य व उनाड मुलें मार्गोपदेशक चांगला मिळाला असतां अधीक चांगलीं निपजतात.

या विषयाचे संबंधानें लिहूं लागलें असतां एक मोठा ग्रंथ होईल. परंतु तशा तऱ्हेचा ग्रंथ लिहिण्याचा आज आमचा उद्देश नाहीं, व त्याला व्हावी तितकी सामुग्रीही आमचे जवळ नाहीं. परंतु एवढी मात्र खात्री आहे कीं, आमची स्थिति सुधारण्याला आह्मी ह्मणतों या गोष्टींची अत्यवशकता आहे; व त्यांचें दिग्दर्शन होण्या साठीं ही लहानशी खटपट आहे.

समाप्त.

# दारू पिऊं नका.

[library stamp]

॥ श्लोक ॥

चित्त भ्रांती पावतें मद्यपानें,
त्या भ्रांतीनें पाप होतें क्रमानें ;
पापानें त्या दुर्गति प्राप्त होते,
तस्मात् मूढा मद्यपीऊं नको तें.

( बालबोध )

मुंबई:

"सुबोधप्रकाश" छापखान्यांत छापिलें.

सन १८८४

किंमत अर्धा आणा.

८,

# बालबोध-शास्त्र-पाठमाला.

## १.

## पाणी.

किंमत ६ आणे.

---

आत्माराम सगूण आणि कं०; व गोपाळ नारायण आणि कं० यांचे दुकानीं किंवा आह्मांकडे मिळेल.

बळवंत भाऊ नगरकर.

मुंबई,

८०, गिरगांव ब्याकरोड.

आलव्हगा / 15

# दारू पिऊं नका.

आमच्या देशामध्यें पाश्चिमात्य विद्येचा प्रसार होऊं लागल्यापासून आमच्या हिताच्या आणि फायद्याच्या अशा ज्या कांहीं थोड्याबहुत गोष्टी आमच्या देशांत आल्या आहेत, त्यांजबरोबर अत्यंत निंद्य आणि नाशकारक अशाही कित्येक आल्या आहेत. त्यांपैकींच मद्यप्राशन किंवा दारू पिणें ही एक होय. प्राचीन काळीं यज्ञयागाचे प्रसंगीं ऋषि वगैरे आमचे पूर्वज सोमवल्लीचा रस प्राशन करीत असत, अशा प्रकारच्या कथा वेदांमध्यें आणि पुराणांमध्यें आहेत. तथापि सोमरसाचें पान केल्यानें मनुष्यें उन्मत्त झाल्याचीं उदाहरणें फारशीं वाचनांत येत नाहींत. राक्षसादिकांनीं मद्यप्राशन केलें अशा अर्थाच्या कथा पुराणांतरीं सांपडतात खऱ्या; तथापि त्या मद्यापासून त्यांचा कोठें प्राणनाश झालासा दिसत नाहीं. यावरून एवढें तरी अनुमान काढतां येईल कीं त्या काळचें मद्याचें दैवत सांप्रतच्या ब्रांडीच्या देवतेसारखें उग्र आणि जाज्वल्य असें नव्हतें. तें कसेंही असो. एवढें तरी अगदीं निर्विवाद आहे कीं पूर्वीच्या काळीं आमच्या देशांत हल्लींच्या सारखें मद्यप्राशनाचें बंड सर्वत्र आणि सर्व प्रतीच्या लोकांत पसरलेलें नव्हतें. ही स्थिति ह्मणजे फार पुरातन काळची होती असें नाहीं. इंग्रजांचा अम्मल होण्याचे अगोदर हिंदुस्थानावर कैक वर्षेंपर्यंत मुसलमानांसारख्या परधर्मी, अडाणी आणि जुलमी अशा लोकांचें राज्य झालें.

परंतु तेव्हां देखील स्वभावतः शुद्ध आणि निर्मल अंतःकरणाच्या अशा हिंदुलोकांस सुराबाईचा विटाळ फारसा झाला नव्हता, असें इतिहासावरून स्पष्ट दिसतें.

आमच्या लोकांस दारूचें व्यसन गेल्या शंदीडशें वर्षांतच लागलें असें ह्मणण्यास कांहीं हरकत नाहीं. आणि अलीकडे ह्या व्यसनाचा प्रकार इतका कांहीं माजला आहे कीं तो जर असाच आणखी शंदोनशें वर्षें चालेल तर आमच्या लोकांची काय अवस्था होईल हें सांगतां येत नाहीं. इंग्रेजी विद्येचा आह्मी जसजसा अधिकाधिक व्यासंग करूं लागलों तसतसें इंग्रज लोकांविषयीं आह्मांस अधिकाधिक ज्ञान होऊं लागलें, आणि ते लोक आह्मांवर राज्यकर्ते असल्यामुळें त्यांच्या सर्व चाली, रीतिभाती आणि व्यवहार हे आह्मांस आवडूं लागले. परंतु चांगल्यापेक्षां वाइटाकडे मनुष्यस्वभावाची अधिक प्रवृत्ति असते. ह्यामुळें त्यांच्या ज्या कांहीं वाईट चाली त्यांचेंच अनुकरण आह्मी अधिक करूं लागलों. त्यांचा उद्योग, त्यांचा व्यासंग, त्यांचा दीर्घ प्रयत्न ह्यांचें अनुकरण करण्याचें सोडून त्यांच्यासारखें टेबलावर सुरी, कांटा, चमचा आदिकरून आयुधांनीं भोजन करणें, त्यांच्यासारखा पोषाख करणें, त्यांच्यासारखा चिरूट ओढणें, आणि शेवटीं त्यांच्यासारखें मद्यप्राशन करणें या गोष्टींचें अनुकरण करूं लागलों. ह्याचा परिणाम शेवटीं असा झाला आहे कीं हें दारूबाजीचें व्यसन नुस्त्या इंग्रेजी शिकलेल्याच लोकांस ग्रासून राहिलें नाहीं. ज्यांच्या मनावर इंग्रेजी विद्येचा तिळमात्रही संस्कार नाहीं असे निवळ प्राकृत जनही त्याच्या तावडींत सांपडून त्याचे दास होऊन राहिले आहेत. विद्येनें ज्यांचीं मनें विशाल झालीं आहेत आणि ज्ञानानें ज्यांचे विचार

प्रौढ झाले आहेत, अशा विद्वान् आणि विचारी गृहस्थांनीं दारूबाजीसारख्या सर्वथैव अमंगल आणि घाणेरड्या अशा व्यसनाच्या आधीन होणें यासारखें त्यांस दुसरें लांछन नाहीं यांत संशय नाहीं. असल्या या यःकश्चित् गोष्टी-मध्यें त्यांच्यानें आपल्या मनाचें आकलन करवत नाहीं तर धिक्कार असो त्यांच्या त्या ज्ञानास आणि विद्वत्तेस!

व्यसनें तेवढीं वाईटच. मग तीं कसलींहा असोत, त्यां-पासून मनुष्याचें कधींही हित व्हावयाचें नाहीं. तथापि अशीं कित्येक व्यसनें आहेत कीं त्यांच्यायोगें एक प्रका-रचा तोटा झाला तर दुसऱ्या प्रकारचा फायदा होतो. विद्येसारख्या एकाद्या चांगल्या गोष्टाचा नाद लागला असतां मनुष्याचें सर्वप्रकारें अनहित होण्याचा फारसा संभव नसतो. परंतु दारूसारख्या व्यसनाची गोष्ट अशी नाहीं. ज्या कोणास दारूबाजीचें व्यसन लागतें त्याचा सर्व प्रकारें नाशच होतो. दारूनें मुख्यतः चार प्रकारची हानि होते.

१. **द्रव्याची हानि**— साधारणतः पाहूं गेलं असतां आपणास असें आढळतें कीं मनुष्यास पैसा फारच अवश्य आहे. त्यावांचून आपलें क्षणभरही चालत नाहीं. पहा, आप-णास दोन पैसे मिळावे म्हणून मनुष्यें सब दिवसभर खपत असतात. मजूर लोक सकाळपासून तों संध्याकाळपर्यंत अनेक प्रकारचे काबाडकष्ट करून कोठे तीन किंवा चार आणे रोज मिळवितात. तथापि सायंकाळीं हातावर मजु-री पडतांच पिठ्याची वाट धरितात. घरामध्यें बायका-मुलें आपली वाट पहात असतील, आपण हा पैसा अशा रीतीनें उधळला असतां त्यांचे काय हाल होतील, त्यांस खावयास कोण घालील आदिकरून गोष्टींचा विचार त्यां-चे मनांत बिलकुल येत नाहीं. आपले छंदीफंदी सोबती

आपणास मजा मारावयास बोलावीत आहेत असें पाहून त्यांचे बरोबर ते जातात, आणि मिळविलेला सर्व पैसा दारूमध्यें उधळतात. आपल्या आणि आपल्या प्रिय मुलांबाळाच्या पोषणाकडे आणि सुखाकडे ज्या पैशाचा व्यय व्हावा त्या सर्व पैशानें ते कलालाची धन करितात! स्वकष्टार्जित पैसा खर्च करून विष विकत घ्यावयाचें यासारखें वेडेपण दुसरें कोणतें?

मनुष्य कितीही श्रीमान् आणि धनवान् असा असला तरी या दारूबाजीच्या व्यसनानें तो अगदीं थोड्या काळांत धुळीस मिळतो. मग ज्यांचें पोट हातावरचें त्यांची काय कथा? अशा लोकांचे जे हाल होतात ते तर सांगतां पुरवत नाहींत; मात्र या व्यसनानें आपला कसा नाश होत आहे हें ह्या बिचाऱ्या अज्ञानी लोकांस समजत नाहीं.

२. **शरिराची हानि**—दारूनें आमच्या नुसत्या पैशाचीच हानि होती तर ती आह्मांस पुरवती. परंतु तिच्यायोगें आमच्या शरीरसंपत्तीचाही नाश होतो. मनुष्यास दारूचें व्यसन लागलें ह्मणजे त्याच्या शक्ति क्षीण होत जातात. पूर्वी जर तो चांगला धट्टाकट्टा जवान असला तर दारूबाजीनें एका वर्ष सहा महिन्यांत तो अगदीं अशक्त आणि निस्तेज होतो. त्याच्या शरिरावरील कांति नाहींशी होऊन तो एकाद्या रोग्याप्रमाणें दिसूं लागतो. आपलें व्यसन वाईट नाहीं असें लोकांस भासविण्याकरितां दारूबाज लोक ह्मणत असतात कीं दारू प्याल्यानें अन्न पचन होऊन शक्ति येते. परंतु हा त्यांचा अगदीं भ्रम आहे. आपल्या दुष्ट व्यसनांस लोकांनीं नांवें ठेवूं नयेत ह्मणून व्यसनी लोक आपल्या व्यसनांमध्यें नसते गुण आणून ठेवितात. तंबाखू ओढणारे तंबाखू ओढल्यानें निर—

निराळ्या गांवचें पाणी बाधत नाहीं असें ह्मणतात. भंगट जे आहेत ते भांग प्याल्यानें ईश्वराच्याठायीं लय लागतें असें ह्मणतात! वास्तविक पाहतां असें कांहींच होत नाहीं. भांगेनें मस्तक फिरून मनुष्य वेडा होतो. आणि तंबाखू खाल्ल्यानें किंवा ओढल्यानें तोंडास दुर्गंधि येते आणि मनुष्य अगदीं घाणेरडा होतो. दारूबाजीची गोष्ट अशीच आहे. मादक दारूनें अन्न पचन होत नाहीं, बुद्धीस मांद्य येतें, शरीर कृश आणि क्षीण होतें, आणि एकंदरीनें मनुष्य साठ वर्षें वांचावयाचा असल्यास तीस वर्षेंच वांचतो. ह्या सर्व गोष्टी वैद्यविद्येंत प्रवीण अशा विद्वान् लोकांनीं निर्विवाद सिद्ध करून दाखविल्या आहेत. त्यांविषयीं आतां संशय ह्मणून राहिला नाहीं. शिवाय सुराबाईचे जे पक्के दास बनले आहेत ते किती सुदृढ असतात तें आपण पाहतोंच. तेव्हां अशा या दुष्ट व्यसनापासून मनुष्याचे आंगीं शक्ति येते असें कोण ह्मणेल?

३. **अब्रूची हानि**—दारू प्यालें ह्मणजे मनुष्य शुद्धीवर नसतें. इतर व्यसनांमध्यें आणि दारूच्या व्यसनामध्यें हा मुख्य भेद आहे कीं भांग, गांजा, अफु आदिकरून मादक पदार्थांचें सेवन केल्यानें फार तर मनुष्यास गुंगी येऊन तो आपलें देहभान विसरतो आणि बेशुद्ध होऊन पडतो, परंतु मद्यप्राशनानें मनुष्य उन्मत्त होतो. शुद्धीवर असतांना जीं कृत्यें करण्यास तो सहसा प्रवृत्त होणार नाहीं तीं तो दारूच्या अमलांत करूं लागतो. मनुष्याच्या मनावर मद्याचा मुख्य परिणाम असा होतो कीं त्याच्यायोगें त्याचा विचार नष्ट होतो. विचार नाहींसा झाल्यावर मनुष्य आणि पशु यांमध्यें भेद तो काय राहिला; याप्रमाणें विचारनष्ट होऊन मनुष्य पशु बनला ह्मणजे मग

तो अर्वाच्य शब्द बोलूं लागतो आणि अनन्वित कृत्यें करूं लागतो. आणि असें झालें ह्मणजे मग त्यास अन्नाची चाड कोठून असणार? ह्मणूनच एकादा कांहीं भलभलतें बोलूं लागला ह्मणजे आपण ह्मणतों कीं " हा काय दारू प्याला आहे, याच्या तोंडीं कोणी लागावें." दारूबाजास सुज्ञ लोकांत मान नसतो. ते त्याच्या वाऱ्यासही उभे रहात नाहींत. गांवचीं पोरेंसोरें हीं देखील त्याच्या चेष्टा करितात. सारांश सर्वत्र तो तृणवत् होतो.

४. **पातकाकडे प्रवृत्ति**--दारूनें मनुष्याची विचारशक्ति लयास जाते, असें वर सांगितलेंच आहे. अंतःकरणांतील विचारसूर्य मावळला ह्मणजे त्या ठिकाणीं भ्रमरूपी अंधकाराचें राज्य होतें. तें झालें ह्मणजे मग मनुष्यास सन्मार्ग कोठून दिसणार? अशी स्थिति झाली ह्मणजे मनुष्य पाहिजे तें दुष्कृत्य करण्यास तयार होतो. खोटें बोलणें, फुशारकी मारणें, मारामारी करणें, शिव्या देणें, कांहीं कारण नसतां दुसऱ्याशीं भांडणें, यांचें तर दारूबाजास कांहींच वाटत नाहीं. या सर्व गोष्टी त्याच्या नेहमींच्याच असतात. परंतु चोऱ्या करणें, दरवडे घालणें, खून करणें यांसारखीं भयंकर कृत्यें देखील करण्यास तो मागें पुढें पहात नाहीं. एका ग्रंथकारानें एके ठिकाणीं ह्मटलें आहे कीं पृथ्वींतून हा सुरापानाचा प्रकार नाहींसा होईल तर जगांतील अर्धें पाप नाहींसें होईल. हें ह्मणणें पुष्कळ अंशीं खरें आहे. नीतीनें आणि सदाचारानें वागण्याचा जो मनुष्याचा अधिकार तो सोडून त्यानें अनीति व दुराचार यांस प्रवृत्त होणें यासारखें दुसरें लांच्छन त्याला नाहीं. ह्मणून मनुष्यानें आपल्या योग्यतेला जागावें. मनुष्यानें एकदां मद्यप्राशनाच्या मार्गाचें अवलंबन केलें ह्मणजे त्याची

बुद्धि भ्रष्ट होते. चांगलें आणि वाईट, सत्य आणि असत्य, नीति आणि अनीति यांमधील भेद त्यास समजत नाहींसा होतो. इतकेंच नाहीं, परंतु जेवढें ह्मणून वाईट तेवढें त्यास चांगलें भासूं लागतें. ह्मणूनच एका संस्कृत कवीनें मद्यास नरकाचा मार्ग असें ह्मटलें आहे:—

चित्ते भ्रांतिर्जायते मद्यपानात् भ्रांते चित्ते पापचर्यामुपैति ।
पापं कृत्वा दुर्गतिं यांति मूढास्तस्मान्मद्यंनैवपेयं नपेयं ॥

**अर्थ**—दारूनें चित्तभ्रांति होते. चित्तभ्रांति झाली ह्मणजे मनुष्य पापाचरण करूं लागतो, आणि पापाचरणानें नरक प्राप्त होतो. ह्मणून दारू पिऊं नका.

प्रिय मित्रहो, दारूपासून होणारे मुख्य मुख्य तोटे वर सांगितले आहेत. मद्यप्राशनानें आज मितीस आमचा आणि आमच्या देशाचा सर्व प्रकारें नाश होत आहे. कुटुंबाचा पालनकर्ता आणि पोषणकर्ता दारूबाज निघाला ह्मणून आज हजारों कुटुंबांतील बायकामाणसें शोक करीत आहेत. लहानपणापासून मोठ्या प्रेमानें वाढविला आणि आपल्या वृद्धापकालीं आपणास आधार होईल या आशेवर तोंडचा घास घालून मोठ्या कष्टांनीं आणि श्रमानें लहानाचा मोठा केलेला ऐन हातातोंडास आलेला आपला एकुलता एक पुत्र सुराबाईच्या भक्षस्थानीं आहुति पडला ह्मणून शेकडों आईबापें आक्रोश करीत आहेत. तिकडे लक्ष द्या. त्यावरून बोध घ्या. आणि तुह्मांस हें दुष्ट दुर्व्यसन लागलें असल्यास त्याचा ह्या घटकेस त्याग करा. उद्यांवर टाकूं नका.

तुह्मांस आपल्या मनुष्यपणाची चाड नाहीं काय? मूर्ख, मतिमंद, जडबुद्धि अशा एकाद्या मनुष्यास ज्याची आपण उपमा देतो; अमंगळपणा आणि घाणेरडेपणा

यांची ज्यास आपण मूर्ति असें समजतों, असें जें गाढव त्या गर्दभाहूनही मनुष्यप्राणी नीच असा झाला काय? पहा! ज्याचें सर्वांग धुळीनें भरलें आहे, जें उकिरडे फुंकीत रस्तोरस्तीं आणि गल्लोगल्लीं भटकत फिरतें, ज्याचा स्पर्श झाला असतां आपणास मोठा विटाळ झाला असें मानून कोणी सचैल स्नानही करितात, त्या गर्दभाहूनही मनुष्यप्राणी नीच असा ह्मटला पाहिजे. याची प्रतिती तुह्मांस पहावयाची असल्यास त्याच्यापुढें दारूनें भरलेलें एकादें पात्र ठेवा, आणि ती दारू तें पितें का पहा! कदापि पिणार नाहीं. गाढव नुस्तें गदळ किंवा गढूळ पाणी पीत नाहीं तर दुर्गंध अशी दारू कोठून पिणार? तुह्मांस ठाऊक असेलच कीं, शर्यतीच्या मैदानावर घोड्यांनीं मोठ्या जोमानें धांवावें आणि फार वेळ टिकाव धरून शर्यती जिंकाव्या ह्मणून घोड्यांचे धनी त्यांस दारू पाजीत असतात. तेव्हां मोतद्दारांस किती आयास पडतात. तर पहा जनावरें जो पदार्थ राजीखुषीनें खात नाहींत तो आह्मीं ज्ञानी आणि समंजस ह्मणविणाऱ्या मनुष्यप्राण्यांनीं पदरचा पैसा खर्च करून सेवन करावा आणि ऐहिक व पारमार्थिक सुखास मुकावें, हें आमच्या मनुष्यपणास शोभतें काय? मूढ पशूंमध्यें जी अक्कल आहे ती देखील आह्मांमध्यें नाहीं काय?

मद्यप्राशन करून विचारनष्ट होत्साते गटारांमध्यें पडण्याची आमची योग्यता नाहीं. पाणी, दूध, मध यांसारखे अमृताप्रमाणें मधुर पदार्थ आपणाकरितां आपल्या परमवत्सल आणि परमकृपालु पित्यानें निर्माण करून ठेविले आहेत. ते सोडून मद्यासारख्या मादक पदार्थांचें सेवन आपण काय ह्मणून करावें? अनेक पौष्टिक पदार्थ खाऊन ज्या शरिरास तुह्मी पोशितां, सुंदर वस्त्राभरणांनीं

आणि मौल्यवान अलंकारांनीं ज्यास तुह्मी दररोज सकाळीं आणि संध्याकाळीं शिणगारितां, ज्या तुमच्या शरिराचा तुह्मास इतका अभिमान वाटतो कीं त्याच्या नखास माती लागली असतां ती तुह्मी धुऊन टाकितां त्याचे दारू पिऊन तुह्मी बेशुद्ध झालां ह्मणजे, इतरांनीं हाल करावे, आणि नानाप्रकारची विटंबना करावी यांत तुह्मांस कसला मोठेपणा वाटतो ? आपलें शरिर हें आपल्या आत्म्याचें मंदिर आहे. आणि मद्यासारखे अमंगल पदार्थ सेवन केल्यानें हें आपलें देहमंदिर अपवित्र होऊन शुद्ध आणि निष्कलंक अशा आत्म्यास रहाण्यास अयोग्य असें होतें.

ह्मणून मित्रहो, या दारूच्या व्यसनाचा त्याग करा. विषारी सर्पास पाहून जसे दूर पळतां तसें कलालाचें दुकान पाहून पळा. मद्यपी मनुष्यानें दारूची बाटली पाहिली ह्मणजे त्याची मद्यप्राशनाची इच्छा अनावर होते. ह्मणून तिचें अवलोकन देखील करूं नका. आह्मी बेताबेतानें कधीं कधीं एकादें ग्लास प्यालों तर त्यांत काय हरकत आहे असें कधींही ह्मणूं नका. असें ह्मणण्यांत कांहीं अर्थ नाहीं. पातकाचा मार्ग आरंभीं अरुंद आणि निमुळता असाच असतो. तो जसजसा लांब जातो तसतसा अधिकाधिक रुंद आणि मोठा असा होतो. त्याप्रमाणेंच दुराचार आणि दुर्व्यसन यांचा आरंभ लहानच असतो, तथापि तोच पुढें वळावतो. असल्या दुर्व्यसनापासून दूर रहाण्याचा एकच मार्ग आहे. तो त्या व्यसनांत न पडण्याविषयीं किंवा व्यसनाचा त्याग करण्याविषयीं दृढनिश्चय होय. हा निश्चय करण्याची बुद्धि आणि तो शेवटपर्यंत कायम ठेवण्याचें सामर्थ्य हीं आपल्या आंगीं येण्याकरितां सर्वसमर्थ परमेश्वराचें सहाय मागा ; जय तुमचा.

# गद्यनवनीत.

महाराष्ट्रभाषाप्रिय जनांस मराठी भाषेमधील निवडक लेख एके ठिकाणीं वाचावयास मिळावे अशा हेतूनें "गद्यनवनीत" हें पुस्तक प्रसिद्ध करण्याचें योजिलें आहे.

मराठी भाषेमध्यें आजपर्यंत जे कांहीं उत्तम उत्तम ग्रंथ झाले आहेत; त्यांतील अत्यंत मनोवेधक आणि बोधपर अशा स्थळांचा ह्या पुस्तकांत संग्रह केला आहे. या शिवाय "बालबोध," "निबंधमाला," "विविधज्ञानविस्तार," यांसारख्या सर्वमान्य अशा मासिक पुस्तकांतूनही कांहीं वेंचे घेतले आहेत. वाचकांस आणि विद्यार्थ्यांस या पुस्तकापासून विशेष लाभ व्हावा ह्मणून सोपेपणा आणि सुबोधता ह्यांच्या चढत्या मानानें लेखांची योजना आरंभापासून अखेरपर्यंत केली आहे. हें पुस्तक सर्वप्रकारच्या वाचकांस फारच उपयुक्त असें होईल अशी उमेद आहे.

ह्या पुस्तकाचीं "सुपररायल" षोडशपत्री सांच्याचीं सुमारें दीडशें पत्रें होतील असा अजमास आहे. जून-अखेरपर्यंत नांवें पाठविणारांस किंमत आणे १२. शिवाय पोस्टेज आणे २. पुस्तकें जुलैअखेर तयार होतील. वर्गणीदारांनीं नांवें पाठवावयाचीं तीं "**निर्णयसागर**" छापखान्यांत किंवा खालीं सही करणार ह्यांजकडे पाठवावीं.

मुंबई,
८०, गिरगांव ब्याकरोड.

**व. भा. नगरकर.**

# पैसा मिळविण्याची युक्ति.

"मराठी ग्रंथ संग्रहालयास"

हा निबंध उपयोगाकरितां अर्पण केले असे

अनंत वामन बरवे

यांणीं लिहून

---

उत्साहसपन्नमदीर्घसूत्रं
क्रियाविधिज्ञं व्यसनेष्वसक्तं ॥
शूरं कृतज्ञं दृढसौहृदंच
लक्ष्मीः स्वयं याति निवासहेतोः ॥ १ ॥

---

पुणें येथें

"श्री शेतकरी" छा० छापला.

किंमत ०४

मराठी ग्रंथ संग्रहालय
नं. ७०
ठाणे सन १८९३

श्रीमंत राजमान्य राजेश्री

मल्लाप्पा बसाप्पा ( उर्फ )

# आप्पा साहेब वारद

यांस

हा निबंध त्यांच्या औदार्यादि अनेक

सद्गुणांस अनुलक्षून कृतज्ञतापूर्वक

अर्पण केला असे.



# पैसा मिळविण्याची युक्ति.



उपयुक्ततेच्या दृष्टीनें आपल्या देशाची स्थिति मोठी मातब्बर असल्याचें आढळतें. जमीन पुष्कळ व सुपीक, अल्प मजुरींत मिळणारे श्रमकार लोक असंख्य, खनिज संपत्ति भरपूर, आणि हवापाणी अत्युत्तम; अशा प्रकारें निसर्गदेवतेची अत्यंत कृपा आपल्यावर असतां, " काय करावें बावा, उत्तरोत्तर दिवस मोठे कठिण येत चालले आहेत, गेला जो काळ तो पुढें येणाऱ्या काळापेक्षां बरा ठरत असतो, आजचा दिवस निभावला उद्यांचा विचार काय होईल, " इत्यादि प्रकारचे अनेक उद्गार आपण सर्वतोमुखीं ऐकत असतों, याचें कारण काय असावें बरें? गत गोष्टींना नेहमीं वाखाणीत असावें अशी मनुष्य स्वभावाची एक सामान्य प्रवृत्ति आहे; तीस अनुसरून तर हे उद्गार केवळ कांहीं तरी नसतील ना ? पण नाहीं. तसें खचित नाहीं. आजकालची आपली एकंदर परिस्थिति क्षणेक विचारपूर्व

अवलोकन करणारास हे सर्वत्र ऐकूं येत असलेले उद्गार बरेच यथार्थ आहेत असें आढळून येतें. अवश्य निर्वाहाचीं साधनें सहज कमावतां येत असत व अशी त्या साधनांची स्वस्ताई व विपुलता असल्यामुळें कुटुंबभरणाची चिंता जी बरेंच मोठें वय होईपर्यंतहि न केली असतां चाले, तो सर्व प्रकार आतां खाचत नाहींसा झाल्याचें दृष्टीस पडत आहे. थोडेंसें समजूं लागतांच निर्वाहसाधनांची चिंता एकदम येऊन बोकांडीं बसते; आणि मग तिच्या पायीं उत्तर वयामध्यें मनुष्याला अत्यंत हितकर होणारे उत्साह, धैर्य, महत्वाकांक्षा इत्यादि प्रशंसनीय गुणांचा पूर्ववयांतच बामोड होऊन मनुष्याचें सारें वय क्लेशकारक, कष्टाचें आणि दीनवाणें असें त्याला भोगावयाचें कपाळीं येतें. आणि कित्येकांच्या तर आयुष्याचा ग्रंथहि लौकरच आटपतो !

या प्रकारची लोकस्थिति निःसंशय खरी आहे. आज खरोखरच आपल्या देशांतील सुमारें चार कोटी लोकांना केवळ अर्धपोटीं राहून गुजारा करावा लागत आहे; सुमारें दहा कोटी लोकांचे कसे तरी सरासरी दिवस ढकलत आहेत; एकंदर हिंदुस्थानच्या लोकसंख्येपैकीं निम्या लोकांचे उद्योगधंदे बसल्यामुळें त्यांचे हातपाय निरुपयोगी झाले आहेत; आणि या स-

यांचें एकंदर सार म्हटलें ह्मणजे देशांतील लोकांचें दर माणशीं सालीना उत्पन्न सरासरी वीस पंचवीस रुपयांवर येऊन बसलें आहे, हें होय. ही इतकी शोचनीय स्थिति होण्याचें कारण काय असावें हें शोधून काढण्याचें आणि तें निवारण करण्यासाठीं त्याजवर उपाय सुचविण्याचें आजकाल प्रत्येक विचारी व समंजस माणसाचें एक कर्तव्यच झालेलें आहे. आणि त्याप्रमाणें अशा मनुष्यांच्या विचारान्तीं त्यांना जे जे उपाय सूचले आहेत त्यांतील एक विशेष महत्वाचा उपाय म्हटला ह्मणजे एखादी "पैसा मिळवण्याची" विचारानुभवसिद्ध "युक्ति" लोकांस सुलभ रीतीनें माहीत करून दिली पाहिजे हा एक होय, असें समजल्यावरून एतद्विषयक कांहीं इंग्रजी पुस्तकांच्या आधारानें हा एक प्रयत्न सर्व द्रव्यार्थी जनांना आणि विशेषतः होतकरू तरुण बांधवांना सादर करीत आहों. यांत पैसा मिळवण्याची युक्ति सर्वांस साधतां येईल अशीच सांगितली आहे. ही युक्ति जो जितकी साध्य करून ठेवील तितक्या मानानें त्याला पैसा मिळवतां हटकून आलाच पाहिजे असा सिद्धान्त आहे.

याकरितां ज्यांना पैसा मिळवण्याची उत्कट इच्छा असेल, आणि ती प्रत्येकालाच आहे, त्यांनीं हे

पुढील पथ्यावह विचार नीट वाचून ठेवून आपल्या ठायीं त्यांपैकीं आहेत किती किंवा आणतां येण्यासारखे-आहेत किती हें पहावें, आणि त्या मानानें मग आपल्या इच्छेच्या सफलनिष्फलतेचें अनुमान करावें. हर्वी तशीं कुपथ्यें नेहमीं करीत राहून आपल्या प्रकृतीच्या रोगीपणाविषयीं कुरकुरणारे किंवा निरामयतेची आशा करणारे ज्याप्रमाणें कित्येक अविचारी लोक असतात, त्याप्रमाणें इकडेहि बरेच कांहीं मूर्ख लोक नेहमीं असे आढळतात कीं, पैसे मिळवतां येण्याची पात्रता आंगीं आणून ठेवणाऱ्या गोष्टींचा स्वतांमध्यें गंधाहि नसतां किंवा त्या गोष्टी आपल्यांत आणावेण्याची उत्सुकताहि नसतां, पैसा मिळत नाहीं ह्मणून किंवा पैसा मिळावा ह्मणून, ज्याच्या त्याच्यापाशीं तोंड वेंगाडण्याविषयीं मात्र त्यांचा पहिला पाय असलेला आढळून येतो. त्यांना वाटतें कीं, तोंडें वेंगाडून, दुसऱ्याच्या परोपकारबुद्धीस जागृत करून, किंवा इतर कांहीं हलक्या उपायांनीं पैसा मिळवावयाचा असतो. परंतु ही समजूत चुकीची आहे; आणि चुकीची आहे हें त्यांच्याहि लक्ष्यांत येतें, तथापि तें पुढें फार अवकाशानें येतें; त्यांतूनाहि हलक्या उपायांनीं एखादे वेळीं यद्यपि

पैसा मिळाला, तथापि त्यांतील मिंधेपणा कधींहि मनाची प्रसन्नता राखीत नाहीं. तेंच पुढें सांगितल्यासारखीं योग्य साधनें साध्य करून घेऊन व द्रव्यप्राप्तीचा अधिकार आपले आंगीं राखून जें द्रव्यार्जन होतें त्याची योग्यता व तत्संबंधीं मनस्तोष कांहीं विशेष असतो. तेव्हां पैसा मिळण्यासाठीं किंवा मिळवितां येण्यासाठीं भलभलत्या व काल्पनिक अशा अन्यथा उपायांच्या मागें बिलकुल न लागतां येथें जी युक्ति किंवा पथ्यावह विचार सांगितले आहेत त्यांचेंच अवलंबन करण्याविषयीं द्रव्यार्थी जनांनीं तत्परता ठेवावी, इतकें आग्रहपूर्वक सूचवून एतत्प्रकरणीं साध्य करून घ्यावयाचीं एकेक साधनें क्रमाक्रमानेंच ह्या पुढें सांगण्यास सुरुवात करूं.

................

काहीं तरी उपयुक्त ज्ञान शिका ( किंवा गुण संपादन करा. )—आंगीं एखादा हि उपयुक्त गुण असल्यावांचून पैसा मिळविण्याची इच्छा धरणें केवळ व्यर्थ आहे. आपणास गरज असो वा नसो, परंतु कांहीं तरी उपयुक्त विद्या अगर गुण प्रत्येकानें आंगीं बाळगण्याची खबरदारी घेतली पा-

हिजे. कारण प्रत्येक प्रसंगीं त्यासारखें अगदीं हटकून आपल्या उपयोगी पडणारें आपल्या हातचें असें साधन दुसरें कोणतेंहि नाहीं. ज्ञान किंवा गुण यांच्या उपयुक्तानुपयुक्ततेचें मान, स्थल—काल—विशेषीं वेगवेगळें असूं शकतें. याकरितां पैसे मिळवतां येण्याच्या दृष्टीनें अमुकच गुण किंवा ज्ञान उपयोगी आणि अमुक निरुपयोगी असें सांगतां येणें अशक्य आहे. सुईच्या नेढ्यांतून राईचे दाणे अचुक टाकतां येण्याचा गुण पुष्कळ मेहेनत घेऊन शिकलेल्या एका इसमाची संभावना प्रसिद्ध शिकंदर बादशाहा याचे दरबारीं राईचे दाणे भरलेल्या फक्त एका टोपलीनें झाली! ह्मणजे अतिशय श्रमानें संपादलेला असाहि हा त्याचा गुण त्या दरबारांत कवडीमोल ठरला! पण कदाचित् आमच्या इकडल्या स्वराज्याच्या वेळच्या एखाद्या "गुणिजनांच्या चाहत्या" शोकी राजानें त्याच्या तेवढ्याच गुणावर वंशपरंपरा कांहीं जहागीर करून दिली असती! तसेंच, डोक्यास पुष्कळ त्रास देऊन तयार केलेला एक अति बिकट कूट श्लोक दाखविण्यास नेलेल्याचा आदर, तो श्लोकाचा कागद फाडून टाकण्याच्या रूपानें, एके वेळीं कोणा एका महाविद्वान् पुरुषाकडून

करण्यांत आल्याची एक आख्यायिका आहे; पण भोजराजासारख्याच्या दरबारीं त्याच मेहेनतीचें चीज कांहीं लक्ष मुद्रांच्या रूपानेंहि झालें असतें! तेव्हां उपयुक्ततेचें मान साधारणपणें ज्यांच्यांत व जेथें आपला व्यवहार व्हावयाचा असतो त्या आपल्या परिस्थितीच्या धोरणानें ठरवावयाचें असतें. तथापि, पैसा मिळवितां येण्याचें मूळ गुणांतच आहे. अशा कांहीं गुणावांचून द्रव्यार्जनार्थ मनुष्याचें राबणें केवळ कष्टकर, परतंत्र व अत्यल्प फलदायी म्हणून व्यर्थच जाणावें. गुणी मनुष्य सुखी असतो, स्वतंत्र असतो किंवा राहूं शकतो, व आपल्या गुणाचा योग्य उपयोग करूं निघेल तर हवे तेवढे पैसे मिळवण्याची त्याला खात्रीची धमक असते. पण असा कांहीं गुण किंवा ज्ञान आंगीं नसलेल्याचें सर्व जीवन कोणाच्या तरी मेहेरबानगीवर व उदारपणावर अवलंबून असलेलें, आणि तेंहि मिंधेपणामुळें मनाच्या प्रसन्नतेस कधींहि साधनीभूत न होणारें असें जाणावें. शोभा आणि उपयोग हे दोन प्रकार प्रत्येक गोष्टींत आहेत; त्याप्रमाणें ते आपल्या शिक्षणांतहि आहेत. शोभेचें महत्व उपयोगाच्या अनुरोधानें असतें. उपयोग नाहीं तर नुसत्या शोभेला कोणी समंजस मनुष्य विचारीत नाहीं.

थाकरितां केवळ शोभेच्या विद्या किंवा गुण कोणते आणि उपयोगाचे कोणते ह्याचा विचार करून आधीं उपयोगाचे एकाधिक गुण साध्य करून ठेवले असावे आणि मग सवड असेल तर शोभादायक गुणांच्या मागें लागावें. निर्गुणी मात्र अगदीं असूं नये. मनुष्याला स्वतःसिद्ध किंमत कांहीं नाहीं. त्याच्या ठायीं गुण किंवा विद्या ज्या प्रकारची असेल, त्या प्रकारें त्याला किंमत येत असते. तेव्हां पैसे मिळवतां येण्याच्या युक्तींतलें लक्ष्यांत ठेवण्यासारखें पहिलें कलम ह्मटलें ह्मणजे हें आहे कीं, किमानपक्ष एखादा तरी उपयुक्त गुण किंवा विद्या मनुष्यानें अवश्यमेव शिकलेली असावी. तिच्या अभावीं. त्यानें द्रव्यार्जनाची इच्छा करणें व्यर्थ आहे. गुण किंवा विद्या जी शिकावयाची ती आपल्या मनाची स्वाभाविक आवड लहानपणापासून ज्या विषयाकडे विशेष असेल किंवा जी विद्या साध्य करून घेण्याचीं साधनें व सोई आपल्यास विशेष असतील त्या प्रकारची शिकावी हें बरें. तसें केल्यानें मनुष्यास त्या गुणांत सहज प्रवीण बनतां येतें. आणि कोणत्याहि गुणांत प्रवीण असणें हेंच त्यापासून द्रव्यार्जन करतां येण्याचें खात्रीचें साधन होय. माणसा माणसांच्या चेहऱ्यांत ज्या-

प्रमाणें भिन्नता आढळते, त्याचप्रमाणें त्यांच्या शारीर व मानसिक शक्तींच्या अवसानांत व आवडींतहि असते. एकाच विषयांत सर्वांची सारखी गति व मति चालते असें नाहीं. या बाबतींत लहानपणापासूनच वडिलांकडून खबरदारी राखली गेली पाहिजे. मुलांस ज्या विद्या शिकवावयाच्या त्यांची निवड वडिलांनीं आपल्या स्वतांच्या आवडीप्रमाणें न करतां मुलांच्या शारीर व मानसिक योग्यतेचा मगदूर व कल अजमावून त्याप्रमाणें केली पाहिजे. बिन अवसानाच्या व आवडीच्या विषयांत शिकणारास व्यर्थ शीण होतो; त्यांतून अंग काढून घेण्याविषयीं तो नेहमीं निमित्तावर टेंकलेला राहतो; आणि त्यांत प्रवीणता संपादतां येणें त्याला अशक्य असतें. त्यामुळें त्यापासून द्रव्यार्जनाचा इष्ट हेतु कदापि साध्य होत नाहीं. सारांश पैसा मिळवण्यासाठीं कांहीं तरी उपयुक्त गुण किंवा विद्या अंगीं असणें हें जसें अगत्याचें आहे तसेंच त्या गुणांत किंवा विद्येंत आपली प्रवीणता सहज राहण्याकरितां त्याची निवड आपल्या आवडीस व अवसानास अनुरूप झाली पाहिजे. पैसा खात्रीनें मिळवतां येण्याचें हें एक साहित्य झालें.

## संपादित गुणानुरूप धंदा पत्करा.

मागें सांगितल्याप्रमाणें कांहीं एखादा तरी उपयुक्त गुण किंवा विद्या संपादन करणें ह्मणजे ही पैसा मिळवितां येण्याची एक पूर्व तयारी मात्र होते. खरोखर पैसा मिळविण्यास म्हटलें असतां त्या संपादित गुणानुरूप असा पुढें एखादा धंदा पत्करावा लागतो. धंदा पत्करतांना मनुष्याला भ्रांतींत पाडणाऱ्या दोन गोष्टी असतात. त्यांच्याविषयीं अवश्य खबरदारी घेतली पाहिजे. कित्येक गुण किंवा विद्या अनेक धंद्यांत उपयोगी पडण्यासारख्या असतात. त्यामुळें त्यावरून धंदा पत्करावयास निघालें असतां अनेक धंदे पुढें येऊन सर्वांतच यशोलाभ दृष्टीस पडतो व सर्वच करावेंसें वाटतें. त्यामुळें मनुष्याचें मन एकाहि धंद्याकडे निश्चयपूर्वक न लागतां त्याची त्या सर्वांत नुकसानी होते किंवा अपुरें यश मिळतें. याकरितां एका पेक्षां जास्त धंदे सहसा कधीं हातीं घेऊं नयेत. एकाच धंद्यावर सर्वस्वीं आपलें तनमनधन योजतां आल्यानें त्याच्या भरभराटीस साह्यभूत अनेक कल्पना आपल्यास सुचूं लागून तो आपणास चांगल्या किफायतीचा करून घेतां येतो. अनेक धंद्यांचें लिगाड मागें लावून घेतल्यानें "एक धड ना भाराभर चिंध्या"

मात्र पदरीं येऊन शेवटीं " धांव धांव धांवले आणि फजित पावले, " अशा प्रकारें आपल्या कष्टांचें चीज होतें ! धंदा पत्करतांना या सारखीच मनुष्याला भ्रांतींत पाडणारी दुसरी गोष्ट म्हटली ह्मणजे कोणत्याहि धंद्या संबंधानें त्यांत यशोलाभ होईल कीं नाहीं याविषयीं प्रारंभीं जी संशयवृत्ति कित्येकांनां घोटाळ्यांत पाडीत असते ती होय. परंतु या वृत्तीचें निरसन पुढील विचारांनीं होण्यासारखें आहे.धंद्यांत लोकांची अतिशय गर्दी असली ह्मणजे त्यांत नवीन शिरणारास त्यापासून यशोलाभ होईल किंवा कसें याविषयीं संशय उत्पन्न होऊं लागतो. परंतु ही एक गोष्ट सर्वांनीं नेहमीं लक्ष्यांत ठेवावी कीं, अशी कितीहि कशांत गर्दी झाली तरी ती गर्दी एखाद्या इमारतींत केवळ खालच्या तळमजल्यांत पुष्कळ लोक जमावेत त्या प्रमाणेंच होय. ही गर्दी वरल्या वरल्या मजल्यांत अगदीं कमी; आणि मुळींच गर्दी नाहीं असे बरेच मोकळे मजले सर्वांच्यावर कांहींना कांहीं तरी नेहमीं असावयाचेंच हें खात्रीनें समजावें. एका पाठशाळेंतील पदवीधर विद्यार्थ्याला कोणा वकिलानें विचारलें कीं, "तूं आतां कोणत्या धंद्यांत शिरणार?" विद्यार्थी ह्मणाला, "अद्यापि त्याविषयीं माझा नि-

श्रय झालेला नाहीं. तुमच्याकडे कसें काय आहे? गर्दी आहे का? " वकिलानें सांगितलें, " होय; तळमजला अगदीं गच्च भरून गेला आहे; परंतु वरचे मजले पुष्कळ मोकळे आहेत ! " आणि सर्व धंद्यांत अशीच स्थिति असते. ज्यांची मेषसांप्रदायी वृत्ति, अशीं स्वयंभू अक्कलशून्य माणसें, कांहीं मनुष्यांनीं एखाद्या धंद्यांत स्वतांच्या शहाणपणानें आणि सचोटीनें चार पैसे मिळवलेले पाहिले, ह्मणजे तेथेंच आपण शिरून सर्वांसच तोटा होईल अशी गर्दी व अडचण करीत असतात. अशा गर्दीला स्वतः कर्मकुशल मनुष्यानें बिलकूल भिण्याचें कारण नाहीं. या सर्वांच्या मूर्धाभिषिक्त होण्यास तो खचित पात्र असतो. या संबंधानें एका इंग्रजी शालोपयोगी पुस्तकांतील पुढील भावार्थाचा एक उतारा मनन करण्यासारखा आहे,

"व्यवहारांत नुकतेंच येऊं घातलेले होतकरू लोक या जगांत आपलें नशीब कोणीकडे काढावें याचा जेव्हां विचार करूं लागतात, तेव्हां त्यांपैकीं कित्येकांना हें जग मधमाशांच्या मोहोळाप्रमाणें सर्वत्र माणसांनीं गजबजून गेलेलें आढळतें आपल्या जोगती एकहि जागा त्यांना त्यांत रिती दिसत नाहीं. प्रत्येक खात्यांत व प्रत्येक कारखान्यांत माणसांचे थव्यांच्या थवे ते बघतात. मग अशा वेळीं त्यांच्या म-

मनांत असा विचार येतो कीं, "शिव शिव : आम्ही आतां उगीच जन्मास आलों. एका शतकापूर्वी किंवा आणखी एका शतकानंतर परमेश्वरानें आम्हांस या भूतलावर आणून सोडलें असतें तर बरें होतें. पण हा हल्लींचा काल आम्हास वरतीं डोकें काढण्यास अगदींच निरुपयोगी आहे! वस्तुतः असे निराशेचे उद्गार काढणें हें अगदीं निरर्थक होय. कारण या जगाची रचनाच अशी आहे कीं, त्यांत योग्य व सत्या मार्गानें चालणाऱ्या हरएक मनुष्याची सोय हा झालीच पाहिजे. मात्र त्यानें उगीच काल्पनिक भीतींनीं मागें मागें सरून अप्रसिद्ध स्थितींत राहतां कामा नये. बुद्धिविशिष्ट मनुष्याकरितां येथें सर्वत्र जागा जणूं काय राखूनच ठेवलेल्या आहेत. उलट असेंच गमतें होतें कीं, तशा जागांकरितां योग्य निवडक मनुष्येंच मिळत नाहींत. चढण्याकरितां या जगामध्यें प्रत्येक होतकरू मनुष्यानें केव्हांहि निराश न होतां अनेक प्रतिस्पर्ध्यांशीं यथान्याय झुंजून जगांत नांव काढलें पाहिजे. जगांतील सर्व माणसांची एकार्थ दृष्टि असते. सर्वांचा झुंड एकाच दरवाजांत शिरण्याकरितां वळलेला आढळेल. त्यांतून जो घुसून निघेल तोच इष्ट वस्तूचे प्राप्तीस अधिकारी होईल. उभा राहील तो तसाच मागतेल. याकरितां आळस टाकून, धीर धरून, संधि साधून, मेहनत घेऊन, प्रामाणिक राहून व आशा ठेवून कामधंद्यास मनुष्यानें नेहमीं प्रवृत्त झालें पाहिजे. मग अशा रीतीनें चालत असतां जरी कदाचित अपजय आलाच, तरी त्यावेळीं आपण आपलें कर्तव्य करतांना कांहीं कसूर केली नाहीं, हें आपल्या मनाचें उत्तम प्रकारें समाधान तरी खचित राहील."

असो, ह्याप्रमाणें धंदा पत्करून निवडावयाचे वेळीं मनुष्यास प्रारंभींच भ्रमांत पाडणाऱ्या दोन विशेष गोष्टींविषयीं विचार आहेत. या प्रकारच्या विचारांनीं त्यांचें निरसन करून पैसे मिळवण्या-साठीं आपल्या संपादित गुणानुरूप कोणत्या तरी धंद्यांत शिरावें. शेतकी, व्यापार आणि नौकरी हे एकंदर धंद्यांचे तीन मोठे भाग आहेत. यांच्या पोटीं बहुतेक सर्वांचा अंतर्भाव होतो. यांच्यांत एकाहून एक कनिष्ठपणाची कल्पना आहे, तथापि या निबंधांत सांगितलेल्या सूचनांस अनुसरून योग्यप्रकारें पत्करल्यास ज्याच्या त्याच्या योग्यतेनुरूप त्यास पैसे मिळवून देण्यास ह्या सर्वांतही सारखेपणा मानावयाला हरकत नाहीं. तशा दृष्टीनें यांत उच्चनीचपणा लेखण्याचें आपल्याला कांहीं कारण नाहीं. पैसा मिळण्यासाठीं शेतकी, व्यापार व नौकरी यांपैकीं आपल्यास शक्य असेल असा कोणताहि मार्ग आपण स्वीकारावा. तो या लेखांतील सूचनांप्रमाणें पाळल्यास आपली द्रव्यार्जनेच्छा सफल झालीच पाहिजे.

.......................

पत्करलेल्या धंद्याचीं सर्व साहित्यें जवळ सिद्ध राखा—संपादित गुणानुरूप धंदा पत्करण्याचा

निश्चय झाल्यावर प्रथमतः त्या धंद्याच्या चालू स्थिती-विषयीं नीट चौकशी करून त्याबद्दलची पूर्ण माहिती करून घेतली पाहिजे. हें धंद्यासाठीं जुळवावें लागणाऱ्या साहित्यमालिकेंतलें पाहिलें कलम होय. ही माहिती ते ते धंदे चालू असलेल्या ठिकाणीं स्वतांच्या उमेदवारीनें मिळविलेली फार उत्तम होय. अशा रीतीनें स्वतः प्रत्यक्ष अनुभवानें माहिती मिळवून व त्याच्या माहितीचे अनेक ग्रंथहि वाचून आपणास पत्करावयाच्या धंद्याच्या अंतर्बाह्य स्वरूपाची आपणास पूर्ण ओळख झाली, म्हणजे त्या नंतरचें दुसरें कलम भांडवलाचें असतें; त्याची तयारी करावी. ज्यास्त संपत्ति उत्पन्न करण्याकरितां प्रथमतः जो कांहीं संपत्तीचा थोडा फार अंश आपण पत्करलेल्या धंद्यास लावावयाचा असतो, त्याला भांडवल असें ह्मणतात. अथवा पुनरुत्पादनाकडे लावलेली संपत्ति भांडवल होय अशीहि याची थोडक्यांत व्याख्या आहे. या भांडवलाचे दोन प्रकार असतात. एक कायमचें स्थावर भांडवल आणि दुसरें खेळतें अगर फिरतें जंगम भांडवल. प्रत्येक धंद्यांत भांडवल दोन्ही प्रकारच्या स्वरूपानें असतें. धंद्यामध्यें ज्याचा एकवार उपयोग केलेला त्या उपयोगाच्या

रूपानें स्वस्वरूप फारसें न बदलतां जो त्यांतला भाग कायम असतो, तें स्थावर भांडवल होय; व एकवेळ उपयोग होतांच जो त्यांतला भाग पूर्वींच्या त्या रूपानें पुनः आपल्या दृष्टीस पडत नाहीं तें दुसऱ्या प्रकारचें खेळतें भांडवल होय. धंद्याचीं यंत्रादि साधनें, इमारत वगैरेंत गुंतलेलें भांडवल पहिल्या प्रकारचें आणि कामकरी लोकांची मजुरी, कच्चे मालाची खरेदी वगैरेंत गुंतलेलें भांडवल दुसऱ्या प्रकारचें होय. स्थावर भांडवल आपलें स्वरूप सहसा न बदलतां तसेंच संपत्ति उत्पन्न करण्यास साधनीभूत होत असतें; आणि खेळतें भांडवल जें असतें, त्याचा उपयोग होतांच लागलेंच त्याचें स्वरूप बदलून तें आपल्याहून जास्त किंमतीचा माल उत्पन्न करून नाहींसें होतें. स्थावर भांडवलाची अधिक संपत्ति उत्पन्न करण्यास वेळोवेळीं मदत होत असते आणि खेळतें भांडवल उपयोग होतांच नफा पदरांत टाकून नाहींसें होतें. याप्रमाणें उभयतांतले भेदाभेद आहेत, हें चांगलें ध्यानांत ठेवलें पाहिजे. कोणत्याहि धंद्यास आरंभ करतांना आपल्या एकंदर भांडवलापैकीं किती भागास स्थावर स्वरूप द्यावयाचें व किती खेळतें ठेवावयाचें हें वेगवेगळ्या धंद्याच्या मानानें

कमजास्त असतें. तथापि स्थावरांत गुंतलें गेलेल्या पेक्षां खेळतें राहणाऱ्या भांडवलाचा भाग नेहमीं अधिक असला पाहिजे हें मात्र पक्कें लक्षांत असावें.

भांडवल बहुधां कर्जाऊच मिळवलेलें असतें. कर्ज काढण्यासंबंधानें मनुष्यानें फारच सावधगिरी ठेवली पाहिजे. सहसा कर्ज काढण्याचा प्रसंग टाळावा; व नच टळेल तर फक्त उद्योगधंद्यासाठींच तें पाहिजे तर काढावें. कर्जाऊ द्रव्याचा व्यय उद्योग धंद्यावांचून खाजगी खर्चांत बिलकुल करूं नये. उद्योग धंद्यांत वेचलेलें द्रव्य जिवंत असतें, पण खाण्यापिण्यांत वेंचलेलें एक प्रकारची मृतावस्था पावतें. त्यामुळें क्वचित्प्रसंगीं उद्योगधंद्यांत यश आलें नाहीं तर त्यांतील द्रव्याच्या काहींना कांहीं तरी जिवंतपणामुळें त्याचें सर्वत्र ओझें आपल्यास वहावें लागत नाहीं; पण खाऊन पिऊन, लेऊन सवरून फस्त झालेल्या कर्जाऊ द्रव्याचें मग उत्तरकार्य करतांना नाकीं नऊ येतात! आणखी जास्त कर्ज काढून पहिल्याची वाट,लावावी लागते; आणि उत्तरोत्तर असें आणखी आणखी काढलेलें कर्ज पहिल्याची व्याजानें झालेली वाढ भागेल त्या बेतानें, जास्तच होत असल्यामुळें कर्जबाजारीपणांत सारा जन्म

घालविणें कपाळी येतें. ही स्थिति फार वाईट. हींत सुख नाहीं, स्वातंत्र्य नाहीं, योग्यता राहत नाहीं, गुणांची किंवा मेहनतीची किंमत होत नाहीं; सारा वेळ चिंतेंत, तोंड चुकवाचुकवींत आणि मिंधेपणांत घालवावा लागतो. याकरितां साधेल तर कर्ज टाळाच; पण निदान कर्जाचें साह्य खाण्यापिण्यासारख्या व्यवहारदृष्टच्या निरुत्पादक गोष्टींत तरी घेऊं नका. ह्या गोष्टी उद्योगधंदे करून स्वतांच्या मिळकतीवरच भागवावयाच्या असतात. भांडवलाप्रमाणें धंद्याच्या साहित्यमालिकेंतील तिसरी बाब तत्संबंधीं साधनें—माणसें, सामान, जागा हीं होय. ही बाब नौकरीच्या धंद्याला अर्थातच नसते. तथापि व्यापार आणि शेतकी या जातींच्या धंद्यांत हिची जरूरच आहे. दोन तीन प्रकारचीं माणसें साह्याला घ्यावयाचीं असतात. भागीदार, नोकरचाकर, दलाल वगैरे. यांची कमजास्त अवश्यकता व संख्या हीं धंद्याचे मानावर आहेत. यांच्यांत वरचेवर बदलणूक नसावी. धंद्यांत यांचें ज्या प्रकारचें साह्य घ्यावयाचें तद्गुणविशिष्ट अशीं हीं माणसें असलीं पाहिजेत. धंद्याला लागणाऱ्या सामानाची उणीव बिलकुल नसावी. तसल्या उणीवीनें नेहमीं अडचण येते

व धंदा लंगडा पडतो. धंद्यास लागणारें सामान टिकाऊ आणि भरपूर असावें. धंद्यास आड गिऱ्हाईकी सामान घेणें झाल्यास तें फार चौकशीनें घ्यावें. असें सामान स्वस्त मिळतें खरें; पण तें मोड-तोड होऊन लौकर निरुपयोगी होण्याचाहि संभव फार असतो. धंद्यासाठीं जागा असावी ती स्वतंत्र, प्रसिद्ध व प्रशस्त अशी असावी. शिवाय त्या धंद्याची जेथें जास्त रहदारी अशाच ठिकाणीं ती पाहिजे. या प्रमाणें पत्करलेल्या धंद्याच्या आवश्यकीय सर्व साहित्याची तयारी असल्यावर आपला धंदा जेणें-करून पुष्कळ लोकविश्रुत होईल अशा प्रयत्नास लागावें लागतें. हा प्रयत्न धंद्याच्या अमुक एका वेळीं करावा असें नाहीं. तर धंद्याच्या हयातींत संततसमान चालू असावा लागतो. आपल्या धंद्याची सारी भरभराट त्यावर आहे. बरेच धंदे अनेक लोकांच्या आश्रयावर अवलंबून असतात. त्यामुळें आपल्या धंद्याची आठवण त्यांना सतत राहील असें केलें पाहिजे. तें करण्याची अलीकडे प्रचारांत येत चाललेली सोय ह्मटली ह्मणजे जाहिराती देणें ही होय. लोकांचें लक्ष त्यांजकडे चटकन् जाईल अशा या जाहिराती चटकदार पण प्रामाणिक असाव्या.

खुबीदार जाहिराती देण्याची विद्या आपल्याला पाश्चात्य व्यापाऱ्यांपासून अवश्य घेण्यासारखी आहे. आमच्या एका महाराष्ट्र कवीचा श्लोक आहे तो असा कीं,—

अहो येतां जातां बसत उठतां कार्य करितां ॥
सदां घेतां देतां वदनिं वदतां ग्रास गिळितां ॥
घरींदारीं शय्येवरि रतिसुखाचे अवसरीं ॥
समस्तांची लज्जा त्यजुनि भगवच्चिन्तन करी ॥१॥

—या श्लोकांत भगवच्चिंतना संबंधानें कोणताहि काल व स्थल न वर्जिण्याविषयीं मोठ्या आग्रहानें उपदेश केलेला आहे. याच्याच शेवटच्या चरणांत "भगवच्चिंतन करी" असे शब्द आहेत त्या ऐवजीं "निज धंदा प्रकटवी" असे शब्द ठेवले ह्मणजे पाश्चात्य व्यापारी लोकांना जगूं काय हाच उपदेश असावा असें एतदनुरूप त्यांच्या कृतीवरून वाटतें! धंद्याची प्रसिद्धि करणें ती तत्संबंधीं खर्चाच्या भयानें थोडथोडी प्रसिद्ध करणें अगदीं निरुपयोगी होय. एका इंग्रजी ह्मणी ‡ प्रमाणें जसें "कोणत्याहि विद्येचें अल्पज्ञान घातक होय" तशीच धंद्याची अल्प प्रसिद्धिहि तितका

‡ "A little learning is a dangerous thing."

खर्च व्यर्थ दवडून बिनकिफायतीचा ह्मणून थांतकच होय. लोकांच्या दृष्टीपुढें अनेक रूपांनीं एक सारखी जाहिरात राखावी लागते. आपली जाहिरात कोणत्या ना कोणत्या तरी चित्तवेधक रूपानें नेहमीं लोकांच्या दृष्टीपुढें राहील असें करण्याविषयीं पाश्चात्य व्यापारी आपलें फारच चातुर्य खर्च करीत असतात. त्यांच्यांत 'बॉल' ह्मणून जो स्त्रीपुरुषांनीं नाचून करमणूक करण्याचा एक प्रकार असतो, त्यांत नाचणाऱ्या स्त्रीपुरुषांची दृष्टी एकमेकांच्या वक्षप्रदेशीं एकसारखी कांहीं वेळ सहज राहत असते. ही गोष्ट लक्ष्यांत आणून एका व्यापाऱ्यानें स्त्रियांना अवश्य लागणाऱ्या जिनसांची एक जाहिरात पुरुषांच्या वक्षस्थळावर येणाऱ्या त्यांच्या गळ्यांतील पांढऱ्या स्वच्छ गळपट्ट्यावर छापून काढिली होती. व असे गळपट्टे घालावयास देऊन मुद्दाम आपल्या तर्फेचीं नृत्यकलाकुशल माणसें तो 'बॉल' या खेळाला पाठवीत असे. अर्थातच या जाहिराती स्त्रियांच्या सहज नजरपुढें येत व त्या योगानें त्या व्यापाऱ्याच्या सदर्हू मालाची विक्री होई. जाहिरातींच्या योगानें फायदा जो होत असतो, तो ती

भीतभीत थोडथोडी प्रसिद्ध करून दिल्यानें नव्हे; तर ती सतत लोकांच्या पुढें राहील असें केलें पाहिजे. जाहिरातीकडे प्रथम प्रथम लोकांचें दुर्लक्ष्यच होत जातें. पण नेहमीं नेहमीं नजरे पुढें येत गेल्यानें एका फ्रेंच ग्रंथकारानें लिहिलें‡ आहे त्या प्रमाणें पुढें पुढें ती लोकांच्या आदरास पात्र होत असते. ओसाड जागीं आपलीं जळमटें पसरणाऱ्या सर्व कोळ्यांना एकदां एका विनोदी † पत्रकर्त्यानें आपल्या पत्रद्वारें असें कळविलें होतें कीं, दर आठवड्यास आमचें

‡A French writer says that, "The reader of a newspaper does not see the first insertion of an ordinary advertisement; the second insertion he sees, but does not read; the third insertion he reads; the fourth insertion he looks at the price; the fifth insertion, he speaks of it to his wife; the sixth insertion, he is ready to purchase; and the seventh insertion, he purchases."

† मजेदार जाहिरातीचा आणखी एक मासला पुढें दिला आहे. हा जपानी लोकांतील आहे.

† "Books elegant as a singing girl. Print clear as a crystal. Paper tough as an elephant's hide. Customers treated as politely as by the rival Steamship Companies. Goods despatched as expediously as a cannon ball. And parcels done up with as much care as that bestowed on her husband by a loving wife."

वर्तमानपत्र तुह्मी पाहात जा आणि जो व्यापारी आमच्या पत्रांत आपल्या मालाची जाहिरात देत नसेल, त्याच्या वखारींत जाऊन तेथें खुशाल आपलीं कोळिष्टें पसरून ठेवा; कारण त्याचा माल वर्षानुवर्ष जशाचा तसाच पडून राहणार आहे! तेव्हां तुमचीं हीं कोळिष्टें तेथें निर्विघ्नपणें राहतील. ही एक नक्कलच आहे, पण यांतलें तात्पर्य मात्र खरें आहे. कोणताही माल लोकांत झटापट खपून किंवा कोणत्याहि गुणानें लोकांत हटकून चीज होऊन त्यापासून पैसे उत्पन्न होण्यास तो माल किंवा गुण उत्तम प्रतीचा असणें जसें अवश्य आहे, तसेंच तो सर्व प्रसिद्ध करून ठेवणें हि अवश्यच आहे. नेहमीं लोकविश्रुत जर तो न राहील तर तो आपल्यापाशीं किंवा आपल्याठायीं बाळगणारास त्याचा उपयोग असून नसून सारखाच होणार आहे. ह्मणजे पैसा मिळवण्याचें तें साधन असें त्यास तें बिलकूल उपयोगीं पडणार नाहीं.

........................

**धंदा सुयंत्र चालण्यासाठीं कित्येक गोष्टींची खबरदारी घ्या.**—ही खबरदारी चारपांच गोष्टीं संबंधानें घ्यावयाची असते; त्या गोष्टी अशा:—धंद्यांतील आयव्ययाचा स्पष्ट हिशेब ठेवणें; देवघेव सहसा

रोखठोक करणें; काम वेळच्या वेळीं करणें; जें काम करावयाचें तें आपल्या कर्तृत्वानुरूप पहिल्या प्रतीचें करणें; आणि धंद्यांत टापटीप व व्यवस्थितपणा राखणें. ह्या प्रत्येक गोष्टी कोणत्याहि धंद्यामध्यें अत्यंत महत्वाच्या आहेत. हिशेब ठेवल्यानें आपल्या धंद्याच्या नफयातोटयाचें यंत्राप्रमाणें यथार्थमापन नेहमीं नजरेपुढें स्पष्ट राहतें. हिशेब किंवा जमाखर्च टिपलेल्या वह्या ह्मणजे धंद्यांतील आयव्ययाचें स्पष्ट मान हवें तेव्हां दाखवणारें एक घड्याळच होय, असें एतद्विषयक दुसऱ्या एका ग्रंथकाराचें ह्मणणें आहे. शिवाय हिशेबठिशेब चोख ठेवल्यानें धंद्यामध्यें ज्या अनेक प्रकारच्या भानगडी कराव्या लागतात त्याजविषयींचा बोध धंद्यांतील प्रमुख व्यक्तीच्या प्रसंगविशेषीं आकस्मिक अभावीं इतरांस होण्यास घोटाळा पडत नाहीं. धंद्यांतील सर्वच देवघेव नेहमीं रोखठोकच करतां येते असें नाहीं. पण कांहीं बाबतींत तशी जरी करतां आली नाहीं, तरी ती ठरलेल्या मुदतींत तरी केलीच पाहिजे अशा विषयीं जपावें. ह्या योगानें धंद्याचे सुयंत्रितपणांत बिघाड येत नाहीं. वेळच्या वेळीं नेमलेलीं कामें करण्याच्या संवयीनें अनेक कामें सहज करतां

येऊन तीं उरकतांना आपल्या जीवाची ओढाताण होत नाहीं, व इतरांसाहि त्रास होत नाहीं. व्यापार-धंद्याच्या कामांत वेळ हाच पैसा आहे. वेळच्या वेळीं हरएक काम करण्याविषयीं जपणें म्हणजे पैशालाच जपण्याप्रमाणें असतें. ही संवय केवळ हलगरजीपणामुळें पुष्कळांमध्यें नसते. ती मुद्दाम आपण लावून घेतली पाहिजे. आपल्या उद्योगधंद्यासंबंधीं हरएक काम वेळचे वेळींच करावें, त्याचप्रमाणें जें काम करावें तें आपल्यांत कर्तृत्व असेल त्या मानानें, अगदीं पहिल्या प्रतीचें करावें. हयगयीनें कसें तरी करून देण्याची खोड अगदींच वाईट होय. त्या योगानें चांगलें काम करण्याची संवय रहात नाहीं, व कामधंद्यांत उत्तरोत्तर चांगुलपणाची सुधारणा होत नाहीं. शिवाय कसें तरी केलेलें काम गिऱ्हाइकाच्या गळ्यांत बांधण्यासाठीं लबाडी शिकावी लागते ती वेगळीच. याकरितां काम करण्याची ही वाईट दिशाच टाळावी हें बरें. धंद्यामध्यें टापटीप किंवा व्यवस्थितपणा राखल्यानें त्याला शोभा तर येतेच येते; पण नासधूस कमी होऊन सुरक्षितताहि जास्त वाढते आणि या उभय प्रकारांनीं त्यापासून धंदेवाल्यास फायदाच होतो. ही टापटीप काम करण्यांत, तें दुकानीं मांडण्यांत, गिऱ्हा-

इकाला देण्यांत वगैरे सर्वांत सारखी राखावी लागते. अनेक तऱ्हेच्या मालाच्या कारखान्यांत तर हिच्या शिवाय सर्व घोंटाळा होईल. व्यापारकर्मकुशल पाश्चात्यांपासून या सर्व गोष्टी आपणास अवश्य शिकण्यासारख्या आढळतील. शिवाय पदार्थांचे किंमतीच्या घासाघासीची तर खोड फारच वाईट आहे. मालाच्या यथायोग्य उच्चनीचपणा प्रमाणें रास्त नफा घेऊन वाजवी किंमत सांगण्याची, जशी दुकानदाराला, त्याचप्रमाणें तशी ती किंमत ऐकण्याची गिऱ्हाइकालाहि संवयच नसते. दुकानदाराची ‘ सांगायाची ’ किंमत निराळी आणि ‘ द्यायची ’ किंमत निराळी. हें काय ह्मणें, ‘ सांगायला दोन रुपये, पण द्यायला नक्की दीड रुपया पडेल, ’ ही वाक्यरचनाच त्याच्या तोंडीं बसलेली. आणि एखाद्या दुकानदारानें या वाईट पद्धतीस सोडून रास्त रीतीनें प्रथमच मालाच्या गुणानुरूप कमी अधिक नक्की किंमत सांगितली तर तशी ती गिऱ्हाइकांसहि ऐकावयाला बरी वाटत नाहीं! ‘ मग द्यायच्यायचें काय, धर्माची वार्ता एक बोल, ’ असें त्यानें पुनः विचारलेंच. हा परिपाठ उगाच त्रासदायक आहे. दुकानदार व गिऱ्हाईक उभयतांनींहि समजुतीच्या एकविचारानें हा मोडून टाकला

पाहिजे. दुकानदारानें आपल्या दुकानच्या मालाची छापील यादी मालांच्या गुणानुरूप ठरींव किमतीसह तयार राखावी आणि गिऱ्हाइकानेंहि त्या नोंदलेल्या किमतीवर भरंवसा ठेऊन अगर वर्तमानपत्रांत प्रसिद्ध होणाऱ्या बाजारभावाशीं वगैरे त्याचा पडताळा पाहून आपली खरेदी करावी. अशा योगानें बाजारांत सतरा दुकानीं फिरण्याची मेहनत व किमतीसाठीं दुकानदाराशीं उगाच घासाघीस करण्याचे प्रसंग न येऊन सौदा होत जाईल. तसेच घेतलेल्या किमतीच्या योग्य मोबदला असा माल देण्याचें दुकानदारालाहि भाग पडून त्याची पत वाढेल. असो; धंदा सुयंत्र राखण्यासाठीं त्यांत खबरदारी घेण्यासारख्या ह्या गोष्टी आहेत. या शिवाय आपल्या धंद्यास उपयुक्त असलल्या विषयांची नेहमीं चौकशी ठेवणें व माहिती मिळवणें, देवघेवींत चांगली हुषारी राखणें, धंद्याचे समृद्धीसाठीं आपल्या योजना व बातबेत यांची आधींच वाच्यता न करण्याविषयीं जपणें, आपल्या धंद्याशिवाय इतर भानगडींत न पडणें इत्यादि गोष्टीहि याच सदरांत घालण्यासारख्या आहेत.

..................

**धंदा यशस्कर होण्यास कांहीं मनोधर्म आपलेसे करा.**—कोणताहि धंदा नेहमींच यशस्वी असतो

असें नाहीं. अनेक अस्मानीसुलतानी कारणांनीं त्यांत प्रसंगविशेषीं सोळा वारा आणे होतात, आणि आरंभीं आरंभीं तर यशाचीं चिन्हेंहि एखादे वेळीं भासत नाहींत. याकरितां कित्येक विशेष मनोधर्म प्रत्येक उद्योगधंदेवाल्या मनुष्याचे ठायीं अवश्य असले पाहिजेत. त्यांवांचून त्याला पैसे मिळवतां येणाऱ्या कोणत्याहि व्यवसायांत निःसंशय सुखप्राप्ति नाहीं. हे विशेष मनोधर्म ह्मटले ह्मणजे महत्वाकांक्षा, दृढनिश्चय, प्रामाणिकपणा, सभ्यता व उद्योगपरता हे होत. असे मनोधर्म आपलेसे करून ठेवणें हें पैसे मिळवण्याच्या युक्तींतलें बरेंचसें ठळक कलम आहे. आपल्या हरएक उद्योगांतली निःसंशय यशःप्राप्ति केवळ ह्या मनोधर्मांच्या बळावर अवलंबून असते. यांपैकीं-महत्वाकांक्षा या फक्त एकाच मनोधर्माचें असें कांहीं सामर्थ्य विलक्षण आहे कीं, प्रसिद्ध रोमनयोद्धा जो **जुलियससीझर** यानें एके प्रसंगीं त्या संबंधानें असें ह्मटल्याचें सांगतात कीं, 'माझी सर्व संपत्ति आणि ऐश्वर्य जावो; पण महत्वाकांक्षा मात्र मला असली पाहिजे; फक्त तिच्या एकटीच्या बळावर मी हवें तें मिळवूं शकेन.' आणि हें खरें आहे. अनेक वेळां पिछेहाट झाली असतांहि एखाद्या व्यवसायास म-

नुष्याला पुनः पुनः ताज्या दमानें प्रवृत्त करणारी झटली ह्मणजे महत्वाकांक्षाच होय. तिच्यावांचून तो या जीवनार्थकलहाच्या संग्रामांतून एखाद्या पहिल्याच उलट हल्ल्याला पळ काढावयाचा! महत्वाकांक्षेच्या जोडीचा दुसरा मनोधर्म दृढनिश्चय हा होय. किंबहुना पाहिल्याचाच हा पुढील परिणाम झटलें तरी चालेल या मनोधर्माचें वर्णन करण्यापेक्षां जणुं काय या मनोधर्माचा मूर्तिमंत अवतारच अशा पालिसी नामक एका फ्रेंच कुंभाराची गोष्ट येथें थोडक्यांत सांगूं म्हणजे झालें.

हा गृहस्थ जन्मतः अत्यंत गरीब स्थितींत होता, त्यामुळें त्याचें शिक्षण कांहीं फारसें झालें नव्हतें. आपल्या शिक्षणा संबंधानें पुढें मोठेपणीं त्यानें तर असें एकवेळ झटलें होतें कीं, " सर्वांस सुलभ अशीं आकाश व पृथ्वी हीं जीं दोन प्रशस्त पुस्तकें, ह्यांशिवाय मी कधीं एक हि पुस्तक पाहिलें असेल तर शपथ ! " ह्याचे बापाचा धंदा मणेरीचा होता. पुढें तो धंदा हा वयांत येण्याचे सुमारास बुडाला. तेव्हां याला निर्वाहासाठीं चार देश फिरण्याचा प्रसंग आला. इतालींन असतां कांचेचा मिना केलेलें एक मृण्मयपात्र याच्या नजरेस सहज एकदां आल्यावरून तशीं भांडीं तयार करण्याचा याला नाद लागला. पण नाहीं द्रव्यसहाय, नाहीं कृतीची माहिती, फक्त एक तें काम स्वतः तयार करण्याचा दृढनिश्चय. एवढ्या सामुग्रीवर स्वारीनें आली मनोरथसिद्धि करून घेण्यासाठीं

कंबर बांधली. इकडे तिकडे नोकरी करून चार पैसे मिळवावेत आणि घरची अत्यंत गरिबी असतांहि त्यांतून पैसे शिलक राखून मिना चढविण्याची कृति करून पाहण्यांत ते सर्व पैसे खर्चावे, असा क्रम चालला. पुष्कळ वर्षे हा क्रम चालला, पैसा व श्रम अतिशय खर्च झाले; पण बहादराच्या निश्चयाचा सांठा म्हणून लवमात्र कमी झाला नाहीं! ऊन म्हणूं नका, पाऊस म्हणूं नका, फार काय अन्नपाण्याविरहित सुद्धां त्यानें भट्टी शेजारीं आठ आठ दिवस एकसारखे बसून काढले. एकेवेळीं भट्टींत जाळण्याकरितां सर्पण नाहींसें झालें, जवळ पैसा नाहीं, तेव्हां त्यानें टेबलें, खुर्च्या, खिडक्यांचीं दारें, आढे वगैरे घरांतलें लांकडी सामान धडाधड मोडून त्यांजवर भट्टीचें काम उरकलें.! शेवटीं मिना करण्याची कृति उत्कृष्ट प्रकारें साध्य करून घेऊन पुढें त्याच्या कमनशिबानें तिचा त्याला स्वतः जरी योग्य फायदा झाला नाहीं, तरी त्याच्या दृढनिश्चयाचें हें लोकोत्तर उदाहरण आजपर्यंत अनेकांना अनुकरणीय होऊन त्याच्या कळप्रमाणेंच तें सर्वांस फायदेशाईक होऊन बसलें आहे. याचें नांव दृढनिश्चय.

या नंतरचे मनोधर्म प्रामाणिकपणा आणि सभ्यता हे होत. धंदा कोणताहि वाईट नाहीं. परंतु या दोन मनोधर्मांचा तो करणाऱ्यांमध्यें जितपत कमीअधिक अभाव असेल, त्या मानानें तो धंदा उच्चनीचता हें नांव पावत असतो. प्रामाणिकपणानें आणि सभ्यतेनें चालविलेला हरएक धंदा श्रेष्ठच आहे. या गुणांचा अभाव नसतां अमुक एका धंद्यास हलकट

ह्मणणें आणि अमुक एकास श्रेष्ठ ह्मणणें ही केवळ पोकळ स्वयंमन्यतेची क्षुद्र कल्पना होय. 'व्यापाराच्या कामाला प्रामाणिकपणानेंच चालतां येतें असें नाहीं; यामुळें व्यापार हा एक बऱ्याचशा लबाडीचा व्यवसाय होय,' अशी पुष्कळांची भलतीच समजूत झालेली असते. पण ती अगदीं खोटी होय. कोणत्याहि प्रसंगांत किंवा व्यवसायांत सद्‌गुणांचें अपथ्य बिलकुल नसावयाचें हें पक्कें लक्ष्यांत ठेवावें. सद्‌गुण अंगीं राखून ठेवण्यासाठीं जें काय धैर्य लागत असतें, त्याची उणीव असली ह्मणजे मात्र अमुक अमुक प्रसंगीं किंवा कामीं अमुक गुण वावडे आहेत असें लोकांना वाटतें; पण तो दोष त्या गुणांचें धारण करण्यासाठीं लागणारें धैर्य अंगीं नसल्याचा आहे. गुणांचा नाहीं. गुणांचें तेज चिरंजीव आहे. तें हरएक व्यवसायास शोभाच आणतें. याकरितां पैसे मिळवण्यासाठीं कालवशेंकरून कोणताहि धंदा पत्करावा लागो, जर या मनोधर्मास विसरलें नाहीं, तर कसल्याहि धंद्याची गणना खऱ्या विचारी लोकांकडून कधींहि हलक्या कोटींत व्हावयाची नाहीं. आमच्या इकडल्या प्रमाणेंच इंग्लंदामध्येंहि अद्यापि एखाद्याच्या केवळ धंद्यावरून त्याची उच्चनीचता

मानण्याची क्षुद्र समजूत आहे असें कळतें. ' सभ्य गृहस्थ' ( Gentleman ) हा जो एक सन्मानाचा सर्व साधारण शब्द तो कारागीर किंवा उदमी लोकांना लावणें कित्येक आढ्यतेच्या लोकांना बरें वाटत नाहीं, असें ह्मणतात.* अशा देशामध्यें धंद्यावरून मनुष्याच्या उच्चनीचत्वाची कल्पना करण्याची खोड लोकांना आहे; पण अमेरिकेसारख्या स्वातंत्र्यप्रिय राष्ट्रामध्यें मनुष्याच्या आंगभूत सद्गुणांवरून त्याच्या योग्यतेचें उच्चनीचत्व मानण्याचा प्रशस्थ मार्ग पडत चालला आहे असें कळतें. अर्थातच त्यामुळें उद्योगधंद्याची मर्यादा सर्वांस विस्तृत होऊन कालानुरूप किंवा मनाचे कलानुरूप फायदेवाईक असा हवा तो धंदा तिकडे

---

* विशेषत: ज्या इंग्रजी पुस्तकाचे आधारानें आम्ही हा निबंध लिहिला आहे त्या पुस्तकाच्या कर्त्यानेंच पुढें दिलेली स्वतांच्या अनुभवाची एक गोष्ट सांगितली आहे.-

"In England, the business makes the man. If a man in that country is a mechanic or working man, he is not recognised as a *gentleman*. In the occasion of my first appearance before Queen Victoria, the Duke of Wellington asked me, what sphere in life General Tom Thumb's parents were in ?

" His father is a carpenter, " I replied

"Oh! I had heard he was *a gentleman*;" was the response of his Grace.

*-Art of money getting.-*

कोणासाहि खुशाल पत्करतां येतो. काल बदलो कीं कल नसो, केवळ वडिलार्जित धंदाच गोड मानून घेऊन कसा तरी त्याजवर गुजारा करण्याचें भाग पडत नाहीं. तेव्हां कोणत्याहि उद्योग धंद्यासंबंधानें ही उच्चनीचत्वाची वृथा समजुत अगदीं घालवून न्याय्य असा व ज्यांत आपण करीत असलेल्या मेहनतीचा व आपल्यास तिजबद्दल प्राप्त व्हावयाच्या मिळकतीचा योग्य मोबदला होत आहे असा, कोणताहि धंदा पत्करावा, आणि थोर मनानें व सत्यव्रतानें त्यास शोभा व महत्व राखावें. एतद्विषयकच एका ग्रंथकारानें लिहिलें आहे कीं, शिपाइगिरीस ज्या प्रमाणें शौर्य, किंवा न्यायाचे कामीं ज्या प्रमाणें समदृष्टि, त्याच प्रमाणें उद्योग धंद्यास सचोटीचें वर्तन अति अवश्य आहे. आणि हें खरें आहे. कोणत्याहि धंद्यांत योग्यता आणि महत्व या सचोटीच्या वर्तनानेंच येतें. या करितां सभ्यता व प्रामाणिकपणा यांस बिलकुल न विसरून कष्टानें व गुणानें चांगल्या चालविलेल्या धंद्यापासून प्राप्त होणाऱ्या स्वातंत्र्याचा आणि पैशाचा दुरुपयोग न करण्याविषयीं नित्य जपत असावें. धंद्याच्या यशस्कर-

तेंच नुसतें कारणच नव्हे, तर चिनाहि हे दोन मनोधर्म आपलेसे करून ठेवण्यांतच आहे.

आपलासा करून घ्यावयाचा आणखी एक मनोधर्म उद्योगपरता हा होय. पैसा मिळवतां येण्यास या मनोधर्माची फार अवश्यकता आहे. हा आपलासा करून घ्यावयास याचा प्रतिबंधक जो आळस नामा जबरदस्त मानवशत्रु, किंवा त्यानेंच दुसरें सौम्य स्वरूप जो एक प्रकारचा निरर्थक प्रारब्धवाद यांस पिटाळून लावावें लागतें. धंद्यांत ज्याला यश मिळवावयाचें, त्यानें हीं दोन्हीं प्रतिबंधकें आपल्यांतून पार उठवून लाविलीं पाहिजेत. असें होण्यास आळस, उद्योग आणि प्रारब्ध यांच्या संबंधानें त्यानें आपली विचारसरणी नेहमीं पुढें दिल्याप्रमाणें ठेवावी.

आळसवृत्ति ह्मणजे एक प्रकारची शुद्ध कुचराई आहे. दुसऱ्याच्या कष्टाचा आपण अन्यायानें फायदा घेण्याची ती वाईट वासना होय. ही स्वतांचा घात करते, इतकेंच नव्हे तर, ज्यांच्या श्रमावर आपण असें आपल्या आळसाचें कौतुक केलें असेल, त्यांचाहि घात करते. कोणत्याहि समाजामध्यें आळशी लोक आढळले म्हणजे त्यांजवरून खुशाल असें अनुमान बांधावें कीं, त्यांच्या ऐवजीं इतकेच मेहनती

लोक त्याच समाजांत असे आहेत कीं, त्यांच्या कष्टाचा त्यांना पूर्ण फायदा न मिळतां या ऐतखाऊंची मात्र त्यांच्या निढळाच्या घामानें फुकटफाकट भर होत आहे, व तिकडे त्यांची उपासमर आहे. आशा दृष्टीनें पाहिलें ह्मणजे आळसाला मानवशत्रूची उपमा दिलेली अन्वर्थक आहे असें भासतें; आणि जे आळशी या शत्रूस आपल्या ठायीं खुशालपणीं वागवितात ते तर शुद्ध मानवद्रोहीच ठरतात. याकरितां आळसाचा सर्वांनीं त्याग केला पाहिजे. नाहीं तर निदान आळशी मनुष्यांचा तरी समाजानें केला पाहिजे. ह्मणजे आळस वाढविणाऱ्यांचें किंवा वागविणाऱ्यांचें भरणपोषण इतरांच्या श्रमावर बिलकुल न होऊं देण्याविषयीं जपलें पाहिजे. निरुत्पादक धंदा करणाऱ्या अशा ऐतखाऊ आळशांची इतरांनीं आपल्या कष्टार्जित द्रव्यानें भरती करण्याची देशबुडवी चाल असण्यापेक्षां, उत्तर अमेरिकेच्या ईशान्य दिशेस असलेल्या ग्रीनलंद नामक बेटांतील एसक्कीमो लोकांच्या कायद्यांत आहे* असें ह्मणतात, त्याप्रमाणें

* सदर्हु देशांत या विलक्षण कायद्यान्वयें असाध्य रोगानें आजारी झालेला मनुष्य, स्वोदरंभरणास असमर्थ असा पंगु आणि हातपाय थकून उद्योगधंद्यास निरुपयोगी झालेला वृद्ध अशांना ते लोक प्रायोपवेशानें मारून टाकतात! स्त्रीपुरुषबालवृद्ध कसलादी भेदाभेद पाहात नाहीत!

" उपजीवनाचें एखादें कांहीं साधन जवळ नसेल तर त्या मनुष्यास जिवंतच राहण्याचा हक्क नाहीं, त्यानें मेलेंच पाहिजे," असेंहि विलक्षण कलम असावें हें बरें ह्मणतां येईल. सारांश आळसाची किंमत याप्रमाणें आहे. ही दिवसानुदिवस लोकांना कळूं लागली आहे ह्मणूनच कीं काय नकळे, त्यानें आपलें तें स्वरूप टाकून एक प्रकारच्या प्रारब्ध वादाचे रूपानें तो लोकांत संचार करीत असलेला आढळण्यांत येतो. प्रारब्धवाद अगदींच खोटा, निदान निरुपयोगी, असें एथें सिद्ध करणें नाहीं. त्याची एक प्रकारची समजुत आह्मी पुढें दिली आहे त्याप्रमाणें तो आमच्या मतें उपयुक्तच आहे. पण उद्योगपरतेस प्रतिबंधक असा जो केव्हां केव्हां त्याचा वाईट परिणाम दृष्टीस पडतो तो मात्र अत्यंत दूष्य होय. प्रारब्ध आणि उद्योग या दोघांतून एकाची श्रेष्टता स्थापन करीत बसण्यापेक्षां दोहोंचाहि चांगला उपयोग करून घेतां येण्यासारखा आहे. आमच्या मतें हरएक कृत्य आरंभण्याच्या प्रसंगीं आपण उद्योगवादी असावें आणि त्याचा परिणाम भोगावयाचे प्रसंगीं आपण प्रारब्धवादी बनावें. अशा व्यवस्थेपासून पुष्कळ हित आहे. एकतर उद्योग आणि प्रारब्ध यांचा वाद घालीत बसण्याचें कारण

राहत नाहीं; आणि दुसरें आपला उद्योग परिणामीं सफल होवो किंवा निष्फल होवो, अशा प्रकारच्या व्यवस्थेनें तो सफल झाला म्हणून आपण अभिमाना सहि चढत नाहीं, किंवा निष्फल झाला म्हणून हताशाहि होत नाहीं. बाकी आपल्या आळसाची मिजास आपण प्रारब्धवादी बनून कितीजरी ठेवित असलों तरी बुद्धिपूर्वक चलनवलन केल्यावांचून ज्याअर्थी आपला यत्किंचित्हि व्यवहार चालत नाहीं असा नित्याचा अनुभव आहे, त्याअर्थी उद्योग आणि प्रारब्ध यांपैकीं आपल्या व्यवसायांत खरोखर कोणाचें किती महत्व मानावें हें प्रत्येकास माहीत आहेच आहे. इष्ट गोष्टीच्या प्राप्त्यर्थ आणि अनिष्ट गोष्टीच्या निवृत्यर्थ उद्योग हें साधन आपल्या हातचें आहे. तेंच आपण प्रथमतः हरएक प्रसंगीं योजलें पाहिजे, आणि तसें आपण योजिताहि असतों हा आपला नेहमींचा अनुभव ध्यानांत आणून दैवाच्या सबबीनें आपल्या उद्योगपरतेस कधींहि प्रतिबंध करूं नये. जें आपणास कर्तव्य त्यासाठीं नेहमीं यत्नशील असावें. दैवासारख्या अनिश्चित अदृष्ट गोष्टीवर अवलंबून राहण्याची किंवा लटकें समाधान मानण्याची जोंपर्यंत खोड राहील तोंपर्यंत उद्योगशीलता आ-

ल्यामध्यें कधींहि जागृत असावयाची नाहीं; आणि ती जागृत असल्यावांचून हरएक संपन्नतेच्या संबंधानें महा दीर्घ प्रयत्नी अशा परकीय लोकांच्या तावडींतून आपलें डोकें वरतीं निघण्याची आशा करणें अगदीं व्यर्थ आहे.

..............

अस्तुं, 'पैसा मिळण्याची' युक्ति ह्मणून एथवर यथामति विस्तारपूर्वक पांच सूत्रें सांगितलीं ह्मणजे (१) कांहीं तरी उपयुक्त ज्ञान किंवा गुण शिका, (२) संपादित गुणानुरूप धंदा पत्करा, (३) पत्करलेल्या धंद्याचीं भांडवल, माणसें वगैरे सव साहित्यें जवळ सिद्ध राखा, (४) धंदा सुयंत्र चालण्यासाठीं काम चोख व्यवहार रोख वगैरे कित्येक गोष्टींची खबरदारी घ्या, आणि (५)धंदा यशस्कर होण्यास धैर्य, प्रामाणिकपणा, निश्चयादि कांहीं मनोधर्म आपलस करा—हीं पांच सूत्रें सर्वांनीं ध्यानांत ठेवून त्यांस अनुसरून कोणत्याहि व्यवसायप्रवाहत ते पडले तरी परमेश्वरी कृपेनें 'पैसा मिळवण्याची' त्यांची इच्छा खात्रीनें तृप्त होईल असा आमचा सिद्धांत आहे.

# प्रकरण दुसरें.



द्रव्य मिळवण्याची प्रत्येकास इच्छा आहे; आणि इच्छा असून अत्यंत गरजाहि आहे. कारण त्याच्या आधाराशिवाय आपलें उपजीवनच कोणास सुलभ नाहीं. द्रव्याची सर्वसंमत व्याख्याच मुळीं अशी आहे कीं, " कोणासाहि पाहिजे तो जिन्नस पाहिजे त्या ठिकाणीं मिळवतां येण्याचें सोपें साधन तें द्रव्य होय " ही व्याख्या करण्याविषयीं अमेरिकेंत नुकतेंच बक्षीस लागलें होतें व त्याप्रमाणें वरील व्याख्या करणारास तें मिळालें असल्याचें कळतें. द्रव्यार्जनासाठीं प्रत्येकजण रात्रंदिवस खटपट करीत असतो; पण नुसतें द्रव्य मिळवणें एवढ्या एका गोष्टींत आणखी कांहीं गोष्टींचा अंतर्भाव करावा लागतो त्यांची माहिती असल्या शिवाय हें द्र-

द्रव्यार्जननिरूपण सांग होत नाहीं. याकरितां या प्रकरणांत त्या गोष्टींचा क्रमाक्रमानें विचार करूं.

## पैसे न्यायानें मिळवावे.

अन्यायानें मिळवूं नयेत. ह्मणजे कोणाचे घातपात करून, मुंड्या मुरगाळून, अधिकाराच्या जोरानें अपहार करून, अवद्यानें तोंडांत दाकून, लोकांस फसवून, अशा रीतीनें द्रव्यार्जन नसावें. हें सहसा कधीं पचत नाहीं, आणि उघाडीस आलें ह्मणजे 'समूलंच विनश्यति' समूळ नाहींसें होतें. शिवाय द्रव्यार्जनाचे इतर चांगले सरळ व प्रशस्थ राजमार्ग असतां, अशा गैररस्त्यानें जाणें हें चांगलें नाहीं. ज्यास ते प्रशस्त मार्ग माहीत नसतात तेच अशा आडवाटेनें द्रव्यार्जन करूं निघतात. साहस, निश्चय, चतुराई, सावधपणा, वगैरे जे गुण, या दुर्गुणानें द्रव्यार्जन करण्यांताही मनुष्याला राखावे लागतात, त्यांहून कांहीं देखील अधिक गुणांची गरज राजमार्गानें द्रव्यार्जन करण्यास लागत नाहीं. मग अन्यायानें द्रव्यार्जन करून मनाची शांति नष्टविणारी पीडा जन्मभर मागें लावून घेण्यांत काय अर्थ आहे बरें?

धनप्राप्तीचा न्यायमार्ग बिलकुल अवघड नाहीं. फारच सोपा आहे. डा० फ्रँकलिन् नामक एका प्रसिद्ध अमेरिकन पुरुषानें ह्मटलें* आहे त्याप्रमाणें तो रस्ता "एखाद्या प्रसिद्ध ठिकाणच्या भर रहदारीच्या रस्त्या प्रमाणें सहज गम्य आहे." याकरितां त्याचेंच अवलंबन करावें. कुमार्गांत शिरण्याची कांहीं देखील गरज नाहीं. भिक्षा मागून, जुगार खेळून, चोऱ्या करून, मिळवलेला कुमार्गजन्य जो पैसा असतो, तो आपणास जितका मिळाला असेल, तितका आपल्याच पैकीं कोणाचा तरी कमी होऊन आपणास मिळालेला असतो. त्यामुळें व्यक्तिदृष्टीच्या जरी आपण तो पैसा मिळवला असें दिसतें, तरी समाजदृष्टीच्या कांहीं त्यांत नवीन द्रव्य संपादन केलें असें होत नाहीं, ही संपत्तीची वृद्धि नव्हे. परंतु तेंच शेतकी करून, व्यापार करून, नवे नवे कारखाने काढून, अशा प्रकारें सन्मार्गजन्य जो पैसा मिळवावा, तितकी आपल्या केवळ व्यक्तीच्याच नव्हे तर एकंदर समाजाच्याहि संपत्तींत नवी भर टाकल्या प्रमाणें

*Dr. Franklin says, " The road to wealth is as plain as the road to Mill "

होतें. ह्याकारितां अशाहि दृष्टीनें न्यायानें पैसा मिळवला पाहिजे, या गोष्टीचें महत्व व अगत्य दिसून येतें.

अतिदाक्षिण्ययुक्तानां शंकितानां पदे पदे ॥
परापवादभीरूणां दूरतो याति संपदः ॥

"लोक काय ह्मणतील याची पर्वा केली, हें करूं कां नको करूं अशी शंका मनांत आणली, ज्यांत त्यांत फार चौकशी ठेवली, ह्मणजे पैसा मिळत नाहीं;" या कारितां वेळेस प्रसंग येईल तसें हवें तें करून पैसे मिळवावेत, असा कोणाचा समज असतो. पण ही चूक वरील सुभाषिताचा 'मनःपूतं समाचरेत्' या एका लोकप्रसिद्ध वचनाच्या समजाप्रमाणें विपरित अर्थ मनांत आणल्याचा परिणाम होय.

उत्साहसंपन्नमदीर्घसूत्रं
क्रियाविधिज्ञं व्यसनेष्वसक्तं ।
शूरं कृतज्ञं दृढसौहृदंच
लक्ष्मीः स्वयं याति निवासहेतोः ॥

या सुभाषितांत लक्ष्मी सहज वश होण्याचे गुण वर्णिले आहेत, त्यांच्यांतील कित्येकांच्या प्रतिगुणांचा वरील वचनांत निषेध करून पैसा मिळवण्यास

ते प्रतिगुण किंवा दुर्गुण बाधक होतात असें सांगितलें आहे. वाईटबुऱ्या वाटेल त्या मार्गानें पैसा मिळवावा असा त्यांत अनर्थक उपदेश नाहीं. द्रव्यार्जना संबंधानें एक सुभाषित कंठमणी करून जवळ बाळगण्या सारखें आहे, तें असें—

अकृत्वापरसंतापमकृत्वाखलनम्रताम् ।
अनुसृत्यसतांवर्त्मयत्स्वल्पमपि तद्बहुः ॥

ह्मणजे, " दुसऱ्यास ताप न देतां व दुष्टांपुढें नीचपणा न पत्करतां, थोरांच्या मार्गास अनुसरून जें द्रव्य मिळतें तें थोडें असलें तरी फारच आहे." फारच सुंदर वचन हें ! असो. यानंतर दुसरा मुद्दा—

## पैसे काटकसरीनें राखावे.

न्यायानें पैसा मिळवतां येणें हें जसें अगदीं सुलभ आहे, तसेंच काटकसरीनें राखणेंहि अवघड नाहीं. अगदां थोडक्या शब्दांत तें सांगायचें म्हटलें ह्मणजे इतकें कीं, तुमची जितकी वास्तविक मिळकत असेल त्याच्या आंत तुमचा खर्च ठेवा ह्मणजे झालें. आपल्या मिळकतीपेक्षां कांहीं तरी कमी खर्च करीत चला, ही व्याख्या किती तरी सोपी आहे ! आणि जशी ती सोपी आहे, तशीच ती पुष्कळांना

माहीताहि आहे. मिळकतीपेक्षां कमी खर्च करणें याला सामान्यतः काटकसर ह्मणतात. अशा काटकसरीनें वागलें ह्मणजे अर्थातच कांहीं पैसा शिल्लक राहत जातो. परंतु आपण मिळवलेला पैसा नेहमीं काटकसरीनें वागून वांचवीत जाण्याचें धोरण ठेवीत गेलें ह्मणजे मग त्याचा आपणास उपभोग तो कसा घेतल्याप्रमाणें होणार, ही एक पुष्कळांना शंका असते. याकरितां काटकसर या शब्दासंबंधानें थोडें जास्त विस्तारानें सांगितलें पाहिजे. काटकसर या शब्दाविषयीं विपरीत समजूत बाळगून कांहीं लोक मिळालेल्या संपतीचा पुरता उपभोगहि घेत नाहींत आणि कांहीं त्यांपैकीं अवश्य तितका जवळ संग्रहहि राखीत नाहींत. "आद्यापेक्षां खर्च मोठा, त्याचा होतो खचित तोटा" ही ह्मण सर्वांना माहीत आहे. त्याचप्रमाणें वर्षाचा मिळकत शंभर रुपये असतां [ फार नव्हे पण ] एकशें एक रुपयांचा खर्च ठेवणें ह्मणजे आपली स्थिति ओढगस्त करून घेणें होय; आणि शंभर रुपयांच्या मिळकतीला नव्याण्णव रुपयांचा खर्च असणें ह्मणजे त्या सारखी सुखसमाधानाची स्थिति दुसरी नाहीं, हा

हिशेबहि सर्वांना कळत असतो. ह्मणजे काटकसर हा शब्द सर्वांच्या फार परिचयाचा आहे, इतकेंच नव्हे तर, तो बहुतेकांच्या वागण्यांतहि एकानेक प्रकारें भासमान देखील होत असतो. परंतु या सर्वांची काटकसरीच्या वास्तविक स्वरूपाविषयीं समजूतच पुष्कळ विपरीत असल्यामुळें त्यांचा तिच्याशीं इतका परिचय किंवा तिचें आपल्या वागण्यासवरण्यांत कांहीं ना कांहीं अवलंबन हीं निरुपयोगी होतात; आणि त्यांना शेवटीं असमाधानाचे उद्गार काढीत स्वस्थ बसावें लागतें. पुष्कळांची काटकसर "Penny wise and foolish Pounds," या इंग्रजी ह्मणीसारखी असते. ह्मणजे अशीं माणसें देवपूजेच्या वेळीं देवाला गंध वाहावयाचें त्यांत मोठी सूक्ष्म दृष्टि ठेवून गंधाचे ऐवजीं गंधगोळ्या वाहून तें वांया जाऊं न देण्याची खबरदारी घेत असतील, आणि तोंच दुसऱ्या अनेक गोष्टींत त्यांचा निरर्थक खर्च बेलाशक उधळेपणानें होत असलेला दृष्टीस पडेल. त्याचप्रमाणें त्यांच्या आंगावरील कपड्यांला बरींच ठिगळें मारलेलीं असताल; अथवा बाजारांतून

कोणताहि जिन्नस आणतांना सतरा दुकानीं त्याच्या भावाबद्दल त्यांची घासाघीस चालेल आणि इतर खर्चीच्या बाबतींत त्यांचाच अनेक ठिकाणीं पुष्कळ उधळेपणा दिसून येईल—म्हणजे पायानें चालण्याची चांगली शक्ति असतांहि केवळ चैनीसाठीं ते भाड्याच्या गाडींत बसून जाणारे असतील, किंवा कांहीं एक कारण नसतां उगीच नको त्या वस्तू खरेदी करून त्यांचा संग्रह करण्याची त्यांना खोड असले, अथवा एखाद्या लहान मोठ्या व्यसनाचें त्यानीं उगाच एक लिगाड आपल्या गळ्यांत बांधून घेतलेलें असेल. सारांश, नाहीं त्या ठिकाणीं अथवा कोणत्या तरी एखाद दुसऱ्याच ठिकाणीं मात्र तेवढा काटकसरीचा मोठा डौल घालून बाकीच्या निरर्थक खर्चाचे मार्ग खुशालपणीं मोकळे आहेत अशीच बहुतेकांची स्थिति आढळून येते. आणि हींच सर्व माणसें आपल्याला काटकसर या शब्दाचा खरा अर्थ समजतो व आपण कधींहि व्यर्थ खर्च न करण्याविषयीं फार जपणारे आहों अशा घमें-डींत असतात. पण ही त्यांची केवळ भ्रांति आहे. निरर्थक खर्च न करणें व खर्चाचें मान मिळकती-

च्या आंत राखणें एवढ्यांत सर्व काटकसर या शब्दाचें सार आहे. यां पैकीं मिळकतीच्या आंत खर्च राखणें ही बाब सर्वांस सहज समजण्यासारखी आहे. पण दुसरा मुद्दा—

## पैसा निरर्थक खर्च करूं नये,

ह्या विधानाविषयीं मात्र पुष्कळांना मोठा घोंटाळा वाटेल. आपल्या खर्चांत अमुक ह्मणजे निरर्थक खर्च आहे असें सहसा कोणाच्या मनांत येतच नाहीं. याचें कारण फक्त आपल्या खर्चाकडे तितकें विचारपूर्वक अवलोकन लोकांचें नसतें हेंच होय. साधारणपणें एक हातींच कारभार असल्यामुळें हिशेबठिशेबाची हयगय राखली जाऊन येईल ती जमा, होईल तो खर्च, राहील ती शिल्लक, असाच व्यवहार असतो. तेव्हां त्यांत सार्थनिरर्थकतेची निवड व्हावी कशी! ती होण्यास अगोदर आपला जमाखर्च नित्यनेमानें टिपून ठेवण्याची संवय प्रत्येकानें राखली पाहिजे. हवेचें मान दाखविणारें ज्या प्रमाणें वायुमापक यंत्र किंवा काळाची गती दाखविणारें ज्या प्रमाणें कालमापक यंत्र त्याप्रमाणेंच टिपलेला जमाखर्च

हें एक आपल्या आयव्ययाचें मान नित्यशः आपल्या डोळ्यापुढें राखणारें वह्याळच आहे, असें एका ग्रंथकारानें म्हटलें आहे. हें आयव्यय. मापक यंत्र आपलपाशीं नेहमीं सिद्ध राखून त्या- जवरूनच कांहीं दिवस पुढील युक्तीनें आपल्या खर्चांतल्या बाबींमधील सार्थनिरर्थकतेचा भाग नित्य निवडून पाहतां येतो. त्याचा प्रकार असा कीं, हिशेब टिपण्यामध्यें ज्या प्रमाणें 'जमा' आणि 'खर्च' अशीं दोन वेगवेगळीं सदरें असतात, त्याचप्रमाणें एका वेगळ्या वहींत दोन सदरें घा- लून त्यांपैकीं एकाच्या मथळ्यावर "अवश्य नि- र्वाहाच्या बाबी" आणि दुसऱ्याच्या "केवळ चैनीच्या बाबी" अशीं नांवें मांडावीं; आणि आप- ल्या नित्याच्या खर्चांतून रकमा ह्या दोन सदरां- मध्यें विभागीत जाव्या. म्हणजे थोड्याच अव- काशांत आपल्याला आपल्या आयव्ययांतील नि- रर्थक गोष्टींचा चट्कन् बोध होऊं लागून त्यांच्या विषयीं आपण खबरदार रहात जाऊं.

### पैशाचा सत्कारणीं व्यय करावा.

म्हणजे, आडल्या पडलेल्यांचें आपण यथाश- क्ति उपयोगी पडावें, सार्वजनिक हित होण्या-

सारखी परोपकारवृत्ति ठेवावी, दीनदुबळे, असहाय अशा स्थितींत त्यांचा परामर्श घ्यावा इत्यादि प्रकार होत. अशा बाबींत लक्ष पुरविणें व यथाशक्ति वेंच करणें हें, कित्येक आपस्वार्थी लोकांच्या समजुती प्रमाणें केवळ ऐहिक लौकिकाच्या आशेकारितां किंवा कित्येक परमार्थी लोकांच्या समजुती प्रमाणें केवळ पारात्रिक मोक्षाच्या लाभाकरितां होय असें असतें; पण एथें त्यांतील दोन्ही उद्देश नव्हत; तर हा प्रकार आपल्या एक अति अवश्य कर्तव्यापैकीं आहे, तो आपण आपल्या ऐपती प्रमाणें करीत गेलेंच पाहिजे व तो अशा स्वार्थी परमार्थी उभय प्रकारांतील केवळ मध्यस्थ समजुतीनें करावा असें सांगणें आहे. कोण केव्हां कोणत्या स्थितींत येईल याचा कांहीं एक नियम नसतो. आपण आपल्या असहाय स्थितींत इतरांच्याच ऐपतीवर ज्या प्रमाणें वाढत असतो, किंवा आपणास वाढावें लागतें आणि तसें वाढत आलेलोंहि असतों, त्याचप्रमाणें आपलीहि ऐपत इतरांच्या असहाय स्थितींत त्यांना यथायोग्य उपयोगी राखणें हें आपणास अवश्य आहे. हा एक योग्य मोबदला आहे किंवा कारण प्रसंगीं आपणासच कधीं उपयोगी पडणारी ही

एक अत्यंत जरूरीची पुढील तरतूदच आहे. गरीबगुरिबांच्या उपयोगा पडणें यांत कित्येक अल्पविचारी आर्वाचीन अर्थशास्त्रज्ञ ह्मणविणारांना निरर्थक खर्च वाटता आणि कित्येक महाधर्मभोळे दांतजन यांतच अनर्थक द्रव्य खर्च करीत असतात ! हे दोन्ही प्रकार वाईटच. ज्यांना स्वतांचे पायावर उभें राहण्याची इच्छा आहे, परंतु जे प्रसंगानें गरजवंत स्थितींत आले आहेत, अशांनाच माह्य केलें पाहिजे. सत्कारणी व्यय ता हा होय. परंतु भल्याबुऱ्यांची निवड करण्याची तसदी न घेतां सरसकट परोपकारवृत्ति ही अनर्थक आहे. हींत योग्य मोबदला होत नाहीं; हिच्यापासून स्वतांची तरतूद नसते; आणि आळशी व्यसनी, उनाड, ढोंगी अशा दुर्गुणवर्धकांना विनाकारण पोसल्याचा अभिशाप माथीं येऊन स्वतः मात्र लवकर गरजवंत स्थितींत जाऊन पडण्याचा, प्रसंग येऊं लागतो.

## पैसा सदुद्यमानें वाढवावा.

पैसा मिळविण्याच्या अंगभूत ज्या इतर गोष्टींचें एथपर्यंत थोडथोडें निरूपण करीत आलों आहों, त्यापैकीं " पैसा सदुद्यमानें वाढविणें " ही आतां शेवटची गोष्ट आहे. एक तऱ्हेनें मिळत असलेला

पैसा स्वकीय निर्वाहासाठीं अवश्य तेवढा खर्चून बाकी त्याच किंवा माय असेल तर अन्य तऱ्हेनें वाढीस लावतां आला पाहिजे. पैसा खेळता राखावा लागतो. लक्ष्मीचा स्वभाव चंचल असा वर्णन केला आहे त्याचें तात्पर्य येथें आहे. पैसा पुरून ठवणें किंवा अनावश्यक जिनसांत तो अडकवून पाडित राखणें, ह्मणजे त्याच्या स्वभावाविरुद्ध त्यास वागविणें होय. आणि स्वभावाविरुद्ध वागविल्यानें तो आपणास कधींहि हितकर व्हावयाचा नाहीं. सदुद्यमामध्यें खेळता राहिलेला पैसा वाढीस लागून आपल्या एकट्याच्या उपयोगी असतो असें नव्हे, तर तो इतरांच्याहि अल्पबहुत निर्वाहास साधनीभूत होऊन अनेकांच्या उपयोगी पडतो. याकरितां योग्य खर्चवेंच संभाळून मिळवलेला पैसा व्यर्थ पडूं न देतां सदुद्यमांत तो वाढीस लावीत जावा. तो एखाद्या सदुद्यमांत वाढीस लावण्याची दगदग व्यक्तिविशेषीं स्वतः उरकण्यासारखी नसल्यास ज्यांच्यांत तें सामर्थ्य आहे अशांच्या हवालीं, त्यांजबद्दल व्याजाचे रूपानें योग्य तें भाडें घेऊन व न बुडूं देण्याची अवश्य ती खबरदारी ठेवून तो करावा. कोणीकडून तरी त्यास खेळता राखून स्वस्थ पडूं देऊं नये. क

ल्पना करूं कीं, एका मनुष्याजवळ ५०० रुपये आहेत. ते त्यानें एखाद्या कृपणाप्रमाणें पुरून ठेवले तर पंचवीस वर्षांनीं फार झालें तर ते जसेच्या तसेच राहतील, व त्यानें एखाद्या अर्थशास्त्रशून्य मूढा प्रमाणें दागिन्यासारख्या वस्तूंत पाडित राखून ठेवले, तर तितक्याच अवधींत त्याला निदान त्यांत बरीच दागिन्यांची झीज होईल त्या रूपानें तूट येईल पण तेच त्यानें शेकडा बारा आणे व्याजाला एखाद्या उद्यमांत गुंतविले तर दरसाल त्याच्या त्या पांचशें मुद्दल रुपयांत आणखी ४५ रुपयांची भरती होत जाईल. शिवाय त्याचें तें मुद्दल एखाद्या कारखान्याचें पोषक होऊन त्याजवर कित्येकांचा चरितार्थ चालत राहील तें श्रेय वेगळेंच.

असो, तर्‍हां पैसा मिळवणें एवढ्या एका विधाना बरोबर त्यांत ज्या कांहीं सामान्य पोटविचारांचा अंतर्भाव होण्यासारखा होता त्याचें एथपर्यंत सामान्यपणें विवेचन केलें, त्याचें तात्पर्य उत्तम प्रकारें ज्यांत संकलित केलेलें आहे असा एक सुभाषित श्लोक शेवटीं सांगून हें प्रकरण पूर्ण करूं.

अलब्धमीहेद्धर्मेण लब्धं यत्नेनपालयेत् ॥
पालितं वर्धयेन्नीत्या वृद्धं पात्रेषु निक्षिपेत् ॥

// द्या टाळी पाहूं!





छापावयास उपयोगी पडण्यासारखें अनेक प्रकारचें कोरींव काम विलायती लांकडावर आणि धातूंवर मुदतशीर, माफक किंमतींत आणि मनासारखें करून देऊं.

पत्ता—अनंत वामन वरवे, शनवार पेठ, पुणें.